# लोकसाहित्याचें लेणें



म. ग्रं. सं. ठाणें
विषय

REFBK 0007846
REFBK-0007846

— सौ. मालती दांडेकर

११०८
काव्य
७४३९
११।३।७१

१९८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७४३९ वि: काव्य
क्रमांक १९८६ नों दि: ११।३।७१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथोत्तेजक
समृद्धि योजना
१९७०

# लोकसाहित्याचें लेणें

: लेखिका :

सौ. मालती दांडेकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८४६
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0007846

REFBK-0007846

एकमेव विक्रेते

महाराष्ट्र ग्रंथ भाण्डार, कोल्हापूर.

१९५२

प्रकाशक : मा. ल. दांडेकर
बुधगांव ( सातारा )

पुनर्मुद्रण, उतारे वगैरेचे सर्व हक्क लेखिकेकडे.

मूल्य ६ रु.

मुद्रक : मा. कृ. सहस्रबुद्धे,
श्रीज्ञानेश्वर प्रेस, कोल्हापूर.

ज्यांनीं हें बहुमोल साहित्य दिलं,
त्या माझ्या सर्व
मराठमोळा मैत्रिणींना
कृतज्ञतापूर्वक
अर्पण

—सौ. मालती दांडेकर

# थोडेसें हितगुज

किती तरी दिवसांपासून मनांत या पुस्तकाची रूपरेषा घोळत होती. मे १९४९ मध्यें स्त्री मासिकांत प्रसिद्ध झालेलें "मंजूचें जीवनगीत" मला लिहावयाचें होतें व त्यासाठीं थोड्याशा स्त्रीगीतांची मला जरूर होती, त्यामुळें माझं लक्ष या स्त्रीविरचित गीतांकडे वेधलं गेलं.

माझ्या गांवीं, घरालगतच कित्येक मराठमोळा घराणीं आहेत. रोज पहांटे चारापासूनच जात्याचा आवाज कानीं पडून जाग येते. या जात्याच्या आवाजांतच उंच स्वरांत गृहिणींनीं म्हटलेलीं गीतें कानीं पडूं लागतात. पुष्कळदां मनांत येई कीं हीं गीतें आपण अभ्यासावीं, आणि कृषिप्रधान जीवनाच्या साक्षी त्यांत आहेत काय, तें पहावें. मंजूच्या जीवनगीतानें त्याला चालना दिली. त्या लेखासाठीं मी या ओव्या जमवूं लागले आणि केवढं आश्चर्य! दरेक भगिनीला या गीतांचें पाठांतर आहेच असें मला आढळलें! किती मार्मिक अन् सहजसुंदर गीतं होतीं तीं! त्यांचा एक संग्रह करायचा असं ठरवून त्या उतरून घ्यायला मीं सुरुवात केली. माझ्या लेखाला जरूर असणाऱ्या ओव्या तर मला एकदोन दिवसांतच मिळाल्या. परंतु महिन्याभरांतच माझ्या संग्रहाला बरींचशीं गीतें जमलीं. आणि मग अशा प्रकारचीं मिळतील तेवढीं गीतें जमवून रसिकांना सादर करण्याची कल्पना माझ्या मनांत घोळूं लागली.

परंतु हें काम किती कठिण आहे याची मला लवकरच कल्पना आली. आधीं पांढरपेशा स्त्रियांत व कामकरी स्त्रियांत शिक्षणाच्या आणि राहणीच्या फरकानें फार परकेपणा उत्पन्न झालेला आहे. आम्ही त्यांच्या झोंपड्यांतून कधीं जाऊन बसत नाहीं नि त्याहि आपलीं शेतीभातीचीं कामं सोडून कधीं कोठें फारशा जात नाहींत. यामुळें घरोबा तर दूरच राहिला, पण साधा स्नेहभावहि शिक्षित व अशिक्षित कुटुंबांत आढळणं दुर्मिळ झालं आहे. दुसरी गोष्ट भाषेचा फरक. त्यांचीहि मायबोली मराठीच. परंतु त्याहि भाषेची

एक विशिष्ट अशी घडण आहेच. तिचा जर नीट परिचय नसेल तर मानसिक अंतर कायमच राहणार, हें उघडच आहे. सुदैवानं मला खेडेगांवांतच अनेक वर्षं राहतां आलं असल्यामुळं ही अडचण मला नव्हती. पण यानंतरची अडचण म्हणजे स्वतःच्या निरक्षरतेची जाणीव असल्यामुळें मिळूनमिसळून वागण्याबोलण्यांत उत्पन्न होणारा एक प्रकारचा बुजरेपणा, संकोच, आणि लाजाळूपणा. साधं कांहीं विचारलं तरी — "—आम्हां अडाण्यांना कशाचं काय येतंया ? त्यामंदी सांगायाजोगं काईबी न्हाई; जात्यावर काय तरी म्हनायचं. त्यामंदी काय शिकवायाचं तुम्हांला ? उगंच थट्टा हुईल."

अशा प्रकारचीं उत्तरें येऊं लागलीं. कोणी कोणी सांगितलें, "आम्हांला जात्यावरच फक्त गीतें आठवतात. एरवीं आठवत नाहींत. तर तुम्ही घरीं येऊन आमच्या दळणाच्या वेळीं जवळ बसा अन् उतरून घ्या."

तोहि प्रयत्न मीं केला. परंतु एकेक ओळ ४–४ वेळां बोलून व अतिशय उंच स्वरांत म्हणण्याची पद्धत; त्यामुळें मला शब्द नीटसे त्यांतून उमजेनात. माझ्या घरीं मीं पुष्कळजणींना बोलावण्याचा प्रयत्न केला. तेव्हां त्यांनीं घरीं तेंहि पसंत पडणार नाहीं म्हणून सांगितलें. शिवाय कांहीं उच्चवर्गीय घराण्यांत अजूनहि गोषापद्धत चालते. त्यामुळें त्या गृहिणींना गीतें येत असूनहि त्या एकत्र जमणें अशक्य होऊन बसलें. कित्येकजणींनीं स्पष्टच सांगून टाकलें, कीं आम्हांला मुळींच मोकळा वेळ नसतो; पण आमच्या घरीं तुम्ही आलांत तर कामंधामं करतांना, भाकरी भाजतांना हीं गीतं आम्ही सांगूं आठवून !

शेवटीं याच मार्गाचा अवलंब करून हीं गीतं मीं जमवलीं आहेत. तिखट कुटणाऱ्या मराटमोळा गृहिणीजवळ बसून उधळलेल्या खाटामुळें जीव कासावीस होत असतांना यांतल्या चाळीस पन्नास ओव्या मीं उतरून घेतल्या ! तर बाजूला जोंधळ्याचीं ताटं पडलेलीं आहेत, एकीकडे शेतकऱ्याची गृहिणी धान्याचीं कणसं झोडपीत आहे व हंसत गीतें सांगत आहे अशाहि गोड आठवणी आज मनांत येतात. कधीं एकाद्या घरांत समोर शेळी, डाव्या हाताला म्हैस नि उजव्या हाताला कडब्यांचीं ताटं अशाहि

जागीं आम्ही वसत असूं. कुठें कुठें शेवया चारपांचजणी मिळून करीत. तेथें तर एकमेकीच्या चढाओढीनं मला ओव्या मिळालेल्या आहेत. कधीं त्यांच्या रडणाऱ्या तान्हुल्याला मी खेळवीत असें. त्यावेळीं सहजस्फूर्त बाळजीवनाच्या ओव्या आईच्या ओठावर यायच्या. या सर्व ओव्यांत मोलमजुरीनं कामं करणाऱ्या माझ्या कित्येक गरीब मैत्रिणींनींहि अमोल अशी मदत केलेली आहे. एकीकडे भांडीं घासतां घासतां रोज स्वतांशींच गीतें गुणगुणत बसणारी कोंडाबाई, नव्या दोन ओव्या आठवल्या कीं हातांतलीं भांडीं टाकून धांवत येऊन मला सांगणारी अंबू, रेशन दुकानांत झाडलोट करणारी परंतु अगत्यानं घरीं येऊन ओव्या देणारी बाळाबाई, माझ्या एका श्रीमंत मैत्रिणीजवळ राहून तिच्या बाळाला खेळवतां खेळवतां आनंदानें गाणीं म्हणणारी सुगंधा या सर्व मैत्रिणींनीं अगदीं आपुलकीनं मला या संग्रहांतलीं अनेक गाणीं दिलीं. जन्मांध असल्यानं केवळ ओव्या हेंच रंजन असलेल्या नट्टुबाई भगत या स्त्रीनें तर हौसेनें दोनतीनशें गीतें दिलीं आहेत ! गीतांच्या या दुव्यानं आमच्यांत कायमचीं स्नेहबंधनेंच निर्माण झालीं आहेत, हें मला कृतज्ञतापूर्वक सांगितलें पाहिजे.

याहि समाजांत पाटील, खोत, मळेकरी असे सधन लोक आहेत. यांच्या घरांतून मी जीं गीतें मिळवूं शकलें तीं सर्व समाजदर्शनाच्या, चाली-रीतीच्या दृष्टीनं उल्लेखनीय आहेत. बैलांसंबंधीं, शेतांपिकांसंबंधी भरपूर ओव्या या स्त्रियांच्या रोजच्या पाठांतरांत आहेत. यांतल्या कांहीं कांहीं मुली अलीकडे शिकूं लागल्या आहेत. अशा चुणचुणीत मुलींनींहि मोठ्या हर्षानें मला अनेक गीतें मिळवून दिलीं आहेत. वृद्ध स्त्रियांनीं "आम्ही फक्त देवाला गीतं गातों" असं म्हणून भाविकतेचं सर्व प्रकरण सजवलं आहे, तरुण गृहिणींनीं घेतलेल्या लाजेच्या, भीडमर्यादेच्या बुरख्यांतून पतीसंबंधींचीं शृंगारिक वा वर्णनपर गीतें मिळवण्यास मला किती तपश्चर्या करावी लागली, किती सायास पडले, माझें मलाच माहीत ! परंतु त्यांचीहि मी जिवलग मैत्रीण झालें व अनेक हृद्य गीतें त्यांनीं मला प्रेमानें दिलीं. कसुदा, दुरपती, तारू इत्यादि माझ्या तरुण मैत्रिणींचीं हीं शृंगारिक व नाजूक भावनांचा

आविष्कार करणारीं गीतें देतांना त्यांची जी गोड धांदल उडाली होती ती आठवून अजून मला गंमत वाटते !

मला मिळालेल्या ओव्यांतून अर्थातच कौटुंबिक ओव्यांचा प्रमुख भरणा होता. परंतु समाजनिरीक्षकाला फक्त कुटुंबजीवनच पाहून चालत नाहीं. त्यासाठीं दैनंदिन व्यवसाय, आर्थिक परिस्थिति, सामाजिक प्रश्न, शिक्षण, चालीरीती, धार्मिक—नैतिक कल्पना इत्यादि पुष्कळच गोष्टींची माहिती असणें जरूर आहे. यासाठीं मला सर्व वयाच्या व अनेक गांवांच्या भगिनींकडून अशा प्रकारच्या गीतांचा संग्रह करावा लागला. या कामांत सुमारें शंभरदीडशें मराठमोळा भगिनींच्या मीं गांठीभेटी घेतल्या व सुमारें दोन वर्षं या निमित्तानें मी सातारा प्रांतांतील अनेक गांवीं हिंडून ही दौलत कणाकणानं जमवली. त्यामुळें कृषिजीवनासंबंधीं व समाजदर्शनासंबंधीं उपयुक्त अशा खूपच ओव्या मला मिळाल्या.

यानंतर कठीण काम म्हणजे, वाचणाराला या ओव्यांतलें सौंदर्य, भाषेच्या वेगळेपणामुळें व कृषीवलांच्या सत्यजीवनाचा पूर्ण परिचय नसल्यामुळें एकदम मनांत भरत नाहीं, त्याबद्दल सोपे परिचयलेख लिहिण्याचें ! अर्थात् हें अवघडच काम होतें. कारण मूळ ओव्यांचा मार्मिकपणा आणि सहजसुंदरता मला या दिग्दर्शनांत साधेल कीं नाहीं याबद्दल मन साशंक होतेंच. तथापि माझ्या अल्पमतीनुसार मी प्रत्येक प्रकरणाला परिचयलेख लिहिला आहे. खेडुतांच्या संगतींत जीं वीस वर्षें मीं घालवलीं त्यामुळेंच हे परिचयलेख तरी मी लिहूं शकलें. ओवीगीतांकडे रसिकांचें लक्ष वळावें, "बायकी ओव्यांत काय मोठं आहे ?" अशी उपेक्षा न करतां यांतलेहि वाङ्मयगुण जनतेसमोर यावे हा मूळ हेतु.

त्याचप्रमाणें एक गोष्ट ध्यानीं घेतली पाहिजे. ती ही, कीं हीं गीतें जशीं मिळालीं तशींच येथें दाखल केलीं आहेत. त्यांच्या नित्याच्या बोलभाषेंत जे शब्द रूढ झाले आहेत तेच ओव्यांतून आलेले आहेत. ह्या भाषेचें दर्शनी स्वरूप व्याकरणदृष्ट्या अशुद्ध भासणारें आहे. कोन, क्रिस्न, सूर्ये, जिमिन, दुनव्या, डव्हाळं, कुनबी इत्यादि शब्द म्हणजे कोण, कृष्ण, सूर्य, जमीन, दुनिया, डोहाळे, कुणबी इत्यादि शुद्ध शब्दांचेच अपभ्रंश

होत हें सहज लक्षांत येणारें आहे.* परंतु हें साहित्य मिळालें त्याच रूपांत तें रसिकांपुढें मांडणें हेंच योग्य. त्यांतच त्याचें सौंदर्य आहे; हें ओळखून मी त्यांत कसलाहि बदल केला नाहीं.

परंतु ही भाषेची कांहींशी अनोळखी घडण परिचित झाली, कीं याच भाषेमध्यें घडलेलें साहित्याचें एक सुंदर लेणें नजरेस येतें व तें रसिकाला निश्चित आवडणारें आहे.

विषयाच्या सोयीसाठीं मी या गीतांचें ग्रामीण जीवन, कौटुंबिक जीवन व समाजदर्शन असे तीन प्रमुख विभाग केले आहेत. कौटुंबिक ओव्यांची संख्या फारच मोठी असल्यानं त्यांतहि माहेर–सासर असे दोन प्रमुख विभाग कल्पून, [ त्यांना जोडणारा दुवा विवाह हा असल्यामुळें ] सोयरीक हें प्रकरण या दोन विभागांमध्यें ठेवलें आहे. भाषेच्या दृष्टीनेंहि कांहीं सुंदर नमुने आढळले. विचारवंतांच्या आग्रहावरून त्यासाठीं मुद्दाम ‘ भाषेचें लेणें ’ हा छोटासा विभाग तयार करून त्यांत तीं सर्व उदाहरणें दिलीं आहेत. या विभागांत अनेक अपरिचित शब्द, नामें, क्रियापदें वगैरे आलीं आहेत. शब्दकोशाचे साहाय्यानें त्याचे अर्थ लावावे लागले. कांहीं शब्द कोशांतहि नव्हते, त्यांचे अर्थ त्यांच्यांतल्याच सुशिक्षित बंधूकडून समजावून घेऊनच दाखल करावे लागले. श्री. म. भा. भोसले यांनीं तर याबाबत बहुमोल मदत केली आहे.

या कामांत अनेक सन्मित्रांचं मला साह्य झालं आहे. मी त्यांची त्याबद्दल ऋणी आहें. भाषेचें लेणें या प्रकरणाबाबत मला आमचे स्नेही प्रो. स. शं. जोग, व कवि गिरीश ( शं. के. कानेटकर ) व श्री. कमलाकर काळे यांची बहुमोल मदत झाली आहे हें मला कृतज्ञतापूर्वक नमूद करावंसं वाटतं. कांहीं ऋणें न फिटण्याइतकीं थोर असतात. त्यांपैकींच हें एक मी मानतें.

केवळ एका सातारा प्रान्तांतूनच दोन वर्षांच्या परिश्रमांनीं मला जवळजवळ अडीच हजार गीतें मिळूं शकलीं ! मग सगळ्या महाराष्ट्रांतलें

---

*असे अपभ्रष्ट शब्द संदर्भानं ध्यानीं येण्याजोगे असल्यानें शेवटीं कोषांत दाखल केलेले नाहींत.

लोकसाहित्य किती मोठ्या प्रमाणांत असेल ? महाराष्ट्रांत असे कितीतरी प्रांत आहेत कीं तेथें अजून लोकसाहित्याची मोठी दौलत भूमिगत द्रव्याप्रमाणें जनदृष्टीपासून प्रच्छन्न अशा स्थितींत आहे. ती शोधून काढून, कणाकणानं जमवून आपल्या साहित्यभांडाराला समृद्ध करण्याचं कार्य फार मोठं, आणि महत्त्वाचं आहे. निरनिराळ्या प्रान्तांतल्या हौशी, वाङ्मयप्रेमी लोकांनीं तें मनावर घेतलं पाहिजे.

माझ्या या छोट्याशा प्रयत्नानें जर अशा प्रकारची उत्सुकता जनमनांत निर्माण केली, तर हें पुस्तक लिहिल्याचें सार्थक झालेसें मला वाटेल.

अक्षय्यतृतीया, शके १८७४. —सौ. मालती दांडेकर

**सन १९५२.**

# लोकसाहित्याचें लेणें

## ओळख


| | | |
|---|---|---|
| विभाग १ | ग्रामीण विभाग | पृष्ठ |
| | १ स्नेहसंबंध | ९ |
| | २ कृषिजीवन | २४ |
| विभाग २ | कौटुंबिक ओव्या | |
| | १ माहेर | ५३ |
| | २ बंधुराय | ७७ |
| | ३ माहेरचे आप्तेष्ट | १०२ |
| | ४ मैत्री | १०७ |
| | ५ सोयरीक | १११ |
| | ६ सासर | १३५ |
| | ७ घरधनी | १४४ |
| | ८ तान्हुलें | १७९ |
| | ९ बाळराज | १९५ |
| | १० मुलगी | २११ |
| | ११ शेजीबाई | २३२ |
| विभाग ३ | समाजदर्शन | |
| | १ समाजदर्शन | २४१ |
| | २ भाविकता | २६५ |
| | ३ स्त्रीजीवन | २९६ |
| विभाग ४ | भाषेचें लेणें | ३३३ |
| | परिशिष्ट | |
| | अपरिचित शब्दांचे अर्थ | ३५५ |

# ओळख

लोकसाहित्य हा साहित्याचाच एक समृद्ध पण 'अलिखित' अशा प्रकारचा विभाग आहे. इतर देशांतून त्याचें भरपूर संशोधन झालेलें आहे व तें संकलित स्वरूपांत जनतेसमोर आलेलेंहि आहे. आपल्या देशांतहि हें वाङ्मय खेडोपाडीं पसरलेलें आहे. जानपद कविता आजपर्यंत पुष्कळ सुशिक्षित कवींनीं देखील रचलेली आहे व ग्रामीण जीवनाची स्पष्ट कल्पना जनतेस आणून दिलेली आहे; परंतु या कवितांहून स्वतः खेडुतांनीं रचलेलें वाङ्मय पुष्कळच वेगळ्या पद्धतीचें आहे; त्यालाच लोकवाङ्मय अशी संज्ञा आहे. या वाङ्मयाची समृद्धि आश्चर्यानें मनाला गुंग करून टाकील इतकी प्रचंड आहे. यामध्यें अनेक प्रकार आहेत. लोककथा ह्या तर दरेक भाषेंत बहुसंख्य असतातच, तशा मराठींतहि असणें स्वाभाविकच आहे. याशिवाय लहान मुलांसाठीं म्हटलीं जाणारीं शिशुगीतें, बालगीतें, स्त्रियांच्या ओठांवर खेळणाऱ्या म्हणी व वाक्प्रचार, खेळांतले व लग्नप्रसंगीं घ्यावयाचे उखाणे, कहाण्या, जुनीं चालत आलेलीं गाणीं, अनेक चातुर्यकथा (उदा. बिरबल–बादशाह वगैरेंच्या), अनेक जांवईकथा, विनोदकथा हें सर्व लोक-साहित्यच म्हटलें पाहिजे.

या वाङ्मयास लोकवाङ्मय कां म्हणतात, याबद्दल एका चतुर साहित्यिकानें एक सुंदर व्याख्या केलेली आहे :

हें साहित्य लोकांनींच रचलें, लोकांसाठींच व लोकांसंबंधींच तें रचलें गेलें. म्हणून लोकांचें, लोकांसाठींच रचलें गेलेलें व लोकांनींच रचलेलें तें लोकसाहित्य !

लोकगीतांचा विभाग या लोकसाहित्यांत अत्यंत समृद्ध आहे. पुरुष-वर्गानें मोटेवर, शेतामळ्यांतून कामें करतां करतां अनेक सामुदायिक गीतें रचलीं. याशिवाय नाविक गीतें, कोळ्यामाळ्यांचीं गाणीं, वगैरेहि रचना बरीच आहे. त्याखेरीज बुद्धिमान लोकांनीं पोवाडे, लावण्या, कटाव यांचीही रचना बरीच केली आहे.

हीं लोकगीतें केव्हां निर्माण झालीं, हें सांगणें कठीणच आहे. परंतु तीं फार फार पूर्वींचीं आहेत एवढें खरें. ज्या काळीं आजच्या सुधारणा नव्हत्या, यंत्रें नव्हतीं, गिरण्या, आगगाड्या नव्हत्या, त्या वेळीं हीं गीतें जन्माला आलीं. साध्या जीवनाचें, शेतीवाडी करून सुखी असणाऱ्या

खेडुतांचें, धार्मिक भावनांनीं ज्यांचें मन पापभीरु आणि श्रद्धाळु बनलें आहे अशा समाजाचें त्यांत चित्रण आढळतें. कोणीतरी लोकगीतांना सामाजिक आरशाची उपमा दिली आहे, ती किती यथार्थ आहे! मनुष्य जें जीवन जगतो, तेंच वाङ्मयांतून तो वर्णन करणार! त्याप्रमाणेंच, लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें निर्माण केलेल्या या वाङ्मयांत सामाजिक चालीरीती, कल्पना, समाजाचें अंतरंग इत्यादि गोष्टींच्याही साक्षी पहायला मिळतात, हा वाङ्मयाच्या अभ्यासकाला एक मोठा फायदाच होतो.

लोकगीतांमध्यें स्त्रीवर्गानेंहि मोठी कामगिरी केलेली आहे. जुनीं स्त्रीगीतें, देवाचीं–सोहाळ्यांचीं गाणीं वगैरे अजूनहि प्रचलित आहेतच. पण ओवीरचना त्यांत प्रमुख म्हटली पाहिजे. ओवीवृत्त हें रचायला अत्यंत सोपें, शिवाय हें वृत्त साडेतीन चरणी अगर चार चरणीहि रचण्याची मुभा दिसून येते. कोठें कोठें तर फक्त तीन चरणीहि ओव्या आढळून येतात. याशिवाय ओव्या सुरेलपणीं गातांहि येतात. या सर्व गोष्टींमुळेंच कीं काय, स्त्रीविरचित गीतांमध्यें जात्यावर अगर झोपाळ्यावर म्हटल्या जाणाऱ्या ओव्यांची संख्या फार मोठी आढळून येते.

अद्यापहि हें ओवीगीत महाराष्ट्राच्या खेड्याखेड्यांतून जात्याच्या साथीवर म्हटलें जातें. पांढरपेशा स्त्रियांनीं ज्याप्रमाणें हजारो हजार ओव्या निर्माण केल्या त्याचप्रमाणें मराठमोळा स्त्रियांनींहि कितीतरी सुरेख सुरेख ओव्या आपल्या बोलभाषेंत रचल्या. कदाचित श्रमजीवी वर्गांत त्याचें प्रमाण अधिकच सांपडेल. कारण अजूनहि त्यांच्या जीवनांत दळणाचें काम नित्याचें ठरून राहिलेलें आहे.

दळण हा गरीब शेतकरी स्त्रियांचा बाळअभ्यासच म्हटला पाहिजे. दोन दोन तासांचा हा रोजचा कार्यक्रम गीतांच्या साथींत सोपा होतो. जात्याचा दगड ओढतांना मनासहि ओढ लागते. सुपांत दाणे भरलेले पाहून मनहि सासरमाहेरच्या आठवणींनीं भरून येतें. एक एक मुठीनं जात्याला घांस भरवतांना एक एक सुंदर ओवी सुचूं लागते! जातें पळत असतें, मनहि भराऱ्या घेऊं लागतें. पतीच्या, मुलाबाळांच्या जीवनाचीं दृश्यें नजरेसमोर साकार होतात, आईवडिलांच्या पुण्यमूर्ती दिसूं लागतात. सारें बाळपण प्रकट होतें जणुं! स्वतःचें संपूर्ण जीवनचित्र पहांटेच्या त्या एकांतांत दृष्टीस

दिसूं लागतें. मग भावनांनीं मन दाटून येऊन सहजसुंदर ओव्या ओठांवर नाचूं लागतात. एकप्रकारें हें ग्रामवासी स्त्रीचें जीवनगीतच असतें. मग त्यांत जिव्हाळा जणुं कांठोकाठ भरलेला असावा यांत काय नवल ?

पांढरपेशांप्रमाणें मराठमोळ्या गृहिणींनींहि हजारों सुंदर ओव्या रचल्या हें खरें, पण एक मोठा फरक जरूर ध्यानीं घेतला पाहिजे. त्यांचें जीवनच मुळीं पांढरपेशाहून निराळें. आवडीचे विषयहि भिन्न, त्यामुळें सुखाच्या कल्पनाहि वेगळेपणानें नटलेल्या आढळतात. पतीनें सत्तेनें एकादें कौलारू घर बांधलें तरी शेतकरी पत्नीला अस्मान ठेंगणें होऊन जातें. मुलगा मोठा होऊन मोट चालवूं लागला, त्यानें एकादा मळा केला, उंसाचें गुऱ्हाळ चालू केलें, कीं खेडुत आईला जी धन्यता वाटते ती कोठवर सांगावी ? प्रीतीच्या कल्पनाहि वेगळ्या, मर्यादेच्याहि कल्पना जास्त कांटेकोर, तसेच नोकरी पेशाहून कृषिजीवन मुळांतच अगदीं वेगळ्या घडाईचें. कृषिजीवनांत शेतीवाडी, पशुधन, मोटा, विहिरी, पीकपाणी, नांगरट, पेरणी–मळणी, पाऊस इत्यादि गोष्टींचें महत्त्व सगळ्यांत अधिक असणारच ! त्याला उद्देशून जीं गीतें आहेत तीं अर्थांतच आमच्या शहरवासी भगिनींच्या ओवीगीताहून अत्यंत भिन्न स्वरूपाचीं आहेत व हा वेगळेपणा अनेक प्रकरणांतून स्पष्टपणें नजरेस येतो. आणखीहि एक गोष्ट हें संकलन वाचतांना रसिकांनीं ध्यानीं घेतली पाहिजे. हें वाङ्मय निरक्षर स्त्रियांनीं रचलें आहे. भावनांचें चालतें बोलतें विश्व त्यांनीं जणुं निर्माण केलें हें तर खरेंच, तथापि या अज्ञात कवियित्रींवर शिक्षणाचे संस्कार मुळींच घडलेले नसल्यानें भाषेची सफाई, व्याकरणशुद्धता, हीं येथें अभावानेंच आढळतील. परंतु साध्या भाषेंत सुंदर वाङ्मय निर्माण होऊंच शकत नाहीं, असें थोडेंच आहे ? उलट सोप्या भाषेंत समर्पक वर्णन करणें हीच कला फार अवघड असते. तीहि या गीतांतून अधुनमधून नजरेंत भरण्याजोगी आहे. सहजस्फूर्त गीतांमध्यें काव्याचे सारे गुण उतरतात असें म्हणतात. त्याला अनुसरून या ओवीगीतांतून भाषेच्याहि दृष्टीनें श्रेष्ठ ठरणारी रचना आढळून येते. [ त्याचीं कांहीं उदाहरणें 'भाषेचें लेणें' या प्रकरणांत दिलेलीं आहेत. ]

या गीतांतून जें कृषिजीवनाचें व कामकरी समाजाचें शब्दचित्र नजरे-समोर उभें राहतें तें मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाहून किती तरी निराळें

असतें. शिक्षणाच्या संस्कारांनीं व भिन्न राहाणीनें आचारविचारांत देखील जमीन्‌अस्मानचा फरक होऊं शकतो, हें खरेंच, परंतु बाह्य राहणी वेगळी असली तरी एक सुंदर साम्य या स्त्रीगीतांतून चटकन् नजरेंत भरण्याजोगें आहे. तें म्हणजे भावनाविष्करणाचें ! आपले पोषाख भिन्न असतील, भाषा निराळी असूं शकेल, रीतिरिवाज, कुलाचार थोडे वेगळेहि असतील ! फार काय, धार्मिक, सामाजिक जीवनाच्या कल्पनांतहि मोठा फरक दिसेल; नाहीं असें नाहीं. पण मानवी हृदय तर चहूंकडे सारखेंच ना ? मातृप्रेम, भावाचा जिव्हाळा, जातकुळीचा अभिमान, सृष्टिसौंदर्याचें वेड, देवावरील श्रद्धा, रसिक वृत्तीच्या साक्षी, लेकराचं वात्सल्य, प्रणयाची उत्सुकता, इत्यादि ज्या ज्या भावना आपल्या जीवनांत मिसळलेल्या आहेत, त्याच याही जनतेच्या जीवनाचा आधार असतात, हें तर खरें ना ? आणि ह्यामुळेंच या गीतांतला खरा जिव्हाळा कोणासहि सहज पटण्यासारखा आहे; कारण हें मानवी मनाचें अगदीं सत्यदर्शन आहे. शेतकरी कुटुंब कदाचित् निरक्षरहि असेल. पण त्यांचें हें भावनांचें रम्य जग खरोखरच दर्शनीय आहे. 'काव्य' म्हणजे काय हें त्यांना कदाचित् सांगतां येणार नाहीं. परंतु त्यांच्या साध्याभोळ्या जीवनक्रमांत 'काव्य' कसें भरून राहिलें आहे याची साक्ष हीं गीतें देऊं शकतील.

अर्थात् आणखी एक महत्त्वाची बाब ध्यानीं घेणें जरूर आहे. ही सर्व रचना स्त्रीनिर्मित असल्यामुळें, समाजाचें किंवा जीवनक्रमाचें यांत जें जें वर्णन आलें आहे, तें कांहींसें एकांगी आहे. स्त्रीनें अत्यादरानें पुरुषवर्गाबद्दल विचार करावा, त्यानें वाममार्ग पत्करला तरीहि सोसून राहावें, शिक्षणाबद्दल उपेक्षेचा दृष्टिकोन ठेवावा, नवस, दृष्ट, इत्यादीबद्दल भोळसर समजुती मनांत ठेवाव्या व अंधश्रद्धेनें जीविताकडे पहावें हा सर्व दृष्टिकोन मर्यादित क्षेत्रांत वावरणाऱ्या, अल्पसंतुष्ट स्त्रीवर्गाचा आहे हें चिकित्सकाला विसरून चालणार नाहीं. मराठमोळा समाजाचें हें स्त्रीनें, स्त्रीच्या दृष्टिकोनांतून केलेलें वर्णन आहे. म्हणूनच कीं काय, पुरुषांचे कपडे, संवयी, रूप, बोलणें, त्याची गृहजीवनांतली भागीदारी याबद्दल कौतुकानें वर्णन केलेलें आढळतें खरें, परंतु पुरुषाची महत्त्वाकांक्षा, त्याची आर्थिक उन्नति किंवा अवनति, त्यांचा मागसलेपणा, कमी शिक्षण,

अगर बाहेरच्या सुधारलेल्या जगांत कांहींसें त्यांना मिळणारें गौण स्थान याबद्दलचे उल्लेख जवळजवळ कोठेंच नाहींत! परंतु त्यांत तरी आश्चर्य कोणतें? सर्वांगीण दृष्टिकोन येण्याला अभ्यास, बहुश्रुतपणा आणि दूरदृष्टि यांची जरूर असते. आणि हीं गीतें तर भावना उत्कट होऊन ओठांवर येणारीं! मनांत विचार दाटले कीं ओवीरूप होऊन सहजसुंदर शब्द बाहेर पडावयाचे! त्यांत इतर कोठल्याहि गोष्टीपेक्षां भावनांचाच जिव्हाळा कांठोकांठ भरलेला असावयाचा हें उघडच आहे आणि ह्या मृदु भावनांची गुंफण हेंच या लोकगीतांचें प्रमुख सौंदर्य आहे!

हें सौंदर्य अद्यावत्पणानें नटलेलें नाहीं, उलट हें किती प्राचीन काळचें आहे हेंच सांगणें कठीण! तथापि त्यांत जीवनाचा स्पर्श असल्यानें हें वाङ्मय जिवंत, चैतन्यमय झालें आहे. पुष्कळदां या ' निरक्षरांच्या ओव्यांतून काय मोठं लक्ष देण्याजोगं विशेष?' असाहि विचार मनांत येण्याजोगा आहे. परंतु जुन्या काळची उत्कृष्ट शिल्पकला पाहाण्यास कलादृष्टि लागते. तीच नसेल तर 'दगडांत पहावयाचें काय?' असेंहि म्हणतां येईल! एकादें सुंदर लेणें असावें, त्यांत नाजुक खोदकामाची कलाकुसर असावी, मूर्ती कोरीव रेखीव दिसाव्या व आजच्या घडीपर्यंत टिकणारे सुंदर रंगहि त्यांत शोभत असावे अशा प्रकारचें हें साहित्यप्रान्तांतलें सुंदरसें लेणेंच आहे म्हटलें तरी चालेल. हें सुंदर लेणें अनेकांनीं घडवलेलें आहे. एका हातीं घडलेल्या इमारतींतून जो आटोपशीरपणा, बांधेसूदपणा व एकसूत्रता दिसते ती या प्राचीन शिल्पांत नाहीं. उलट ह्याची मांडणी पुष्कळ विस्कळितच आहे, पण या विस्कळितपणांतच अनेकांच्या सहकार्यांची, व वर्षानुवर्षांच्या संस्काराची आपणास स्पष्ट जाणीव होण्याजोगी आहे.

अशा प्रकारें साहित्याचें एक सुंदर लेणें ठरूं शकणारीं अशीं हीं ग्रामीण लोकगीतें आहेत. महाराष्ट्रांतील शेतकीजीवनाचें संपूर्ण प्रतिबिंब दाखवणारा हा जणुं एक बोलपटच आहे. अनेक गांवांतील शेकडों भगिनींनीं या वाङ्मयाला कळत न कळत साह्य केलेलें आहे. रानोरानीं आपोआप फुलें उमलून राहावीं, त्याप्रमाणें महाराष्ट्राच्या खेड्याखेड्यांतून ही लोकवाङ्मयाची ओवीशाखा पालवून पुष्पवती झाली आहे. ही सारी निरक्षर

स्त्रियांची रचना, परंतु 'अक्षर' वाङ्मयांत त्याची गणना होण्याजोगी ती श्रेष्ठ ठरणारी आहे.

अजूनहि या क्षेत्रांत कितीतरी काम हौशी लोकांना करतां येण्यासारखें आहे. असे प्रयत्न यापूर्वीही कांहीं लेखकांनीं केलेले आहेत हें खरें, परंतु ते हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच आहेत. त्यांत प्रथम कै. साने गुरुजींच्या अपूर्व कामगिरीचा आदरानें उल्लेख केला पाहिजे. त्यांनीं पांढरपेशा स्त्रीवर्गानं रचलेल्या ओव्यांचें 'स्त्रीजीवन' नांवाचें एक सुंदर पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. श्री. वामन चोरघडे यांचें 'साहित्याचें मूलधन' हें पुस्तक, श्री. कमलाबाई देशपांडे यांचें 'अपौरुषेय वाङ्मय,' श्री. पां. श्री. गोरे यांचें 'वऱ्हाडी लोकगीतें' हें संकलन, जोशी यांचें 'लोकगीतें व लोककथा' हें पुस्तक अशीं कांहीं नांवें यांत प्रामुख्यानें दिसतील. मासिकांतून स्फुट लेख मात्र बरेच प्रसिद्ध झाले आहेत, त्यांत कु. दुर्गा भागवत यांचे लेख विशेष अभ्यसनीय ठरतील. डॉ. कु. सरोजिनी बाबर यांनींहि लोकसाहित्याचें पुष्कळच संकलन केलेलें आहे. पण लोकसाहित्याच्या एकंदर व्याप्तीच्या मानानें हे प्रयत्न अगदीं अल्प आहेत.

अन् याचें कारणहि स्पष्ट आहे. हें सर्व साहित्य झटकन् व एकेच ठिकाणीं प्राप्त होण्याजोगें नाहीं! ठिकठिकाणीं विखुरलेलें हें वाङ्मयधन शोधून संकलित करणें, त्याचें परीक्षण–निरीक्षण करणें, त्यांतला सुंदर भाग पारखून जनदृष्टीसमोर आणणें हीं सारींच कामें श्रमाचीं, व्यासंगाचीं अन् दीर्घ मुदतीचीं आहेत. आपलें दैनंदिन जीवन आजकाल अति उद्योगी, धांवपळीचें झालें आहे; त्यामुळें या कार्यास लागणारें मानसिक स्वास्थ्य, व पुरेसा मोकळा वेळ याचीच वानवा दिसून येते. आणि केवळ याच कारणामुळें ही लोकसाहित्याची दौलत अजूनहि पुष्कळशी जनदृष्टीआड आहे.

परंतु साहित्याच्या प्रांतांत लोकसाहित्याला किती महत्त्व आहे हें वाङ्मयप्रेमी जनतेस हळुहळू पटत चाललें आहे व त्या दृष्टीनें संकलनाचे प्रयत्नहि होऊं लागले आहेत हीच एक भाग्याची गोष्ट म्हटली पाहिजे. हे प्रयत्न अधिकाधिक होऊन आपलें लोकवाङ्मय ऊर्जितावस्थेस यावें हीच साहित्यप्रेमी रसिकांची खरीखुरी इच्छा!

---*---

## विभाग १

# ग्रामीण जीवन

(१) स्नेहसंबंध

(२) कृषिजीवन

दा.

# स्नेहसंबंध

शहरवासी लोकांची राहणी व ग्रामीण जीवन यांत जमीनअस्मानाइतका फरक असतो. शहरवासीय लोकांत नोकरी करणारांचें प्रमाणच जास्त, तेव्हां या प्रतिष्ठित वर्गाचें आयुष्य पुष्कळच यांत्रिक नि परावलंबी असतें. दूधवाली दूध आणून देईल तेव्हां कुठें चहानें रोजच्या दिनक्रमाची सुरुवात होणार ! हें दृश्य निराळें व गोठ्यांत गायवासरूं आहे, दुधाच्या धारा आईच्या कासंडींत सरसरून पडताहेत, मुलें हातांत वाट्या घेऊन धारोष्ण दुधाची वाट पहात आहेत हें दृश्य किती निराळें ! त्यांना जे गायवासरांबद्दलचे स्नेहभाव त्या भांड्यांतील दुग्धधारांप्रमाणें दाटून येतील ते दूधवालीनें दिलेल्या दुधाकडे पाहून थोडेच शहरवासीयांच्या मनांत येतील ? रोजच्या दिनक्रमांतहि दरेक गोष्टींतून असा फरक आढळतो. शहरांत बाहेर कोठें जायचें असेल तर सायकल, मोटार यांची मनधरणी करावी लागते. किती वेगवान् असलीं तरी हीं निर्जीव वाहनें. स्वतांचे पुष्ट बैल जोडलेल्या, घरच्या गाडींतून फिरतांना अगर स्वतःच्या हातानं मोठ्या केलेल्या व स्वतःवर प्रेम करणाऱ्या घोड्यावर बसून जातांना मनांत कोठल्या विचारविकारांना उधान येतें तें आम्हांला कसें कळणार ? लोकगीतें फार जुनीं यंत्रव्यवस्थेपूर्वीचीं असल्यानें तत्कालीन राहणीचे पडसाद या ओव्यांतून ऐकूं येतात. अर्थात् खेड्यांत यंत्रप्रसार अजूनहि फारसा नाहीं व शिक्षणाची बाजूहि तशीच अंधाराची म्हणून या गीतांतली पहिली समाजरचनेची घडी आजहि खेड्यांतून आढळून येते !

पूर्वींच्या जीवनांतून नांगरणें, पेरणें, शेती, कापणी, मळणी इत्यादि व्यवसाय चालत. दळणें, कांडणें, सूत काढणें, विणणें, दूध काढणें, गुरें राखणें, कापड विकणें, बांगड्या भरणें, घरें बांधणें हे व्यवसाय करून लोक जीवन व्यतीत करीत. आज शहरांतून गिरण्या झाल्या, यंत्रें आलीं आणि हे व्यवसाय दूर राहून निराळे व्यवसाय आले. पण खेड्यांत अजूनहि सर्व व्यवसायाचे लोक पुष्कळदां गुण्यागोविंदानें राहतांना दिसतात. लहानसें गांव असल्यानें एकमेकांच्या मध्यें एक तऱ्हेचें स्नेहबंधन दिसून येतें. या

ओव्यांतून अशा कितीक धाग्यांचें दर्शन होतें! शहरांत राहिल्यानें आपण एक तऱ्हेचे स्वयंकेंद्रित होत आहों. इतर व्यावसायिकांबद्दल आपल्याला आर्थिक संबंधापलीकडे आपुलकी नाहीं! पण खेड्यांत अजून 'आपण एका गांवाचे' ही आत्मीयतेची भावना सजीव आहे. एकामेकांची चौकशी करायची, परस्परांच्या सुखदुःखांत भागीदार व्हायचें हें सूत्र अद्यापहि खेडोपाडीं टिकाव धरून आहे ही साक्ष अनेक ओव्यांतून पटते! उदाहरणार्थ, बांगडी-वाल्याची गोष्ट घेऊं. 'बांगडीवाला बांगड्या विकायला घेऊन घरीं आला' या गोष्टीला शहरी दृष्टीनें कांहींच महत्त्व नाहीं! पण खेड्यांत ही किती अप्रुबाईची गोष्ट! चुडयाबद्दल 'सौभाग्यचिन्ह' म्हणून जिथें जिवाविशेष प्रेम तिथें 'चुडेदान' करणारा बांगडीवाला ऊर्फ 'वैराळ' हा किती तरी सन्मान्य माणूस. ठिकठिकाणीं वैराळाला 'वैराळदादा' असें प्रेमानें संबोधलेलें आहे. बांगडयांचीं तऱ्हेतऱ्हेचीं नांवें. हिरवा कारला, कापी बिलवर, केरवा, चमक बिजली अशा तऱ्हेतऱ्हेच्या बांगडया घेऊन वैराळ-दादा गांवांतून साद देत जाऊं लागला, कीं लहानमोठ्या मुलीबाळींची धांदल उडून जाई. आईजवळ हट्ट घ्यावा, भावाला रंजिस करावं अन् बांगड्या भरून घ्याव्या! पुढील ओव्या पहा—

**हिरवा कारला वैराळाच्या बैलावरी**
**बंधु हाय पारावरी, छंद घेत्ये मी नानापरी**
**वैराळदादा, बस सोप्याच्या साउलीला।**
**मी विनवित्यें माउलीला॥**
**वैराळ, तूं रे दादा! भर बिल्वरामंदी छंदु!**
**मोल द्यायचा माझा बंधु॥**

'वैराळदादा'ला बजावून सांगण्यात येतें कीं माझा भाऊ, बाप पैसे देणार आहे! चांगल्या छान छान बांगड्या भर पाहूं!

**वैराळ, तूं रे दादा! उंच बांगड्या भर मला।**
**बाप्पाजी माझे थोर। नको पैशाची चिंता तुला॥**

आणि एकादी नांदत्या गोकुळांतली गृहिणी म्हणते, कीं या वैराळानं तर माझ्या घराज़वळच मुक्काम केला!

**वैराळानं दिलं पाल माझ्या वाड्याला टेकूनी।**
**माज्या लेकीसुनांना देखुनी !॥**

अशा प्रकारें वैराळ ऊर्फ बांगडीवाला नेहमींचा पाहुणा ठरल्यावर त्याला आपुलकीची वागणूक मिळे, यांत काय नवल? तांबोळीण ऊर्फ विड्याचीं पानें विकणारी बाई, तरी गांवांतलीच एक शेजारीणबाई! पानें विकत घेतांनाहि स्नेहमय भाषणें होण्याइतकी लहान गांवांत ओळख असायचीच कीं! एके ठिकाणीं एक आई विनंति करते आहे—

**तांबोळिणीबाई पानं द्यावी चिल्लीपिल्ली।**
**माज्या बाळरायानं शिंगी सडकेला उभी केली॥**

माझा मुलगाहि लहान, त्याची बसायची घोडीहि छोटीसी, तर पानंहि लहान लहानशींच द्या कशीं!

एके ठिकाणीं एक गृहिणी पानें निवडून घेतांना ओठांतल्या ओठांत हंसून तांबोळीणबाईला सांगते आहे, कीं "हा विडा कुठें जायचा आहे माहीत आहे ना? चांगलीं पानं दे बाई! 'स्वारीला' पाठवायचा आहे बरं का!"

**तांबोळिणबाई! पानं द्यावीं इस-तीस**
**विडा जायाचा कचेरीस!**
**तांबोळीणबाई पानं द्यावी बारा-तेरा**
**विडा जायाचा माज्या सुभेदारा!**

अन् मग तांबोळीणबाईनं थोडी गोड चेष्टा करायची. गिऱ्हाईक अन् विक्रेता याहून हा भाव आपुलकीचा नाहीं काय? माळी–माळीण हेहि रोजच्या येण्याजाण्यांतले जिव्हाळ्याचेच लोक. माळणीनं भाज्या घेऊन यायचं, गल्लींत साद द्यायची, गृहिणींनीं भाज्या हव्या असतील त्या घ्यायच्या. माळी फुलं विकायला यायचा, गजरे, तुरे, जाई, जुई, शेवंती आणायचा, फुलं हवीं नको विचारून जायचा यांत विशेष काव्य काय आहे? परंतु समजा कीं माळी–माळीण घरोब्याचे आहेत. तर हे जिन्नस हवे–नको सांगतांना स्नेहमय भावना ज्या प्रकट होतात त्यांचं स्वरूप पहाण्याजोगं आहे. उदा०—

**माळीण साद देई–भाजी चन्नुल्या घेवड्याची**
**रानी गर्भिण केवड्याची!**

'केवडा' हा शब्द नेहमीं बहुमानार्थी विशेषण म्हणून वापरलेला आढळतो. केवड्याच्या पानासारखे मालक, त्यांच्या राणीला डोहाळे लागले म्हणून भाजी आणली आहे हा यांतला भाव ! तो हृद्य आहे कीं नाहीं ? तसेंच माळीण आलेली ऐकली कीं प्रेमळ पत्नीला एकदम पतीची आठवण येई—

**माळीण साद देई माज्या वाड्याच्या भंवती ।**
**माज्या राजसाच्या जेवनाला भाजी मेथीची हवी होती ॥**

अशा प्रकारें भाज्या घेतांना प्रेमाचीहि देवाणघेवाण होते. फुलमाळीण फुलें घेऊन आली कीं हीच तऱ्हा—

**माळीण साद देई–घ्या ग बायानो पिवळी जाई ।**
**वास घ्येनारं घरीं न्हाई ॥**

कित्येक ओव्या 'माळ्याच्या मळ्यामंदी' असलेल्या वातावरणाच्या आहेत. कारण खेडेगांवांत शेती करणारे लोक असतात, तसे मळेकरी पण असतात. घरचाच मळा ! मग ओव्यांना काय कमी ?

'शिम्पीदादा'चीहि गोष्ट अशीच. गांवांतल्या साऱ्यांची त्याला ओळख. उंची खणाची चोळी शिवायला आली कीं शिंपी आपलेपणानें चौकशी करूं लागे कीं कुणाला हा एवढा उंची खण घेतला आहे ?

**हिरव्या खनाला रुपै दिले सवादोन ।**
**शिंपी म्हणे लेनार कोन? बंधु म्हणे, पाठीची हिरकण !॥**
**भाऊ शीवीतसे चोळी, पट्ट्यापट्ट्याला चवल ।**
**शिंपी करीतो नवल ॥**

एकादी माहेरवासीण आपल्या मैतरणीला चोळी शिवून पाठवणार असायची, ती शिंप्याला विनंति करते —

**शिम्पीदादा शीव चोळी, मोती लाव कडणीला ।**
**चोळी जायाची गडणीला ॥**

तर एकादी माता मुलीची चोळी शिवून घेतांना आर्जवानें सांगेल—

**शीव शिंप्या चोळी, आखूड बाह्या लाव !**
**माझ्या मैनाबाईच्या, बाकीला जागा ठेव !**

धाकट्या लेकीचा झगा घट्ट झाला म्हणून शिंप्याला गाठून सांगायला हवंच—

**हातांत सुई दोरा, शिंपी वाटेला गांठला ।**
**झगा छातीला दाटला ॥**

अशा प्रकारें शिंप्यालाही गांवांतल्या साऱ्या गांवकऱ्यांची माहिती; एकादी शिंपीण शिवणारी असेल तर तिला बारशाचे कपडे आहेत, चांगले नक्षीदार शिवा ही विनंति—

**अंगडं टोपडं, शीव शिंपीणी नकाशाचं**
**बंधुचं माज्या बाळ, लेनार मोकाशाचं**

सारांश हे धंदेवाले लोक असले तरी आपल्यापैकींच ही आपुलकी प्रत्येक ठिकाणीं दिसून येते.

सोनाराचीही गरज कधीं कधीं लागे. सोनाराची मुलगी मैत्रीणसुद्धां असणार ! एक युवती म्हणते—

**सांगुन पाठवील्ये सोनार सखियेला ।**
**मोतीघोस लाव साळूच्या वाकीयेला ॥**

तर दुसरीकडे सोनाराला विनंति आहे—

**घडव घडव सोनारा, सरी बिंदुल्या वाघनख ।**
**ताईत बंधुजीला झाला ल्योक ॥**

लोहाराची मुलगी देखील बाळमैत्रीणच ! तिलाहि मैत्रिणीच्या मुलाबद्दल अगत्य वाटतें—

**गडीण मी केली लोहाराची ताई**
**तिची लोखंडाची कडी, पाळण्यावरी जाई**

सुतार लोहार झाले तरी छोट्याशा गांवांतले एकमेकांचे स्नेहीच असतात. घर बांधायला भावानें सुरुवात केली, कीं या लोकांवाचून माडीची बांधणी नीट होणार नाहीं असें वाटून बहीण विचार करते—

**सांगून पाठविते, सुतार मैतराला**
**बंधुजीची माडी आलीया आकाराला**

तसेच चाटी उर्फ कापड दुकानदार हे तर भावाचे जिवलग मित्रच ! त्यांच्या दुकानांत भाऊ बोलत बसतो रोज व बहीण मनास आवडेल तें कापड, लुगडें हौसेनें घेते—

लुगडं घेतलं दुही पदराला जर
चाटी बंधुचा मैतर
चाट्याच्या दुकानी बंधु बसे मोतीदाणा
हात मी टाकिते उंच खणा

अशाहि ओव्या पुष्कळच आहेत.

अशा प्रकारें गांवांतले इतरहि धंदेवाईक लोक आतासारखेच आपुलकीनें वागतात. बुरूड, रंगारीणबाई, टपालवाला, गवंडी, सुतार अशा सर्वांशींच स्नेहाचें नातें असल्यामुळें सर्वांना उद्देशून ग्रामवासी भगिनींनीं ओव्या रचल्या आहेत.

या ओव्यांतून सर्व गांवकऱ्यांशीं सहानुभूतीचें, प्रेमळपणाचें व समानतेचें नातें जोडलेलें आढळून येतें. शहरांतली एकमेकांशीं तुटकपणें वागण्याची वृत्ति येथें नाहीं. सारीच ग्रामवासी जनता एकमेकांच्या ऋणानुबंधांत असते. त्यामुळें एक प्रकारची आत्मीयता मनांत निर्माण होते.

खेड्यापाड्यांतून स्नेहबंधनें किती दृढतेनें विणलीं गेलेलीं असतात याची साक्ष देणाऱ्या अशा कांहीं ओव्या पुढें दिल्या आहेत.

# स्नेहसंबंध

वैराळ सादवीतो, घ्या ग बायांनो काळाकिता *
माझा राजवर्खीचा हेका होता १
गोंडाळ माझा हात, बांगडी लागे थोडी
भरूं राजवर्खी जोडी २
फुटली बांगडी, नको करू हाळहाळ
म्होरं गजरा देतो ढाळ ३
कापी बिलवर, बारा आन्याला ल्याले चार
बयाच्या जीवावर, आविंदी केल्या फार ४
बारीक बांगडीला देते रुपया इसाराला
बंधुजीचं नांव सांगते कासाराला ५
हात भरून बांगड्या, गोठ पाटली कुठं ठेउं
बया माऊलीचा रंजीस केला जीउ ६
वैराळानं दिलं पाल, माझ्या वाड्याला टेकूनी
लेकीसुनांना देखूनी ७
मागं म्होरं केरवा, मधी तारेच्या पाटल्या
बयाच्या जीवावरी मौजा करूंशा वाटल्या ८
मागं म्होरं केरवा मधी बिलवर चार चार
बयाच्या जीवावर मौजा केल्या फार फार ९
वैराळ सादवितो, चुडे लेनार बाया किती
माझी मायबाई लेकीसुनाची नांवं घेती १०
वैराळ सादवीतो, आधी सादीव वरली आळी
लेकीसुनांनीं भरली माळी ११

---

* गजरा, काळाकिता, केरवा, कापी बिलवर, छंद, अंबुर, बोरीबंदर, सात रस्ता, डाळींबी, चमकबिजली हीं सर्व बांगड्यांचींच नांवें आहेत.

वैराळदादा, तुझी पेटारी झाली रिती
मायबाई माझी लेकीसुनाची आली होती १२
लाडक्या लेकीनं वैराळ अडवीला
राजवर्खी जोडीसाठी अंवुर वाढवीला १३
बारीक बांगडी नाव चमक-विजली
हटाला आली मैना राती उपाशी निजली १४
बारीक बांगडी नांव तिचं नागमोडी
भरायासाठी जीव माझा झाला येडी १५
बारीक बांगडी गोऱ्या हाती झगझगा
दृष्ट व्हईल घालूं नगा १६
बारीक बांगडी भरणी गाडीवर येते
कुना हौशाची लेक लेते १७
बारीक बांगडी रुपायाला चार
पुन्याला केली तार १८
वैराळ सादवीतो हिरव्या काचेचा बिलवर
मैना निजली जागी कर १९
वैराळदादा, भर बांगडी काळाकिता
म्यां रंजिस केली माता २०
बांगडीचा हात, न्हाई देत काकनाला
बंधुजी, चला पुढल्या दुकानाला २१
वैराळदादा बैस, सोप्याच्या साउलीला
वया गवळणीला विनविते माउलीला २२
वैराळदादा बैस, सोप्याच्या पायरी
मैना गेलीया बाहेरी २३
हौस मला मोठी नागमोडी कांकनाची
बयाच्या गावापाशी वाडी वसली वैराळाची २४
हिरवा कारला वैराळाच्या बेलावरी
बंधु बैसला पारावरी, माझा छंद नानापरी २५

बारीक बांगडी हातांत शिलका मारी
राधा हौदाला पाणी भरी २६
वैराळदादा, तुझं माझं काय नातं?
चुड्याकारणं दिला हात २७
बारीक बांगडी फुटली काचेची
हौशाच्या जीवावर उद्यां भरीन पाचेची २८
सांगून धाडते दूरदेशीच्या कासाराला
मैना जायाची सासऱ्याला २९
अंबुर डाळिंबी भल्याभल्याला लावी बट्टा
राजवर्खीचा दर मोठा ३०
माडीवर माडी वर कासाराची आस्था
बांगडी ल्यायले बोरीबंदर सात रस्ता ३१
वैराळाशेजारी शिंपीदादा देई पाल
चोळीपरीस चुडा लाल ३२
हात भरून बांगड्या मागं पाटलीचा थाट
गुजर माझ्या बाई, लेन्याचा परिपाठ ३३
हात भरीला काकनानं माय बघे खालवर
न्हाई जोडीचा बिलवर ३४
नागमोडी बिलवर, बारा आन्याला ल्याले जोडी
हौशा भरतार हंसत चंची सोडी ३५
अंबूर डाळिंबी, कशानं पिचकली
गोऱ्या हाता दृष्ट झाली! ३६
कांकनं ल्याया गेले माझ्या हाताची कांब रुंद
बिलवरामंदी लेते बाजुबंद ३७
गोंडाळ माझं हात, बयाच्या नदरेत
कापीव बिलवर बांधीते पदरांत ३८
गोंडाळ माझा हात, बंधुच्या सपनात
सोन्याचे बिल्लोर, मला धाडीले टपालांत ३९

गोंडाळ हाताची, नगं जाऊस बाजाराला
घालूं कागद वैराळाला ४०
वैराळदादा, भर बिलवरांमदी छंदु
मोल द्यायाचा माझा बंधु ४१
वैराळदादा, उंच बांगड्या भर मला
बाप्पाजी माझे थोर, नको पैशाची चिन्ता तुला ४२
मोठी चटकचांदनी, तांबोळ्या तुझी सून
बंधुला देते पान, वर लवंगेची करी खूण ४३
तांबोळ्याची मैना पडदा लावी दुकानाला
चातुर बंधुजी यायाचं मुकामाला ४४
तांबोळ्याची मैना, तिचा दुकानाखाली ओटा
बंधुजीला माझ्या पानांचा छंद मोठा ४५
पान खातवन्या आलाया माझ्या गावा
बंधुला माझ्या तांबोळ्याची आली दावा ४६
तांबोळिणीबाई, पानं द्यावी चिर्लीपिर्ली
बाळराजानं शिंगी सडकला उभी केली ४७
तांबोळिणीबाई, पानं मोजावी छकडा
माझ्या बाळाच्या हातीं, रुपाया रोकडा ४८
तांबोळिणीबाई, पानं द्यावीं ईस तीस
विडा जायाचा कचेरीस ४९
तांबोळिणीबाई, पानं द्यावीं बारा तेरा
विडा जायाचा माझ्या सुभेदारा ५०
तांबोळ्याची मैना, पानं मेजाया चुकली
माझ्या चंद्रहाराला दिपली ५१
तांबोळ्याच्या मुली, पानं द्यावी तेरा चौदा
खानार माझा राघू पोरसवदा ५२
तांबोळ्याच्या मुली पानं देई बिगीबिगी
तान्या राघुवाची बगी रस्त्याला उभी ५३

तांबोळीनीबाई, तुझा तांबोळी कुठं गेला
कंथाच्या इड्याचा खोळंबा झाला ५४
माळीन सादवीते, घ्या ग बायानु जाईजुई
तुरे लेनार घरीं न्हाई ५५
माळीन सादवीते, घ्याग बायानुं सीताफळ
बाळ आमुचं गेलं साळं ५६
माळीन मस्तवाल केज घेईना वाटान्याचं
बाळ रडतं बंधुजी पठाणाचं ५७
माळीन साद देई माझ्या वाड्याच्या भवतीं
राजसाच्या जेवनाला भाजी मेथीची हवी होती ५८
माळीन साद देई घ्याग बायांनो शाकभेंडी
कुनबी पिकला पहिल्या तोंडी ५९
बुरुडाची सुपली, आडभिंतीला उभी केली
मैना दानं घोळाया सोप्या गेली ६०
बुरूड सादवीतो, सुपलीमंदी बुट्टी
बाळीसाठीं घाला लखुट्यामंदी चिठ्ठी ६१
सुरेख सुपली आला बुरूड मिरजेचा
खेळ मांडूया गिरजेचा ६२
सुतारापरायास न्हावीदादाला देते पाट
राख बाळाची, शेंडीशेजारीं झुलपं दाट ६३
सुतारापरायास न्हावीदादाची कारागिरी
करतो बाळाची रेघन्दारी ६४
टपालवाला आला त्याला वाढिते दहींभात
हौशा राजसाची सांग खुशाली कागदांत ६५
टपालवाला आला सांगतो कानगोट
माझ्या धनियांची, आली खजिन्याची नोट ६६
रंभे पाथराच्या मुली, कां ग रस्त्याला मोकळी ?
माझ्या बाळराजा, न्हाई वाघाला साखळी ६७

लाकूड तासी सुतार, थलपी उडे नऊलाख
माझा बाळराय माडी बांधतो कडीपाट ६८
सुताराच्या शाळे, नवल काय झालं ?
सोनं मोडून चाड केलं ! ६९
सांगुन पाठवते, सुतार मैतराला
माडी आलीया आकाराला ७०
गडीण मी केली, सुताराची भागू
माझ्या बाळाच्या पाळन्यावर, देई लाकडाचं राघू ७१
वाजत गाजत आलं, गवंडी सुतार
धरला वाड्याचा आकार ७२
सुतारापरायास, गवंडीदादाची कारागिरी
सोडी कमळ वाड्यावरी ७३
पांच परकाराचं गहूं, कांडते खिरीयेला
गवंडी लावला हिरीयेला ७४
सुतारापरायास, माझा गवंडी कारागीर
नक्षी काढतो धोंड्यावर ७५
माडी बांधुनिया, सोपा आलाया आकाराला
दिली बनात सुताराला ७६
रंगारिनीबाई रंग तुझ्या तांबल्यात
तान्हा माझा राघु खेळतो बंगल्यात ७७
रंगारिनीबाई रंग तुझा ग वाटींत
सखा शेला धरितो मुठींत ७८
शिंप्याच्या दुकानीं, शिंपी दिंडाचा[1] सोडी दोर
आलं पेठेला बंधुजी सावकार ७९
हिरव्या खनाला रुपै दिले सवादोन
शिंपी म्हनं लेनार कोन? बंधु बोले पाठची हिरकण[2] ८०
भाऊ शिवी चोळी, पट्ट्यापट्ट्याला चवल
शिंपी करीतो नवल ८१

१ कापडाचा गठ्ठा. २ बहीण.

लाकूड तासी सुतार, थलपी उडे नऊलाख
माझा बाळराय माडी बांधतो कडीपाट ६८
सुताराच्या शाळे, नवल काय झालं ?
सोनं मोडून चाड केलं ! ६९
सांगुन पाठवते, सुतार मैतराला
माडी आलीया आकाराला ७०
गडीण मी केली, सुताराची भागू
माझ्या बाळाच्या पाळन्यावर, देई लाकडाचं राघू ७१
वाजत गाजत आलं, गवंडी सुतार
धरला वाड्याचा आकार ७२
सुतारापरायास, गवंडीदादाची कारागिरी
सोडी कमळ वाड्यावरी ७३
पांच परकाराचं गहूं, कांडते खिरीयेला
गवंडी लावला हिरीयेला ७४
सुतारापरायास, माझा गवंडी कारागीर
नक्षी काढतो धोंड्यावर ७५
माडी बांधुनिया, सोपा आलाया आकाराला
दिली बनात सुताराला ७६
रंगारिनीबाई रंग तुझ्या तांबल्यात
तान्हा माझा राघु खेळतो बंगल्यात ७७
रंगारिनीबाई रंग तुझा ग वाटींत
सखा शेला धरितो मुठींत ७८
शिंप्याच्या दुकानीं, शिंपी दिंडाचा[1] सोडी दोर
आलं पेठेला बंधुजी सावकार ७९
हिरव्या खनाला रुपै दिले सवादोन
शिंपी म्हनं लेनार कोन ? बंधु बोले पाठची हिरकण[2] ८०
भाऊ शिवी चोळी, पट्ट्यापट्ट्याला चवल
शिंपी करीतो नवल ८१

१ कापडाचा गठ्ठा. २ बहीण.

शीव शिंप्या चोळी, मोती लाव कडणीला[1]
चोळी जायाची गडणीला ८२
अंगडं टोपडं, शीव शिंपीनी नकशाचं[2]
ताईत बंधुजीचं बाळ लेनार मोकाशांचं ८३
शीव शिंप्या चोळी, उगीच टाक दोरा
मैना निघाली सासुऱ्या, जीव माझा झाला वारा ८४
हातांत सुई दोरा शिंपी वाटेला गाठला
झगा छातीला दाटला ८५
अंगी शीव शिंप्या, आकड्या काढ भुजेवरी
चांदसुर्व्या छातीवरी, गरुडपक्षी पाठीवरी ८६
घडव घडव सोनारा, सरी बिंदुल्या वाघनख
माझ्या ताईत बंधुजीला झाला ल्योक ८७
घडीव घडीव सोनारा, घडीव वाघनखी
बाळं घुंगुराजोग्या लेकी ८८
सांगुन पाठविले, सोनार सखियेला
घोस साळूच्या वाकीयेला ८९
सोनाराच्या शाळे पाच पेट्यांचं गांठलं
बंधुचं माझ्या बाळ मला वघूसं वाटलं ९०
नंदाभावजयी, चला सोनारवाड्या जाऊं
रुपियाच्या करंड्याला मोत्याच्या जाळ्या लाऊ ९१
सांगुन पाठवले सांगली गांवीच्या सोनाराला
सोन्याची साखळी बंधुजीच्या आहेराला ९२
सोनाराच्या साळे, उडतं ठिणग्याजाळ
ताईत बंधुजी करतो, रानीला मोहनमाळ ९३
लाडके ग लेकी नको माझा जीव खाऊं
चाट्याच्या दुकानीं उंचघडीला नको हात लावू ९४
लुगडं घेतलं, दुही पदर खुतनीचं
माझ्या बंधुजीचं चाटी मितर अथनीचं ९५

१ बाजूला. २ नक्षीदार.

चाट्याच्या दुकानीं, बंधु बसले दोघंतिघं
बहिणा, पातळ तुझ्याजोगं ९६
चाट्याच्या दुकानीं, बंधु बसे मोतीदाणा
हात मी टाकिते उंच खणा ९७
चाट्याच्या दुकानीं चंद्रकळाची लुगडी
बयाला देखुन, चाटी दुकान उघडी ९८
गडं घेतलं त्याचा पदर गोपयाचा
चाटी मितर बापयाचा ९९
लुगडं घेतलं दुही पदराला जर
चाटी बंधुचा मैतर १००
भरल्या बाजारांत चाटी राहिना उधाराला
जामीन देते बंधुजी गुजराला १०१
चाट्याच्या दुकानी बंधु बैसले दिगंबर
घेती उंच मोलाचे परकर १०२
फाटलं लुगडं चिंता पडली जोडियाला
चाटी बोलावूं वाडियाला १०३
माह्यार काय केलं ? मला पुसती सारी आळी
बंधुजीनं चाटी लुटला सायंकाळीं १०४
चाट्याच्या दुकानीं, जळं समई उथाळ
बंधु, साडी घेऊं कां पाताळ ? १०५
लुगडं घेतलं दुही पदर जराचं
चाटी मितर दीराचं १०६
चाट्याला चाटी बोले, इकरा झाला न्हाई
बहिनीचा भाऊ, बाजारी आला न्हाई १०७
चाट्याच्या दुकानीं, चंद्रकळा डोळं मोडी
मन रुतलं घाला घडी १०८
लुगडं घेतलं हिरवं गोमेकांठी
म्होरं बंधुजी, मागे चाटी १०९

चिकनी सुपारी, वाण्याची रंभा झोकी
रतीब जेठ्या लेकी १११०

चिकनी सुपारी, माझ्या बंधुला लागली
अशी वानीन चांगली, वारा घालाया लागली १११

गडीन मी केली, ल्व्हाराची ताई
तिची लोखंडाची कडी माझ्या पाळन्यावर जाई ११२

साळंच्या पंतुजीला, देऊं केली डाळवाटी
लिहींनं बाळाला येन्यासाठीं ११३

साळंच्या पन्तुजीला, देते मी जांबवाटी
माझ्या राघुबाला, नका मारूं छडीकाठी ११४

साळंच्या पंतुजीला, देऊं केलीया वाटीलोटी
भाचा पंडीत राघु, लिहीतो जगजेठी ११५

साळंच्या पंतुजीला, देऊं केलंया निरसं दूध
राघु पंडिताचं, लिहिनं बाळबोध ११६

साळंच्या पंतुजीला, देऊं केलंया दूधपेढं
कागद वाचीतो बापापुढं ११७

साळंच्या पंतुजीला, देऊं केली शालजोडी
बाळ शिकतंया बाराखडी ११८

कलालीनबाई, तुझ्या दारीं लाल जोडा
धनी कैफांत झाला येडा! ११९

कलालिनबाई, नको करूं कलाकला
माझा कंथ दारू प्याला, उतारा सांग मला १२०

कलालिनबाई, जळुं जळुं दारुखाना
धरनी लोळतो मोतीदाना १२१

—*—

# कृषिजीवन

कृषिजीवन हें नागर जीवनाहून सर्वस्वी निराळें असतें, हें एकदां लक्षांत घेतलें कीं अनेक ओव्यांची मांडणी नीट समजेल. या ओव्या कृषिजीवनास अनुलक्षून असल्यानें त्यांतले शब्द, भाषा ही नवीन पद्धतीची वाटेल. कल्पनाहि वेगवेगळ्या प्रकारच्या व वर्णनेंहि शेतकी जीवनाचींच आढळतील. त्यांत शेतीचें वर्णन आहे, मळ्याचें आहे, गुऱ्हाळाचें आहे, पीक-पाण्याचेंहि आहे. या ओव्या अतिशय जिव्हाळ्यानें रचलेल्या दिसतात. जणूं 'कारभारणीनें' आपले हृदयींचे नाजूक विचार त्यांतून प्रकट केले आहेतसें दिसून येतें. शेतांतून मोट पुष्कळदां चालू असते. एका स्त्रीचे घरधनी मोटेवर आहेत, तेव्हां ती खुद्द त्या विहिरीलाच प्रार्थना करीत आहे—

**नवस करूं गेले इहिरीबाई तूं सुंदरी**
**जतन कर माझं चारी बैल मोटकरी**

किती हृद्य शब्द आहेत हे! कधीं कधीं मुलगाहि मोठा होऊन नव्यानें मोट हाकायला प्रारंभ करतो. त्या दिवशींहि या साध्याभोळ्या आईचें मन व्याकुळ होऊन पुत्ररक्षणाची विहिरीलाच प्रार्थना करूं लागतें—

**हात मी जोडीते, ईहिरीबाईच्या काठाला**
**गनीस [1] माझा वाळ, नवा लागला मोटेला**

मुलाप्रमाणेंच आपल्या बैलांवरहि शेतकऱ्याचें प्रेम असतें. मुलांच्या रक्षणासाठीं विहिरीला प्रार्थना, तर बैलांच्या रक्षणासाठीं दूरच्या डोंगराला प्रार्थना. पहा—

**सकाळच्या पारी हात जोडिते डोंगराला**
**खोंड खिलारी नांगराला**

या शेतांतून, मळ्यांतून कांहीं वेळा मोठ्या, चार चार बैलांच्या मोटा चालतात, त्याचा या कारभारणीला केवढा तरी अभिमान वाटत असतो! ती म्हणते—

**वनींचं पाकरूं करीतं पानीपानी**
**बंधुच्या मळ्यामंदी चावऱ्या [2] मोटा दोन्ही**

---

१ गणेश शब्दाचा अपभ्रंश. २ बैलांची मोट.

अर्थात् हें वैभव जाणून घ्यायला शेतकऱ्याचेंच मन हवें. मोट हाकणारीं माणसें बहुधा घरधनी, मुलगा, भाऊ अशी घरची जिव्हाळ्याचीच मंडळी असल्यानें त्यांच्याबद्दल कौतुकानें या स्त्रीवर्गानें प्रेमळ ओव्या रचलेल्या आढळतात, यांत आश्चर्य नाहीं. परोपरीचें कौतुक करून मोटकऱ्याचें वर्णन केलेलें दिसून येतें. मोटेचे चारी बैल एकाच रंगाचे असले तर त्या भाग्यालाहि पहाणाराची दृष्ट होईल असें कारभारणीला वाटत असतें—

**मोट चालते, एका वानाचं चारी बैल**
**मोटकऱ्याला दृष्ट व्हईल**

पहांटेच्या वेळीं, दूर कुठें मोट चालू झाली तर इतर कुणाच्या तें ध्यानांतहि येत नाहीं. परंतु मराठा गृहिणीच्या मनांत नाजूक आंदोलन उठतें. तिचा घरधनीच मोटेवर असतो ना ?—

**पहांटेच्या परामंदी, चाक वाजतं भिरीभिरी**
**माझं देव अर्जुन मोटेवरी**

कृषिजीवनांत अशीं वर्णनें खूपच येतात. खरोखरच, जेथें पतिपत्नी दोघेंहि घाम गाळून मोती पिकवतात, त्या शेतकीबद्दल व तदनुषंगिक इतर गोष्टींबद्दल अशी जिव्हाळ्याची भावना असणारच. बोलून चालून सारा जन्म शेतामळ्याच्याच सावलींत जातो. वाऱ्याच्या–पावसाच्या तालावर हिरवीं रोपें डुलत आहेत, कुणी गुरें राखीत आहे, कुणी धान्य खळ्यांत भरीत आहे, कुणी गोफण घेऊन पांखरें उडवीत आहे, सुंदर बैल जुंपलेला नांगर कोणी चालवीत आहेत व कोणी पिकाला पाणी देत आहे अशा प्रकारचीं दृश्यें शेतांतून नित्य दिसतात. अर्थात् शेती हाच प्रधान जीवितहेतु असल्यानें या सर्व दृश्यांना उद्देशून तऱ्हेतऱ्हेच्या ओव्या रचल्या गेलेल्या आढळून येतात. याहि आयुष्यांत जे गोड अनुभव येतात, त्याचें सरस वर्णन अनेक ओव्यांतून आढळतें. उदा० खेडुत कारभारणी जेवणाची पाटी डोक्यावर घेऊन घरवाल्या मंडळींना शेतांत अन्न नेऊन पोहोंचवतात. कधीं मुलीहि न्याहरी घेऊन जातात. अशी एक बहीण भावाला विनंति करीत आहे—

**जेवनाची पाटी माझ्या मानेला झाली जड**
**बंधु मोटेचं बैल सोड, आडवा गडी धाड !**

'अन्न न्यायला रस्त्यापर्यंत एक गडी पाठवण्याची' ही लहानशी विनंति किती मजेदार, नाहीं काय? जेवणाची पाटी घेऊन मळ्यांत येणाऱ्या एका तरुण पत्नीची तक्रार ऐका—

**जेवनाची पाटी नेतां मानेला झालं वझं**
**हौशा राजसा, शिंवेला पानमळं तुझं**

लांब, गांवच्या शिवेला पानमळे केल्याबद्दल ही पत्नी प्रेमानें रागावत आहे!

शेतांतील दृश्यांचींहि बरींच वर्णनें आढळतात. उदा०—

**शेताला जाते कुरी, सव्वा मणाचा प्येरा झाला**
**बैल वेशींत डरकला, धनी मनांत हरखला**

शाळूच्या शेतामध्यें राखण करणाऱ्याबद्दल कौतुकाचें वर्णन पहा—

**शिवंच्या शेतामंदी, शाळु आलाया राखनीला**
**घुंगुर लाविलं गोफनीला**

केव्हां केव्हां नांगर चाललेला असतो. त्यावर मागें व पुढें बसणाऱ्या माणसांना नांगऱ्या व आगल्या असें म्हणतात. हे गाणीं म्हणत असतात व हीं घरचींच मुलें माणसें असल्यानें यांचे उल्लेख पुष्कळदां येतात—

**आगल्यापरायास साद बारीक नांगऱ्याचा**
**खांद्या चावुक धागऱ्याचा**

या बारीकसारीक गोष्टीहि इथें किती अगत्यानें सांगितल्या आहेत बरें! पहांटे केव्हां केव्हां कर्ता मुलगा गातगात शेतीकाम करतो. तें ऐकून उल्हासानें आई म्हणते—

**पहांटेच्या पारामंदी कोन कोयाळ गीत गातो**
**उसाहळदीला खत नेतो**

अशा प्रकारचीं हीं गीतें किती नाविन्यपूर्ण वाटतात! पिकें उत्तम आल्याचें समाधानहि अनेक गीतांतून आहे—

**वाटेवरलं शेत आल्यागेल्यानं नेल्या पेंड्या**
**बंधुजीला माझ्या, शाळू झाल्याती तीन खंड्या**
**खळं भरीलं दान्यानं, बैलं भरल्याती कुशी**
**सखा शेल्यानं पाठ पुशी ।**

केव्हां केव्हां पीक इतकें उमाप येतें, कीं एका वावडीऐवजीं दोन लावाव्या लागतात व याचें लोक कौतुक करतातहि—

**लोक बोलत्यात, बोलती वेशीला**
**जोडवावड्या राशीला**

अशा प्रकारें शेतीच्या समृद्धीची कल्पना या गीतावरून येते. शेतांत नेहमीं कुरी [ तिफणी ], औतं, कुळव, चाडनळी इ० गोष्टी असतात व त्यांचे उल्लेख येणें क्रमप्राप्त आहे. उदा०—

**पेरायाची कुरी, रुप्याची चाडनळी**
**ताईत बंधुजी, पेरक्या चवरी ढाळी**
**शेताला नेली कुरी, आधी मोगरा तुरीचा**
**नंदी आवरा कुरीचा**

अशीं शेतकीच्या अवजारांसंबंधीं देखील आपुलकीनें गीतें म्हटलेलीं आहेत. कृषिजीवनाचा परिचय असणारांना त्याचें महत्त्व सहज पटणारें आहे.

शेतीवाडी हा जसा ऐश्वर्याचा एक भाग, तसाच मालकीचा मळा असणें, हीहि समृद्ध जीवनाची एक साक्ष आहे. मळे करणारा मळेकरी, फुलबागा करणारा माळी, मळ्यांत भाज्यापाले करणारा सासरा अगर भाऊ यांचीं कितीतरी वर्णनें मोठ्या रसाळपणें केलेलीं आढळतात. एक सून सासऱ्याचें ऐश्वर्य सांगत आहे —

**माळ्याच्या मळ्यामंदी, केळी पेरूला काय तोटा ?**
**माझ्या मामाजीच्या एका इहीरीला बारा मोटा**

बारा मोटा चालणारी विहीर किती मोठी असेल बरं ? आणि त्यामुळें भरारलेला मळाहि केवढा असेल ? एक युवती आपल्या पतीच्या मळ्याचें वर्णन किती काव्यमय शब्दांत करीत आहे पहा—

**पाऊस पडतो मोत्यांचा शिरवा**
**मळा सख्याचा हिरवा !**

अशा या मळ्यांत कसलें उत्पन्न होतें बरें ?

**माळ्याच्या मळ्यामंदी भाजी तोडीन पान पान**
**माझ्या मामांजीने लावले चारी वाण**

कुणी मळेकरी फारच मोठ्या मनाचे, दिलदार असतात. कौतुकानें एक पत्नी म्हणते—

वाटेवरचा मळा आल्या गेल्या ऊसरस
धनी मळ्याचा राजस

उसाचा मळा असतो, त्याप्रमाणें कांहीं लोक बागवानहि असतात, त्यांच्या फळबागाहि असतात. मळा करून त्यावर गुजराण करणें हें कसब सगळ्यांना साधणारें नव्हे. अशा भावाचें कर्तृत्व एक बहीण पुढील शब्दांत वर्णीत आहे—

जातीचा मऱ्हाठी, हिमतीनं झाला माळी
ताईत बंधु माझा, उसांत लावी केळी

मळ्यांत आणखीहि एक आकर्षण असतें. तें म्हणजे उंसाचें गुऱ्हाळ. गुऱ्हाळ सुरू झालें कीं, लग्नालसुद्धां दिसणार नाहीं अशी गर्दी तेथें दिसून येते. कुठें दृष्ट पडेल असा सुंदर बैल जोडलेला असतो, तर कुठें मुलाबाळांचा एकच दंगा चालू असतो. एका गुऱ्हाळाचें हें शब्दचित्र पहा—

लगनापरायास गुऱ्हाळा तुझी हवा
बंधुजीचा घाना कांतीव, बैल नवा

गुऱ्हाळाच्या ओव्या गुळासारख्याच गोड आहेत यांत आश्चर्य कसलें ?

एकादी आई मुलाचें जसें वात्सल्यानें कौतुक करील व गुणानुवाद गाईल, त्याचप्रमाणें गुरावासरांबद्दलहि ठिकठिकाणीं प्रेमाचे, आपुलकीचे उद्गार या ओव्यांत दिसतात. बैलांना बहुतेक ठिकाणीं नंदी असें म्हणून गौरविलें आहे. मोटेकडे कुणी निरखून पाहूं लागला कीं अभिमानानें ही कारभारीण म्हणते—

वाटंच्या वाटसरा, काय पहातो वाटेला
नंदी खिलारी मोटेला !

एकादा बैल इतका मस्तवाल असतो कीं कोणाला दावंहि लावूं देत नाहीं. पण मालक त्याहूनहि ताकदवान् असतो—

नंदीमंदी नंदी, मझ्यानंदी अरेराव
बंधु, तुझ्या लाडक्याला दावं लाव !

कधीं बैल दंगा करतात, तेव्हां ही मालकीण काकुळतीनें म्हणते—

गाडीच्या बैलांनीं शिवारीं केला दंगा
धनी गांवाला गेला सांगा

"धनी गांवाला गेला आहे" म्हणून समजावून सांगितलें कीं त्या बैलांना जणूं समजतेंच, ही या गृहिणीची श्रद्धा किती मधुर आहे बरें!

आणि अशा प्रकारची उमद्या बैलांची जोडी आणि बैल हाकणारा धनी यांची उंची सारखीच असली तर लोकांची दृष्ट लागायला उशीर आहे का?

दृष्ट मी काढिते, मीठमोहऱ्या मिर्च्या तीन।
धन्याबैलाची एक शीण।

या बैलांना किती छानछान नांवें दिलेलीं दिसतात! मदनमल्ह्या, हौशा, चेंडू, पित्तार, ढवळ्या पवळ्या, पाखऱ्या अंजिऱ्या, हंबीर, मोऱ्या इत्यादि नांवांनीं शेतीच्या बैलाला आळविलेलें दिसतें. गृहिणीनें अनेकवार कौतुकपूर्ण शब्दांत त्याचें वर्णन केलेलें आहे. एके ठिकाणीं ती म्हणते, कीं बैल सुंदर आहेत, परंतु अंगण किती लहान! कोठें बांधावें त्यांना?—

धाकुटं माझं घर, अंगन कांचणीचं
नंदी मोराच्या नाचणीचं।

मालकीचे दोन बैल असणें हीहि जिथें नशिबाची गोष्ट मानली जाते, तेथें एकाद्याच्या मालकीचे बारा बैल असणें हें केवढें वैभवाचें! म्हणून श्रीमंतीबद्दल बोलतांना बारा बैलांचा त्यांत हटकून उल्लेख होतोच—

बारा बैलायाचा, कुनबी तेगाराचा
माझ्या बाळायाच्या खांदी आसूड घागऱ्याचा

पुष्कळदां घरची गाडी असते, तिचेंहि अगत्याचें वर्णन ओव्यांतून येतें; उदा०—सुंदर गाडीचें हें वर्णन—

गाडीमागें गाडी, मधल्या गाडीला हिरवा रंग
नारी पेठेच्या झाल्या दंग।

ही गाडी कारभारीण लांबूनसुद्धां ओळखते. गाडीचे बैल कोणी परके थोडेच आहेत? असे पांखरांवाणी धांवणारे हे बैल तिच्याच हातांत लहानाचे थोर झालेले—

दुरून ओळखते, माझ्या गाडीचं चक्कर
बैल न्हवं, ती पाखरं, घरच्या गईची वासरं

पुष्कळदां शेतावरून गाड्या भरभरून धान्य घरीं आणलें जातें. या गाड्या जितक्या ज्यास्त तेवढी आर्थिक स्थिति चांगली, हें उघडच आहे. त्यांचीहि वर्णनें आढळतात. उदा० नाक्यावर या गाड्यांना नाकेवाला अडवतो. पण घरधनी दरिद्री थोडेच आहेत ?—

गाडीमागं गाडी, गाड्या सोडीना नाकेवाला
मागें पैक्याचा हुंडीवाला

पुष्कळदां बऱ्याच धान्याच्या गाड्या पाहूनहि लोक आदरानं विचारपूस करतात, कीं 'हें इतकं पीक कोणाच्या शेताचं आहे ?'

गाडीमागं गाडी, गाड्या गेल्या नऊ
लोक पुशित्यात कुठं खंडल्याती गहूं ?

एकंदरींत प्रसंग छोटेछोटेसेच, परंतु त्यांत हार्दिक भावना मिसळलेल्या असल्या कीं त्यालाहि एक प्रकारची नाजूक सौंदर्याची झिलई चढते यांत संशय नाहीं.

पशुधनाची जिवाविशेष मातब्बरी या शेतकरी जीवनांत असते हें सांगितलें पाहिजे. गुरें, वासरें, गाई, म्हशी, बैल, घोडे हेच तर जिवाचे मित्र. खरोखरच गुरावासरांबद्दल किती माया, किती ममता त्यांना ! अन् कां असूं नये बरें ? शेतांत राबायला बैल सोबत देतात, कोठें जायचें असेल तर घरच्या बैलांची जोडी नजरेसमोर हंबरत असते. मोट चालायची बैलांच्या जिवावर ! घरांत दूधदुभत्याची समृद्धि गाईम्हशींमुळेंच असायची ना ? लहान मुलें गुरें चारायला रोज घेऊन जातात. चारणीला लावून मुलें रानांत खेळतात. गोकुळ म्हणतात तें हेंच ! लहानपणापासूनच नित्य असा मानसिक संबंध येत असल्यामुळें शेतकऱ्यांना गाईबैलांबद्दल इतका जिव्हाळा वाटतो, कीं जसे तेहि कुणी कुटुंबांतले आप्तच आहेत ! एकाद्या गोड गळ्याच्या गवयाला जशी वाद्यांची सुरेल साथ असावी, तशी ग्रामीण जनतेच्या जीवनाला या मुक्या प्राण्यांच्या सहवासाची जन्मभर साथ असते.

घरीं गोधन विपुल असेल तर घरधन्यांना या इतक्या गाई चारून आणायला उशीर होतो याबद्दलचे शब्द पहा--

सकाळच्या पारीं, गाईची लांबड
माझ्या गवळ्या, पडली सांजड

सगळ्या काळ्याभोर म्हशी चारणीला नेल्या कीं मध्यभागीं गोरा, नीटस गुराखी किती छान दिसतो, त्याचें वर्णन आहे--

म्हशीराख्या दादा, म्हशी चरती उभा बांध
माझा गवळी गोरा चांद

हें गुरावासरांचें वैभव किती मानाचें असतें, याची या गृहिणीला जाणीवहि आहे. ती पतीबद्दल आदरानें म्हणते—

गईनी भरला गोठा, म्हशींनी भरला वाडा
आला सखा गवळी माझा, वाट सोडा

एक माहेरी जाणारी मुलगी बांधाच्या कडेला जरा विसाव्याला बसते. तिला दुरून माहेरचें गोकुळ कसें प्रसन्न दिसतें! तिचे समाधानी शब्द पहा—

माहेराला जाते, मी पानंदी वसते
वाडी गवळ्याची आनंदी दिसते

अशा प्रकारें पशुधनाबद्दल व गोपाल-जीवनाबद्दल धन्यतेचे उद्गार जागोजाग आढळून येतात.

ज्या घराण्यांत पिढ्यानुपिढ्या गवळ्याचा धंदा चालतो, त्यांच्या कारभारणींच्या ओव्यांतून दूधदुभतें, दुभतीं जनावरें, त्यासंबंधींचीं कामें व रोजच्या जीवनक्रमांतील तत्संबंधीं येणारे विचार यांचे उल्लेख वैपुल्यानें आढळतात. अशा घरांत पहांटेच ताकाचा डेरा घुमूं लागतो. कोणी गवळण उभ्यानें ताक करून झटकन् लोणी काढते त्याबद्दल गौरवाचे शब्द पहा—

घुसळन घुसळीते, पाच फेरांत आलं लोनी ।
माझ्या गवळनीची भरज्वानी !॥

आपली तरुण दमदार पत्नी अशी कर्तबगार आहे हें पति येथें सांगतो, तर पत्नी पतीबद्दल कौतुकानें काय म्हणते पहा—

पहांटच्या पारामंदी, भरला रांजन मारी लाटा ।
माझ्या गवळ्याचा खर्च मोठा ॥

रांजणभर विरजण ही सामान्य गोष्ट नव्हे. गवळी मातबर असल्यावांचून हें शक्यहि नाहीं. गायगुरांचें ऐश्वर्य, गोपालांचा धंदा यांचा अभिमान मराठमोळा समाजांत किती आहे, याची ओळख या ओव्यांतून पटते.

घरीं लक्ष्मी येणें ( म्हणजेच वैभव प्राप्त होणें ) ह्याबद्दल उल्लेख करतांना देखील 'लक्ष्मी तांब्याभर ताक पिऊन संतुष्ट झाली' अशी कल्पना केलेली आढळते.

लक्ष्मी आई आली, तांब्यानं ताक प्याली ।
माझ्या गवळ्या भाक दिली ॥

फार काय, पहांटे लोणी काढायला मिळणें हेंहि भाग्य थोडें नाहीं अशी या गवळणीची दृढ समजूत आहे—

पहाटेच्या पारामंदी हात भरिला लोनियानं ।
बाप-बयाच्या पुनियानं ॥

एकंदरींत जीवनाचा प्रमुख व्यवसाय म्हणून जो असेल त्याबद्दल अशा आत्मीयतेचे विचार येणेंहि साहजिकच आहे आणि म्हणूनच सूर्य उगवणें म्हणजे वासरें सोडायची वेळ, सूर्य मावळणें आणि गुरें चरून परत यायची वेळ, इत्यादि समीकरणें मनांत ठसून गेलेलीं असल्यानें अनेक ओव्या अशाहि आढळतात. गाईंना सुंदरी, मोकाशिणी, गुजरिणी इत्यादि आदरार्थी विशेषणें दिलेलीं आढळतात. शेतीला बैल लागतात, अर्थात् शेतीबरोबरच गवळ्याचाहि जोडधंदा उत्तम चालतो, ही गोष्ट लक्षांत घेण्याजोगी आहे. खेडेगांवांतून बहुधा आठवड्यांतून फक्त एक दिवस बाजार भरतो. याच दिवशीं गुरांची खरेदी विक्री व्हायची, लुगडीं, चोळीचे खण वगैरे विकत घ्यायचे, बाजाराला धान्यधुन्य घ्यायचें अगर विकायचें, मळ्याचा भाजीपाला, विड्याचीं पानें वगैरे विकायला न्यायचीं, अशा प्रकारें ग्रामवासियांची या दिवशीं फार धांदल उडून जाते. केवढी धामधूम अन्

अपूर्वाई या दिवसाची ! अर्थात् दैनंदिन जीवनाचें प्रतिबिंब या गीतांतून उमटत असल्यामुळें 'भरला बाजार' अगर 'भरल्या बाजारांत' अशा सुरुवातीनं कितीतरी ओव्या निर्माण झाल्या व त्यांतून या बाजाराचीं वर्णनेंहि पुष्कळच आलीं आहेत. अर्थात् गुरांबासरांबद्दलची आस्था याहि ओव्यांमधून दृष्टीस पडते.

अशा बाजाराला आसपासच्या खेड्यांतून, दुरून दुरून माणसें येतात. गुरांचा बाजार फार गजबजलेला दिसून येतो. अनेक प्रकारचीं जनावरें विक्रीला आलेलीं असतात व दलालांची अगदीं गडबड उडालेली दिसून येते. या गुरांमध्यें तान्ह्या गाई, सुंदर गोजिरवाणे खोंड, भरदार म्हशी, खिल्लारी पुष्ट बैल, देखणीं जनावरें काय आलीं आहेत इकडे जातीच्या शेतकऱ्याचें लक्ष चट्दिशीं जायचेंच. कधीं हेड्याचें (दलालाचें) काम पत्करून कधीं कधीं इतके सुंदर बैल कुणबी विकायला घेऊन येतात कीं दृष्टच पडेल—

भरल्या बाजारांत उंच शिंगाचे बैल
दृष्ट हेड्याला होईल !

दलालामार्फत या गुरांची खरेदी केली जाते. या बाजाराचीं, या गुरांच्या खरेदी-विक्रीचीं कितीतरी अगत्याचीं गीतें रचलेलीं आढळतात.

हे जणु जिवाचे मैतरच ! त्यांची बाजारांतून योग्य पारख करून आणायची व त्यांच्या सहवासांत, त्यांच्या मदतीनें आपली शेतकी जीवनाची गाडी जन्मभर चालवायची, ही खेड्यांतल्या जनतेच्या अंगवळणीं पडलेलीच गोष्ट आहे.

अजूनहि आपल्या देशांत खेड्याखेड्यांतून यांत्रिक सुधारणा, धरणें, कालवे इत्यादींचा अभाव असल्यानें शेतकऱ्यांचें जीवन बहुधा पाऊसपाण्यावर अवलंबून असतें. एकादे वर्षी पाऊस पडतो, पीक बरें येतें, शेतकरी हर्षित होतात. एकादे वेळीं देव रागावतो, मेघराज रुसतात, सूर्य डोळे वटारून पहातो, पिकें जळून जातात. असें हें जीवनाचें तंत्र पावसावर अवलंबून असल्यानें लोकांना पर्जन्याची केवढी महती वाटते, हें ह्या ओव्यांतूनहि स्पष्ट झालेलें आढळतें. पुष्कळ दिवस पाऊस पडला नाहीं व आकाशांत काळे ढग सांचू लागले तर पुढील उद्गार आर्ततेनें निघणें अगदीं साहजिकच आहे—

पड पड मेघराजा, काय पडूसं वाटेना
पाप धरतीला साठवेना

किती मनापासून प्रार्थना आहे बरें ही! पावसासाठीं आतुर असलेली दुसरी एक स्त्री पावसाची विनवणी काकुळतीनें करीत आहे——

पड पड पाउसा नको बघूंस तालामाला
ताईत बंधु माझा, कुनबी अट्टाल्याचा* भ्याला

केव्हां केव्हां पावसाला उशीर झाल्यानें कोवळे अंकुर करपूं लागतात व जीव डोळ्यांत आणून गृहिणी विनवणी करते, ती किती करुण आहे——

पड पड पावसा, माळामुरडाच्या झाल्या वाती
कुनबी आल्याती काकुलती

आणि नेहमींच कांहीं दुष्काळ नसतो. पुष्कळदां शेतकऱ्यांच्या विनंतीला मान देऊन, पर्जन्यराज वेळेवर आगमन करतात. केवढा तो आनंद! भाऊ बहिणीला आश्वासन देऊं लागतो——

पडूंदे पाऊस, पिकूंदे माझा मका,
करीन तुझ्या डोरल्याला टिक्का

अशीं गोड मनोराज्यें सुरू होतात. मृगाचें नक्षत्र येतें, आभाळ काळेंभोर होतें. जणुं श्यामलवर्ण, छोटासा, पेरणीला निघालेला शेतकरीच!——

मिरगाच्या महिन्यांत काय आभाळ उठयेलं
कुना कुनब्याचं बाळ, पेराया नटयेलं!

आणि मग चारी धारांनीं पाऊस सुरू होतो. पावसाला आपलेपणानें गीतें म्हटलेलीं आहेत. पाऊस म्हणजे किती मोलाची गोष्ट——

पडतो पाऊस, मोती पवळ्याच्या धारा
सुगी आली घरा!

असे धन्य व संतुष्ट उद्गार निघूं लागतात, पाऊस पडल्यानें घरधनी भिजून चिंब झाले आहेत, भाऊ शेतांतून रास घाईनें गोळा करीत आहे, मुलाच्या पिकांवर पाऊस वर्षत आहे इत्यादि वर्णनाच्या ओव्या आढळतात——

* दहा माणसांचं खटलं आहे असा

पावसानं फळी मांडली सऱ्यां तळी
ताईत बंधुजी, रास मधुनी गोळा करी

किंवा पुढील ओवी पहा—

पावसानं फळी मांडली कोसावरी
माझ्या राघूच्या उसावरी

वळीव पावसानें देखील पुष्कळदां फायदा होतो, त्याबद्दलहि अधुनमधून उद्गार आहेत. पुढील वर्णन पहा—

वळीवाच्या पावसानं जिमीनीबाई भरदार
ताईत बंधुराया ओटी भर !

असें पावसाचें वर्णन तऱ्हेतऱ्हेनें केलें आहे.

एकंदरींत पर्जन्याप्रमाणें लहरी कोणी नाहीं हेंच खरें ! त्यामुळें एकाद्या लहरी, चंचल राजाच्या राजवटींत जसे सारे प्रजानन राजाच्या डोळ्याच्या धाकांत असावे, त्याप्रमाणें पाऊस या किसानांवर सत्ता चालवतो ! त्याची कृपा झाली तर पोराबाळांना चार अन्नाचे घास मिळायचे अन् गैरमर्जी झाली तर उपासमार, दारिद्र्य, पिकांची बूड, कर्ज या सर्व गोष्टींनीं आयुष्य अंधारून जायचें ! हें ओळखूनच पाऊस पडल्यानें येणारी प्रसन्नता व न पडल्यानें येणारी खिन्नता अशा दुहेरी भावनांचें चित्रण या लोकगीतांत आलेलं आहे.

ग्रामीण जीवन हें अशा प्रकारें बहुसंख्य शेतकऱ्यांचेंच असल्यानें या जीवनाला आनुषंगिक अशा शेतीमळे, गुरेंवासरें, पाऊसपाणी, धान्यधुन्य वगैरे गोष्टींवर त्यांचें सुखदुःख अवलंबून असतें; व ही मानसिक भूमिका अनेक गीतांतून स्पष्ट झालेली आहे.

विविध रंग भरून जसें एक सुंदर दृश्यचित्र तयार होतें, त्याप्रमाणें या अनेक गोष्टींच्या रमणीय छटांचे रंग ग्रामवासी जनतेच्या जीवन–चित्रांत मिसळलेले आढळतात. कधीं भडक, कधीं सौम्य, कधीं फिके रंग तर कधीं रम्य खुलावट, केव्हां करुण भावनांची छाया तर केव्हां हर्षमोदाचा प्रकाश अशा वैचित्र्यानें ते नटल्यासारखे दिसतात. साधी राहाणी, कष्टाळूपणा, गरीबी यांचेंहि यथार्थ दर्शन या चित्रांतून होतें. व तें आपल्या मनावर ठसून राहण्याइतकें जिवंत आहे, यांत संशय नाहीं.

# कृषिजीवन

नवस करूं गेले, इहिरीबाई तूं सुंदरी
जतन कर माझं, चार बैल मोटकरी १
हात मी जोडिते, इहिरीवाईच्या काठाला
गनीस माझा बाळ, नवा लागला मोटेला २
पहांटेच्या परामंदी, चाक वाजतं भिरीभिरी
माझं देव अर्जुन मोटेवरी ३
वनीचं पाकरूं, करितं पानीपानी
बंधुच्या मळ्यामंदी चावऱ्या मोटा दोन्ही ४
नवस मी केलं, इहीरीवरच्या म्हसूबाला
जतन कर माझ्या मोट हानत्या जासूदाला ५
हाक किती मारूं गावाभाईर मोटक्याला
रंग नारंगी पटक्याला ६
शिवंच्या शेतावरी कुनी पपई लावली
झाली मोटकऱ्या सावली ७
आली गेली पुशित्यात कुठं गेलाया मोटकरी
बंधुजीचा माझ्या जरीपटका धावेवरी ८
भरली तीनसांज दिवा लावावा चटकरी
धनी आल्याती मोटकरी ९
जेवनाची पाटी मानेला झाली जड
बंधु मोटेचं बैल सोड १०
मोट चालयेते, एका वानाचं चारी बैल
दृष्ट मोटकऱ्या व्हईल ११
बारव इहिरीवर पारवं घुमत्यात
नंदी मोटेचं झुलत्यात १२
शेताला नेली कुरी, तिफणीबाईला तीन नळ
माझा रासन्या, चंवरी ढाळं १३

तिफणीबाईचं तास जिमिनीच्या शिगी
बंधुजीच्या पाठी लक्षुमी उभी १४
शिवंच्या शेतामंदी गेली तिफणीमावली
बंधुजीला धन मोत्याची गावली १५
शेताला नेली कुरी, राम पेरीतो सीतामोघी
हाणी रासन्या बिगीबिगी १६
शेताला गेली कुरी, गेलीया गव्हाची
मागे रास माझ्या भिवाची १७
शेताला नेली कुरी आधी मोगरा तुरीचा
नंदी आवरा कुरीचा १८
शेताला जाते कुरी, सव्वा मनाचा पेरा झाला
बैल वेशींत डरकला, धनी मनांत हरखला १९
शेताला जाते कुरी, उडदा मुगाचा वेवड
बंधुराया, धुरीचा बैल निवड २०
शेताला नेली कुरी, गहूं हरबऱ्याचा पेरा
बंधुजीच्या हलगीला बैल बारा २१
पेरायाची कुरी, रुप्याची चाडनळी
ताईत बंधुजी पेरक्या चवरी ढाळी २२
पेरनीच्या दिसामंदी बी घालीतो घोड्यावरी
बंधुजीचा हात, तोड्याचा चाडावरी २३
शेताला गेली कुरी, दाट पेरणी अर्जुनाची
ओटी बांधली रुमालाची २४
शेताला नेली कुरी, बैलाला म्हनं काशी
सोनं लागलं पहिल्या तासीं २५
शेताला गेली कुरी, बांधाकडेला उभी केली
माझ्या बाळानं बैलाला हाक दिली २६
खळं भरील दान्यानं बैल भरल्याती कुशी
सखा शेल्यानं पाठ पुशी २७

हातीं घेऊनी गोफन बंधु उभा टेकावरी
नजर सव्र्या शेतावरी २८

शीवंच्या शेतामंदी शाळू आलाया राखणीला
घुंगुर लावलं गोफणीला २९

लोक बोलल्यात बोलती वेशीला
माझ्या बंधुजीच्या, जोड-वावड्या राशीला ३०

वारं सुट्येल, सुटलं गंग कोनी
राशीला, वावड्या लावा दोनी ३१

हरचंदर वारा मधुनी घेध्या घेतो
रामचंदर पानी नेतो ३२

जेवनाची पाटी नेतां माझी मैना घामेजली
माझ्या बाळायानं शिवंची शेतं केली ३३

पिकलं पिकलं म्हणुं बंधुची मालदांडी
सारा गाडीला पहिल्या तोंडी ३४

पिकलं पिकलं म्हनुं बंधुची चुनखडी
ऐकूं येती भलंगडी ३५

पिकलं पिकलं म्हनु, बंधुजीच्या गांवदरी
कणगी बळद, ज्येवचरी ३६

दुरून ओळखते कोन निचळ चालणीचा
माझा बंधुराय, हिरवा जुंधळा पलाणीचा ३७

पहाटच्या पारांत, कोन कोयाळ गीत गातो
ताईत बंधुजी उसाहळदीला खत नेतो ३८

नांगऱ्यापरायास माझा आगल्या गरजतो
बारा बैलाचीं नांवं घेतो ३९

नांगऱ्यापरायास आगल्या नटवा
त्याच्या खाकेला बटवा ४०

आगल्यापरायास साद बारीक नांगऱ्याचा
खांद्या चाबूक घागऱ्याचा ४१

नांगऱ्यापरायास आगल्याचा थाट
देते न्याहारीला दहीभात ४२
शिवंच्या शेतावरी गार सावली पांगायाची
तिथं वसती नांगऱ्याची ४३
बारा बैलाचा नांगूर, चाले कुंद्याच्या फडावर
जराची अवदागीर अगल्या बाळावर ४४
बारा बैलाची दावण, मधी शिंगीचा डांब रोवा,
बंधुजी दंडिल्याचा, वाडा दावा ४५
बारा बैलाची दावण, मधी म्हशींची म्होरकी
माझ्या बंधुजींची संपत मनासारखी ४६
बारा बैलायाचा, कुनबी तेगाराचा
माझ्या बाळायाच्या खांदी, आसूड घागऱ्याचा ४७
बारा बैलाचा नांगूर, चाले कुंद्याच्या फडावर
पाप्या मानसाची नंदर, माझ्या चालीच्या खोंडावर ४८
बारा बैल तुझ्या शेती, पानी धरनाचं पिती
कुनब्या सायासाचं किती? ४९
बारा बैलाचा नांगूर, खोंडं सुटली कुळवाला
जन बोलती बंधुला, कुनबी कशानं वळंवाला? ५०
वाटेवरलं शेत आल्यागेल्यानं मोडलं
सावळ्या बंधुजीनं भाग्यवंतानं पेरलं ५१
बांधाच्या कडेला भिकाऱ्यांची दाटी
सावळा कंथ माझा सुपानं धान्यं वाटी ५२
वाटेवरली लक्षुमी आली शेताच्या कांठोकांठी
धान्य भरायाला कणगींत होई दाटी ५३
वाटेवरली लक्ष्मी आली दडत लपत
धान्याची ग रास, पडली सोप्यांत ५४
शेताची राखण, कंथ उभा माळ्यावरी
धान्य पडे खळ्यावरी ५५

बारा बैलाचा नांगूर, शेत काजळाची वडी
घरधनी ग राबती, संगं घरचं बारा गडी ५६
शेताच्या बांधावरी कोन हिरव्या वनातीचा
धनी चावऱ्या जिमीनीचा ५७
वाटेवरली इहीर, पानी लागलं वरवंट्याला
लई जिमीन मराठ्याला ५८
वाटेवरलं शेत आल्यागेल्यानं नेल्या पेंड्या
बंधुजीला माझ्या, शाळू झाल्याती तीन खंड्या ५९
वाटेवरलं शेत गडी मानसं राबतात !
नांव थोराचं सांगतात ! ६०
खळ्यामंदी उभा, हातामंदी पाटी
बाळराज माझा आल्या गेल्या धान्य वाटी ६१
पाभरबाईला चाडदोर रेशमाचा
पाठचा बंधुजी पेरनार नवशाचा ६२
वाटेवरचं शेत आल्यागेल्याला सोलाना
बंधु भिडेचा, बोलंना ! ६३
वाटेवरचा मळा नार मागती पुंडा ऊंस
बंधुजी माझा, पान्यावानी पाजी रस ६४
वाटेवरला मळा, आल्यागेल्या ऊंसरस
धनी मळ्याचा राजस ६५
वाटेवरला मळा, नार झटते ताटाला
बंधु आलाया हटाला, माळा घालीतो वाटेला ! ६६
वाटेवरला मळा कुना हौशानं केला
रंग माचानाला दिला ६७
माळ्याच्या मळ्यामंदी केली उसाची लावण
वडील मामाजींनी भरली गाईंनी दावण ६८
माळ्याच्या मळ्यामंदी केळी पेरूला काय तोटा
माझ्या मामाजीच्या, एका इहिरीला बारा मोटा ६९

माळ्याच्या मळ्यामंदी चाक वाजतं कुईऱ्याचं
गुजर बंधुजीच नंदी गेल्यात पहिऱ्याचं ७०
माळ्याच्या मळ्यामंदी भाजी तोडीन पानपान
माझ्या मामाजीनं पेरले चारी वान ७१
माळ्याच्या मळ्यामंदी मोटेला नवा नाडा
पानी जातं फुलझाडा ७२
माळ्याच्या मळ्यामंदी पेरीते खसखस
चुडीया राजसाची एकादस ७३
मळ्याच्या मळ्यामंदी माळिणी जावाजावा
फुलांचा बाग लावा ७४
पाटानं जातं पानी, उसासंगट गाजराला
मळी शोभते गुजराला ७५
माळ्यानं केला मळा, बंधुनं केली शेरी
चढाओढीनं बैलं चारी ७६
हातांत इळादोरी, कुठं निघालं मळंकरी
बंधु चातुर माझं, केली उतरी येळापुरी ७७
जेवनाची पाटी नेतां, मानेला वझं झालं
हौशा भरताराचं शिवेला पानमळं ७८
जेवनाची पाटी, माझ्या मानेला झाली जड
बंधु, वाट मळ्याची अवघड ७९
जेवनाची पाटी, मी ठेविते धांवेवरी
घरधनी माझं, कुठं गेल्याती मळेकरी ८०
जातीचा मऱ्हाठा, हिंमतीनं झाला माळी
ताईत बंधु माझा उसांत लावी केळी ८१
माळ्याच्या मळ्यामंदी जाईशेवंती खुलत
बंधुजी येतो रस्त्यानं डुलत ८२
लगीन न्हाई, मूळ कशाचं मला आलं
माझ्या बंधुजीचं गुऱ्हाळ चालू झालं ८३

पहाटच्या पारामंदी, हाक हारोळी चिल्लाळाची
ताईत बंधु माझा, पाळ हानितो गुऱ्हाळाची ८४
लगनापरायास, गुऱ्हाळा तुझी हवा
बंधुजीचा घाना, कातीव बैल नवा ८५
लगनापरास गुऱ्हाळाची हवा
चरकीं जळे दिवा ! ८६
नंदीमंदी नंदी, मल्ल्या नंदी अरेराव
धन्या, लाडक्या दावं लाव ८७
बैलामंदी बैल, पांखऱ्या दूध प्याला
सडका लावुन मळ्या नेला ८८
बैलामंदी बैल हौशा किती शाना
धन्यावाचुन पानी पिईना ८९
गाडीच्या बैलांनी शिवारीं केला दंगा
धनी गावाला गेला सांगा ९०
मारक्या बैलाला भीतया सारं गांव
धनी धाकुटा लावी दावं ! ९१
थोरलं माजं घर अंगन बिघाभर
हौशा बंधुजी बैलाला जागा कर ९२
गाडीच्या बैलाला रातरीची पडली चाल
गाडीवानाचं डोळं लाल ९३
गाडीचा बैल, बघतो रागंरागं
हातीं कासरा, धनी मागं ९४
दुरुन ओळखते गाडीचं चक्कर
बैल ऱ्हवं, तीं पाखरं, घरच्या गईची वासरं ९५
गाडीच्या बैलांनीं घेतलं आडरान
माझं भुक्यालं गाडीवान ! ९६
माझ्या वाड्याम्होरं, धुरळा कशाचा उठला ?
नंदी गाडीचा सुटला ९७

गाडीच्या गाडीवाना, नंदी तान्हेला गाडीचा
हौद खंडीला पान्याचा ९८

शिवंच्या शेतावरी, जोड-नांगर कुनाचं ?
बैल डफळ्या वानाचं ? ९९

गाडीची बैलं, माघारीं बघत्यात
धन्या इसावा मागत्यात १००

रंगीत काढन्या बैल रस्त्यानं झुकतो
माझा बंधुराय लिम्ब उतार फेकीतो १०१

हात मी जोडीत शहर सातारा सडकबाई
बंधुजी गाडीवानाला झोप लई १०२

गाडीमागं गाडी, गाड्या नाकंवाल्यानं अडवील्या
सावळ्या राजसानं, सोनं देऊनी सोडवील्या १०३

गाडीमागं गाडी, गाड्या सोडीना नाकेवाला
मागं पैक्याचा हुंडीवाला १०४

गाडीमागं गाडी, गाड्या गेल्या नउ
गुजर बंधुजी, कुठं खंडल्याती गहुं ? १०५

गाडीच्या गाडीवाना, गाडीला खिळामोळा
बैलं संभाळ, तान्हेवाळा १०६

गाडीच्या गाडीवाना, तुझ्या गाडीला नवा कणा
गाडी हाकार श्यानपना १०७

गाडीच्या बैलाला, परोपरीच्या सापत्या
करतो नवल जकात्या १०८

गाडीच्या बैलाला जिरेसाळीची चंदी
बंधुजीचे रतीबाजोगे नंदी १०९

गाडीच्या बैलाला शेंब्यासाखळ्या घाला झुली
बंधुजीनं इंद्रायणीची खेप केली ११०

गाडीमागं गाडी। मधल्या गाडीला हिरवा रंग
नारी पेठेच्या झाल्या दंग १११

गाडीच्या गाडीवाना गाडीला नवी बाजु
बैल तान्हेलं, पानी पाजुं ११२
गाडीच्या बैलाच्या टापा वाजती टपटपा
बंधुजी करीतो पुन्याच्या खेपा ११३
डोंगरकटारीला बैल चरे काळाकोस
धनी वारुळावरी बसं ११४
लक्ष्मीआई आली पुतळा बैलाच्या नखीं
ताईत बंधुजी, धनी धड्यानं सोनं जोखी ११५
लक्ष्मीआई आली, आली चटकचांदणी
जोडव्याच्या नादें बैल बुजले दावणी ११६
आई तूं वाघजई, वाघ संभाळ आपुला
पुतळा माझा बंधु बैल चारीतो एकला ११७
बैल अंजिऱ्याची शिंगं सोनियाची
दृष्ट मी काढते, बैलासंगट धनियाची ११८
दिस मावळला सांगली मिरजेच्या मैलावर
धनी टाका चाबूक बैलांवर ११९
बंधुजीला रात झाली, शिवंच्या शेतामंदी
नंदी अवखळ हातामंदी १२०
साखळ्याचा नाद, नाद येतुंया घोगरं
बैल बुजला हंबीर १२१
बैलामंदी बैल पाखऱ्या राबयेला
गोन्या हलक्या लादयेल्या १२२
खांद्यावर पेंडी निघाला बाजाराला
बैलांची जोडी आनिली हजाराला १२३
भरल्या बाजारांत उंच शिंगाचं बैल
दृष्ट हेड्याला व्हईल १२४
भरल्या बाजारांत आल्याती तान्हं खोंडं
गनीस बंधु माझं, दलालामागं हिंडं १२५

भरल्या बाजारांत आल्याती तान्ह्या म्हशी
उभा बंधुजी, दलाल्या बाईपाशी १२६
लोकाच्या बैलाला काय पाहातां वाकुनी
बैल पाखऱ्या माझा गेला दावण झाकुनी १२७
बैलाला दृष्ट झाली, झालीया येशीमंदी
लिंब डाळिंब, बंधुच्या खिशामंदी १२८
बैल अंजिऱ्याचा पिवळा दिसे माथा
बंधजीनं त्याला, जेजुरी नेला हुता १२९
बैलामंदी बैल, बैल मदन दिसणीला
मोती लाविलं वेसणीला १३०
बैलाला दृष्ट झाली, पेठेच्या वाण्याची
दृष्ट उतरीते बैलासंगट धन्याची १३१
दृष्ट मी काढीते, मीठमोहऱ्या मिर्च्या तीन
धन्या बैलाची एक शीण १३२
बैलामंदी बैल हौशा गुनाच
नका जुंपू उन्हाचा १३३
बैलांची नांवं, मोऱ्या, पुतळ्या, चिन्तामनी
बंधु रघुनाथ, मागं झुले हौशा धनी १३४
सकाळच्या पारी हात जोडिते डोंगराला
खोंड खिलारी नांगराला १३५
सकाळच्या पारी गाईची लांबड
माझ्या गवळ्या झाली सांजड १३६
गईच्या गाईराख्या, गई राखावी देखणी
हौशा बंधु तिचा धनी, पाठचा चिंतामणी १३७
गाईंनीं भरला गोठा, म्हशींनीं भरला वाडा
आला गवळी माझा, त्याला वाट सोडा १३८
गईचा गईराख्या, म्हशीचा बाळनंदी
तान्हा माझा पांवा वाजवी पाणंदी १३९

गईचा गईराख्या, म्हशीला गडी ठेवा
बाळ वासरांमागे लावा १४०
गईचा गईराख्या, म्हशी ढानक्या गेल्या पिका
गवळी अजाण मारूं नका १४१
नेनन्त्या गुराख्याचं काठी धोतर माळावरी
गाई पांगल्या गोळा करी १४२
गाईला झाली खोंडं, म्हशीला झाल्या रेड्या
लावूं जोत्याला मोरकड्या १४३
म्हशीराख्या दादा म्हशी चरती उभा बांध
माझा गवळी गोरा चान्द १४४
सकाळच्या पारी हात भरिला अमृतानं
आंदन दिल्या गाई, पिता माझ्या सव्रतानं १४५
पहाटेच्या पारामंदी हात भरला लोनियानं
बापबयाच्या पुनियानं १४६
पहाटेच्या पारामंदी रवीबारडी झाली एक
माझी बाळाबाई नवशीक १४७
पहाटेच्या पारामंदी रवीबारडीळा आलं गोंडं
माझ्या गवळनीला राजदंड १४८
पहाटेच्या पारामंदी, भरला रांजन मारी लाटा
माझ्या गवळ्याचा खर्च मोठा १४९
घुसळन घुसळते पाच फेराला आलं लोणी
माझ्या गवळनीची भरज्वानी १५०
घुसळन घुसळते, रवीबारडी घुंगुराची
माझी गवळन मथुरेची १५१
गई हबरती वासरं साद देती
वाडा गवळ्याचा लक्षपती १५२
सकाळच्या पारी रविबाईचा गोमकार
माझा गवळ्याचा शेजार १५३

कोन वाडा पुसती पिताजी गवळ्याचा
दुरून दाविते दारी चौरंग अंगुळीचा १५४
लक्ष्मीआई आली, आलीं उठत बसत
वाडा गवळ्याचा पुसत १५५
लक्ष्मीआई आली, तांब्यानं ताक प्याली
माझ्या गवळ्या भाक दिली १५६
जाते माहेराला पानंदी बसते
वाडी गवळ्याची आनंदी दिसते १५७
उगवला नारायेन, उभं वसरीवाईला
बाळका गनपती सोड वासरं गाईला १५८
सकाळच्या पारी, म्हशीखाली रेन्दा
माझ्या गवळ्याला सोभतो गवळी धंदा १५९
सकाळी उठूनी स्वारी गोठ्याकडे गेली
धनियांना पाहूनी जोडी गाईची हंबरली १६०
तिन्हीसांजा झाल्या दारी घंगाळ वाजती
घरधनियांचे बैल दाणा खाती १६१
भरली तीनसांज दिसा सोडली कासरं
सोड गाईला वासरं १६२
भरली तीनसांज दिवा लावावा राहीबाई
गवळी पाजितो तान्ह्या गाई १६३
भरली तीनसांज गाई आल्या गोठींत
दूध बाळाच्या वाटीत १६४
भरली तीनसांज दिवा लावावा सवाशिणी
गाई आल्याती मोकाशिणी १६५
भरली तीनसांज दिवा लावावा तुळशीपाशी
बंधुजीचे बैल हंबरती वेशीपाशी १६६
तीनसांजा झाली, गईवासरं सोडा सोडा
राया नंदाला दूध काढा १६७

भरली तीनसांज दिव्याला ताकीत
चाळ आला लक्ष्मी हाकीत १६८
भरली तीनसांज दिवा लावु आडभिंती
दावणीचे बैल आले किती १६९
भरली तीनसांज, गुरांढोराचा वकूत
दिली बाळाला ताकीत १७०
भरली तीनसांज, दिवा लावावा सवंदरी
बंधुजीचं बैल आल्याती गावंदरी १७१
भरल्या तीनसांजा दिवा लावूं कोठे कोठे
धरधनियाचे चिरेबंदी गाईगोठे १७२

## पाऊस

पान्यापावसानं टाकली लांब दोरी
नक्षत्रं गेली चारी १७३
पड पड तूं पावसा, माळामुरडाच्या झाल्या वाती
कुनबी आल्याती काकुळती १७४
पड पड तूं पावसा, पिकूंदे मूगराळा
बंधु माझा लेकुरवाळा १७५
पड पड पावसा, नको बघूं तालामाला
माझा कुनबी, अट्टाल्याचा भ्याला १७६
पड पड पावसा, काय पडूंसं वाटंना ?
पाप धरतीला सांठवेना १७७
पड पड पावसा, सारी करावी ओली माती
जीव येतो काकुळती १७८
पड पड पावसा, नको बघू तालामाला
व्हईल दुबळ्या भाजीपाला १७९
मिरगाच्या महिन्यांत काय आभाळ ऊठयेलं
कुना कुणब्याचं बाळ पेराया नटयेलं १८०

पावसाची वाट पहात्याल भलंभलं
देव मेघाजीनं सूर्यासमोर डेरं दिलं १८१
पड पड पाऊसा, कोकन धरतीला
पानी येतंया खडूळ कृष्णाबाई गरतीला १८२
मेघरायाचं लगीन ढगाचा वाजे डफ
ईजबाई नवरी आली झपझप १८३
मेघरायाचं लगीन ढगाच्या मांडवात
नवरी ईजबाई आली चकाकत १८४
मेघरायाचं लगीन ईजबाई करवली
भाऊच्या शेतावर त्यांची वरात मिरवली १८५
पडूंदे पाऊस पिकूंदे माझा मका
बहिणा करीन तुझ्या डोरल्याला टीक्का १८६
पडूंदे पाऊस पिकूंदे माझा ऊस
बहिणा, करीन तुझ्या डोरल्याचं घोस १८७
पडतो पाऊस नका करूं गाजावाजा
आला धरनीबाई पती तुझा १८८
पडतो पाऊस नका करूं गलबला
जिमिनीबाईचा पती आला १८९
पाऊस पडतो मोती पवळ्याच्या धारा
सुगी आली घरा १९०
पाऊस पडतो मोत्याचा शिरवा
मळा सख्याचा हिरवा १९१
पावसानं फळी मांडली अनिवार
माझा भिजला तालेवार १९२
वळीव पाऊसानं फळी मांडली दुरुनी
माझ्या राघूबाची शेती निघाली पेरूनी १९३

वळीव पावसानं फळी मांडली कवाची
माझ्या राघूबाची शेती पाभर गव्हाची १९४

पावसानं फळी, मांडली वरच्यावर
माझ्या राघूच्या मिरच्यावर १९५

पावसानं फळी मांडली कोसावर
माझ्या भाऊच्या उसावर १९६

पावसानं फळी मांडली सऱ्या तळी
ताईत बंधुजी रास मधुनी गोळा करी १९७

पावसानं फळी मांडली कोकनांत
बाळ भिजला दुकानांत १९८

पावसाची फळी उठली काळीकूच
सोडा नांगर कूरीयेचं १९९

वळवाच्या पाऊसानं जिमीन भरदार
ऊठ कुणब्या ओटी भर २००

वळीव पाऊस पडून गेला राती
ताईत बंधुजीला धान्य पेराया दिली घाती २०१

वळीव पाऊसानं मोठा भाऊलपणा केला
बंधुजीचा बैल तासाला पानी प्याला २०२

—*—

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६८८६
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ७४३१८ दि: ७।१०८
क्रमांक १८८६ नों: दि: ११।३।८१

## विभाग २

# कौटुंबिक ओव्या

(१) माहेर

(२) बंधुराय

(३) आप्तेष्ट

(४) मैत्री

# माहेर

स्त्रीनिर्मित गीतांत फार मोठा भाग कौटुंबिक ओव्यांनीं सजलेला आहे यांत आश्चर्य कोठलें ? स्त्रीचें उभें आयुष्यच मुळीं कुटुंबजीवनानं व्याप्त आहे. वस्त्रांत जसे आडवे उभे धागे एकत्र विणलेले असतात तसे स्त्रीच्या जीवनपटांत सासर—माहेरच्या प्रीतीचे धागे जुळलेले असतात. स्त्रीचें सारें आयुष्य जणूं या कौटुंबिक दालनांसभोंवतीं प्रीतीची रुंजीच घालीत असतें ! अशा वेळीं मन मृदुतेनें उचंबळून येतें, भावनांना बहर येतो व काव्याचे जे प्रमुख गुण—सहजस्फूर्ति, प्रसाद आणि माधुर्य—ते सारे अलंकार लेऊनच ही खेडेगांवी शारदासुंदरी कवनरूपानें प्रकट होते. तिचें रूप ठसठशीत आहे, हृदय कोमल आहे, व सौंदर्य चित्तवेधक आहे.

हीं गीतें अनंत आहेत. सुगीच्या दिवसांत शेतांत पानोपानीं कणीस लागावें त्याप्रमाणें ओवीओवींतून मृदु भावनांचा बहर नजरेस येतो. किती तरी वर्णनें, किती विचार, किती कल्पना त्यांत सामावलेल्या दिसतात ! कौटुंबिक ओव्यांचें प्रकरण मनाला अगदीं मोहून टाकणारें असेंच आहे व म्हणूनच त्याची थोडी ओळख आपण करून घेऊं.

सासर व माहेर हे प्रत्येक विवाहित स्त्रीच्या जीवनाचे प्रमुख दोन विभाग पडतात. या दोहोंबद्दलहि अत्यंत जिव्हाळ्यानें ओव्या रचलेल्या आढळतात. लग्नानंतरच्या पहिल्या कांहीं वर्षांत मुलीची माहेराबद्दलची ओढ अन् प्रेम कांहीं विलक्षणच असतें. याचें कारण एकच. बाळपणींच मुलीचें लग्न होतें; छोट्याछोट्या मुली लग्न होऊन सासरीं जातात व अशा प्रकारें लहानपणींचें आईबाप, भाऊबहिणी हें प्रीतीचें जग दूरावतें ! माहेर हें जणुं आनंदाचें निधानच. म्हणच आहे, कीं एक आपघर आणि एक बापघर ! या लहान सासुरवासणींना माहेरच्या किती आठवणी येतात ! आईची आठवण पावलो-पावलीं होते, सणासुदीला भाऊ माहेरीं न्यायला येईल का म्हणून मन वाट पहात असतें. वडिलांच्या आठवणी जाग्या होतात आणि मग मनाच्या या आतुरतेमधून शब्दरूप घेऊन कवनें प्रकट होतात.

माहेराला मुलगी निघाली, कीं तिचा आनंद काय विचारतां? आईच्या आठवणीनें मन उल्हसित होतें. माहेरचें गांव दुरून दिसूं लागलें तरीहि हर्षाचे तरंग मानसांत उठूं लागतात. या सर्व नाजूक भावनांचा आविष्कार ओवीरूपांत प्रकट झालेला पाहून मोठें कौतुक वाटतें. माहेरीं गेलें कीं जिवाला किती विसांवा मिळतो आणि देवाच्या दयेनें माहेरीं सारी समृद्धिहि आहे—

**माह्याराला जाते, जीवाला इसावा**
**बापजी बयाबाई सारा संजोग असावा**

या माहेरीं भरलं गोकुळ आहे. त्याचा किती अभिमान—

**सया पुशित्यात तुझ्या माह्यारी काई काई**
**बंधुपरास भाचं लई**

भाऊ, भाचे, भाच्या, आजाआजी, चुलत भावंडं, मामा, मावश्या अशीं माहेरीं कितीक नात्याचीं माणसें. शेतकऱ्यांच्या घरांतून अजून एकत्रकुटुंब-पद्धति असल्यानें माहेरीं सासरीं दहा माणसांचीं घरें आढळतात. मुलीला प्रेमानें माहेरीं आणवतात, "माह्यारपणा" ची म्हणून कौतुकानें भाऊ, मामा, वडील वगैरे मंडळी साडीचोळी घेतात, दागिनेहि देतात—

**कान भरीलं कापानं, ओटी भरली नारळानं**
**केलं माह्यार मावळ्यानं**

कधीं भाऊ इतकी मोठी देणगी देतो, कीं सर्वजण कौतुक करतात—

**माह्यार माझं केलं एका गांवाचा वसूल**
**सया पुशित्यात, बंधु सम्रत असंल**

अशा या माहेराबद्दल मुलींना किती आपुलकी वाटते! आणि या सर्वांत मायबापाची महती कांहीं निराळीच!

**आईबाप:—**

माहेरच्या सर्व गोतांत आईबापाचें महत्त्व जास्त आहे. बापाची जात-कुळी, मोठेपणा, लौकिक याबद्दल मुलीला आदर वाटत असतो. त्याचप्रमाण आईच्या मायेचीहि आठवण मनांत घर करून राहते. सर्वसाधार

असें म्हणतां येईल, कीं वडिलांबद्दल एक प्रकारचा दरारा, धाकमिश्रित आदर मुलीच्या उद्‌गारांत दिसून येतो; तसाच त्यांच्या कीर्तीचा अभिमानहि तिला वाटत असतो. परंतु आईबद्दल मात्र तसें नाहीं. तेथें आपपरभाव मुळींच नसतो. तोंडचा अर्धा घांस द्यायची जेथें तयारी, तेथें सुखदुःखाच्या दरेक प्रसंगीं आईची आठवण व्हावी व ती ओवी–गीतांतून झरूं लागावी यांत नवल नाहीं. त्यामुळें आई व बाप या दोघांवरहि ओव्या असल्या तरी त्यांचा निराळेपणा झटकन् लक्षांत येण्याजोगा आहे. वडिलांवर रचलेल्या ओव्यांहून आईवर रचलेल्या ओव्यांची संख्या अधिक आहे हेंहि स्वाभाविकच वाटतें.

आई व वडील या दोघांच्याहि मूर्ती मुलीच्या मनाच्या देव्हाऱ्यांत नित्य पूजनीय ठरलेल्या आहेत. हीं दोन्ही असणें म्हणजे मुलांवर मायेचें छत्रच असतें. या भाग्याची जाणीव मुलीला असतेच. ती येथें किंचित् निराळ्या कल्पनेनें व्यक्त झालेली आढळते—

**पड पड पाऊसा, झड येतीया वाऱ्याची**
**बापजी–बयाबाई, माझी पासुडी निवाऱ्याची**

चहूं बाजूंनीं वाऱ्याचं वादळ उठलं आहे, संकटांचा पाऊस कोसळूं लागला आहे, अशा वेळीं आई व वडील हेच काय तें निवाऱ्याचें आच्छादन, हा अर्थ स्पष्ट व मातापित्यांची कल्याणकारी भूमिका व्यक्तवणारा आहे. आईवडिलांबद्दल अशा बऱ्याच ओव्या आहेत. दळण दळतांना " पहिली माझी ओवी " ओठावर येते ती बहुधा मातापित्यांबद्दल !

**पहिली माझी ओवी, बाप्पाजी गवळ्याला**
**गाते मायेच्या जिव्हाळ्याला**

बहुतेक खेडेगांवच्या भाषेंत बापाला बापजी अगर बाप्पाजी म्हणतात. आईला ' बया ' हा सरसकट शब्द आढळतो. ही दुसरी एक ओवी पहा—

**दळण दळीते, हृदं मी करते रितं**
**आपुलीं बाबाबया, गाईली उभइतं**

अशा प्रकारें दळणाची सुरुवातच मुळीं पहांटेच्या रम्य वेळीं मात्यापित्याच्या पवित्र स्मृतीनें होते व सर्वच ओव्यांतून आप्तेष्टांचा जिव्हाळा प्रकटूं लागतो.

माहेरच्या आठवणी सरसरून मनांत सांचू लागतात. आईवडिलांचे गुणानुवाद गाण्यासाठीं मन उत्सुक होतें व सुंदर ओव्यांचे सुंदर उपमांनीं सजलेले चरण जमूं लागतात. पुढील ओवी पहा—

**बापजी बयाबाई दोन्ही हाईती वडजाई**
**त्येंच्या साउलीची किती सांगु मी वडजाई**

वडिलांना भव्य वटवृक्ष म्हटलें आहे, तर आईला जाईच्या नाज़ूक वेलीची उपमा. वडाची छाया व जाईचा सुगंध एकत्र असावा -तशी मायबापांची मला शीतल छाया आहे. त्याचा वडेजाव किती सांगावा ? हा अभिप्राय किती मनोहर आहे ! अशीच एक सुंदर ओवी—

**बाप समिंदर बया गोदायण**
**काशीला जाती वाट, दोन्हीच्या मधयानं**

बाप हाच प्रीतिसागर, आई तर साक्षात् गोदावरी ! मग माझें काशीक्षेत्र, पुण्यक्षेत्र, या दोघांजवळच आहे हा भावार्थ आईबापाबद्दल विलक्षण भक्ति व आदर दर्शविणारा आहे. एके ठिकाणीं तर आई-वडिलांना अमृताचीं कुंडें असें गौरवानें म्हटलेलें आढळतें—

**बापजी बयाबाई दोन अमृताचीं कुंड**
**त्यांत जन्मला माझा पिंड**

अशाप्रकारें आईवडिलांचें पुष्कळच गीतांतून मनोहर वर्णन आलेलें आहे. जन्मदात्या मात्यापित्यांची योग्यता खरोखरच थोर, त्याबद्दल किती गुणानुवाद गावे तेवढे थोडेच, नाहीं काय ? आई-बापाच्या ओव्यांमध्यें आईला उद्देशून म्हटलेल्या ओव्या अधिक जिव्हाळ्याच्या आहेत. त्याचं कारणहि स्पष्ट आहेच. मनुष्याचें पहिलें प्रीतिस्थान म्हणजे आई. आईसारखें निःस्वार्थी आणि शुद्ध प्रेम दुसरें कोण करूं शकेल ? खेडेगांवांतून आईला 'बयाबाई' म्हणतात हें खरें, परंतु या एकाच नांवानें थोडेंच माऊलीचें महत्त्व वर्णन करतां येईल ? आईला कितीतरी नांवें, किती शब्द, कितीक उपमा ! माउलीचा महिमाच असा थोर आहे, कीं तेथें शब्द अपुरेच पडावे. 'बया' या शब्दाप्रमाणेंच मातेला, काशी, गंधारी, गंगा, गवळण, भागीरथी, माऊली, मायबाई, गोदावरी, अशा अनेक नांवांनीं आळविलेलें दिसतें. गोड ओव्या मुलगी म्हणूं लागते—

बया म्हनुं बया, तिच्याइकतं गोड काई ?
साखर बाईला, कडूपनाचा लेश न्हाई

आईला जेथें प्रत्यक्ष साखर म्हटलेलें आहे, तेथें गोडीला काय उणें ?

कोठकोठें सासुरवास असतो. मुलीला कुणी सासरीं धड वागवीत नाहीं. किती काम केलं तरी कोणाला किंमत नाहीं, कुणी मायेचा शब्द बोलत नाहीं अशी स्थिति असते. या वेळीं बापड्या सासुरवासिनीला आईच्या मायेची कितीदां आठवण येते ! ती मनांत म्हणते—

पावसावांचुनी जिमीन हिरवी हुईना
माउलीवाचुनी माया कुनाला येईना

आईच्या मायेला येथें मऊ हिरवळीची उपमा दिलेली आहे.

पुष्कळदां सासरीं दुःख अनावर होऊन शब्द येतात—

अगिनीच्या पुढं जळतं ओलं चिलं
बयावाचूनी कुनी म्हनंना काम केलं

कांहीं वेळेला दुखणं येतं, मन, आई येईल, म्हणून वाट पहात असतं. आई जवळच राहते. मग ती कशी येत नाहीं ? मुलगी म्हणते—

जीवाला माझ्या जड, म्यां उंबरी दिलं उसं
माझी बयाबाई, तुला कळालं न्हाई कसं ?

आसपास आयाबाया जमलेल्या असतात. पण त्यांना आईची सर कोठली ? तेवढ्यांत आई दिसते. व मुलगी हर्षित होऊन म्हणते—

जीवाला माझ्या जड आयाबायांनी भरला वाडा
आली कोयाळ वाट सोडा !

परंतु नेहमींच कांहीं हाल नसतात. सासरमाहेरीं बरी परिस्थिति असली, कीं आई दागिने, चोळ्या वगैरे पाठवते. मुलीला त्याचा केवढा अभिमान—

दंडीच्या तोळबंद्या न्हाई म्यां घरीं केल्या ।
माझ्या बयानं मला दिल्या ॥
जरीच्या चोळ्या मी काढते आडवारी ।
बयाच्या जीवावरी मी भोगते तालेवारी ॥

अर्थात् हे संपन्न घरच्या स्त्रीचे शब्द आहेत. कांहीं ठिकाणीं उलटहि स्थिति असते. चोळी फाटून चिंध्या होत आल्या तरी माहेरचा खण येत नाहीं. लोकांत हंसूं होऊं लागतें. मुलगी समजूत करते, कीं आई गरीब असली तरी मला चोळी पाठवल्यावांचून राहणार नाहीं---

फाटली माझी चोळी, डावी बगल गेली वाया।
चोळी घेणारी माझी बया।

आणि नाहीं पाठवली तर नाहीं. आई सुखी असली म्हणजे झालें.

फाटली माझी चोळी, फाटली फाट जाऊं।
माझी घेणार बया सुखी राहूं॥

पण आतां मी माहेरीं जाणार, तेव्हां ही काळजी नको—

फाटली माझी चोळी, न्हाई मी ठिगळ द्यायाची।
आतां माझ्या बयाच्या गांवाला मी जायाची॥

आईची आठवण सासरीं राहणाऱ्या मुलीला घडोघडीं यावी यांत आश्चर्य थोडंच आहे? काम करून जीव दमला, कीं आईच्या हृदयावर डोकें ठेवून विसांवा घेण्याची इच्छा व्हावी, जिवाला जडभारी झालें, कीं आईची याद अंतराला जाऊन भिडावी, जेवायला बसलें कीं आईच्या आठवणीनें हातचा घांस गळून पडावा, असें हें मातेचें प्रेम नि मुलीचें मन! त्या दृष्टीनें या ओव्या पहा—

बारीक पिठाची लागे भाकरी चवदारू।
माझ्या मायबाईची जेवतांना याद करूं॥
भुकेलं तहानेलं मला कोण ग म्हणेल?।
माय एक माझी, तोंड कोमेलं जाणील॥

पायाला काटा रुतला तरीदेखील एकदम माउलीची आठवण येते- मन सारखी आईचीच जपमाळ घेतें—

आई म्हणुं आई, तोंडाला येते लई
काटा मोडला पायीं, हुते सई

आईवांचून मनींचीं हितगुजं कुठं बोलायचीं?

अंतःकरनाची गोष्ट हृदया झाली जाळी
माऊली येवं ! गुजाला येरवाळी

आणि आईवांचून या जीवींच्या हितगुजाची किंमत तरी कोण करील? असा हा आईचा पवित्र महिमा, त्याचें वर्णन करावें तेवढें थोडेंच! एक कन्या प्रेमानें म्हणते—

बया म्हनुं बया माझ्या तोंडाला रसाई
बया जलम असाई

आईच्या नामोच्चारानेंदेखील माझें तोंड गोड होतें, अशी आई मला जन्मभर असूंदे, ही मुलीची इच्छा किती हृद्य आहे बरें! मुलगी म्हणते, कीं माझी आई म्हणजे साक्षात् काशीच!

काशी काशी म्हणुनी जन चालले धांवत
माझी माऊली गांवांत

पवित्र काशी क्षेत्राची आईला उपमा देऊनहि कन्येचें समाधान होत नाहीं. ती आईला वरचेवर पवित्र नदीचीहि उपमा देऊन गौरवीत आहे. अंतरीं लागलेली मायेची तहान माऊलीच्या प्रीतीवांचून कोठली शांत होणार?

वळ्याखुड्याच्या पान्यानं न्हाई भागली तहान
बया माझी माउली तूं गंगासमान

नदींत व आईंत साम्यरूपानें कितीतरी गोष्टी दिसतात. आचार्य कालेलकरांनीं नद्यांना 'लोकमाता' अशीच पदवी दिलेली आहे. दोघींचेंहि जीवन किती निर्मळ! कांठच्या तरुलतांना नदीमुळेंच संपन्नता लाभते. आईचेंहि तसेंच आहे. लेकरांच्या आयुष्याला माउलीच संपन्न बनवूं शकते. नदी तृषा शांत करते. माऊलीच्या प्रीतीनें जन्मजन्मांतरींची मायेची तहान शांत होत असते. आणि म्हणूनच आईला गंगा, गोदावरी, भागीरथी इत्यादि नद्यांच्या नांवांनीं गौरविलें आहे.

आईबद्दल बोलतांना साहजिकच मृदुभाव मनांत दाटून येतात. विशेषतः आईचें मायेच्या हाताचें जेवण वरचेवर आठवतें. "मायेची पेज नि सर्वांगी तेज" अशी म्हण आहे. आईच्या गोड घांसाची आठवण कशी विसरणार? एक सासुरवासिनी मनांत म्हणते, वेड्या मना, उगीच हट्ट घेऊं नकोस—

जीवानं मागितली आंकडी दुधांतली खीर।
माझ्या बयाबाईचं गांव दूर

माऊलीवांचून आपले जेवण्याखाण्याचे लाड करणारं कोण आहे सासरीं ?

खाऊसं वाटलं लिंबाचं राईतं।
बया गवळणीवाचून कोन वाढील आयतं ?

आई जेवण घालतें तें किती मनापासून ?—

पाच पकवान गुळाची केली खीर
माझ्या माउलीच्या घरीं, आत्मारामा जेव थीर

जिवाला स्थिरपणें भोजन करण्यास सांगायचें तें एक मायघरींच ! तसेंच या देहाची जोपासना माऊलीनेंच नानातऱ्हेनें केली आहे. हे लांबसडक केस, लोकांना याचें कौतुक वाटतें. पण माझ्या माऊलीनें यांची बाळपणापासून केवढी जोपासना केली आहे, हें मीच जाणतें—

लांब लांब केस, त्या केसाचं नवल काई ?
कोकनची शिकंकाई, सर्व लाविली बयाबाई।

न्हायला बसावें तर कौतुकानें मैत्रिणी पहायला येतात—

लांब लांब बहालं, सडक सोडिलं न्हायाला
मातेच्या सायासाचं, सया येत्यात पाह्याला।

परंतु याचें सारें श्रेय त्या माऊलीलाच आहे. माहेरीं मुलाप्रमाणेंच आई मुलीचीहि काळजीनं जोपासना करीत असते. सासरीं पोरीच्या नीटस, रसरशीत बांध्याकडे इतर सासुरवासणी टक लावून पहातात आणि मग अभिमानानं मुलगी हंसून सांगते, कीं माझ्या आईनें मुलाप्रमाणेंच प्रेमानें माझी जोपासना केली आहे, म्हणून बांधा असा सुंदर झाला !

माझा अंगलोट जाईच्या फोकावाणी
बया माऊलीनं जोपा केलाया ल्येकावाणी !

अशा या मातृप्रेमाच्या ओव्या कितीतरी सुंदर, भावपूर्ण अशा आहेत. मुलीच्या मनाची निष्कपट प्रीति, मातृवियोगानं येणारी व्याकुलता आणि आईचें निःस्वार्थी अनुपम प्रेम या गीतांतून कांठोकांठ भरल्यासारखें दिसतें. आईजवळ मुलगी लाडके हट्ट कसे करीत असे याचींहि वर्णनं आढळतात.

पुष्कळदां शेजारणीची व आईची तुलना करून आईचें वागणें किती आपुलकीचें व शेजारणीचें त्या तुलनेनें किती दांभिकपणाचें दिसून येई याचेहि अनुभव वर्णिलेले आहेत.

आईला कितीतरी उपमा आणि त्यासुद्धां अगदीं वेगळ्या तऱ्हेच्या पण सोप्या, सहज पटणाऱ्या अशा आहेत. मधाची घागर, पिठीसाखर, मनुकांचं झाड, नारळाचं दूध, तुळशीचं रोप अशा या गोड गोड उपमा आहेत. वाचतां वाचतां, ऐकतां ऐकतां या मातृगीतांची उदात्तता पटून सात्त्विक प्रीतीचा ठसा रसिकांच्या मनावर उठल्यावांचून राहणार नाहीं.

आईच्या प्रीतीइतकीच वडिलांच्या थोरवीचीहि जाणीव या संसारी कन्येला वरचेवर होते. सासरीं कोणी नवी सोबतीण 'तूं कुणाची मुलगी?' म्हणून विचारूं लागते. मग या मुलीला जरा रागच येतो. माझ्या वडिलांचें नांव पंचक्रोशींत माहीत असून ह काय विचारणं तरी? ती म्हणते—

**माझी जातगोत, काय पुसशी वेड्या आवा**
**पिता दौलती, साऱ्या जव्हारीला ठावा**

कुणी अनोळखी माणूसहि कधीं अशी चौकशी करतो. तेव्हां अभिमानानें मुलगी उत्तर देते—

**वाटचा वाटसरू माझी पुशीतो डहाळीमोळी**
**किती सांगु? माझ्या पित्याची उच्च कुळी!**

कांहीं मुलींना आईपेक्षां बापाचाच लळा असतो. एक पोरगी सांगते—

**साखरेपरीस बत्तासा लई गोड**
**मातेच्या परायास मला पितयाचं येड**

अशी ही पोरगी माहेरीं आल्यावर काय ऐट विचारतां? बाप इतक्या उंची खणांची देणगी देतो, कीं मुलगी खूष होऊन म्हणते—

**लुगड्याचं मोल एका चोळीला माझ्या दिलं**
**वडील बाप्पाजींनी उंच माह्यार मला केलं!**

बापाच्या ओव्यांतून त्याचें मोठेपण, कीर्ति नावलौकिक यांचीं वर्णनें पुष्कळ आढळतात. पुढील ओवी पहा—

पित्या दौलतीनं कीर्त केलीया थोडी भाऊ
वाटेवर त्याची इहीर, पानी पितुंया सारा गावु

खेडेगांवांत पाणी लांबून आणावं लागतं. तेथें गावाला पाणी पुरेल एवढी मोठी विहीर बांधणें हें थोरपणाचेंच आहे. बापानें असें समृद्ध घर पाहून दिलें कीं उन्हातान्हांतून पाणी आणण्याचेहि मुलीला कष्ट पडत नाहींत. हें पाहून मुलगी पित्याला धन्यवाद देत आहे——

रांजनाचं पानी मी साउलीनं नेतें
पिता दौलतीच्या पारखीला दुवा देतें

पित्याच्या नांवलौकिकाला, घराण्याला, जातकुळीला कमीपणा आणणारी कोठलीहि गोष्ट आपणाकडून घडूं नये, याबद्दल मुलगी जन्मभर दक्षता बाळगते व जागोजाग तसे उद्‌गार आढळूनहि येतात. आईच्या ओव्या मृदु भावनांनीं उत्कट झालेल्या आढळतात तर वडिलांसंबंधींच्या ओव्यांवर लौकिक आणि मानमान्यता या गोष्टींची छाप पडलेली आढळून येते.

परंतु आईबाप ते आईबाप. त्यांची सर इतरांना कोठून येणार ? भाऊ-भावजयींचं प्रेमदेखील, आई आहे तोंवर निराळ्या आपलेपणानें शोभत असत. परंतु आईबापांच्या माघारीं कोठलें मायघर ? आईलाहि त्याची कल्पना आहे. ती मुलीला म्हणते–' मी आहे तोंवर माहेरीं येत जा. पुढें कोण बोलावणार आहे ?——

आईबाप असत्यात तोंवरी येनंजानं ।
बयाबाई बोले, उद्या होतील भाऊ शानं ॥

वडील आहेत तोंवर माहेरीं जायची शोभा. त्यांची सर सख्या चुलत्याला-सुद्धां येणं कठीण —

पितयाची सर काय करीतो चुलता ?
पिकला उंबर गावाच्या खालता

चुलता श्रीमंत आहे पण आपल्याला त्याचा उपयोग काय ? उंबराचं झाड दूर गांवाच्या खालीं पिकून राहावं तशी ती दूरची श्रीमंती ! खालील उद्‌गार पहा कसे करुण आहेत ! आई नाहीं तें कसलें माहेर ? बाप नाहीं तेथें कशाचा आपलेपणा ? भाऊभावजया आहेत पण त्यांचा स्वभाव कोठें आईबापासारखा आहे ?

आईबापाच्या माघारी भाऊभावजया कुनाच्या ?
झळा मारती उन्हाच्या !

पूर्वीच्या प्रकरणांत आईबापांच्या प्रीतीला वटवृक्षाची उपमा होती. तर येथें उलट भाऊभावजईच्या परकेपणाच्या वागणुकीला उन्हाळ्याची झळ म्हटलें आहे, या दोहोंतील तफावत पहाण्याजोगी आहे.

आईबाप वृद्ध होतात, कधींतरी हीं पिकलीं पानं जीवनवृक्षावरून गळून पडतात! मग भावांचा संसार सुरू होतो. या संसारांत बहीण अधूनमधून येते. पण पहिले दिवस आतां राहिलेले नसतात. आईबाप असतांना रुचेल तें खावं प्यावं, हवं तें मागावं, अशी प्रेमाची सत्ता होती, एक प्रकारची स्वतंत्रता होती तेव्हां. आतां साराच जमाना बदललेला! भावजईकडून आईची प्रीत आतां मिळत नाहीं! एक दुःखी माहेरवाशीण म्हणते—

जाते माह्याराला! भावजय बघती रागं रागं
बया ती न्हाई आतां, वेड्या मना फीर मागं!

अशा प्रकारें मनाला कठोर शिकवण देतांना मातृविहीन स्त्रीला किती वाईट वाटत असेल? सगळें माहेर एका आईवांचून शून्य आहे, उदास आहे!!

जाते माह्याराला, मन उदास माझं हुतं
बयावाचूनी घर रितं!

परंतु ही जनरीतच नाहीं काय? मनाला ही स्त्री विवेक करते, कीं पाण्याचा ओघ पुढेंच असायचा. पूर्वींचं भावाचं वागणं आतां पुरं बदललेलं आहे—

आईबापाच्या माघारीं घरीं हाईती गूळभेल्या
बहिणी दारावरनं गेल्या, न्हाई बंधूनं बोलावल्या

आईबापाचं राज्य सत्तेचं होतं. आतां येथें काडीचीहि सत्ता नाहीं!—

आईबापाच्या राज्यांत तांब्या तुपाचा केला रिता
भावजईच्या राज्यांत पानी घ्याया न्हाई सत्ता

तथापि आतां भाऊभावजय हेंच आपलें प्रेमाचें गोत आहे हें ओळखून बहीणहि मनाला आवरते व त्यांना प्रेमळ गीतें गाते, प्रीतीचीं नाजूक बंधनें कायम ठेवण्याचा प्रयत्न करते.

एकंदरींत माहेरच्या कडूगोड अनुभवांनीं या गीतांचे शब्द ओथंबलेले आहेत.

# माहेर

चोळीया काकनाचं, दिसे माह्यार हालकं
बंधुजी दिंड काढावं शेलकं १
माह्यार माझं केलं, नवं आगळ शंभराचं
बंधुजीचं नांव, कागदीं हंबीराचं २
माह्यार माझं केलं, एका गावाचा वसूल
सया पुशित्यात, बंधु सम्रत असंल ३
लुगड्याचं मोल एका चोळीला माझ्या दिलं
वडील बाप्पाजींनी उंच माहेर मला केलं ४
लुगडं घेतलं दुही पदर रामाचं
पहिलं माह्यार मामाचं ५
लुगडं घेतलं दुही पदर खांबाचं
बाप्पाजींनी केलं माह्यार डिंभाचं ६
लुगडं घेतलं पदरी रामसीता
करतो माह्यार माझा पिता ७
जाते माह्यारीं, कसं रमलं माझं मन
भाऊभाच्यांनी भरलं घर ८
माह्याराला जाते, जीवाला इसावा
बापजी बयाबाई सारा संजोग असावा ९
सया पुशित्यात, तुझ्या माह्यारी काईकाई
बंधूपरास भाचं लई १०
माह्याराला जाते, न्हाई मुराळ्याचं कोडं
बंधु सत्तेचा गाडीपुढं ११
जाते माह्याराला, माझं बसनं जोत्यावर
भावजय पडे पाया, नंदेच्या नात्यावर १२
माहेरची वाट, कुना गवंड्यानं खंडली
वाट मुराळ्या दंडली १३

माहेराची वाट टाक्या लावूनी घडली
बाप्पाजींनी मला गाडी बुरख्याची धाडली १४
माहेराच्या वाटे, कोन चालतो लागवेगी
हौशा बंधु माझं हिरं झळकीत जागजागीं १५
माहेराच्या वाटे कळकीचं बेट
बयाबाई माझी लेकीची वाट पहात १६
माहेराच्या वाटे अंबाचिंचेची वनं दाट
माझी मायबाई पहाते माझी वाट १७
माझी अंगलोट सया पहात्यात न्याहळुनी
सयानु किती सांगु, होतो माहेरी खेळूनी १८
माहार म्हनु केलं, पाठ झाकीली पदरानं
केलं माहेर बंधु गुजरानं १९
बंधुजी गेला काल, भाचा पाव्हना आला राती
मला म्हानितो, तूं माह्यारी चल आती ! २०
माह्याराला जात्ये, मला इसावा कशाचा
दारी पलंग भाच्यायाचा २१
माह्याराला जात्ये नको जाऊं लिडीलिडी
सासुबाई बोलत्यात, येऊं दे बंधुची बैलगाडी २२
माहेरघरामंदी, हायती, आजाआजी
लाडक्या भाचीला मामा वाटीनं दूध पाजी २३
दुधातुपानं भरल्या वाट्या, वर साखर निवायाला
माझा राघु बसला, मामासंगट जेवायाला २४
दुधातुपानं भरल्या वाट्या, वर साखरेची सोजी
मैना लाडीयेला, जेवुं वाढिते तिची आजी २५
नातवंडाची आजी पंतुंडं पावली
सयानु किती सांगु ? माझी भाग्याची माउली २६
लेकीचं बाळ हातीं, ल्येकाचा घेई कडे
भाग्याची माऊली सैधवा जाती पुढे २७

पहिली ग ओटी माता सैधवा लाभली
जेठी सून कामा आली २८

माह्यार माझं केलं बंधु माझ्या हंबीरानं
समदी पाठ झाकीली जरीच्या पदरानं २९

माह्यार माझं केलं दुही पदर गोपिकाचं
माझ्या बंधुजींचं घर लौकीकाचं ३०

माहेराला जाते घोडं लागलं चढणीला
माझी मैनाबाई देते निरोप गडणीला ३१

लक्षुमी आई आली धरते मी पदराला
चल माझ्या माह्याराला ३२

तांबड्या लुगड्याच्या निऱ्या घालते हौशीनं
केलं माह्यार मावशीनं ३३

माहेरच्या देवा न्हाई तुला इसरत
माझ्या बंधुजींचा वेल जाऊंदे पसरत ३४

कान भरीलं कापानं, ओटी भरली नारळानं
केलं माहेर मावळ्यानं ३५

कंथ पुशित्यात, रानी माहेरवास कसा ?
केळीच्या पानावर अंबेमोहराचा भात जसा ३६

दुरून दिसे बाई दिवा देऊळाचा
कळस माझ्या माहेरीचा ३७

आईबाप—

दळन दळीते गाऊं मी कोनाकोना
जल्म दिलेल्या दोघाजणा १

दळन दळीते, हृदं मी केलं रितं
आपुली बाबाबया, गाईली उभईतं २

पहिली ओवी गाते, बाप्पाजी चातुराला
बापबयाचं नांव घेतां शीन मनींचा उतरला ३

पहिली ओवी गाते, बाप्पाजी गवळयाला
गाते बयाच्या जिव्हाळयाला ४
पहिली ओवी गाते बाप्पाजी गुजराला
बया तुळस शेजाराला ५
पहिली माझी ओवी पित्या हौशाला गाईली
माता तुळस न्हाईली ६
सकाळच्या पारी रामधर्माची वेळ झाली
जन्म दिलेल्या बाबाबया, हृदयाची ओवी आली ७
पहिली ओवी गाते बापबयाला सहज
दोघांनी मला रजाची केली गज ८
सांगावा सांगते आल्यागेल्याला भेटुनी
माझं मायबाप, झालं लईंदी भेटुनी ९
बाप समिंद्र[1] बया माझी गोदायण[2]
काशीला जाते वाट, दोनीच्या मधयानं १०
बापजी बयाबाई, दोन्ही हाईती वड जाई
त्येच्या साऊलीची किती सांगुं बडजाई[3] ११
पड पड पाऊसा, झड येतीया वाऱ्याची
बापजी बयाबाई, माझी पासुडी निवाऱ्याची १२
बापजी बयाबाई दोन अमृताची कुंडं
त्यांत जल्मला माझा पिंड १३
चंदन मलयागिरी नांव माझ्या बाप्पाजीचं
माऊलीबाईचं दूध गोड नारळीचं १४
गावाला गावकुसू, पानमळयाला पायरी
आईबाप असतांना, नगरी भरली दुहेरी १५
बापजी बयाबाई दोन दवण्याची रोपं
त्येच्या साऊलीला मला लागली गाढ झोंप १६
माह्याराला जाते उंच पाऊलं माझीं पडे
बाबाबया, गंगासागर येती पुढे १७

१ समुद्र. २ गोदावरी. ३ बडेजाव.

माझा सांगावा[१] सांग जासूदा जातांजातां
सोप्याला माझा पिता, परसुदारी माता १८
आईबापाला इच्यारते, कसा परदेस कंठावा
अमृत म्हनवुनी, पेला इखाचा[२] घोटावा[३] १९
आईबापाला इच्यारते कसं दीस कंठावं एकटीनं?
बाप म्हनीतो, अपुल्या भरताराच्या संगतीनं २०
आईबाप बोले लेकी नांदुन कर नांवु[४]
चारचौघामंदी खाली बघाया नको लावु २१
बापजी इसवर, बया माझी पारवती
बंधुराय गनपती २२
माझा ग पिंड बापाच्या दंडभुजा
माऊलीबाई तोंडवळा तुझा २३
माऊली घाली न्हाऊ पिता घालीतो सावली
आपुली कष्टकाया[५] केली लोकाच्या[६] हवाली २४
आई म्हनु आई, तोंडाला येते लई
काटा मोडतां पाई, हुते सई २५
आई म्हनु आई, तोंडाला येते गोड
बया मनुकाचं झाड २६
लांब लांब केस त्या केसाचं नवल काई?
कोकनची शिकंकाई, सव लावली बयाबाई २७
लांब लांब बहालं, त्याचा झाला गुता
माय ती माउली, शिकंकाईचा घेते खुता २८
मोठं मोठं केस सडक सोडिलं न्हायाला
मातेच्या सायासाचं सया येत्यात पाह्याला २९
लांब लांब केस, शिरी बुचडा माईना
बया गवळन, जोपा करीतां न्हाईना ३०

१ निरोप. २ विषाचा. ३ गिळावा. ४ कीर्ती, नावलौकिक. ५ कन्या. ६ सासरकरांच्या.

लांब लांब केस, मातामाईच्या आवडीचं
पानी पित्याच्या कावडीचं ३१
जीवाला माझ्या जड सांग जासूदा जातांजातां
माझ्या बयाबाईनं, तांब्या ठेवला अलगतां ३२
जीवाला माझ्या जड, आयाबायांनी भरला वाडा
आली कोयाळ वाट सोडा ३३
जविाला माझ्या जड आयाबायांनी भरला सोपा
आली नागीन, टाकी झेपा ३४
जीवाला माझ्या जड ग्यां उंबरी दिलं ऊसं
माझी बयाबाई, तुला कळालं न्हाई कसं ३५
जीवाला माझ्या जड कोन कुनाच्या जावाभावा ?
माझ्या बयाबाईला आना जावा ३६
अंगनांत उभी राहिले चिंतागती
मला बयाची सय येती ३७
दिस केला कामामंदी राती झोप न्हाई आली
बयाबाईची सय अंतराला झाली ३८
सुखाला भरतार दुःखाला बयाबाई
बंधु वैद्याच्या गांवा जाई ३९
समद्या गोतामंदी बया खुरद्याची किल्ली
आमच्या जलमा जावी, देवापाशी बोली केली ४०
शेल्याच्या पदरांत बांधते पंचखाज
माझ्या बयाला वेड माझं ४१
भरल्या बाजारी काय करावं किरान्याला ?
माता असावी परान्याला ४२
नदीपलीकडे पंचरंगी झाड
बया, तसली चोळी धाड ! ४३
चोळ्यावरी चोळ्या, बासनी आला पूर
बया म्हनिते, हिरवा निघाला मोतीचूर ४४

चोळयावरी चोळ्या, माझ्या बासनी मावंना
गुजर बयाबाई चोळी धाडतां राहीना ४५
जरीच्या म्हनूं चोळ्या, मी काढिते आडवारी
बयाच्या जीवावरी, मी भोगिते तालेवारी ४६
फाटली माझी चोळी डावी बगल गेली वाया
चोळी घेणार माझी बया ४७
फाटली माझी चोळी, न्हाई मी ठिगळ द्यायाची
बयाच्या गावाला मी जायाची ४८
फाटली माझी चोळी काय फाटल्या माझ्या बाह्या
चोळी घेईल माझी बया ४९
फाटली माझी चोळी फाटली फाट जाऊ
बया घेनारी सुखी राहू ५०
निर्मोळ माझं मन, गंगेच्या पान्यावानी
माझ्या माऊलीचा, कुसवा राजध्यानी ५१
नऊ महिन्याचं वझं, बया वागविलं माझं
काशी गंधारी नाव तुझं ५२
माझा अंगलोट, जाईच्या फोकावानी
बया माऊलीनं, जोपा केलाया ल्येकावानी ५३
बया म्हनु बया, अशा नांवाच्या बया किती ?
एक जल्म दिल्याली भागिरथी ५४
बया म्हनु बया, बया कुनीच व्हईना
माऊलीची सर, शेजीबाईला येईना ५५
बया म्हनु बया, बया साखरेची पुडी
तिच्या ध्याईमंदी माझी जलमली कुडी ५६
बया म्हनु बया, मला बयाचं लई सुख
बया सपनीं दाव मुख ५७
बया म्हनुं बया, बया इक्तं गोड काई
साखरबाईला कडूपनाचा लेश न्हाई ५८

नऊ महिने हुते, अंधार बारीला
माझ्यापायी कष्ट पडलं नारीला ५९
नऊ महिन्याचं वझं, बया वागवीलं मला
आज शेजारीन झाले तुला ६०
अंगनांत उभ्या चुलत्या माझ्या सया
त्यात दूसरी माझी बया ६१
दंडीच्या तोळबंद्या न्हाई म्या घरी केल्या
माझ्या बयानं मला दिल्या ६२
सात सर्जाची नथ मोराची चिलीपिली
माझ्या बयानं मला दिली ६३
भावाबहिनीचं भांडन, मेळा मिळंना पाखराचा
माझी मायबाई पुडा सोडावा साखरेचा ६४
वाटंवरला वड पारंब्या वाववाव
माझ्या माऊलीचा विस्तार गांवगांव ६५
अग्नीच्या पुढं जळतं ओलंचिलं
बयावाचुनी कुनीं म्हनंना काम केलं ६६
भुकेलं तान्हेलं मला कोन ग म्हनंल ?
माय एक माझी तोंड कोमेलं जानील ६७
वढ्याखुड्याच्या पान्यानं न्हाई भागली तहान
माझी तू मायबाई गंगासमान ! ६८
वढ्याखुड्याच्या पान्यानं, न्हाई भागली तहान
बयाबाईला माझ्या बघुन समाधान ६९
बया म्हनु बया, तोंडा सुटलं पाझर
बया मधाची घागर ७०
बया म्हनु बया, पडे तोंडाला मिठी
बया खडीसाखर पिठी ७१
सुख सांगताना, दुःखाची हुते सई
बया नगं, अवघड मानु लई ७२

अंतरीचं गुजु हृदय केलं पेंव
बया म्हनते, खोलून मला दाव ७३
अंतरीची गोष्ट हृदया झाली जाळी
येवं बया, गुजाला येरवाळी ७४
बयाबाचुनी, कुना येतुंया मायाजाळु ?
चैताचं ऊन तापली ओढ्याची वाळु ७५
जीवाला जडभारी, शेजी बघते वाकुनी
मायबाई आली सर्वस्व टाकुनी ७६
भूक लागली पोटा, भूकबाई तूं दम धर
बया हरिणीचं, गांव हाई वाटेवर ७७
बारीक पिठाची, लागे भाकरी चवदारू
माझ्या बयाबाईची, जेवतांना याद करूं ७८
बारीक पिठायाची, भाकरी चहुघडी
माझ्या बयाबाईची याद येती घडूघडी ७९
पाच पक्वान, गुळाची केली खीर
माउलीच्या घरी, आत्मारामा तूं जेव थीर ८०
भूक लागली पोटा, निरी देते आधाराला
जावा नंदा शेजाराला ८१
भूक लागली पोटा, अवेळेची कुठं जाऊं ?
माझी वयाबाई, मध्यान्ही दिवा लावुं ८२
सुगरीन इसरली, लाडवाचा पाक
माझ्या मायबाईला शिवेवरून मारा हाक ८३
आशा न्हाई केली शेजीच्या जेवणाची
वाट मी पाहाते माउली पाव्हणीची ८४
पाची परकाराचं ताट, वाफ येतीया झरझरा
बयावाचुनी कुनी म्हनंना, जेव जरा ८५
किस्नाबाईच्या पान्याची, चूळ भरतां जाते तहान
बयाला देखून सन्तुषी माझं मन ८६

वया जेवुं वाढी, खिरीवरी तूप ताजं
मन परतुनी जातं माझं ८७
वया करी ताट, खिरीवरी वाढी केळं
माझ्या वयाचं राज भोळं ८८
वया जेवुं घाली, निथळीते तुपाची बोटं
वयाचं हृदं मोठं ८९
जातीच्या सुगरनी बसल्या वारधशी[१]
माझी मायबाई वाघीन[२] चुलीपाशी ९०
खाऊसं वाटलं लिंबाचं राईतं
वया गवळणीवाचुनी कुनी वाढीना आयतं ९१
जीवानं मागितली आकडी[३] दुधांतली खीर
माझ्या वयाबाईचं गांव दूर ९२
माऊलीवाचूनी कुनी म्हनंना माझ्या बाळा
समदा चैताचा उन्हाळा ९३
चैताच्या महिन्यांत चैत पालवी फुटली
वया गवळनीवाचूनी लोकाला माया कुठली ? ९४
नदीपलीकडे वेट फुटलं लव्हाळ्याचं
माऊलीवाचूनी कुनी दिसंना जिव्हाळ्याचं ९५
पाऊसावाचून जिमिन हिरवी हुईना
माऊलीवाचूनी माया कुनाला येईना ९६
फाटकं नेसून नेटकं दिसावं
वया गवळनीवाचून मिंधं कुनाचं नसावं ९७
पाटाचं पानी जाईना टेकाला
काशी गवळनीवाचूनी अंत देऊ नये लोकाला ९८
काशी काशी म्हनतां, काशी कुनी पाहिली ?
माउलीनं माझ्या दुनव्या दाविली ९९
काशी काशी म्हनुनी काशींत खांब डोले
माझ्या माऊलीचं दर्यांत जहाज चाले १००

१ पडवीला. २ पराक्रमी स्त्री. ३ निरशा.

काशी काशी म्हणून जन चालले धावत
माझी माऊली गांवात १०१
काशी काशी करती, रामेसराचा डोंगर
माझी मायबाई तीर्थाचं आगर १०२
औक्ष चिन्तीते बया माझ्या मालनीला
येल गेल्याती पलानीला १०३
बया म्हनू बया, माझ्या तोंडाला रसाई
नया जलम असाई ! १०४
साखरेपरीस बत्तासा लई गोड
मातेच्यापरीस मला पितयाचं वेड १०५
माऊलीपरायास माझा पिता उपकारी
दुनव्या दावियेली सारी १०६
जीवाला जडभारी कुनाला घालूं वझं
पिता दौलतीचं ढाण्या वाघाचं हाय बीज १०७
समूरल्या सोप्या, समई जळते तुपाची
सयांनु किती सांगू, वस वाढते बापाची १०८
दिस मावळला झाडाझुडांत झाला गप
आपुल्या लेकीसाठी सांजेचा आला बाप १०९
शितळ साऊली चिचबाई तुझी गार
पिता दौलती, अंबा माझा डौलदार ११०
भरला बाजार, भरूनी झाला गोळा
पिता दौलतीचा न्हाई कुठं तोंडवळा १११
भरला बाजार भरल्या चारी वाटा
कुन्या पेठेला माझा पिता ११२
पिता दौलतीनं कीर्त केलीया थोडी भाऊ
वाटेवर त्याची इहिर पानी पितुंया सारा गाव ११३
पिता दौलतीनं कीर्त केल्याती एकदोन
शेती, आंबयाचं बन ११४

रांजनाचं पानी साउलीनं नेते
पिता दौलतीच्या पारखीला दुवा देते ११५
माझी जातगोत काय पुसशी वेड्या आवा
पिता दौलती, साऱ्या जव्हारीला ठावा ११६
वाटचा वाटसरू माझी पुशीतो डहाळीमोळी
किती सांगु माझ्या पित्याची उच्चकुळी ११७
आईबाप असतांना, दुधातुपाची केली कढी।
भावाच्या राज्यामंदी, ताक घ्याया सत्ता थोडी ११८
आईबापाच्या राज्यांत, काढलीं कुलुपं माडीची।
भाऊभावजईच्या राज्यांत, सत्ता न्हाई काडीची ११९
आइबापाच्या राज्यामंदी माझ्या वटीला खारका।
माघारी झाला उंबरा परका॥ १२०
आईबापाच्या राज्यामंदी तांब्या तुपाचा केला रिता
भावजईच्या राज्यामंदी पानी घ्याया न्हाई सत्ता १२१
आईबापाच्या माघारी, माह्यारी गेलं वेडं
बंधुनं दिलं पायाचं भाडं १२२
आईबापाच्या माघारी माह्यारी जाते वेडी
कवटाळीते खांब मेढी १२३
आईबापाच्या माघारी भाऊभावजया कुनाच्या ?
झळ। मारती उन्हाच्या। १२४
आईबाप असत्यात तोवरी येनंजानं
बया बोले उद्यां होतील भाऊ शानं १२५
आईबापाच्या माघारी घरी हाईती गूळभेल्या[१]
बहिणी दारावरनं गेल्या, न्हाई बंधुलं बोलावल्या १२६
आईबापाच्या माघारी भाऊ नव्हत बहिणीचं
बहिन इसरती, करती माह्यार मेव्हणीचं १२७

१ गुळाच्या ढेपा.

पिताजीची सर काय करतो चुलता ?
पिकला उंबर गावाच्या खालता १२८

जाते माह्याराला भावजय करी रागराग
माय ती न्हाई आतां, वेड्या मना फीर मागं १२९

जाते माह्याराला मन उदास माझं हुतं
बयावाचून घर रितं ! १३०

बयाच्या जीवावरी अंगी केलीया सावकारी
भावजईच्या राज्यांत द्यायाघ्याया झाली चोरी १३१

आईबापाच्या माघारी सत्ता न्हाई कोनांत
बयाबाईच्या उतरंडी हाईती माझ्या ध्येनांत १३२

—※—

# बंधुराय

कौटुंबिक ओव्यांत सर्व तऱ्हेचीं वर्णनें येतात हें खरें असलें तरी पुरुषांचीं उघडउघड वर्णनें केलेलीं तुलनेनें कमी आढळतात. याचें कारण, पुरुषाबद्दल, त्याचं शरीरसौष्ठव, रूप, त्याचा मर्दानी बांधा त्याचा अवखळपणा याबद्दल स्पष्ट शब्दांत स्त्रीनें बोलणें हें एकप्रकारें निर्भीडपणाचें व शालीनतेस सोडून आहे अशी सरसकट समजूत दिसून येते. म्हणूनच कीं काय, पतीबद्दलच्या ओव्या उघडपणें म्हणण्याची अमर्यादा कोणी गरती स्त्री करतांना दिसत नाहीं.

परंतु या नियमाला एक मोठा अपवाद आहे अन् तो म्हणजे भाऊ; भावाबद्दल विशेष आपुलकीनें व पवित्र भावनेनें म्हटल्या जाणाऱ्या ओव्यांना कोणीहि हरकत घेऊं शकत नाहीं. आणि म्हणूनच, मोकळ्या मनानें भावासंबंधीं रचलेलीं गीतें बहुसंख्य आढळतात.

माहेरच्या इतर नातेवाईकांवरहि बऱ्याच ओव्या आहेत; परंतु हें क्षेत्र मर्यादित आहे. अन् भावावरच्या ओव्यांची समृद्धि पाहिली तर तुलनेनें तें अधिकच फिकें वाटणारें आहे. खरी मिजास पहाल तर भावावरच्या ओव्यांची! किती प्रकारांनीं भाऊरायाला आळवलेलें आढळतें! एक तर तोच माह्यारीं नेणार आणणार, लुगडेंचोळी फाटली कीं बंधुवांचून कोण घेणार आहे? माहेरीं बोलवायला तोच येणार! दिवाळीनागपंचमीला तो जेवायला येणार. सासुरवास होत असला तर तो ऐकून त्याचेच डोळे, पुरुष असूनहि भरून येणार नि कंठाशीं हुंदका दाटून येणार! कौतुक तोच करणार. आसरा, मायेचा निवाराहि तेथेंच! भावजय नीट वागली नाहीं तरी बंधुजीचें अंतर बहिणीसाठीं तिळतिळ तुटायचें नाहीं का? साऱ्या हितगुजांची मनांत साचलेली भाषा बोलायला बंधुजीवांचून कोण आहे दुसरें! या साऱ्या भावभावनांची उत्कटता अगदीं प्रकर्षानें या विभागांत आढळते. थोडी नमुन्यादाखल वानगी पाहूं—

समजा, बंधु दिवाळीला न्यायला येणार आहे, किती वेळ मन वाट पहात असतें. दूरवर पहावें काळी छत्री दिसते. मन म्हणूं लागतें—

उन्हाच्या कारामंदी, छत्री बनांत कुनाची
ताईत बंधुर्जीची दौड आलीया उन्हाची

बहीण आपल्या भावाची वाट पाखराप्रमाणें पहात असते. कधीं अगदीं सांजवेळ होते व भाऊ येतांना दिसूं लागतो.

दिस मावळला झाडाझुडाच्या आडूशानं
बंधुजी येतो वाटंच्या कडूशानं

भाऊ आल्यानंतर बहिणीच्या जिवाची कोण धांदल! त्याचीं घोडीं कुठें बांधायचीं? आईची सारी हकीकत केव्हां ऐकायची? अन् जेवायला काय काय करावें, या अनेक विचारांनीं मनाचा गोंधळ उडून जातो! पुढील ओव्यांत तो स्पष्ट दिसतो—

आला बंधुजी पाव्हना, माझ्या जीवाला धगधगा।
शिंगी अवखळ, नवा जागा
आला बंधुजी पाव्हना, घोड्यावरी जान
सांग बयाचं वर्तमान

या भावाचें आदरातिथ्य कोणकोणत्या प्रकारांनीं करायचें बरें?

बंधुजी पाव्हयेना, काय करूं मी जुंधळ्याचं
त्याच्या ज्येवनाला ताट नाजूक अंबोळ्याचं

बहीण सुखवस्तु असली तर ती असे जेवायला नानातऱ्हेचे जिन्नस करतेहि—

आला बंधुजी पाव्हना, न्हवं वरन भाकरीचा
त्याच्या ज्येवनाला करूं पुलावा साकरीचा

परंतु गरीब बहिणीनें काय बरें करावें? अशा प्रसंगीं शेजीबाईचाच तिला फार मोठा आधार असतो. रोजच्या जेवणाचेहि जिन्नस उसने मागण्याची वेळ यावी अशी गरीबी आज अनेक शेतकऱ्यांच्या घरीं आढळते, त्याबद्दल ओव्यांतूनहि उद्‌गार आढळतात. शेजारीण पुष्कळदां साह्य देणारी व सुस्वभावी असते. तिच्याकडे हक्कानें उसनें मागणें तर पहा—

शेजी तूं आईबाई मला उसनी दे ग डाळ
आलं बयाचं माझ्या बाळ

शेजी आईबाई मला उसनं दे ग दही
घराला पाव्हनं, बंधुसंगट भावजई

कधीं कधीं गरीब कुटुंबांत जेवणाची आयत्या वेळेला सर्व तयारी पाहून शेजारीण चकित झाल्याचेहि उल्लेख आहेत, आणि घरांत शतदारिद्य असलें, तरी भाऊ का कुणाला जड होतो ? एक गरीब बहीण म्हणते—

ऐत्या वेळेचा पाव्हना न्हाई मला जड झाला
सयानु किती सांगुं, माझ्या काळजाचा घड आला.

भावाला याहून कोठली सुंदर उपमा द्यायची ? आणि घरांत अगदींच दारिद्य असेल तर असेल तीच मीठभाकर तयार करून गरीब बहीण म्हणते आहे—

कोंड्याचा करतें मांडा, भाजीची केली शाक
बंधु जेवुनी लाज राख

अशा प्रकारें साध्यासुध्या प्रसंगांचें शब्दचित्र अनेक ओव्यांतून आपुलकीनें केलेलें आढळतें.

कोठें कोठें भाऊ लहानगे व आई देवाघरीं गेलेली अशी परिस्थिति असते. अशा वेळीं वडील बहिणीनंच आईच्या मायेनें भावंडांची काळजी घेणें आवश्यक असतें ही जाणीव ठेवून कांहीं वेळां बहीण लहान भावाची अपूर्वाई करीत असते—

आकडी दुधाची, तापुन आली शाई ।
देते बंधुजीला, त्याला बया न्हाई ॥
साकरेचं लाडू, देते वाटंच्या भोजनाला
बया न्हाई माझ्या बंधुजी सजणाला

अशा प्रकारें भावांवरचं प्रेम, त्यांचा पाहुणचार करण्याबद्दलची बहिणीच्या मनाची कासाविशी येथें किती स्पष्ट दिसून येते !

भावाबद्दलच्या आणखी कांहीं निराळ्या ओव्यांची बहार पहाण्यालायक आहे. बहुतेक बहीण माहेरीं आली कीं तिला नवी साडीचोळी भावानेंच घेऊन द्यायची पद्धत सरसकट सगळीकडेच दिसते. एरवींहि भावानें

बहिणीच्या चोळ्यांना खण पाठवण्याची रीत आहे. बहुधा दिवाळी नागपंचमीला हे खण पाठवले जातात. तेव्हां चोळीलुगडं फाटूं लागलं, कीं भावाची याद येते. मन समजूत करूं लागतें—

दिवाळीची चोळी सकरातीला मला येती
माझ्या बंधुची ओढ होती

माझा भाऊ गरीब आहे, त्याच्या हाताला सवड होत नसेल म्हणून खणाला उशीर होतो. लुगडें फाटलें आहे, तेंहि त्याला कळवलं पाहिजे—

फाटलं लुगडं आलंया दंडाला
देते सांगावा बंधुजी पुंडाला *

परंतु इतकेंहि करून त्याला जमत नसलं, तरी काय झालं? तो सुखी असला कीं मग सारं मला मिळालं—

न्हवती चोळीची आशा, न्हाई मी आसुशी
ताईत बंधु सुखी, त्यांत मी सन्तुषी

पण सगळ्यांचेच भाऊ कांहीं असे दरिद्री नसतात. कोठें कोठें संपन्न भाऊ असतात व ते बहिणीची लुगड्याचोळ्यांची हौसहि अपूर्वाईनं पुरवतात. अर्थात् बहिणीला त्याबद्दल किती धन्यता वाटते! बहिणीनें अमुक प्रकारचा खण हवा म्हटलें, कीं भावानें वाटेल तेवढी किंमत देऊन तो आणावा, ही गोष्ट अपूर्वाईचीच. त्यामुळें भाऊबहीण बरोबर बाजारांत जातात, बहीण लुगड्यांबद्दल हट्ट करते, भाऊ हंसत पैसे देतो, उंची लुगडें खरेदी करतो, लोक नवल करतात इत्यादि प्रसंगांचीं ओवीरूप वर्णनें मोठ्या रसाळपणें केलेलीं आढळतात. या ओव्या पहा—

हौस मला मोठी, बंधुसंगट बाजाराची
बहिणीच्या लुगड्यापायी, कंठी मोडली हजाराची!
लुगडं घेतलं, गंगाजमना आरसपेटी
बंधुनं धुंडिलं पुनं सातारा बारामती

* भावाला प्रेमानें "पुंड" व दंडिल्या हीं नांवें त्याच्या अवखळपणाबद्दल कौतुकानें दिलेलीं आढळतात.

रुपयांनीं तोंडोतोंड भरलेला कसा घेऊन भाऊ बाजारांत जातो, कारण काळीभोर चंद्रकळा बहिणीला हवी असते—

भरल्या बाजारांत चंदरकळांच्या उतरंडी
कमरेला कसा, पैशांचा दुहीतोंडी

अशा प्रकारें परोपरीच्या लुगड्यांनीं धनंतर भाऊ बहिणीची हौस पुरवतात. सासरींहि हीं उंची लुगडी पाहून मैत्रिणी नवलानं भावाची चौकशी करूं लागतात. बहीण अभिमानानं सांगते--माझा भाऊ असा तसा नाहीं—

साळवी लुगड्याचा पदर हातभरी।
सयांनु किती सांगूं? बंधु कुनबी मातबरी॥

अशा या 'देणगी' प्रकरणाच्या पुष्कळ ओव्या आहेत.

पण पुष्कळदां या चोळी लुगड्यांच्या वर्णन ओव्यांतून आणखी एका व्यक्तीमुळें निरनिराळे रंग भरत असतात ती व्यक्ति म्हणजे भावजय! बहीण-भावंडाचें प्रेम पुष्कळ असेल. परंतु कित्येकदां भावजईला ते मुळींच आवडत नाहीं! पतीनें विनाकारण बहिणीला महत्त्व द्यावें याबद्दल ती अनेक प्रकारें नाखुशी व्यक्त करते. माहेरीं गेल्यानें तर ती रागराग करूं लागते. 'जेवायला बहिणीसाठीं कांहीं चांगलंस करा' म्हणून भाऊ सांगतो. भावजईचीं नाखूष उत्तरं तर पहाः—

बंधुजी बोलती—कर बहिणीला डाळरोटी
भावजय बोले, गहुं खपल्यांच्या पोटी

भाऊ प्रेमानें बहिणीला लुगडेंचोळी देऊं लागला तरी भावजय नाखूष होऊन पहाते. बहिणीचें मन दुखावतें. ती म्हणते—

बंधु घेतो चोळी, भावजय गुजर डोळे मोडी।
त्या चोळीची काय गोडी? शिंपीदादा घाल घडी॥

ती चोळी नकोच असें बहिणीला वाटतें. पण एकादी ठसकेबाज बहीण उलट बजावून देते—

बंधुजी घेतो चोळी, भावजय गुजर दीना दोरा
माझा चांद असतांना, चांदनी तुझा काय तोरा?

परंतु असेंच नेहमीं होऊं लागलें, भावजयांच्या असल्या परकेपणामुळें भाऊहि मनानें दूरावले तर मात्र बहीण फारच कष्टी होते. परंतु ही जगाचीच रीत आहे, आपण त्यांत वाईट वाटून घेऊं नये, असा ती मनाशीं विवेक करीत आहे—

आताच्या कलिमंदी भाऊ न्हवत बहिणीचं

शिवाय, असें असलें तरी भावासाठीं भावजयहि आपलीच म्हटलं पाहिजे—

बंधुजी आपुला भावजय लोक कशी म्हनुं
माझ्या नागाची पदमिनु

अर्थात् अशा ओव्या आढळांत असल्या तरी सर्वच भावजया अशा नसतात. पुष्कळजणी सुशील व प्रेमळहि असतात व तसेहि उल्लेख ओव्यांतून आहेत.

थोड्या करुण ओव्यांचाहि नमुना दर्शनीय आहे. सासरीं त्रासांत असणाऱ्या बहिणीला भाऊ माहेरपणाला आणीत असतो. वाटचाल हळूहळू संपत असते, पण बहिणीचें हितगुज कसें संपणार ? ती म्हणते—जरा बैसरे खालीं—

अंतरीचं गुजु गुजु सांगते सगळं
बंधु बसा वाटेच्या येगळं ।

सासरची सारी मंडळी भाऊरायाला बोलली. हें पाहून बहिणीला फार वाईट वाटतें. ती म्हणते—वाईट वाटून घेऊं नकोस—

सोइऱ्याचे बोल जसे मुरूमाचे खडे ।
तुझं माझ्यासाठी येणं घडे ।।

भाऊ तुझ्यावांचून मला मनींचं हितगुज बोलायला दुसरं कोण आहे ?

अंतरीचं गुजु सांगते एकल्याला
पाठीच्या रतनाला, बंधुजी धाकल्याला

मी माझीं दुःखं तुला सांगून मन हलकं करणार आहे—

अंतरीचं दुःख तुला सांगते खाली वस ।
ताईत बंधु माझं, भरिली नेत्रं डोळं पूस ।।

अशा प्रकारें दुःखीकष्टी सासुरवासिणींना भाऊ हा एकमात्र मायेचा आधार असतो हें अनेक ओव्यांतून सांगितलेलें सांपडतें.

हा भाऊ वृत्तीनें जसा प्रेमळ तसाच रूपानेंहि देखणा आहे. या भावाचें भरज्वानीचें रूप पाहून नखरेल बाया दारावरून ये जा करूं लागतात.

माझ्या दारावरनं नटनारीचा नखरा
नटवा* माझा बंधु भरज्वानीचा हाय घरा

त्याचे डोळे तर फारच टपोरे! असे, कीं त्यांचा मोह पडून कुणा प्रेम-वेड्या बाईनें घराजवळच आपला मुक्काम केला आहे खुशाल—

मोठमोठं डोळं जसं बागेतलं लिंबू
बंधुला देखून कुन्या नारीनं दिला तंबू

असा हा देखणा भाऊ उन्हातान्हांत हिंडू लागला कीं बहिणीला काळजी वाटूं लागते. ती मायेनें देवाला ऊन कमी करण्याबद्दल प्रार्थना करते—

चईताचं ऊन, तूं शिळोपा दे रे देवा
बंधु नाजुक गेलं गांवा

भावाबद्दल सर्वतऱ्हेच्या ओव्या आहेत. त्याचें व्यक्तित्व, सामाजिक दर्जा व मानमान्यता, त्याची कर्तबगारी, त्याची ताकद, निर्भय स्वभाव इत्यादि-बद्दलहिं वेंचक व अर्थपूर्ण ओंव्या आढळतात.

मराठमोळा समाजांत मर्दानी खेळ, कुस्त्या, तालीम, शर्यती इत्यादींच महत्त्व विशेष आढळत असल्यामुळें भाऊ मर्दानी खेळ खेळणारा अगर कुस्तीगीर असल्याचीं वर्णनें कौतुकानें पुष्कळदां केलेलीं आढळतात. उदा.:—

नदीपलीकडे वाळू उडती चटापटा।
हौशा बंधु माझा हलगी लावुन खेळे पट्टा॥
अंगांत अंगरखं छाती कशानं ओली झाली।
बंधु पैलवानानं कुस्ती केली॥

बंधुजी एक लढवय्या वीर आहे हें पुढील ओवींत व्यक्त केलेलें आढळतें—

---

* "नटवा" हा शब्द आपण 'नखरेल' अशा अर्थानें व छानछोकी करणाऱ्या माणसाला वापरतों. पण मराठमोळा लोकांत हा शब्द कौतुकानें, वात्सल्यानें वापरलेला दिसतो. त्याचा अर्थ व्यवस्थित, टापटिपीचा, रुबाबदार माणूस असा दिसून येतो.

समूरल्या सोप्या ढालतलवार आइन्याची
बंधुजीनं रजा घेतली महिन्याची

पुष्कळवेळां बंधुराय धान्याचा व्यापारहि करतात—

खांद्यावरी पोतं धारण बसली दाण्याची
बंधुजीची माझ्या कवळी उमर वाण्याची

केव्हां भाऊ उत्तम, यशस्वी शेतकरी* आहे व त्याच्या शेतांतून "भलंरी"चीं गीतें ऐकूं येत आहेत अशींहि वर्णनें आढळतात.

पिकलं ग पिकलं म्हणूं, बंधुची चुनंखडी
ऐकूं येती भलंगडी

फार काय, खटल्याच्या निमित्तानं कोर्ट कचेरींतहि त्यांची हुशारी दिसून येते—

दिवानवाड्यामंदी वैरी बोलतो वसावसा
बंधुजीचा शहाण्याचा शब्द खासा

अशींहि परोपरीचीं वर्णनें आहेत. थोडक्यांत एका आदर्श श्रमजीवी मराठ्याचें शब्दचित्र नजरेसमोर पूर्णपणें उभें करण्याचें सामर्थ्य या ओव्यांत दिसून येतें.

अशा प्रकारें हा विषय हजारो ओव्यांनीं नटलेला आहे. त्याचें दिग्दर्शन थोड्या वेळांत पूर्णपणें करणें खरोखरच कठीण आहे. बहीणभावंडाची माया ही अशी निर्मळ, पवित्र आहे. या प्रीतीची माधुरी कांहीं निराळीच. वरून दिसायला ओबडधोबड पण अंतर गोड. ग्रामवासी भगिनीच्या शब्दांतच सांगायचें झाल्यास एवढेंच म्हणतां येईल—

बहिणभावंडाची माया अंतर काळजाची
पिकलं सिताफळ, त्याला गोडाई साखरेची

अन् हें वर्णन किती यथार्थ आहे!

—※—

* "ग्रामीण जीवन" या विभागांत बंधु उत्तम मळेकरी, गुऱ्हाळ चालवणारा, चांगला मोटकरी, हेड्या, उत्तम गाडीवान व सधन शेतकरी असल्याचे उल्लेख पूर्वी आलेले आहेतच.

# बंधुराय

बंधुजी पाव्हणं, लईंदी यायाचं गाजत्यात
घोडीचं घासदाणं, माझ्या घंगाळी भिजत्यात १

दिस मावळला, झाडाझुडांत झाला राऊ
बहिणीच्यासाठीं रातचा आला भाऊ २

दिस मावळला दिव्यापाशी माझा हात
बंधुला इच्यारीते, कां रं पाव्हन्या केली रात ३

दिस मावळला झाडाझुडाच्या झाल्या वेठी
बंधु बहिणीचं गांव गाठी ४

दिस मावळला झाडाझुडाच्या आडूशानं
बंधुजी येतो वाटंच्या कडूशानं ५

दिस मावळला, झाडीमंदी झळकला
ताईत बंधुजीला चालीमंदी मी वळकला ६

दुरून वळकीते, बंधुजी हाई कां न्हवं
काळ्या टोपीची त्याला सवं ७

उन्हाच्या कारामंदी छत्री बनांत कुनाची ?
ताईत बंधुजीची दौड आलीया उन्हाची ८

साळीचे तांदुळ आधनी झाला मेवा
बंधु अशात माझा यावा ९

उन्हाळ्याचं ऊन झळया मारीतं
बंधुजी आलं रुमाल वारीत १०

दुरून ओळखते बंधुची करडी घोडी
वाऱ्या वादळानं उडते शालजोडी ११

घरांत कामधंदा, बाहेर गेलं चित्त
बंधु आल्याती अवचित १२
आला बंधुजी पाव्हना माझ्या जीवाला धगधगा
शिंगी अवखळ नवा जागा १३
आला बंधुजी पाव्हना टाकते सत्रंजीवर शेला
बयाजीच्या बाळा बैस गुलाबाच्या फुला १४
आला बंधुजी पाव्हना, गादी टाकते झाडूनी
बंधु बसा मंदील काढूनी १५
बंधुजी पाव्हना, दाराला होती कडी
बापलेकाची आली जोडी १६
बसाया बसकुर, पाट टाकते जांभळा
बैस बयाच्या कंवळा १७
बसाया बसकुर, टाकते चांदवा
बैस बयाजीच्या बाळा, माझ्या बंधवा १८
समूरल्या सोप्या मी टाकीतसे जान
हौशा बंधुजींनी लई दिसांनी केलं येनं १९
आला बंधुजी पाव्हना घोड्यावरी जान
सांग बयाचं वर्तमान २०
गांवाहून आला लाल माझ्या मालनीचा
बयाच्या बाळाला शीण आलाया चालणीचा २१
ऐत्या वेळेचा पाव्हना, न्हाई मला जड झाला
सयांनु किती सांगुं, माझ्या काळजाचा घड आला २२
आला बंधुजी पाव्हना काय करूं मी जेवायाला
तूप वाढते शेवायाला २३
बंधुजी पाव्हना काय करूं मी जुंधळ्याचं
त्याच्या जेवनाला ताट नाजूक अंबोळीचं २४

आला बंधुजी पाव्हना, नव्हं वरनभाकरीचा
त्याच्या जेवनाला करूं पुलावा साकरेचा २५
पाची परकाराचं ताट, तोंडी लावाया काय वाढूं
करूं बुंदीयेचं लाडू २६
दुधातुपानं भरलं ताट, वर झाकीते दोन्ही हात
बंधुजी पहाते तुमची वाट २७
बंधुजी पाव्हना, शेजीला पडलं कोडं
त्येच्या फराळाला माझ्या साठ्याला दूध पेढं २८
बंधुजी पाव्हना शेजी सांगत आली रंभा
त्येच्या ज्येवनाला खडीसाकर पिवळा आंबा २९
बंधुजी पाव्हना, शेजी म्हनिते आतां कसं ?
बंधुजीचं ताट करते, मनाला येइल तसं ३०
बंधुजी पाव्हना शेजी म्हनते आतां कसं ?
माझ्या बंधुजीला मी तळीते अनारसं ३१
पाव्हना माझा बंधु, शेजी बघे सान्यावाटं
येकूचा तोंडमोळा, चंद्र उगवला कुठं ३२
आला बंधुजी पाव्हना, काढीते मी केळाची फनी
शेजी पुसते कोन आलाया वानी ? ३३
बंधुजी पाव्हना, शेजी म्हनते कोन राजा
शेजी किती सांगु राजा न्हवं, बंधु माझा ३४
शेजी आईबाई मला उसनं दे ग दही
आलं घराला पाव्हनं, बंधुसंगट भावजई ३५
शेजी आईबाई बघ माझ्या घराकडे
बंधुजीची गाडी सुटली दारापुढे ३६
घोडीला घासदाणा देईन साखर नीसती
नका बंधु हट्ट घेऊं, माझी खेड्याची वसती ३७

बंधुला भोजन सोजीचा करते मासा
बंधुजी बोलती, स्वैपाक झाला खासा ३८
बंधुला भोजन, मी दह्याची करते कढी
बंधुजी बोलती, लवंग झाली थोडी ३९
जेवण जेवतो, तूप खिचडी पापड
बंधुरायाला माझ्या जमाबंदीची निकड ४०
सोजीच्या शेवाया, दुधातुपानं झाल्या मऊ
माझ्या धाकल्या भावा जेऊं ! ४१
सोजीच्या शेवायाला उशीर न्हाई बंधु
कर अंघुळ लेई गंधु ४२
जिरंसाळीचं तांदूळ मी वेळत्ये तवलींत
आली माझ्या पाठची दौलत ४३
आला बंधुजी पाव्हना, नड सांगतो जवांतवां
मी पोळ्याला ठेवीला ग तवा ४४
आला बंधुजी पाव्हना, न्हाई केली पोळीपाती
लाडू बुंदीचं वाढूं किती ४५
बंधुजी पाव्हना, जाऊ गुजरी, तुझा माझा
त्याच्या जेवनाला लाडू बुंदीचा करूं ताजा ४६
आला बंधुजी पाव्हना, जाऊ गुजर होती घरी
त्याच्या जेवणाची कशी केलीस उस्तवारी ? ४७
जिरंसाळीच्या तांदुळाला जरासा देते धाऊ
आला माझा भाऊ, नका उपाशी दादा जाऊ ४८
पाव्हनं माझं बंधु, माझ्या जिवाचा गोंदूळ
अंगणी वाळत्यात अनरशाचं तांदूळ ४९
पाव्हनं माझं बंधु काय करूं पकवान
गुळाच्या गुळपोळ्या वर केळाचं शिकरण ५०
पंचपकान्नाचं ताट करिते पराणापरी याला
माता नाही माझ्या बंधुजीला ५१

कोंड्याचा करते मांडा, भाजीची करते शाक
बंधु जेवुनी लज्जा राख ५२
आला बंधुजी पाव्हना याव आंब्याच्या दिसामंदी
तूप वाढते रसामंदी ५३
आंब्याचा आंबरस, ताट दिसे सोन्यावाणी
करते बंधुजीला मेजवानी ५४
सकाळच्या पारी चूल न्हाई थंडगार
हौशा बंधुजी जिलबीचा जेवनार ५५
साखरेचा लाडू देते वाटच्या भोजनाला
बया न्हाई माझ्या बंधुजी सजणाला ५६
आकडी दुधाची तापून आली शाई
माझ्या बंधुजीला बया न्हाई ५७
फाटल्या माझ्या चोळ्या न्हाई फाटली माझी पाठ
माझं घेनारं बंधु बळकट ५८
लुगडं फाटलं, आलंया दंडाला
माझ्या बंधुजीला देते सांगावा पुंडाला ५९
फाटली माझी चोळी न्हाई पडली कापणी
माझ्या बंधुजीला घोकणी ६०
लुगडं फाटलं पदर फाटला पाठीवरी
गुजर बंधुजीन चाटी लूटला वाटेवरी ६१
जिला न्हाई भाऊ, तिनं कशाला रुसावं ?
जरीच्या लुगड्याचं मोल कशाला पुसावं ? ६२
ओटीचा खुर्दा मुठींत मावंना
भाऊ शिवी चोळी, बहिणीच्या मनास येईना ६३
काळी कल्पन्दारू, चोळी असली कुठली
ताईत बंधुजीनं पेठ ममईची लूटली ६४
भाऊ घेतो चोळी, भावजय गुजर डोळे मोडी
त्या चोळीची काय गोडी ? शिंपीदादा घाल घडी ६५

बंधुजी घेतो चोळी भावजय देईना दोरा
माझा चांद असतांना, चांदनी तुझा काय तोरा ? ६६
बंधुजी घेतो चोळी, भावजय गुजर बोलेना
बहिणा, इलाज चालेना ६७
बंधुजी घेतो चोळी, भावजय म्हणे, उणाक घेऊ नका
नन्दा दिल्याती थोर लोकां ६८
बंधुजी घेतो चोळी भावजय गुजर खुशालीत
तिच्या माहेरी चालरीत ६९
चोळया म्हणू चोळ्या, माझ्या बासनी वारा तेरा
बंधु राजसा, देते हिशेब तालेवारा ७०
शिंप्याच्या पालाखाली उंच मोलाचा लालवा
भाऊ बहिणीचा बोलवा ७१
लुगडं घेतलं, साडेसाताचा रासता
माझ्या बंधुजींनी शब्द टाकीला हासता ७२
लुगडं घेतलं, साडेसाताची नामावळ
बंधुजीची घेणावळ ७३
लुगडं घेतलं गंगाजमना आरसपेटी
बंधुजीनं धुंडिलं, पुणं सातारा बारामती ७४
लुगडं घेतल साडेसाताची इरकली
कुन्या पेठेला पैदा केली ? ७५
लुगडं घेतलं दुही पदर धारवाडी
बंधु पुन्याचं मारवाडी ७६
लुगडं घेतलं, दुही पदरी मोतीघोस
माझ्या बंधुजीची हौस ७७
लुगडं घेतिलं घडी कागदाच्या पोटी
बंधुनं धुंडिली मिरज माझ्यासाठी ७८
लुगडं घेतलं रुततं पाठीपोटी
बंधुजी हिंडती बारीक चिरीसाठी ७९

लुगडं घेतलं बंधु बघतो दिव्याजोती
आंत जरीच्या काड्या किती ८०
लुगडं घेतलं, जरीची काडी न्हाई
बंधुजी बोलती, एवढ्यानं झालं न्हाई ८१
लुगड्याची घडी मी टाकीते रागंरागं
माझा बंधुजी मनधरणीचा येतो मागं ८२
लुगड्याची घडी शिपायाच्या हाती
लोक पुशित्यात राजसाला बहिणी किती ? ८३
लुगड्याची नीरी रुतते माझ्या पोटा
मिरजेच्या लुगड्याचा दर मोठा ८४
साळवी लुगड्याचा पदर हातभरी
सयानु किती सांगू, भाऊ कुनबी मातबरी ८५
लुगडं घेतलं, त्यांत दिसतं माझं अंग
बंधु कुठं खरेदी केली सांग ! ८६
हौस मला मोठी रंगकताई पातळाची
हौशा बंधुराय, पेठ पहावी सांगलीची ८७
हौस मला मोठी,उडद्‌वाणीच्या लुगड्याची
बंधु बोले, वाट अवघड बडोद्याची ८८
हौस मला मोठी राघुरंगाच्या लुगड्याची
माझ्या बंधुजींनी पेठ लूटली बडोद्याची ८९
काळी चंद्रकळा, नेसते गांठीवरी
गनीस बंधुजी, पदर भिंगाचा पाठीवरी ९०
काळी चंद्रकळा, चारी सांगतो साडेबारा
बंधु किती सांगू, घडी उचल तालेवारा ९१
काळी चंद्रकळा, धुन्याधुन्यानं रंग गेला
माझ्या बंधुपाशी म्यां उगीच हेका केला ९२
काळी चंद्रकळा, उंच मोलाची काढूं नका
भीड हरीला घालूं नका ९३

काळी चंद्रकळा, नका दिंडाच्या आड ठेवूं
न्हाई मी मागत, बंधूजी नका भिऊ ९४
न्हवती लुगड्याची आशा, न्हाई मी आसुशी
बंधुजी तुम्ही सुखी, त्यांत मी सन्तुषी ९५
आम्ही चौघी बहिणी पान्याच्या चार नया
मधी बंधुजी हौद पानी प्याया ९६
आम्ही चौघी बहिणी चार गांवच्या चार शिवा
ताईत बंधुजी मधी गुलाब घेतो हवा ९७
आम्ही चौघी बहिणी चार गांवीच्या चार पेठा
मधी बंधुजी किल्ला मोठा ९८
आम्ही चौघी बहिणी चार गावीच्या चिचा
बंधुजी मधी आंबा, डौल बघा त्याचा ९९
आम्ही चौघी बहिणी चहुंगावचे केळीखांब
ताईत बंधुजी, मधी नांदतो सूर्यचांद १००
आम्ही चौघी बहिणी चार गांवीच्या वारवा
ताईत बंधुजी मधी नांदतो पारवा १०१
लिंबाच्या लिंबोण्या लिंबाखालीं पसरल्या
बंधुला झाल्या लेकी, बहिणींना इसरला १०२
बहिणीला केल्यानं नको म्हणूंस नासलं
ताईत बंधूजी, तुला दुणीनं असंल ! १०३
बहीणभावंडाचं भांडण रानीवनीं
बंधु चिन्तावला मनी, बहिणीच्या डोळ्या पाणी १०४
बहिणभावंडाचं भांडण झालं काल
बंधुजी बोले, बहिणा कशानं डोळं लाल ! १०५
बहिणभावंडाचं भांडण झालं राती
बंधु म्हणे अजून राग किती। माझ बोलणं सभागती १०६
दुबळी बहीण मी बंधुच्या शेजाराला
लागे वर्दळ गुजराला १०७

चांदन्यांसंगट चांदाला येते शोभा
भाऊ बहिणींमंदी उभा १०८
सयाना इच्यारते, माझ्या बंधूचा ऊस कसा ?
त्यांत चवथाई माझा हिस्सा १०९
बंधुजी बोलती, बहिणा चौथाई घ्याया चला
चौथाई तुझी तुला, एक चोळीची आशा मला ११०
बहिणीच्या आशिरवादें बंधु झाल्याती कुबेर
माडी बांधलीया जबर १११
येळाचा येळ गेला गाडी तट्टयाची विणायाला
बंधु निघाले बहिणीला आणायाला ११२
पोटाच्या परीस, मला पाठची फार गोडी
सावळ्या बंधुराय ! बाळपनीची तुमची जोडी ११३
दिल्याघेतल्यानं पुरेना ऐरावती
माझ्या ग भाईची, गोड बोलाची रसवंती ११४
पडतो पाऊस नदीनाल्यांना आला पूर
थोरला माझा बंधू साळ्याचा समुंदर ११५
बंधुजी बोलतो, ये ग बहीणा एकदिशी
माझ्या व्याल्याती गाई म्हशी ११६
बापानं दिली लेक सातसमुद्राच्या आडू
ताईत बंधुजी , खुशालीचं पत्र मला धाडू ११७
पराया पुरुषाला दादा म्हनायाची चोरी
सख्या बंधुची गोष्ट न्यारी ११८
वाटच्या वाटसरा चल धरला देते पानी
ताईत बंधु माझा परमुलुखी तुझ्यावाणी ११९
लोकांच्या बंधुवाणी बंधु नव्हत माझं नारी
शहामिरगाला माया भारी १२०
धनग संपत् पडे सांदीच्या सुगडांत
बंधुजी ग माझे हडे ते उजेडांत १२१

आतांच्या कलिमंदी भाऊ न्हवत बहिणीचं
भावजय पुसती कोन गांव पाव्हणीचं १२२

बहिनीच्या गावां जाया भावा पडतं साकडं
रानिच्या गावी जातो घेतो कोसाचं वाकडं १२३

थोरलं माझं घर सोनीयाच्या आडभिंती
हौशा बंधु माझं, सोप्या बैसले हिरेमोती १२४

बहिनीचा भाऊ मोठा मायाळु दिसत
चोळी अंजिरी खिशांत १२५

एकलीचा एक लाल खुतनीचा दोरा
माझ्या बंधुजीला औख मागते परमेसरा १२६

लोकाला लई ल्येक माझ्या बयाला एकला
ताईत बंधुजी मोती सामिंदरांत पिकला १२७

एकापुढे एक मायबाई तुमचं लेक
मोतीपवळ्याचं सामिंदरी झालं पीक १२८

समूरल्या सोप्या गंध लेत्यात भाऊभाऊ
दृष्ट व्हईल, पडदा लावु १२९

चईताचं ऊन, तूं शिळोपा दे रे देवा
बंधु नाजूक गेले गावा १३०

उन्हाळ्याचं ऊन लागतं शेल्यांतून
बंधुजी शिंगी काढावी बागेंतून १३१

दुरून ओळखते गावीचा पानोठा
ताईत बंधुजी रावा माकनीमागे होता १३२

वाटचा वाटसरू कां ग विचारी माझं घर
माझ्या बंधुजीचा मैतर १३३

वाटेवरचा वाडा, जन म्हणती कोनाचा
बंधुजीचा माझ्या मराठ्या जैनाचा १३४

खांद्यावरी पोतं धारण बसली दाण्याची
बंधुजीची माझ्या कवळी उमर वाण्याची १३५

गांवोगावीचं पाटील माझ्या बंधुच्या आरांत
नित कचेरी दारांत १३६
पाची पानाचा इडा बंधुच्या मुखांत
माझा भाईराय उभा दिंडीच्या लोकांत १३७
मोठं मोठं डोळं, भुंवई बाकांत
माझा बंधुजी सदा गुजर लोकांत १३८
अष्टीच्या धोतर रुमालाची कानपट्टी
बंधु वकिलाच्या जातो भेटी १३९
समूरल्या सोप्या ढालतलवार आयन्याची
माझ्या बंधुजीनं रजा घेतली महिन्याची १४०
धोतराचा सोगा वाऱ्यानं मलपा मारी
बंधु माझा उभा, दलाल्या शेजारी १४१
सांगलीच्या बाजारांत मालाला ठेलाठेली
गुजर बंधुजीची अडत्याची एक बोली १४२
गावीच्या तालुक्यांत शिंगीचा जागा रिता
माझ्या बंधुजीला दिवाणी पडे गोता १४३
दिवान वाड्यामंदी वैरी बोलतो वसावसा
माझ्या बंधुजीचा शहाण्याचा शब्द खासा १४४
दिवानवाड्यामंदी वैरी बोलतो दडूनी
माझ्या बंधुजीनं दिला जवाब चढूनी १४५
पाची पानाचा इडा बंधुच्या मुखांत रंगला
ताईत बंधुजी रानीपरीस चांगला १४६
भावाच्या परायास भावजय करावी गोरीपान
आयन्याशेजारी दरपण १४७
बंधुजीपरायास भावजय गुजर जिव्हाळ्याची
लेक माझ्या मावळ्याची १४८
बंधुजीपरायास भावजय गुजर किती शहाणी
बंद्दा माहेराला आणी १४९

एकामागं एक बंधु हौशाचं लेक
भावजय गुजरीचं जिरेसाळीचं माझ्या पीक १५०
भावजय गुजरीचा पदुर धरनीचा
नटवा माझा बंधु खांब कातीव कोरणीचा १५१
बंधुजी आपुला भावजय लोक कशी म्हणुं
माझ्या नागाची पद्‌मिणु १५२
बंधुजी आपुला भावजय लोकाच्या पराण्याची
हौस मला मोठी तिच्या पोटीच्या किराण्याची १५३
भावजय गुजरी, तुझ्या उशाला चबुझारी
ताईत बंधु माझा तहानेला शिरहारी १५४
मोठंमोठं डोळं, तुला भित्याती सारीलोक
बंधुला किती सांगुं ? रानी कायद्यामंदी राख १५५
चिकनी सुपारी अडकित्त्या दाटली
बंधुजीला माझ्या रानी अगद भेटली १५६
अंघुळीला पानी इसान झालं थोडं
ताईत बंधुजी बघे रानीच्या तोंडाकडं १५७
भावजय गुजरी, नको बोलूंस ढेवज्याचं
माझं बंधुजी, पान कोमेलं सबज्याचं १५८
भावजय गुजर खोटी, कशी निरीनं पिढं लोटी
माझ्या बंधुसाठी तिचा अन्याव घालीन पोटी १५९
बंधुजी पारावरी माझी चवथी येरझारी
बोलेनाशी झाली भावजय गुजर कुरँदारी १६०
लुगडं घेतलं घडी रानीच्या हाती दिली
रुसली बहीण समजाविली १६१
साखरेचा लाडू मुंग्याबायांनीं येढीला
वहिणीचा भाऊ भावजयीनं तोडीला १६२
बहिनभावंडाची, बाळपनीची जोडी
भावजई, नको करूं ताडातोडी १६३

बहिणीला आणाया बंधु सांगतो बारा ओढी
रानीला आनाया बंधु धुरेची बैलं सोडी १६४
माझ्या वाड्यामंदी कोन मोकळ्या केसाची
ताईत बंधुजीची रानी चवथ्या दिसाची १६५
बंधुजी बोलती, यावं बहिणी घरामंदी
भावजय बोलती, गई मारकी दारामंदी १६६
बंधुजी बोलती, कर बहिणीला डाळरोटी
भावजय बोलती, गहुं खपल्यांच्या पोटी १६७
बंधुजी बोलती, कर बहिणीला भात
भावजय बोले, साळी हाईत्या लिंपणांत ! १६८
बंधुजी बोलती, यावं बहिणी चुलीपाशी
भावजय बोलती, वऱ्या हाईत वारधशी १६९
बंधुजी बोलती, वाढ बहिणीला दूधभात
भावजय गुजर, बोले म्हशीनं दिली लाथ १७०
पिकल्या पानाचा, विडा येईना दाणेदारी
भावजय गुजर वर लवंगेचा ठसा मारी १७१
बहिण भावंडाची माया कशानं तुटली
बंधुजीला माझ्या राणी अगंद भेटली १७२
भावजय गुजरी, नको माघारी बोलूं मला
हौशा बंधुजी, पाठचा चांद दिला तुला १७३
काळी कळवतीण जागा मागते बिऱ्हाडाला
बंधु गेलाया कऱ्हाडाला १७४
माझ्या दारावरनं नटनारींचा नखरा
नटवा माझा बंधु भरज्वानीचा हाय घरा १७५
लेन्यालुगड्याची नार, सोड तालमीचं दार
बंधुजी चातुराला नवती झाली फार १७६
मोठं मोठं डोळं बागेतलं लिंबू
बंधूला देखून, कुन्या नारीनं दिला तंबू १७७

नवतीची नार माझ्या दारावरनं येती जाती
बंधु गावा गेलेला सांगूं किती ? १७८
शहरामंदी शहर, सातारा लवणी
सातत‌ळाच्या माडीची पडे बंधूला मोहनी १७९
घोड्यावरचा स्वार उन्हानं आला जार,
बंधु आल्यागेला पुसतो, कुन्या पेठेला मोहना नार १८०
पान्याला जाते नार इकडे कोणीकडे
ताईत बंधु माझं, चाफाचंदन दोन्हीकडे १८१
काळी कळवतीण, नाचती परकारानं
खुबी केलीया बंधुजी सावकारानं १८२
काळी कळवतीण, काय नाचणी झाली सुरू
माझ्या बंधुजीला मागते मोतीचुरू १८३
नदीच्या पलीकडे अग्नीधोतर वाळत्यात
बंधुजी शिकार खेळत्यात १८४
नदीपलीकडे वाळू उडते चटापटा
हौशा बंधुजी, हलगी लावुन खेळे पट्टा १८५
पाची उतरंडी पैलवानाचं खोबरं
माझ्या बंधुजीनं कुस्ती नेमिली जबर १८६
गावीच्या माळावर कशाची धूळमाती
नटवा बंधुजी कुस्ती खेळून आला राती १८७
माझ्या वाड्यावरनं पैलवानाची जोडी गेली
ताईत बंधुजीनी नई तालीम कुठं केली १८८
कुस्तीच्या फडावरी शिंग वाजे-घाईघाई
पैलवानाला गडी न्हाई १८९
आकडी दुधाचा तांब्या ठेवला आडभिंती
पैलवानाच्या मिनत्या किती १९०
सकाळच्या पारी आकडी दुधाचा करते खवा
बंधुजीची कुस्ती नेमली परगांवा १९१

बंधुजी पाव्हना त्याच्या छत्रीला लाल पाती
बंधुजीला माझ्या तालीम सोभा देती १९२
भरल्या बाजारांत भरणी आलीया बटव्याची
हौशा बंधुजीची सासु बोलावा नटव्याची १९३
भरल्या बाजारांत भरणी आलीया चुनाळाची
हौशा बंधुजीची सासू बोलावा हिलाळाची १९४
अंगड्या टोपड्याची भरणी आलीया तळेगावी
ताईत बंधुजी बाजाराला येई १९५
भरला बाजार मला द्याया घ्यायाचं न्हाई काई
जाते बंधुच्या भेटीपाई १९६
लुगडं घेतलं निरी पडते हजार
केला बंधुजीनं बाजार १९७
भरला बाजार किती पाहुं दाटणीचा
माझ्या बंधुजीचा काच्या तो पैठणीचा १९८
भरला बाजार भरून सारा रिता
ताईत बंधुजी, वाणी भरणीचा आला नव्हता १९९
भरल्या बाजारांत किती पाहु नटव्याला
ताईत बंधुजीच्या गोंडं रेशमी बटव्याला २००
भरल्या बाजारांत ओळखीते चातुराला
माझ्या बंधुजीच्या रंग कैलासी धोतराला २०१
भरला बाजार, बंधु अशांत माझा यावा
खण साडीचा मला घ्यावा २०२
भरल्या बाजारांत चंद्रकळेच्या उतरंडी
बंधुजीच्या कमरेला, कसा पैशाचा दुही तोंडी २०३
भरल्या बाजारी छत्रीवाल्याची झाली दाटी
बंधु उभा माझ्यासाठी २०४
भरल्या बाजारांत चंद्रकळेच्या उतरंडी
माझा बंधुराय, पालाच्या पहिल्या तोंडी २०५

भरल्या बाजारात बंधु वळकिला पहिल्या तोंडी
काळी छतरी हाती, पिवळी दांडी २०६
भरल्या बाजारांत उभी पालाला धरून
माझ्या बंधुजीला घडी दाविते हेरून २०७
हौस मला मोठी बंधुसंगट बाजाराची
बहिणीच्या चोळीसाठी कंठी मोडली हजाराची २०८
दिस उगवला काय-मी मागू त्येला
जलमचुड्याचं राज्य मला, धनसंपत बंधुजीला २०९
पाहुण्याला पाहुणचार बुंदी पाडूं घाईघाई
बंधुजी अमलदाराला रजा न्हाई २१०
पाहुण्याला पाहुणचार करते मालपोव्हं
बंधुजीला माझ्या तूप शेवायासंगं होवं २११
माझ्या वाड्यामंदी कुनी बांधिली निळीघोडी
ताईत बंधुजीची वर बनात शालजोडी २१२
सोनसळे गहूं सोजी पडते फक्कड
बंधुजी करूं नको जायाची निकड २१३
जिवाला जडभारी, कुनाला घालूं वझं ?
बंधु तांतडी येनं तुझं २१४
जीवाला माझ्या जड, कोन माझ्या कळकळीचा
ताईत बंधु माझा वाघ सुटेल साखळीचा २१५
जीवाला माझ्या जड, कसं कळालं अंतरांत
ताईत बंधु माझं, झालं रंजिस मैतरांत २१६
सांगावा सांगत्ये, आल्यागेल्याला गाठुनी
बंधुजी, झालं लईदी भेटुनी २१७
निरोप धाडिते पत्र वारियाच्या हाती
फार जिवाला तसती होती, यावं बंधु रातोराती २१८
दिव्याला भरण, घालते सदासदा
गुज बोलूया माझ्या दादा २१९

अनुक्रम. ८४३१८ दि: [illegible]
१९६६ : १०१ [illegible]



दिव्याला भरण, घालते लोन्यांचं
गुज, बयाच्या तान्ह्याचं २२०
गुज बोलतांना, बोलन्या आली गोडी
बंधुजी, रात मध्यान्ह उरली थोडी २२१
अंतरीचं गुज गुज सांगते एकल्याला
पाठीच्या रतनाला, बंधुजी धाकल्याला २२२
दिव्याला भरण घालते लोटीलोटी
माझ्या बंधुजीच्या गोड गोष्टी २२३
अंतरीचं गुज मी सांगते बंधुपाशीं
डाव्या हातानं डोळे पुशी २२४
गुज बोलतांना, दिव्याला जोड वाती
गुज बोलूंया साऱ्या राती २२५
अंत:करणाची गोष्ट, नको बोलूंस गलीयेला
बंधुजी, चल सोप्याच्या खोलीयेला २२६
अंतरीचं गुजु, सांगते सगळं
बंधु बसा, वाटंच्या येगळं २२७
अंतरीचं गुजु, सांगते वाटंला
बंधु हुंदक्यानं दाटला २२८
अंतरीचं गुजु, मी सांगतां चुकली
बंधुजी तुमच्यापरास मी धाकली २२९
अंतरीचं गुजु सांगते अंतराला
पानी भरलं नेतरांला २३०
अंतरीचं गुजु, सांगते खाली बस
भरिली नेत्रं, डोळं पूस २३१
अंतरीचं दु:ख, तुला सांगते चालीचाली
भरिली नेत्रं बैस खाली २३२
सकाळच्यांपारी तुळशीला दिला तक्या
गुजु बोलूंया, बंधु सख्या २३३

—*—

# माहेरचे आप्तेष्ट

भाऊ नि बहीण यांचें नातें सारखेंच. परंतु या गीतांतून, भावावर जेवढीं कवनें आहेत, त्याच्या एकदशांशदेखील बहिणीबद्दल दिसत नाहींत. याचें कारणहि उघड आहे. बहीण म्हणजे तरी काय ? बोलूनचालून तीहि अशीच एक परघरीं गेलेली सासुरवासिनीच ! तिची आठवणं येणं स्वाभाविक असलं तरी कर्तृत्वाचा भाग भाऊ ज्या ज्या प्रकारें माथीं घेतो, त्यांत बहिणीची कांहींच मदत नसते ! बहीण माहेरपण करूं शकत नाहीं, कीं जीवनाचे कष्ट कमी करूं शकत नाहीं. आणि म्हणूनच बहिणीवरील गीतें आहेत, तीं फक्त बहिणीचें रूप, मेहुण्याचें वर्णन, भाच्यांचें कौतुक व तिचा संसार यापुरतींच मर्यादित दिसतात.

पुष्कळदां बहिणीबहिणी अगदीं सारख्या रूपाच्या दिसतात. पण त्यांत काय नवल आहे ?

अक्काची चोळी, येते माझ्या अंगा
आम्ही दोघी बहिणी, एक वेलाच्या दोन शेंगा

मोठ्या बहिणीला आईच्या ठिकाणीं मानल्याचाहि उल्लेख आढळून येतो—

माउली परीस आशा थोरल्या बहीणीची
चोळी फाटली ठेवणीची

आणि म्हणूनच कीं काय बहिणीला बरेच ठिकाणीं बहिणाई म्हटलेलें आढळतें. बहिणीच्या वैभवाचीं वर्णनेंहि आढळतात—

गळा भरीला दागिन्यानं, सराला न्हाई जागा
माझी बहिणाई, सुभेदाराला दिली राधा

क्वचित् एकादा मेहुणा आडमुठाहि निघतो. पण बहिणीमुळें त्याचाहि मान ठेवावा लागतो. तेथें रोजच्या व्यवहारांतला एक दाखला दिला आहे—

पाटाचं ग पानी, उसासंगं एरंडाला
सांगुन मी धाडी, बहिनीकारन मेव्हन्याला

बहीण–मेहुणा यांखेरीज माहेरचे इतर आप्तेष्ट म्हणजे चुलता, मामा, मावश्या, भाच्याभाचे, आजाआजी, इत्यादि असतात. पण त्यांबद्दलचीं गीतें फारच कमी आहेत. कारण मुलगी अगदीं बाळपणींच माहेराला पारखी होते व हे नात्याचे संबंध दूरावतात. लग्नानंतर आईबाप व भाऊ यांखेरीज मुलीच्या आयुष्याशीं कुणाचाच संबंध येत नाहीं. इतर आप्तेष्टांची अशा प्रकारें मुलीच्या आयुष्यांत कोठलीच महत्त्वाची भूमिका राहात नसल्यानें त्यांच्याबद्दलचीं गीतें कमी असावीं हें स्वाभाविकच दिसतें.

—*—

# माहेरचे आप्तेष्ट

भरल्या बाजारांत भरणी आलीया रताळ्याची
मला आगत गोताळ्याची १
अंगड्या टोपड्याचा बाजार कवां झाला
रात्री भडंग्या मामा आला २
माझा अंगलोट बहिणाई तुझ्यावाणी
एका झऱ्याचं प्यालो पाणी ३
आम्ही दोघी बहिणी एकाच चालणीच्या
लेकी कुना मालनीच्या ४
अक्काची ग चोळी येते माझ्या अंगा
आम्ही दोघी बहिणी एका वेलाच्या दोन शेंगा ५
माऊलीपरास आशा थोरल्या बहिणीची
चोळी फाटली ठेवणीची ६
मावळा इच्यारतो भाचीबाईचा कंचा वाडा
हायती चांदसुर्य कवाडा ७
मामाच्या पंगतीला भाचा बसला नटवा
दृष्ट व्हईल उठवा. ८
मेहुना राजस माडीचा कडीपाट
माझी बहिणाई जिन्याची चवकट ९
मेहुन्याचं नातं नका शिरूं आडरानी
मी तुमच्या धाकल्या बहिनीवानी १०
आऊक्ष मागत्ये, मेहुन्या दाजिला
माझ्या बहिणाईला सुख मेथीच्या भाजीला ११

मेहुन्या राजसाचा, पलंग अवघड
बहिणाई, कडी धरून वर चढ १२
बहिनीच्या गांवा जाते, माझा चढानं पाय पडे
बहिणाई माझी, जाई शेवंती पाया पडे १३
पाची परकाराचं ताट, घालत्ये सजुरी ऊनऊन
मेहुन्या राजसा जेवा, तुम्हाला पाठची न्हाई भन १४
गळा भरीला दागिन्यानं, सराला न्हाई जागा
माझी बहिणाई, सुभंदाराला दिली राधा १५
मेहुना राजस, किती नटशील जमादारा
माझी बहिणाई पंख्यानं घाली वारा १६
पाटाचं ग पानी उसासंगं एरंडाला
सांगुन मी धाडी बहिनीकारणं मेव्हन्याला १७
आजोळी जातो बाळ, आजी घेतीया अलाबला
अवखळ नातू एकला कसा आला ? १८
चुलत भावंडं नका म्हनूसा लोक लोक
एका ताईताचं गोफ १९
चुलत भावंडं नका म्हनूंसा वंगाळ
एका राशीचं जुंधळं २०
पाया पडू आली, ओटी भरूया गव्हाची
रानी चुलतभावाची २१
आईला म्हनु आई, चुलतीला म्हनुं आऊ
माझ्या कापाला मोती लावू २२
घराला पाव्हणा, अंगनी सुपारीच्या डाल्या
चुलता पुंडाईत झाला २३
मावळन आत्याबाई तुमच्या माह्यारी माझी सत्ता
तुमचा बंधुजी माझा पिता २४
मावळ्याच्या घरी भाचीबाईचं संवळं
मामी वाढते जेवाया, मामा बसला जवळ २५

बंधुजी परायास, भाच्या राघुची आगत
मुदला परायास मला याजाची लजत २६

पाया पडूं आली भावजई गुजर अंगनांत
बंधुजीचं बाळ, हिरा झळाकितो कंकनांत २७

मावळन आत्याबाई वाडा तुझा चहुकोनी
भाच्यासंगट कळवंतिणी २८

सोनसळे गहुं शेवाई बारा वाबु
मायबाई, आला माझा मावळा तुमचा भाऊ २९

सोनसळे गहु, त्याचे प्रकार केले बहु
एका ताटी जेवले साडभाऊ ३०

मला हौस मोठा भाचा मुराळी मला यावा
ऊन लागता पुढं घ्यावा ३१

पाच पकवान करीते ताजंताजं
मामाच्या पंगतीला जेवतं बाळ माझं ३२

मामाच्या पंगतीला भाचा बसला नटून
गंध लावितो उठून ३३

पाया पडू आली, म्या धरिली वरच्यावर
भावजईच्या कडेला भाचा दुणीदार ३४

भावजय गुजरीचं पाया पडणं चांगलं
हळदकुकवानं माझं जोडवं रंगलं ३५

आपुली माया, लोकाची तशी जाणा
धनी किती सांगू, नातू आजोळाला आणा ३६

—*—

# मैत्री

मित्र म्हटले तर परके, परंतु केव्हां केव्हां मैत्रीचा जिव्हाळा रक्ताहूनहि दाट असलेला पाहाण्यांत येतो. सर्व बाळपण मित्रमैत्रिणींच्या घोळक्यांत जातें. या साऱ्याच मैत्रिणी अगर सगळेच मित्र चांगल्याच मनाचे असतात असें नसलें तरी कांहीं सख्या भावाप्रमाणें निष्कपट प्रेम करतात. त्यांचीहि आठवण स्त्रीहृदयास काम करतां करतां येत असतेच. मैत्रिणीबद्दलहि अत्यंत प्रेम वाटत असतें. मैत्रिणी पुष्कळ असल्या तरी जिवाभावाची त्यांत एकादीच. बाकीच्या जागोजाग असून करायच्या काय ? एक मुलगी म्हणते—

तुझा माझा मैत्रपना एक लवंग दोन भाग
शिंनच्या गडणीच्या, चौक्या बसल्या जागजाग

एक क्षणभर देखील या मैत्रिणींना एकमेकींवांचून करमत नाहीं.—

तुझा माझा भाऊपना घडी गमंना पाराची
कडी उघड दाराची

अशा प्रकारें हें बाळमैत्रिणींचें प्रेम असतें. बहिणीच्या तोडीची निर्मल माया, उत्तम मैत्रीण करूं शकते, पण पुष्कळदां निष्कपट मैत्रीहि लोकांना सहन होत नाहीं; कोणीतरी त्यांत विष कालवतें व अबोला सुरू होतो पण हा अबोला कधीं संपेल, असें मन म्हणत असतें—

तुझा माझा भाऊपना, कुनी कालविलं मीठ ?
सोड अबोला, सई बोल नीट ।

त्यांतली एक मैत्रीण म्हणते कीं, आपल्या मैत्रीला दुसऱ्यांची नजर लागते ! म्हणून तूं उघडउघड मला भेटायला येऊं नकोस. कोठल्या निमित्तानं येशील बरं ?—

तुझा माझा भाऊपना, जन बोले खुनशानं ।
मागल्या दारीं चाफा, यावं फुलाच्या निमिषानं ।।

एकादी वेगळ्या जातीची मैत्रीण असली तरीहि खेड्यांतून निंदा सुरू होते.

जातीपातीचे निर्बंध मोडतां येत नाहींत. मैत्रीण असून एकत्र जेवतांदेखील कधीं येत नाहीं, याचें वाईट वाटून घेत एक प्रेमळ मैत्रीण म्हणते—

जोडली मायबहिन, जात साळूची वायली
एका ताटीं जेवायाची हौस मनांत न्हायली

अशा प्रकारें मैत्रिणीचें महत्त्व पुष्कळच आपलेपणीं वर्णन केलेलें दिसतें. मात्र या मैत्रिणीची संगत लग्नानं तर फारशी लाभते असेंहि नाहीं. बाळपणच्या जिवलग मैत्रिणी असल्या तरी लग्नानंतर चार दिशांना चिमण्या उडाव्या तशा त्या दूरदूर जातात व स्त्रीजीवन हें बंदिस्त असल्यानें कितीकिती वर्षांत परत त्यांची गांठभेट देखील घडत नाहीं. अधूनमधून या रमणीय स्नेहाची आठवण येऊन या मैत्रिणी मनांत म्हणतात—

तुझा माझा भाऊपना, बारा वर्सं लोटीयेली
गडणी सांग, कशीं कंटियेली ?

तरी पण हीं गीतें मैत्रीची दृढता दर्शविणारी असूनहि अल्पसंख्य आहेत. शिवाय संसारविषयक हितगुजांचा त्यांत उल्लेखसुद्धां नाहीं हें ध्यानीं घेण्यासारखें आहे.

अगदीं क्वचित्‌च, पण सन्मित्रहि केव्हां केव्हां असतात. [ मर्यादशील जीवनामुळें पुरुषाशीं मैत्री ही एक दुर्मिळ गोष्ट आहे. ] त्याबद्दलच्या ओव्याहि कांहीं आढळतात. परंतु त्या अगदींच थोड्या आहेत. त्याहि मैत्रीसंबंधीं सरस गीतें अधुनमधून आढळांत येतात.

—*—

# मैत्री

तुझा माझा भाऊपना भाऊपनाची तारीफ
रेशमाच्या गाठी कशा पडल्या बारीक १

तुझा माझा भाऊपना, लाल बागेतली हवा
राजस बोलन्यानं शाळु दीस गेले कवां २

तुझा माझा भाऊपना, तुझ्यापरास माझा चढ
नारळीचं झाड, चढाया अवघड ३

तुझा माझा भाऊपना, जन तोडिती, तुटेना
रेशमाचा दोरा, गाठ पडली सुटेना ४

तुझा माझा भाऊपना, भाऊपनाची महिमा मोठी
एक लवंग दोघीसाठी ५

तुझा माझा भाऊपना, नगं बोलत उभा राहूं
हसतो सारा गांवुं ६

तुझा माझा भाऊपना, नगं हाताला हात धरू
गाव हाय निंदखोरू ७

तुझा माझा भाऊपना, जनालोकाची काय चोरी ?
यावं वाड्याला बिनघोरी ८

जोडिली मायबहीण, जात साळूची वायली
एका ताटी जेवायाची हौस मनांत ऱ्हायली ९

जोडिली मायबहीण पराया जातीची
जीवाला जडभारी, येते मध्यान रातीची १०

तुझा माझा भाऊपना, जन सांगतो गाऱ्हानं
जोडली मायबहीण, येवं मागल्या दारानं ११

तुझा माझा भाऊपना, हाई पराया जातीचा
जेवायाला बसू, मधी अंतर वीतीचा १२

तुझा माझा भाऊपना, कसा पडला.येतांजातां
साखरेचा लाडू म्यां दिलाया खातांखातां १३

तुझा माझा भाऊपना, झाली बारावर वर्सं लई
कुनी तोडिली बागशाई, पडे पाऊल हुते सई १४

तुझा माझा भाऊपना, बारा वर्सं लोटियली
गडणी सांग कशी कटियेली ? १५

तुझा माझा भाऊपना, वरिसं झाली बारा
आपुल्या चित्ताचा एक बसुन गेला दोरा १६

तुझा माझा भाऊपना, जसा डोंगरीचा झरा
अंतरीचा लोभ खरा १७

सांगुन धाडते दूरच्या मैतराला
यावं चैताच्या जतरेला १८

दिल्या घेतल्यानं पानी पुरंना नईचं
माझ्या मैतरणी ग्वाड बोलनं सुईचं १९

गेले वाटेनं जपत अंतरीचं गुज
माझी मैतरीण, साठयाची गज २०

तुझा माझा भाऊपना, निरशा दुधावानी
कुनी ओतलं ऊन पानी २१

गडणी म्या केल्या इसावर बारा
त्यांत जीवाची एक तारा २२

गडणी म्या केल्या इसावर दोन
सखूवाणी इमानाची कोण ? २३

तुझा माझा भाऊपना, कुनी कालवलं तीळ ?
अबोल्यांत गेला ईळ २४

तुझा माझा भाऊपना, असा पडूं नये, पडला
तुझ्या गुणांनी जडला २५

—*—

# सोयरीक

सासर नि माहेर हे स्त्रीच्या आयुष्याचे दोन प्रमुख विभाग. जणूं एकाद्या कादंबरीचा पूर्वार्ध नि उत्तरार्ध असे दोन विभाग असावे, त्याप्रमाणें हे दोन्ही खंड महत्त्वाचे असतात. या दोन विभागांना एकत्र जोडणारा महत्त्वाचा मधला दुवा म्हणजेच सोयरीक ऊर्फ विवाह. विवाहानंतर कन्या माहेर सोडून सासरीं जाते. मुलीच्या या महत्त्वाच्या स्थित्यंतराबद्दल स्त्रीजनांत केवढी उत्सुकता, किती उल्हास असतो. पांढरपेशांमध्यें लग्नसमारंभ अलिकडे त्रोटक व सुटसुटीत करण्याकडे प्रवृत्ति दिसून येते; परंतु ग्रामीण जगांतील लग्नें अजूनहि मोठ्या धामधुमीनें व बडेजावानें पार पडतात. हे लग्नविधी किती अपूर्वाईनें साजरे होतांना दिसतात! त्यांतला आनंद घेण्याची वृत्ति तेथें लहानांपासून थोरांपर्यंत दिसून येते.

सोयरिकीच्या चालीरीती दरेक जातींत वेगवेगळ्या असतात. अर्थात् ग्रामीण ओव्यांतून या चालीरीतींचा उल्लेख येतोच. उदा० मराठमोळा सोयरीक पहाल तर भावाची मुलगी बहिणीच्या मुलाला करून घ्यायची सर्रास पद्धत आढळून येते. बहीणभाऊ–पण सख्खी भावंडं सोयरीं बनतात. मग एक नवाच जिव्हाळा निर्माण होत असेल यांत काय संशय? परंतु सख्खे मोठे बंधु धाकट्या बहिणीला विहीणबाई म्हणतात व पैशाअडक्याच्या गोष्टी सुरू होतात तेव्हां बहिणीला किती भीड वाटत असेल बरें! आपलेंच माणूस देण्याघेण्यासंबंधीं कसें बोलावें, म्हणून एक बहीण दिराला बरोबर चलण्याबद्दल विनंति करीत आहे—

बंधु इवाही करूं गेले, दीरभाउजी तुम्ही चला
पाठीच्या भावंडाची भीड वाटते, तुम्ही चला

वडील भाऊ असून ते ‘विहिणीबाई’ म्हणतात याची बहिणीला भीड वाटत आहे—

वडील बंधुराय मला म्हनती इहिनीबाई
भीड वाटते बोलूं काई

परंतु सगळ्याच बहिणी भिडस्त नसतात. कांहीं तर उलट चांगल्याच ठसठशीत बोलणाऱ्या व स्पष्टवक्त्या असतात. त्यांचीं हुंड्याबद्दल मागणी तर पहा—

बंधु इवाही करूं गेले ऱ्हाई मागत थोडंथोडं
जिनसांसकट पांच घोडं, नवऱ्याबाळाला कडीतोडं ।

कधीं 'खोंडासकट पांच गाई' हुंडा मागितला जातो, तर कधीं 'गांवजेवण' देण्याची बोली ठरते.

अशा या ओव्या नाविन्यानं नटलेल्या दिसतात. त्यांची थोडी ओळख आपण करून घेऊं.

* * *

मुलीला स्थळं पाहाण्यापासून या प्रकरणास सुरुवात होते. चांगल्या मुलीला तान्हेपणींदेखील मागण्या येतात. एक आई कृत्रिम कोपानें म्हणते—

तान्ह्या मैनाला मागनं, काय मागन्याची घाई
नवरी वाढूं द्या, मैनाबाई

परंतु मुलीच्या सुंदरपणाची बातमी ऐकून दूरदूरचे लोकहि मागणी घालतात, पहायला येऊं लागतात—

चांगलंपन हिचं लांब गेलीया आवई
बाळ सोन्यासारखी देवई

कोणकोण पहायला येतात बरें?—

मैनाला मागनं, आलं पुन्याचं गवळी
माझ्या बाळीची शीण कवळी

मुलीचं वय कोवळें आहे तरी आपली पहायला येणाऱ्यांची दाटी होते. कारण मुलगी तशीच देखणी आहे—

मैनाला मागणं, दुहीदारानं झाली दाटी
बाळ आरशाची पेटी

पण असे लोक पुष्कळ आले तरी मुलीला सासर कसें हवें, नवरा कसा हवा, हें मुलीच्या आईनें मनाशीं ठरवलेलें असतेंच. ती घरधन्यांना स्पष्ट सांगते—

मैनाला मागनं, नको वाडीचा खोत मला
गाठ घालावी पाटलाला

जावई पाटील तर हवाच. पण आणखीहि ऐश्वर्य त्याच्या घरीं हवं पुष्कळसं—

सैपाकाला सैंपाकीन, पान्याला गुजराती
तिथं द्यायाची मैनावती।
ज्याच्या घरीं गाडीघोडं, जिथं हाई कुनबीन
तिथं द्यायाची पद्मीन

आणि अशा अटी बऱ्याच असल्यानें चांगलें स्थळ हुडकतांना बरीच काळजी घ्यावी लागते.

नवरा पाहूं जातां, चुलता हिंडे रायबाग
नवरं न्हाईती मनाजोगं

सुरेख, व थोरामोठ्या घरीं पडण्याजोग्या मुलीलाहि कधीं कधीं हुंडा म्हणून मोठी रक्कम द्यावी लागते. अन् कधीं बापाऐवजीं चुलताहि ही 'बोली' करतो. हुंड्यांत कोणकोणते दागिने मागितले आहेत पहा—

बाप्पाजी न्हाई घरीं, चुलता पंडीत बोली करी,
ईस पुतळ्यांवर सरी, दाब झळकतो साडीवरी

वीस पुतळ्यांची माळ, सरी अन् दाब ऊर्फ चांदीचा कमरपट्टा हा हुंडा लहानसान नव्हे!

अर्थात् चांगल्या मुलींप्रमाणें उत्तम मुलगेहि असतातच. अशा मुलालाहि 'मागण्या' खूप येतात; मुलीकडून श्रीमंत माणसें 'पहायला' येत असतात, चढाओढीनें हुंडा देऊं करतात; कारण नवरा अष्टपैलू रत्नाप्रमाणें देखणा, हुशार, श्रीमंत अन् कर्तबगार असतो ना?

नवरीचा बाप हुंडा मोजतो फाडीफाडी
नवऱ्याबाळासाठीं लागल्या चढाओढी
नवरा बघुं आलं, काय बघतां वाडाहुडा?
बाळ अंगठीवरला खडा

अशा प्रकारें सोयरीक ठरण्यापूर्वी मागणी घालण्याचे व पाहायला जाण्या-येण्याचे मजेदार प्रसंग घडतात व नंतर एक अनुरूप जोडी निवडून लग्न ठरतें ! पण याऐवजीं, जर बहिणीचा मुलगा लग्नाचा व भावाच्या मुलीजोगा असला तर दुसरीं स्थळें पाहाण्याचा फारसा प्रश्न उरतच नाहीं. बहीणभाऊ आपापल्या मुलांचीं लग्नें लहानपणींच ठरवून ठेवतात. अर्थात् लहानपणा-पासूनच मामाच्या घरीं या भाच्याचं ऊर्फ भावी जांवयाचं मोठं कौतुक नि अगत्य असतं ! हें जाणूनच कीं काय, एक तऱ्हेच्या अेरावीनें हा छोटा जांवई लग्नापूर्वीपासून मामाकडे वागत असतो ! त्याचें वर्णन पहा—

**मावळ्याच्या घरीं भाचा पाव्हना अेराव**
**कोन काढील त्येचं नांव ?**
**मावळ्याच्या घरीं भाचा पाव्हना शिरिरंग**
**मामी टाकती चवरंग ।**

बहीण–भाऊ अशाप्रकारें व्याही विहीण व्हायचें निश्चित ठरलें, कीं मग देण्याघेण्याची भाषा सुरू होते. बहीण म्हणतें, " करणीला भिऊं नकोस उगीच. आम्हीहि मुलीला सोन्याचे दागिने घालूं "—

**बंधु इवाही करूं गेले, नको भिऊंस करणीला**
**सोन्याचं कारलं घालूं तुझ्या हरणीला**

पण पुष्कळदां भावजईच्या मनास ही सोयरीक येत नाहीं. कारण सोयरीं-धायरीं माणसें म्हणजे कलहाचें बीज !

**वण्याचा वेल, जुधळ्यावर गेला**
**बंधुची करते लेक, तिथं कळीचा पाया झाला**

पण बहिणीचा निश्चय पक्का असतो. ती म्हणते, कीं माझ्या भावाचें नवें नातें होईल इतकेंच; त्यांत भावजईचें काय खर्च होतें ? सोयरा भाऊ तर जुनाच आहे ना ?—

**बंधु इवाही करूं जातां, भावजईचं काय जातं ?**
**जुना सोयरा, नवं नातं ।**

अन् मग या वरमाईची मनधरणी भावजय करूं लागते. ती म्हणते— संभाळून घ्या आतां आम्हांला !

नणंद आकाबाई, नका नणंदपना दावुं
सोन्याच्या करंड्याला मोतियाचे घस लावु
नणंद इहिनीबाई, तुमचा रुसवा कशापाई
बसा चौरंगी, धुते पायी ।

भाऊ हंसून विचारतो, कीं इतके दिवस माझ्या बहिणीबद्दल तुझा रागराग होता. अन् आतांच काय इतकं? भावजयीचं हृद्य उत्तर पहा—

इवाह्यापरास मला आगत इहिनीची
भूक जानील तान्हीची

यांतला दूरदर्शीपणा किती सूचक वाटतो!

लग्न ठरल्यानंतर मांडव, बोहलें वगैरे कामें हौसेनें सुरू होतात. भाऊ हौसेनें मांडव शृंगारूं लागतो.

मांडवाला मेढी तोडल्या वडायाच्या ।
माझ्या बंधुजीनं केळी खंडल्या घडायाच्या ।।
मांडवाला केळी, बहुल्याला ऊंस ।
तान्हेबाई, तुझ्या मावळ्याची हौस ।।

बोहल्यावरील गुलालाचीं लाल पावलं चहूंकडे उमटूं लागतात, मुलीचीं!

लाडक्या लेकीचं बहुलं गुलालाचं
माझ्या बाळाईचं पाय, बुडालं पैंजणाचं

हळदी लागतात, भावाचा आहेर वाजतगाजत येतो. या आहेराचीं वर्णनें खूपच रसिकतेनें केलेलीं दिसून येतात. हा आहेर परत करायचा नसतो म्हणून याला 'बुडता आहेर' म्हणतात.

मांडवाच्या दारीं पाला पडला उंबराचा
बंधुजीच्या माझ्या बुडता आहेर सुंदराचा
सोईऱ्याच्या आहेराची भरली बारा ताटं
बंधुचा आहेर, मुगवी पैठणी जरीकाठ

तसेंच लग्नाच्या वेळीं जांवईबुवा रुसून बसतातच. सुशिक्षित जांवयाप्रमाणें घड्याळ, सायकल, अंगठी असली त्यांची मागणी नसते तर त्यांना एक सुंदर घोडी हवी असते!—

रुसला जावाई, देवपूजेला जाईना
सासरा त्याचा मोठा, शिंगी कबूल होईना

शेवटीं हा रुसवा निघतो, मिरवणुकींत घोड्यावरून वाजतगाजत थाटानें नवरा लग्नाला येतो—

वाजंत्री वाजत्यात, शिंगाडी भाऊभाऊ
नेनन्ता बाळराय घोड्यावर बाजीराऊ

मग अक्षता पडतात अन् क्षणांत मुलगी परकी बनते. आईच्या मनाची कालवाकालव होऊन ती मुलीच्या विरहाचा विचार करूं लागते—

लगनाच्या वेळे भट म्हने काईबाई
झाली धर्माची वाळूबाई !

केवढा चमत्कार! भटजींनीं कायसें म्हटलें अन् मुलगी आजपासून लोकाची झाली !

या उलट वरमाय आनंदानें विचार करते, वडिलांची मोठी पुण्याईच, म्हणून लवकर सून आली मला— !

देवाजीचं देनं, वडिलांचं पुन्य
मला नेनंतेपनी आली सून

तऱ्हेतऱ्हेचें रुखवत भाऊ घेऊन येतो—

पाच दुरड्या रुखवत, वर जरीची फडकी
इहिन ननंद लाडकी

लग्नानंतर मुलगी सासरीं निघते. आतां खरी वियोगाची कठीण वेळ आलेली पाहून आईचे अश्रु व हुंदके अनावर होतात, जणु हरणीपासून पाडस कुणी ओढून न्यावें, तशा वेदना मनाला होतात—

कन्या निघाली सासुऱ्या, आई बघे परसांतुन
हरणी निघाली कळपांतून

बाळ जाती सासुऱ्या, पिता म्हणे जा ग बाई
जल्म दिल्याली वयाबाई, जशी हंबरते गाई !

कन्या सासरीं निघालेल्या वळीं रचलेल्या ओव्या कारुण्य, वियोग अन् प्रीति यांनीं जणुं कांठोकांठ भरून राहिलेल्या दिसतात. आपलें माहेरचें प्रिय जगत् सोडून एका अनोळखी घरीं जातांना मुलीच्या मनाचीहि वियोगानं अवर्णनीय स्थिति होते—रडून डोळे, गाल लालभडक होतात—शालू अश्रूंनीं भिजून जातो—

बाळ निघाली सासुऱ्या, नदीच्या नैवाऱ्यानं
शालू भिजला दहीवरानं।
सासुऱ्या जाते लेक, रडूं लागे माळावर
लिंबु-फुटे गालावर

आईसाठीं मुलीचा जीव थोडाथोडा होतो, मन झुरूं लागतें. भावाला ती सांगते—आतां आईला तूंच संभाळ !

सासुऱ्या जाते लेक, डोळ्यां लागलं जंजाळ
बंधु ! मातेला संभाळ

बरोबर छोटा भाऊ मुराळी ऊर्फ पाठराखणा म्हणून धाडण्याची वहिवाट आहे. या 'नेनंत्या मुराळ्याच्या'हि ओव्या या प्रसंगीं बऱ्याच दिसून येतात. आई अश्रू पुशीत त्याला जपायला सांगते व निरोप देते—

नेनंता मुराळी नेतेस, संभाळ
माझं ते केळीचं कंबळ !

बापहि भरल्या मनानं निरोप देतो व अश्रु लपवतो. परंतु भाऊ वेशीपयत 'घालवायला' म्हणून जातो; पण तेथें बहिणीला निरोप देतांना त्याला वाईट वाटतं, आंसवं अखेर मनोनिग्रहाचा बांध फोडून झिरपूं लागतातच, डोळे गुंजेप्रमाणें लालभडक होतात—

बाळ निघाली सासुऱ्या, भाऊ झाला वेशीआड
डोळे झाल्याती गुंजेघड

अशा प्रकारें मुलीची सासरीं पाठवणी करतांना या अनेक समुचित ओव्या रचल्या गेल्या आहेत. शकुंतला सासरीं जातांना आश्रमवासीय मंडळींना होणाऱ्या वियोगदुःखाचीं आपण सुंदर वर्णनें वाचलीं आहेत, त्याच उत्कट भावनांचा आढळ या साध्यासुध्या शब्दांतून आपणास होत नाहीं काय?

या विविध भावनांच्या दर्शक अशा ओव्यांचें संमेलन सोयरिकीमध्यें झालेलें आहे.

या सुंदर स्थित्यंतरांतून कन्येच्या आयुष्याची वाट सासरघराकडे वळते. बाल्यसीमा ओलांडून ही पोरगी जाणती होते, अनेक नव्या नात्यांचे धागे तिच्या जीवनपटांत येऊन मिळतात. या नव्या आयुष्याचें स्वागत करण्यासाठीं ही बाला सासरीं निघाली आहे. तिला आशीर्वाद देऊनच सोयरिकीच्या या मंडपांतून आपण तिचा निरोप घेऊं.

—*—

# सोयरीक

बाळराजाला मागूं आलं सोपा भरून वसरी
बंधुजींची स्वारी आली टांका बनात दूसरी १

नवरा बघुं आलं काय पाहातां वाडाहुडा
नवरा अंगठीवरला खडा २

नवरीचा बाप हुंडा मोजीतो फाडी फाडी
नवऱ्या बाळा लागल्या चढाओढी ३

नवरी बघु आलं, गडाचं गडकरी
चुलता न्हाई घरीं, मावळा बोली करी ४

नवरी बघु आलं, आलं कोल्हापुरी कारकून
नेलं रतन पारखून ५

नवरी बघु आलं कृष्णाकडेचं गवळी
माझी मैनाबाई सोन्यानं झाली पिवळी ६

मैनाला मागुं आलं बाप्पाजी न्हाई घरी
चुलता बोली करी वीस पुतळ्या वरी सरी ७

नवरी बघु आलं हुंबऱ्या दिलं उसं
नवरी बघुन झालं खुश ८

नवरा पाहूं गेलं, चुलता हिंडे रायबागं
नवरं न्हाईत मनाजोगं ९

नवरी बघु आलं, काय बघतां नाकडोळं ?
चंद्रसुर्य कोमावलं ! १०

नवरी बघु आलं, काय बघतां घेनंच्येनं ?
सावळी बाळाबाई पुतळीचं सोनं ११

मैनाला मागनं, न्हाई द्यायाची कुरुल्यांत
मामानं बोली केली, पाय पडंना दुरुळयांत १२

लेकीच्या आईला रातदीस झोप न्हाई
बाळी पडेल कोन्या ठायी ! १३
नवऱ्यापरायास नवरी सरस
इवाही न्हाई हुंड्याची गरज ! १४
नवरी बघुं आलं नको वाडीचा खोत मला
गाठ घालावी पाटलाला १५
मैनाला मागनं, क्रिस्नाथडीचा गुजर
वाजुबंदाला दिसं पदर १६
नवरा बघूं आलं, काय पाहातां नवऱ्याला
माझ्या तोळबंदीच्या भवऱ्याला १७
तान्ही मैना माझी, पान्याखालची मका
चांगलंपन हिचं, सोईऱ्या सांगुं नका १८
बाळाबाईला मागनं, आली सर्वी दुनिया
लेक पाटलाची कनिया १९
मैनाला मागनं, नदीकडला बामन
मामा हुंड्याला जामीन २०
मैनाला मागनं, दुही दरवाजा वाकुनी
माझी मैना नेली, मोहोर झाकुनी २१
मैनाला मागनं, काय मागन्याची तवा
संगं दागिन्याचा डबा ! २२
तान्ह्या मैनाला मागनं काय मागन्याची घाई ?
नवरी वाढूं द्या वाळूबाई २३
मैनाला मागनं दुही दारानं झाली दाटी
मैना आरशाची पेटी २४
मैनाला मागु आलं पुन्याचं गवळी
माझ्या बाळीची शीण कवळी २५
नवरी बघुं आले आले दडत लपत
मुलगी नक्षत्र सोप्यांत २६

कोकनी सोयरा, माझ्या मनांत न्हवता
हातांत इळादोर, फिरे जाळीच्या भवता २७
कोकनी सोयरा, हुंडा दिल्यानं नगं वाई
नाचण्याची बुत्ती, तिथं सजुरी ठावी न्हाई २८
लाडकी लेक द्यावी, सातार प्रान्तीला
हत्ती लेकीच्या वरातीला २९
ज्याच्या घरीं गाडीघोडं, जिथं हाई कुनबीन
तिथं द्यायाची पद्मीन ३०
सैपाकाला सैपाकीन, पान्याला गुजराती
तिथं द्यायाची मैनावती ३१
गादीवर बसनार हिरव्या शालूंत तुरा खोवी
माझी मैना त्याला द्यावी ३२
लेकीचा जलम जसा अंतराळी दोडका
मैना सावळीयेला, सोयरा चालीचा हुडका ३३
ज्याच्या घरी गाडीघोडं, त्याच्या पडपानं जाऊं नका
बिजवराला देऊं नका ३४
लोकाचं लगन, माझं धुरानं भरलं डोळं
लेकाच्या लगनांत, अष्टी पातळ पायघोळ ३५
लोकाचं लगन, मी धर्माची वऱ्हाडीण
माझ्या ल्येकाच्या लगनाची सवती गाडी शिनगारीन ३६
लोकाचं लगन, जाते मी दळाया कांडाया
भाच्याच्या लगनांत जाईन कळस मांडाया ३७
लोकाचं लगन मी बघते येतांजातां
बाळाच्या लगनांत, दिस पुरेना देतांघेतां ३८
लोकाचं लगन मी दुरुन पाहाते मजा
बाळाच्या लगनाचा सवता लावीन बैंडबाजा ३९
मला हौस मोठी नवरी घेउन बोहलं बसुं
नवऱ्याबाळाची मोतीपवळ्यानी भरुं शेसु ४०

लगनाच्या दिसामंदी जीव माझा बावरा
माझा राघुबा कवां, हुईल नवरा ? ४१
सोनाराच्या साळं, काय वाजतं रुनझुन
घडवती नवरीला पैंजन। ४२
माडीचा जानवसा कोन मागते गवळण
नवऱ्याबाळाची मावळण ४३
नवऱ्यापरीस करवलीचा मोठा ठसा
माडी मागती जानवसा ४४
माडीचा जानवसा कोन मागती हाउशी
नवऱ्याबाळाची मावशी ४५
राघुचं लगीन, माहेरी धाडा मूळ
माझा बंधुजी बुडत्या आहेराचं कूळ ४६
लगीनचिठ्ठी लिव्हा माहेरच्या वऱ्हाडाला
अष्टीच्या पातळाला बंधु गेलाया कऱ्हाडाला ४७
लगनाची लगीनचिठ्ठी म्या ठेवीली भानुशी
सया पुशित्यात, हळदाई कोन्या दिशी ४८
नगरीच्या नारी, पदरानं पालवीती
माझ्या बाळरायाला हळदीला बोलावीती ४९
सातासंडी सयंपाक, हंडा शिजतो खिरीचा
व्यंकोबादेव माझा, येतो लगनाला गिरीचा ५०
वऱ्हाड उतरलं पानमळ्याच्या पिंपरीखाली
नवरा सोनेरी छत्रीखालीं ५१
थोराचा नवरा अबदागिरीनं झाकीयेला
पाय तोड्याचा देखियेला ५२
ननंदभावजया हाईत घरुघरीं
व्हाई तुमची बरुबरी ५३
ननंद भावजया काय बोलती कोनामंदी
इहीनी व्हायाचं गुज चाललं मनामंदी ५४

सांगुन धाडते, ननंद वहिनीला
माझ्या सुभंदाराच्या बहिनीला ५५
ननंद भावजया दोघी बोलती परसूंदारी
इहीनी इहीनी हुयाची मर्जी भारी ५६
ननंद आकाबाई, नका ननंदपना दावुं
सोन्याच्या करंड्याला मोत्याचं घस लावुं ५७
मावळ्याच्या घरीं भाच्याबाळाची उठाठेवु
मामी मंदील कुठं ठेऊं ५८
मावळ्याच्या घरीं भाच्याबाळाची सवती खोली
बंधुजींनीं कन्यादानाची बोली केली ! ५९
मामाच्या पंगतीला भाचा शिरपती
तांब्यानं तुप वाढी मामी दुरपती ६०
वडील बंधुराय मला म्हनती इहिनीबाई
भीड वाटते ! बोलु काई ? ६१
बंधु इवाही करूं गेले, दीर भाऊजी तुम्ही चला
पाठच्या भावंडाची भीड वाटते तुम्ही बोला ६२
बंधु इवाही करूं गेले, वया म्हनबे नको बाई
आजकालच्या भावजया मन राखायाच्या न्हाई ६३
वरण्याचा वेल जुंधळ्यावर गेला
बंधुची करते लेक, तिथं कळीचा पाया झाला ६४
बंधु इवाही करूं जातां भावजईचं काय जातं ?
जुना सोईरा, नवं नातं ६५
बंधुची करते लेक झालं ऊफराटं नातं
भावजय गुजरीच्या पायां पडाया कोन जातं ६६
बंधुची करते लेक, माझ्या जीवाचा घोलयेना
बंधु सोप्या बैसला, बोलयेना ६७
बंधुची करते लेक तिला काम सांगायाची चोरी
परघरींची राधा बरी ६८

वंधुची करते लेक तिला काम सांगायाची न्हाई
प्रानसख्याची माझ्या बाई ! ६९.
बंधु इवाही करू गेले, इहिनी येनाती माझ्या तोला
सोयऱ्या, गुंतले तुझ्या बोला ७०.
बंधु इवाही करूं गेले, नको भिऊंस करणीला
सोन्याचं कारलं घालूं तुझ्या हरणीला ७१
बंधु इवाही करूं गेले, न्हाई मागत थोडंथोडं
जिनसांसकट पांच घोडं नवऱ्याला कडीतोडं ७२.
बंधु इवाही करूं गेले तुला मागते थोडं काई
खोंडासकट पाच गाई ! ७३
वंधु इवाही करूं गेले, न्हाई मागत काळीदशी
गांवजेवन तुझ्यापाशी ७४:
बंधु इवाही करूं गेले, न्हाई मागत थोडंथोडं
तुझी वाघीण काढ पुढं ७५.
पांच दुरड्या रुखवत वर सोजीची पाखरं
बहिनभावंडं इवाही झालो, एका बयाची लेकरं ७६
पाच दुरड्या रुखवत संगं तुपाची केळी नेली
बहिन भावाचीं इहिन झाली ७७.
पाच दुरड्या रुखवत, वर जरीची फडकी
इहीन ननंद लाडकी ७८
पाच दुरड्या रुखवत, सहावी दुरडी बत्ताशाची
बंधुजीची माझ्या इहीन झाले मोकाशाची ७९
पाच दुरड्या रुखवत सहावी दुरडी गुलालाची
माझ्या बंधुजींची इहीन झाले दलालाची ८०
पाच दुरड्या रुखवत, गलींनं मिरवतो
बंधु बहिनीला न्याहरी नेतो ८१
पाच दुरड्या रुखवत, पुरेना वऱ्हाडाला
बंधुजीला बोलवा विऱ्हाडाला ८२

ननंद इहिनीबाई, रुसवा कशापायी ?
बसा चौरंगी धुते पायी ८३
चंदनाचा चवरंग चांदीचे देऊं ठसे
ननंद कामीन वर वसे ८४
इवाह्यापरायास इहीन मिळाली सुईची
जोपा बाळेच्या डोईची ८५
इवाह्यापरायास इहीन मिळाली नाटक
चैताच्या महिन्यामंदी, मागे शिंगीला बाटुक ८६
आहेराचा धनी, रिकामा नसंल
अष्टीचं पातळ, बंधुच्या घरीं असंल ८७
आहेराचा धनी, बंधु पांचामंदी बसे
अष्टीचं पातळ, शेल्याच्या पोटी दिसे ८८
आहेराचा धनी, रिकामा कसा आला
बंधु हांसत बोले वाडी मिरजेला गेला ८९
नको मला साडीचोळी, असां माझ्या मांडवांत
बंधु तुम्हांला मी इहीन दिसे शोभीवंत ९०
सोईऱ्याचा आहेर, रीकामी ऊरफोड
बंधुच्या आहेराची, ऊठ बहिणाई घडी मोड ९१
सम्रत सोईरा गंजीवरला गळाठा
चातुर बंधु माझा गाळीव मराठा ९२
सम्रत सोईरा भिंतीवरला चुना
चातुर बंधुजी, इमारतीचा रंग जुना ९३
सम्रत सोईरा, नटे कांद्याच्या पातीला
माझा बंधु गरीब रीतीला ९४
सम्रत सोईरा कांद्याच्या मोलाचा
ताईत बंधुजी शाहुराजाच्या तोलाचा ९५
सोईऱ्याच्या आहेरानं भरली बारा ताटं
बंधुचा आहेर मुगवी पैठणी जरी कांठ ९६

सोईऱ्याच्या आहेराची दिंड मोठीमोठी
बंधुजींची पैठणी घडी कागदाच्या पोटी ९७
सोईऱ्याचा आहेर म्यां ठेविला शिळेवर
बंधुच्या आहेराचं शिंग वाजे शिवेवर ९८
करणीच्या सोईऱ्याची करणी गाजली
चालत्या गाडीमंदी हंडापरात वाजली ९९
मांडवाच्या दारीं बुडता आहेर कुनी केला
बंधुजी सखा, चालीचा माझ्या आला १००
मांडवाच्या दारीं, कां ग इहिनी काळीमोरी
बंधुच्या आहेराचं, शिंग वाजतं शिवंवरी १०१
मांडवाच्या दारी, पाला पडला उंबराचा
माझ्या बंधुजीचा बुडता आहेर सुंदराचा १०२
मांडवाच्या दारी, पाला पडला गाजराचा
बंधुजीच्या माझ्या, आहेर हजाराचा १०३
मांडवाला केळी, बहुल्याला ऊंस
तान्हेबाई, तुझ्या मामाची हौस १०४
मांडव तुम्ही घाला, जाईजुईच्या फोकाचा
छंद नवऱ्याच्या बापाचा १०५
मांडव तुम्ही घाला, जोतं सोडुनी सवाहात
नवऱ्यावाळाचं लई गोत १०६
मांडवाच्या दारी कशाची रुसारुसी
वरमाय शेल्याला डोळे पुशी १०७
मांडवाच्या दारी हंडा शिजतो रंगाचा
इहीनीपरायास इवाही मिळाला ढंगाचा १०८
मांडवाच्या मेढी निखळ जाईच्या
छंद नवऱ्याच्या आईचा १०९
मांडवाला मेढी कुनी तोडल्या वडाईच्या
माझ्या बंधुजींनी केळी खंडल्या घडाईच्या ११०

मांडवाला मेढी, कुनी तोडल्या जांभळीच्या
केळी खंदल्या कंबळीच्या १११
मांडवाच्या दारी खांब केळीचं दुहेरी
नवऱ्याबाळावर सोनेरी अब्दागीरी ११२
मांडवाच्या दारी गुरव भाऊभाचे
बंधुजीची शिंगी बंगाळ्याखाली नाचे ११३
मांडव घातिला नारळ तोरनाचा
इवाही बंदर कोकनाचा ११४
मांडवाच्या दारी दुरडी सुकली पानाची
चुलती रुसली मानाची ११५
मांडयाच्या दारी घोडं नाचे थयथया
रुसला जावाई, उठंना पानी न्हाया ११६
थोराचा नवरा निघाला झाडींतून
मोत्यांच्या मंडोळ्या बंधु संभाळी गाडींतून ११७
कुरोलीचं घोडं नवऱ्याच्या बरुबरी
चंद्रज्योतीचा उजेड दोघाच्या तोंडावरी ११८
थोराचा नवरा वरघोड्यावर
मोत्याच्या मंडोळ्या, तान्ह्याच्या तोंडावर ११९
वाजंत्री वाजत्यात, शिंगाडी भाऊभाऊ
नेनंता बाळराय, घोड्यावर बाजीराऊ १२०
गांवाच्या शिवंवरी सोनारी शिंग वाजे
नवरी सांगाती पुत्र माझे १२१
नवरीचा बाप मागं कशाला न्हायला ?
ताशा दुहेरी लावला १२२
थोराचा नवरा वऱ्हाडणी कां ग थोड्या
चुलत्या लेकुरवाळ्या शिरवळाच्या गेल्या गाड्या १२३
थोराचा नवरा वऱ्हाडी कां ग थोडे
काळे मोठे घोडे, चुलत्याचे गेले पुढें १२४

नवऱ्यापरीस करवलीचा दीमाख
घोडे हिलाळे संमुख १२५
घाणा घातियेला खंडी आवळयाचा
गोत मांडवी मावळयाचा १२६
घाणा घातियेला खंडी सुपाऱ्याचा
नवऱ्याचा गोत मांडवी व्यापाऱ्याचा १२७
घाणा घातियेला खंडीये कणकी
मांडवी वरुमाय जानकी १२८
वाजंत्री वाजत्यात बहुल्याच्या पुढे
कानपिळ्याला साज चढे १२९
लाडक्या लेकीचं बहुलं गुलालाचं
माझ्या मैनाईचं पाय बुडालं पैंजणाचं १३०
लगनाच्या वेळे भटबामण गेला काशी
राजसाचा मामा मेंढग्या बहुल्यापाशी १३१
लगनाच्या वेळी नवरी कापती दंडामंदी
जिरंसाखर तोंडामंदी १३२
लगनाच्या वेळे भट म्हनितो काईबाई
झाली धर्माची वालूबाई १३३
मांडवाच्या दारी उडती फुलबाज्या
माळ घालियेते, मैनाबाई कुना राजा १३४
लगनाच्या वेळे, बामन म्हनं सावधान
राजसबाळ माझा, नवरी जिंकीतो मानानं १३५
लगनाच्या वेळे, नवरी कापती थरथरा
येतो तिचा मावळा, दम धरा १३६
मोत्याच्या मंडोळ्या आवर माझ्या रामा
शेस भरीतो तुझा मामा १३७
रुखंत आनलं निऱ्या वाटोळ्या मालत्या
कोन मानाच्या चुलत्या १३८

रुखंत आनलं लांब सुतळी सेवाया
सुगरिनी भावजया १३९
रुखंत आनलं गोड अनारसं बहु
वरमाय कोठें पाहुं ? १४०
सुनमुख पाहाया जावा निघाल्या न्हानथोर
संगं हौशा माझं दीर १४१
कडू पिकलं कारलं महादेवाला वाहिलं
सुनमुख मी पाहिलं १४२
रुसली वरमाई, रासबिदीला मेट मोडी
ताईत बंधुजी, इवाही हात जोडी १४३
लाडकी ग लेक चुलत्याचा फार लळा
दिला आंदन पानमळा १४४
बंधुची केली ल्येक, कशी अंगन लोट म्हनु
बंधुजीनं माझ्या दासी दिल्याती आंदणु १४५
मावळा इच्यारतो, भाचीबाई कुठं दिली
शेर सोन्याच्या वाक्या ल्याली १४६
पुतळ्याची माळ लोंबती पाठीपोटी
मैनाबाईच्या चंदरहाराला झाली दाटी १४७
बंधुची केली ल्येक, पडंना माझ्या पाया
केली बढाई गेली वाया १४८
काय सांगु इहिनीबाई सून माझी गेंदा
कशी सांगुं कामधंदा ? १४९
बाळाई माझी गोरी सावळा तिचा पती
जाई तुऱ्याला ढाळ देती १५०
सांगुन पाठवते, बाळे तुझ्या सासूला
माझ्या मैनाईच्या, जपा कुरळ केसाला १५१
जावाया इवाह्यांच्या बसल्याती धजा
सखे, हिरव्या शेल्याचा कंथ तुझा १५२

रुसला जावाई, पायरी चढंना जोत्याची
कंठी मागतो मोत्याची १५३

रुसला जावाई, देवपूजेला जाईना
सासरा त्याचा, शिंगी कबूल होईना १५४

रुसला जावाई चढंना पायरी
कंठी मागतो दुहेरी १५५

जावायाला द्यावी, तांब्याची घागर
माझी मैनाबाई, पाणी प्यायाची नागर १५६

जावायाला द्यावी सोन्याची साखळी
माझी बाळाबाई ल्येक ओतीव पुतळी १५७

जावायाची जात भोंदूचा इचार
मागे नखीचं धोतर १५८

आंब्रं आलं पाडा, चिंचबाईचा आकडा
लक्षाची दिली धन तरी जावाई वांकडा १५९

जावायाची जात जसं हुलग्याचं बेट
बोली त्याची उगराट १६०

सडा सारवन, चुलीपासून देव्हाऱ्याला
करनी येवढी केली लेकीपरायास जावयाला १६१

ल्येक मैना घोड्यावर, जावई राजस चाले पायी
दृष्ट व्हईल दोघाला, मी घरांत जाते बाई १६२

जावई राजस, लाल बागेतला पेरू
सावळी मैनाबाई त्याच्या मंदिलावरची जरू १६३

जावई राजस, मोठं-मर्जीचं जायफळ
ल्येक मैनाबाई माझी लवंग आगजाळ १६४

जावई राजसाची उसुशी तेलकट
माझ्या मैनाईचं केस दाट १६५

जावाया शेचाया इवाह्या गूळपोळी
इहीनीबाईला हिरवी चोळी १६६

जावायाला दिली पांच भांडी जेवायाला
लेक मैना समई उजेड लावायाला १६७
जावई राजसाची उसुशी कमळाची
मैनाबाईची माझ्या वेणी रुतली जावळाची १६८
आईबापांनी लेकी दिल्या, कणगी पाहून दाण्याच्या
बंधु बहीणी देतो विहीरी पाहून पाण्याच्या १६९
आईबापांनी लेक दिली, न्हाई पाहिली भाकरी
तिला इनाम काकरी १७०
आईबापांनी लेक दिली, न्हाई पाहिलं वतन
जोडा पाहिला रतन १७१
आईबापांनी दिली लेक देश सोडुनि कोकनात
लेक बयाच्या सपनांत १७२
बापानं दिली लेक, पाहिली आंबा उंबराची शेती
लोक बोलती, पिता चतुर होता किती? १७३
आईबापांनी लेक दिली, जागा पाहिला खातापिता
आशिर्वाद देती पानमळ्या येताजातां १७४
मायबापानं दिली लेक, न्हाई पाहिला जागाबिगा
जोडा पाहिला मनाजोगा १७५
आईबापांनी दिली लेक, न्हाई पाहिला वाडाहुडा
सोप्या पडला मोटनाडा १७६
नेनन्ता मुराळी दारामंदी उभा
बंधु बोलती उन व्हईल बिगी निघा १७७
बाळ सासुऱ्याशी जाते, कां रं मुरळ्या तुझी घाई
साज बाळीचा झाला न्हाई १७८
सासरी जाते ल्येक कशाला गाडीघोडं?
चंद्रभागंला पानी थोडं! १७९
कन्या निघाली सासुऱ्या, आई बघे परसांतून
हरिणी निघाली कळपांतून! १८०

सासुरी जाते साळू रडते फुंदुफुंदुं
मागं घसाचे तोळबंदु १८१
सासुऱ्याला जाते लेक, घोडं बांधीलं निंबोणीला
ऊन लागतं चांद्‌णीला १८२
सासुऱ्याला जाते लेक हुंबऱ्या देते भेट
जोड मुराळी देते ऊठ १८३
सासुऱ्याला जाते म्होरं बंधुजी मागं दिरू
मधी मैनाई, धन्याची कोथमिरू १८४
सासुऱ्याला जाते मागं बंधुजी म्होरं पती
मधी मैनाई बिजलीची बत्ती १८५
साळु जाते सासुऱ्या, पिता म्हने जा ग बाई
जलम दिल्याली बयाबाई, जशी हंबरते गाई १८६
साळु जाते सासुऱ्या, रडती धाईधाई
बंधु बोलतो, गेल्यावाचून निर्वाह नाहीं ! १८७
सासुऱ्या जाते मैना, ओटीला पिवळा पेरू
संगं चुलता तालेवारू १८८
सासरी जाते लेक, संगं मुराळी छंदखोरू
बाळाईच्या ओटीला हिरवा पेरू १८९
साळू जाते सासुऱ्या रडते फुंदुंफुंदुं
दुही बाजूला दोन बंधु १९०
सासुरी जाते लेक डोळ्या लागतं जंजाळ
बंधु मातेला संभाळ १९१
सासुरी जाते लेक माघारी बघंना
संगं जडिताचा दागिना १९२
बाळ जाते सासुऱ्या माझ्या जीवाचा आटापिटा
शिंपी सोप्याला टाकी टीपा १९३
बाळ जाते सासरी, कुनाची तालेवार
हाती सोन्याचं बिलवर १९४

सासरी जाते लेक बापाच्या आवडीची
तिला घालवाया सभा उठली चावडीची १९५
सासुऱ्या जाते मैना, बुत्ती सजली सजुऱ्याची
सया बोलती, लेक न्हवं नाचाऱ्याची १९६
बाळ निघाली सासुऱ्यां, करते सजुरी साकरेची
कन्या हाय सावकाराची १९७
सासुऱ्या जाते लेक, कुनाची अनुसया
संगं परटीन धुनं धुया १९८
सासरी जाते मैना, बुचडा गेंदावानी
संगं मुराळी चांदावानी १९९
सासुऱ्या जाते मैना, संगं भावजई पाय धुया
बंधु शेल्याला गांठी द्याया २००
मैना निघाली सासुऱ्या, तिचं जेवण अट्टीचं
तूप निघंना वाटीचं २०१
बाळ निघाली सासुऱ्या, नदीच्या नैवाऱ्यानं
शालु भिजला दहींवरानं ! २०२
बापाची लाडकी, चुलत्याच्या कानीं लागे
ठाणाची शिंगी मागे २०३
बाळी निघाली सासरी येशींत झाली दाटी
हौशा बंधुजी पानं वाटी २०४
बाळी निघाली सासुऱ्या, उजवी घालीते वारुळाला
हाक मारीते मुराळ्याला २०५
सासरी जाते लेक रडूं लागे माळावर
लिंबू फुटे गालावर २०६
सासरी जाते साळू घोडं लागे वाळवंटी
सोड गळ्याची आतां मिठी २०७
साळू निघाली सासुऱ्या वेशीपत्तुर आयाबाया
गावाभाईर बंधुराया २०८

सासरी जाते लेक बंधु झाडाआड झाला
नेत्राला लावी शेला २०९
सासुरी जाते मैना, बंधु बैसला वाटेवरी
आल्यागेल्या इच्यारीतो, बहीणा गेली कुठवरी २१०
बाळ निघाली सासुऱ्या बंधु झाला वेशीआड
डोळं झाल्याती गुंजेघड २११
नदीपलीकडे ल्येक देऊनी झाल्ये वेडी
आंबेदादाला हात जोडी २१२
धाकुटा मुराळी वाटेला रुसला
शिंगी सोडून बसला २१३
धाकूटा मुराळी नको मला धाडूं कधी
गावाला आडवी नदी २१४
लेक सासुऱ्याला जाते आडवा डोंगर कंगोऱ्याचा
संगं मुराळी धागऱ्याचा २१५
नेनंता मुराळी नका देऊं बयाबाई
चढउतार ओढ्याचा मला ठावा ऱ्हाई २१६
नेनन्ता मुराळी नेतेस संभाळ
माझ्या केळीचं कंबळ २१७
नेनंत्या मुराळ्याला सांगते घराची खाणाखूण
पुढें सुरूची झाडं दोन, परसूदारी केळीबन २१८
नेनन्त्या मुराळ्याची नको करूस हाळयेट
कंथाच्या शेजारी मांड पाट २१९
दिस मावळला दिसा सोडीलं कासरं
माझ्या बाळाबाईचं गावांमंदी सासर २२०
नेनंत्या मुराळ्याला खूण सांगते लिंबाची
सोप्या चौकट भिंगाची २२१
नेनंत्या मुराळ्याला खूण सांगते पांदीची
दारा चौकट चांदीची २२२

—*—

# सासर

मुलीच्या आयुष्याचीं पहिलीं दहाबारा वर्षे वगळलीं तर उरलेलें सर्वच आयुष्य सासरघरीं जातें. खेड्यापाड्यांतून कर्ते मुलगे नोकरीनिमित्त शहर-गांवीं रहायला जाण्याचें प्रमाण कमीच. कारण मुलगा लहानपणापासूनच शेतांत राबूं लागतो व निरक्षरतेमुळें पुढेंहि त्याचा जीवनव्यवसाय शेती हाच ठरून जातो. अर्थात् एकत्र कुटुंबपद्धति अजूनहि खेडोपाडीं मोठ्या प्रमाणांत दिसून येते. म्हणून एक शेतकरी कुटुंब म्हटलें, कीं सासूसासरा, दीरजावा, नणंदा असा परिवार असतो. हेंच मुलीचें लग्नानंतरचें जग. यांत एकदां पाऊल ठेवलें, कीं ही छोटीशी नवरी त्यांत पूर्णपणें मिसळून जाते. तिच्या सुखदुःखाच्या सीमा या घरापुरत्याच मर्यादित ठरतात. येथल्या बंदिस्त जीवनाचे अनुभव घेत ही नववधू मोठी होते व अनेक वर्षें अशीं जातांजातां एक दिवस तीहि वरमाय होते. घरांत परत एक छोटी सून येते. तिच्याहि जीवनाचें एक नवें पान उघडलें जातें, व त्यावर अनेक कडूगोड अनुभवांचीं अक्षरें लिहिलीं जातात; अशी परंपरा नित्य चालू रहाते.

या सासरघराबद्दल अनेक गीतें आहेत. सर्व प्रकारचीं आहेत तीं. कोणाला आयुष्यांत दुःखविषाचेच घोट घ्यावे लागतात, तर कोणाला संगतीला मायाळू माणसें मिळून जीवन सुखकर होतें. दोन्ही प्रकारच्या भावना या गीतांतून आढळतात. दुःखानें हृदय पिळवटून बाहेर पडणारे उद्गार जसे आढळतात तसे सुखी जीवनाचे धन्योद्गारहि प्रकट झाले आहेत. हे अनुभव विविध आहेत. कोठें सासरच्या श्रीमंतीचें वर्णन तर कोठें शत-दारिद्र्याची छाया; कुठें बाळांच्या बाल्लीलांचें कौतुक तर कोठें पुत्र पोटीं नाहीं म्हणून निराश उसासे; कोठें प्रेमळ पति तर कोठें तो बाहेरख्याली असलेला असें अनेक प्रकारचें जीवनचित्र या ओव्यांतून प्रकट झालेलें दिसून येतें.

माहेरीं जसे आईबाप हे प्रमुख मानकरी ठरतात, तसे सासरीं सासू-सासरा प्रमुख नसतात. कारण स्पष्ट आहेच. सारी सुखदुःखाची दुनिया

ज्या संवगड्याबरोबर पाहायची तो पति हाच सासरचा प्रमुख मानकरी ठरतो. पतीचीं गीतें पुष्कळच आहेत.

दीर, नणंदा, जावा इत्यादि सासरच्या इतर घटकांबद्दलहि गीतें आहेत परंतु त्यांचें प्रमाण अत्यंत कमी आहे. पति हाच या परक्या मंडळींना जोडणारा प्रमुख दुवा असतो. त्यामुळें यांना दुय्यम स्थान असतें.

सासूसासऱ्यांबद्दल नव्या सुनेला किती आदर वाटत असतो! प्रेमळ सासू जर भाग्यानें मिळाली तर या मुलीला सुख लागतें. तिला माहेरीं वरचेवर जायला मिळतें, कामाधामाची जोखीम एकदम पडत नाहीं, सासूबाईच्या हाताखालीं कामाचें योग्य वळण लागतें, म्हणून पुढील आदराचे उद्गार सून काढीत आहे—

सासू नि सासरा दोन सोनियाच्या तारा
त्यांच्या साउलीला मला लागेना ऊनवारा

हळुहळू ही येवढीशी पोर जाणती होते. पतीची ओळख होऊन प्रीतीचीं पावलें जीवनपथावर उमटतात. मनांत कृतज्ञ विचार येतो, कीं पतीसारखी देणगी ज्या सासूनें दिली तिची योग्यता केवढी मोठी?—

आईच्यापरायास सासुबाईचा उपकार
दिलाया मला पीरतीचा चंद्रहार

वैभवाचीं वर्णनेंहि आपुलकीनें केलेलीं सांपडतात—

दानधर्म केला, माझ्या सासुसासऱ्यांनीं
गोठा भरला वासरांनीं

अशा तऱ्हेचें सासर असेल तर सून मनांतून खूष असते. लहान दीर, नणंदा यांनाहि ती प्रेमळ ओव्या गाते—

धाकला माझा दीर वैनी म्हनाया लाजतो
बंधु पाठीचा साजतो
सर्व्या गोतामंदी नंदाबाईची आवड
कंथापाठची शालजोड

अशा प्रेमळ माणसांच्या सहवासांत ही सासुरवाशी मुलगी सुखी होते.

पण एकंदरीनें अशीं एकमतानें नांदणारीं कुटुंबें कमीच. बहुतेक घरीं सासू सून, भाऊ भाऊ, नणंद भावजय, जावा जावा अशीं द्वंद्वें हजारदां नजरेस पडतात व त्यांत दुहीची धुसफूस चाललेली दिसते. एकत्र कुटुंबांत ह्याहि गोष्टी पुष्कळदां असतात व शेतकऱ्यांनाहि त्याचे अनुभव येतच असतात.

परंतु हे सारे प्रकार फिके पडावे असा एक भयंकर त्रास आहे. तो म्हणजे सासुरवास! सासुरवास करणाऱ्या कठोर सास्वांची परंपरा कैकयीपासून चालत आली आहे ती अजूनहि खेड्यांत जीव धरून आहेच. पांढरपेशांत शिक्षणाचें मान वाढत गेलें तसतसें सासुरवासाचें प्रमाण कमी होत गेलेलें दिसतें; पण येथें मात्र अजूनहि अनेक घरांतून सासूचा सासुरवास चाललेला दिसतो. अशा ठिकाणीं सुनेचें मन फुटूनतुटून गेलेलें असतें. सासू छळते, नणंदा चुगल्या करतात, सासरकर उणेंदुणें बोलत असतात, फार काय पतिहि नावड करतो आहे! बरें, कुठें हा काच सांगूं म्हटलें तर आईवडिलांना कमीपणा येतो. अशा स्थितींत जीव कळवळून या दुःखी मुलीच्या तोंडून करुण ओव्या प्रकट होतात--

> सासुरवास येवढा नका करूं सासुबाई
> चांदी आलीया सोन्यापायीं!

माहेरीं जावें, मुलीची सुकलेली काया पाहून आई कळवळून विचारते—

> सासुरवासामंदी, गेली कांकनं कोपराला
> बया इच्यारते, काय जाचलं लेकराला?

आणि मुलगी मन मोकळें करतें. जिवाचीं हितगुजं आईला नाहींतर कोणाला सांगायचीं? भाऊ हें सर्व खिडकींतून ऐकतो व ती दुःखकहाणी ऐकून त्यालाहि वाईट वाटूं लागतें—

> बहिणीचा सासुरवास बंधु ऐकतो सान्यावाटं
> गंगा लोटती डोळ्यावाटं!

शेवटीं आई सांगते, कीं कुळवंताच्या मुलीनं सासरचा बोभाटा करूं नये. हे हाल तुला मुकाट्यानं सोसून राहिलें पाहिजे नाहींतर आईबापाला बोल येतो—

> सासूचा सासुरवास जिऱ्यामिरीयाचा घास
> तान्हे अशीलाची सोस!

अशीं हीं सासुरवासाचींहि गीतें बरींच दिसतात. सासरच्या दीरजावादिकांचीं कौतुकाचीं वर्णनें आहेत, तितक्याच दुष्टतेच्या कथाहि या ओव्यांतून कानीं येतात.

तथापि समाजाबरोबर शेतकऱ्यांचेंहि दैनंदिन जीवन हळुहळू पलट घेत आहे व उत्तरोत्तर पूर्वीप्रमाणें जाचकाच करणाऱ्या सास्वांचें प्रमाण कमी होत जाईल अशी आशा करण्यास पुष्कळच जागा आहे. शिवाय घर-धन्यासारखा चंद्र मिळाल्यामुळें या सर्व अंधारलेल्या परिस्थितींत या तरुणींना केवढा धीर येतो याबद्दलचे उद्गार पहा—

सासुरवासनीला, तिला इसावा कुनाचा ?
कंथ देवाच्या गुनाचा।

जेथें असा समंजस पति लाभतो तेथें सासुरवासाचे कष्टहि गृहिणी हसत सोसून एक दिवस भाग्यास चढते.

—*—

# सासू-सासरे

सासुरवास मला दिलाया गोविंदानं
जाते सासरीं आनंदानं १
सासुसासऱ्याचा आशिरवाद घ्यावा सुने
पोटी फळाला काय उणें ? २
सासू नि सासरा, सोन्याची पाखर
त्येच्या हाताखालीं आम्ही लोकांची ल्येकरं ३
सासू ग सासरा, दैवाच्या ल्येकी तुला
नित्य जायाचं माहेराला ४
दानधर्म केला माझ्या गं सासऱ्यानं
गोठा भरला वासरानं ५
आईपरायास सासुबाईचा उपकार
सासुमालनीनं दिला पीरतीचा चंद्रहार ६
सासुरवास मला कसला ठावा न्हाई
सासु न्हवं, त्या माझ्या बयाबाई ७
सासू नि सासरा दोन तुळशींचीं आळं
त्येंच्या साऊलीला भरतार राजसबाळ ८
सासुसासऱ्यानं कीर्त केल्याती एकदोन
माडी बांधलीया चौदा खन ९
मायबाप काशी सासूसासरा तुळशीबेट
त्येंच्या दरसनानं, तिर्थं घडलीं तीनशेंसाठ १०
काळी कपिला गाय भिंगारी तिचा पाडा
माझ्या मामंजींनी बांधला राजवाडा ११
सासू नि सासरा, माझे देव्हाऱ्याचे देवु
आम्ही जोडीनं फुलं वाहूं १२

सासू नि सासरा, दोन सोनियाच्या तारा
त्यांच्या साऊलीला मला लागेना ऊनवारा १३
बहिणीचा सासुरवास बंधु ऐकतो सान्यावाटं
गंगा लोटती डोळ्यावाटे १४
बहिणीचा सासुरवास कडू कारल्याचे येल
आपुल्या बहिणीसाठीं, बंधु रवंदळी चाल १५
बंधुजी बोलती, बहिणा सासुरवास कसा
चित्तांगाचा फासा, उकलून दावूं कसा १६
बाप्पाजी पुसती, लेकी सासुरवास कसा
मिरीयांचा घास तिखट म्हणू जसा १७
सासुरवासणीला नका बोलूं छिडीछिडी
माऊलीची याद तिला होतीया घडूघडी १८
सासूचा सासुरवास, जसा लोखंडाचा घाना
सोसल्यानं येतुया देवपना १९
सासूचा सासुरवास, करूं नये त्यांनीं केला
चुडियाचा रंग गेला २०
सासुरवास एवढा नका करूं सासूबाई
हारगुंफनी करूं काई ? वास घ्येनारं राजी न्हाई ! २१
सासुरवासनीला बोलतो सारा वाडा
हाय कैवारी तिचा चुडा २२
सासुरवासनीला बोलती सारीसारी
कंथ हौशा साल सारी २३
सासुरवासनीला इसावा कुनाचा
कंथ देवाच्या गुनाचा २४
सासूचा सासुरवास जिऱ्यांमिरीयाचा घास
तान्हे अशीलाची सोस २५
सासुरवासामंदी गेली कांकनं कोपराला
बया इच्यारते, काय जाचलं लेकराला ? २६

सासुरवास येवढा नका करू सासूबाई
इतका अन्याव झाला काई २७
सासुरवास येवढा नका करू सासूबाई
चांदी आलीया सोन्यापायी २८
सासुरवासनी, बस माझ्या तूं वसरी
तुझ्या शिणंची, माझी सई सासरी २९
सासूचा सासुरवास, त्यांची निष्ठुर बोलनी
सोसावी माझे गंभीर मालनी ! ३०
सोईन्याचे बोल जसे मुरुमाचे खडे
बंधुजीचे बहिणीसाठीं येणें घडे ३१
सासरच्या गोष्टी माह्यारीं सांगू नये
वडील बाप्पाजीचा जीव कातरी घालूं नये ३२
सासरच्या गोष्टी, मी हृदय केली पेटी
आईबापाच्या नावासाठीं ३३
सासुरवासनीला बोलतं सारं घर
हाई कैवारी तिचा दीर ३४

## सासरचे इतर आप्तेष्ट:—

समूरच्या सोप्या जान पासोडी कुनाची
सासू निजली सुनाची ३५
अंतरीचं गुज सांगते माझी लाडी
लेक न्हवं, ती माझी ध्वाडी ३६
धाकला माझा दीर, सासूबाईचं शेंडेफळ
चुडीयाचं पाठबळ ३७
कुंकवाचा करंडा मेनाला दूसरा
दीरभाउजीचा चुडीयाला आसरा ३८
आउक्ष चिन्तीते चुड्यामागे गजऱ्याला
दीर राजस वजिराला ३९

नंद पाव्हनी, नका म्हनूंसा कुठली
चुड्यामागली पाटली ४०
आउक्ष चिन्तीते, चुड्यामागे पाटलीला
ननंद धाकलीला ४१
धाकल्या दीराची मर्जी राखूं कुठवरी
उभा पान्याच्या वाटेवरी ४२
धाकला माझा दीर वैनी म्हनाया लाजतो
वंधु पाठचा साजतो ४३
धाकला माझा दीर, म्हणतो वैनी अक्का
दीर राजसाची बोली ऐका ४४
धाकला माझा दीर गोरा छल्लाटा नाकयेला
किती धाक मी लावूं त्येला ४५
थोरलं माझे घर चौकट मोराची
करनी धाकल्या दीराची ४६
थोरलं माझं घर म्होरं लोटितां मागं केर
दोघंतिघं दीर, पानं खात्यात न्हानथोर ४७
चवघी आम्ही जावा, पाचवी माझी सासू
दीर मोतियाचे घसू ४८
पारावरी सभा बैसली न्हानथोर
उंच मंदीलाचा माझा दीर ४९
ननंद पाव्हनी, सया पुसे कोन शेजारीन ?
माझ्या चुडियाची कैवारीन ५०
सासूपरायास उंच पायरी ननंदेची
कीर्त राखील, राधा अशीलाची ५१
दीर हौशाची पंगत, ननंद कामीन मधी बसे
चुडियाला शोभा दिसे ५२
जिरेसाळ तांदुळ आधंनी झाली फुलं
चुडियाच्या पंगतीला, ननंद कामिनीचं मुलं ५३

मक्याची कणसं हाईती किती जून
ननंदबाईंचे द्वाड गुन ५४
धाकली माझी जाऊ हातातलं कांकन
दीर हौशा रतन ५५
सर्व्या घरामंदी दीर भाऊजी चतुर
नांगर जुपायाला दिला सकाळचा मोतुर ५६
पाया पडू आली चोळी अंगांत खुतन्याची
रानी माझ्या पुतन्याची ५७
लुगडं घेतलं, पदरावरी जाई
सयांनु किती सांगू ? सावकाराची मी भावजई ५८
लुगडं घेतलं, पदर मोतीचूर
रत्नपारखी माझं दीर ५९
थोरला माझा दीर, दीर न्हवं देवराया
वागविल्या त्येनं बहिनीवानी भावजया ६०
काळी चंद्रकळा पदरावरी मोर
हौशी घेणारं माझे दीर ६१
काळी चंद्रकळा कट्यारी काठ वजा
दूकानी दीर माझा ६२
उंचशा ओसरीला जावाजावाचं पाळणे
हौशा घरधनी बांधीतो खेळणे ६३
सर्व्या गोतामंदी नन्दाबाईंची आवड
कंथापाठची शालजोड ६४
भावाभावाचं भांडन जावाजावा हायती बऱ्या
चौसुपी वाडा नका लावूं त्याला दोऱ्या ६५
भावाभावाचं भांडन जावाजावांचं एकमत
तान्ह्या बाळीसाठी नका घालूं आडभिंत ६६

—*—

# घरधनी

घरधन्यांबद्दल पुष्कळ प्रकारचीं सुंदर गीतें आहेत. मात्र स्त्रीसुलभ लज्जा व पतीबद्दलचा अतीव आदर यामुळें तीं उघडउघड कोणी गात नाहीं एवढेंच. सासुरवासिनीला मर्यादेचीं बंधनें तर फारच! ती हीं कोमल गीतें मोठ्यानें कशी म्हणेल? तथापि तरुणपणीं प्रीतीची वेल मनांत अंकुरल्यावांचून राहत नाहीं, हेंहि खरेंच! एकान्तांत बसून प्रिय पतीबद्दलचीं मधुर गीतें तरुण पत्नी गुणगुणते व भावसुंदर ओव्या हसऱ्या ओठावर नाचूं लागतात.

पति हाच देव ही समजूत हिंदु स्त्रीच्या मनावर कितीतरी दिवसांपासून ठसलेली आहे. येथेंहि त्याच्या साक्षी मिळतात. घरधन्यांबद्दल आपोआपच मृदुभावनांनीं कारभारणीच्या चित्तवृत्ती बहरास आलेल्या दिसतात. पतीचं कर्तृत्व, स्वभाव, वागणूक, त्याचा दर्जा, त्याचा उद्योगधंदा वगैरे सर्व गोष्टींबद्दल सुंदर वर्णनें आढळतात. पतीच लाडके हट्ट पुरवणार, हौसामौजा पुरवणार, तेव्हां पत्नी कसे लाडकें मागणें मागत आहे पहा—

उंची उंची चोळ्या जावा घालिती शेजाराला
घरधनी किती सांगु? चला बाजाराला

एका तरुण पत्नीचा पतीजवळ दागिन्यांसाठीं हट्ट चालला आहे—

हौस मला मोठी, कंगन्या, पाटल्या आटाच्या
हौशा, येळा घडवा साठाच्या

आटीव सोन्याच्या पाटल्या व साठ रुपयांच्या वेळावाकी इतक्या दागिन्यांची ही मोठी मागणी कर्तबगार तरुणावांचून कोण पुरी करील? पुष्कळदां सोन्याचा भाव उतरतो, कधीं सराफकट्ट्यावर रुप्याचे दागिनेहि मोडींत दिलेले नजरेस पडतात. त्यावर लक्ष ठेवून ही दक्ष पत्नी पतीला विनवून म्हणते—

सोनं झालं सस्त, रुपै आलं मोडी
राणी कंथाला हात जोडी

कोणीहि झालें तरी पत्नीची हौस पुरवण्याच्या योजनेंत असणारच. शेतकरी संपन्न असेल तर सर्व दागदागिने करतो. पत्नीला त्याचें केवढें कौतुक वाटेंत. ती त्याचें वर्णन मैत्रिणीजवळ करूं लागते—

भरतार भोळा सोनं झोकीयेतो तोळा
माझा चितांगाजोगा गळा

पुढील मजेदार ओवी पहा. बायकोचा अबोला पाहून रुष्टपणें पति प्रश्न करतो—

भरतार पुशियात, कां ग अस्तुरी अबोल्यानं ।
तुझ्या डोरल्याचं सोनं न्हाई जोखिलं ताजव्यानं ॥

मी जर दागिने करतांना सोनं मोजूनमापून घेत नाहीं तर तुझें बोलणें इतकें मोजकें कां ? हा प्रश्न रोखठोक आणि गमतीचा आहे.

परंतु कांहीं वेळां कुणबी गरीबहि असतो. बायकोची सारीच हौस त्याला एकदम पुरी करतां येत नाहीं. पण त्याला स्वतःच्या कर्तृत्वाची खात्री आहे. हळुहळू आपण सारें करूं असा त्याला भरंवसा आहे. तो रुष्ट पत्नीची समजूत काढतो—

भरतार बोले दमानं घे ग नारी
लेन्यालुगड्याची हौस पुरवीन सारी

कपड्याचीहि तीच तऱ्हा. काळ्या चंद्रकळेची पत्नीला इच्छा होते. पण गरिबी म्हणून ती कांहीं बोलत नाहीं. पण पतीच्या तें लक्षांत येतें. हाताला सवड होतांच आपण होऊन तो ही हौस पुरवतो—

काळी चंद्रकळा माझ्या मनांत घ्यावी होती
हौशा भरतारानं आणिली अंगमती

ही हौस फक्त लेण्यांलुगड्यापुरतीच मर्यादित नसते. आपल्या घरधन्यांनीं मोठें घर बांधावें, मोठी शेती करावी, गुरांवासरांनीं गोठे भरून टाकावे अशी मनोमन इच्छा पत्नी करते. नशिबानें या इच्छेला मूर्तस्वरूप येऊन घर बांधायला सुरुवात झाली, तर हौसेनें पत्नी सूचना देते, त्या मोठ्या मार्मिक दिसतात—

माझ्या मनीची हौस, तुमच्या मनाची कल्पना
धनी ! बांधा दरवाजावर जिना

हें मोठें घर तयार झाल्यावर कसें दिसत होतें बरें ?

थोरलं माझं घर आठ खिडक्या नऊ दारं
हौशा घरधनी, सोप्या बैसले तालेवार

कोठें शिल्लक थोडी, घरहि आपलें छोटसेंच बांधलेलें असतें. तेथें घरमालकीण लाडानें सांगते—

धाकुटं माझं घर, हंड्याभांड्याचा पसारा
धनी ! वाडा बांधावा दुसरा ।

किसानांच्या झोपड्या आपल्या नित्य दृष्टीस पडतात. परंतु त्यांच्या मालकीचीं हीं छोटींमोठीं घरें पतिपत्नीच्या प्रेमानें किती मोहक बनतात,याचीच कल्पना जणुं या गोड ओव्या देत आहेत. या घरधन्याला निरनिराळ्या व्यवसायांत पडावें लागतें. कधीं तो गोपाल बनतो व गुरें चारणीला नेतो. कधीं गवळी बनून गाईम्हशींच्या धारा काढतो. कधीं मोटेवर गाणीं गातो, कधीं शेतांत गोफण मारीत राखण करतो. कधीं खऱ्या शेतकऱ्याप्रमाणें एकीकडे घामाच्या धारा निथळत असतां नांगर चालवण्याचें काम करतो, निंदणी, पेरणी, मळणी करीत असतो. कधीं मळेकरी होऊन भाज्या व फळें टोपल्या भरून घेऊन येतो.

असें हें विविधरूप पाहून पत्नीला मोठें कौतुक वाटतें. शेतकऱ्याचें ऐश्वर्य हेंच ! पीकपाणी, गुरेंढोरें, शेतंमळे, यांतच आनंदाचें निधान त्यांना सांपडतें ! हें सर्व ऐश्वर्य मिळविणाऱ्या पतीबद्दल ठिकठिकाणीं अभिमानपूर्ण उद्गार येणें स्वाभाविक आहे. साक्षात् ऐश्वर्यलक्ष्मी पतीच्या पाठीस लागून येते अशी गोड अन् प्रेमळ कल्पना केलेली दिसते—

लक्षुमी आली घरा, आली बैलाच्या मागून
धनी ! तुमच्या पालवी लागून ।

लक्ष्मी येण्यासंबंधींच्या या अशा सूचक ओव्या पुष्कळ आहेत व त्यांतून पतीसंबंधाच्या मृदु भावनांचा आविष्कार झालेला आढळतो.

दैनंदिन जीवनांतले उल्लेखहि बरेचदां येतात. गृहिणींना फारसें कोठें बाहेर जातां येत नाहीं, तेथें घरांतील सहजीवन हेंच महत्त्वाचें नाहीं काय ? घडीघटकेला कामें करतांकरतां घरधन्यासाठीं आपण राबत आहों,

ही जाणीव पत्नीच्या हृदयांत नांदतांना दिसून येते. उदा० घर स्वच्छ सारवलें. शेजारीण नवलानें त्याबद्दल चौकशी करूं लागते. पत्नी लाजत हंसत उत्तर देते.

सडा सारवन, शेजी पुसे कोन दिस ?
माझ्या शिरीमंताची एकादस

ही प्रेमळ पत्नी जरा दृष्टीआड झालेली या घरधन्याला चालत नाहीं—तो चौकशी करूं लागतो—

घरधनी इच्यारती, कुठं गेलीया घरवाली
ऐका माझ्या शाहीराची बोली

अशा या प्रेमळ दंपतींत एक तान्हुलें येतें. मग काय विचारतां ? पती रागावला कीं पत्नी बाळाचें नांव सांगते—

रुसला घरधनी, काम पुशितो येळाचं
नांव सांगतें मी बाळाचं

तरी पण एकंदरींत घरधनी मोठा तापट मनुष्य आहे. एवढंसें कांहीं चुकलें तरी तो संतापतो. अशा वेळेला गृहिणीला माहेरकरांची शिकवण काय आहे पहा—

भरताराचा राग डाव्या डोळयाच्या तराटणीं
माझ्या बहिणाअी, नगं बोलूंस मराठणी

अन् एकादी तरुण मैत्रीण अनुभवाची एक गोड शिकवण देते—

रुसला भरतार समजावूं कसा ?
सई घालावा प्रीतफांसा !

परंतु सारेच लोक या प्रीतिपाशांत सांपडून राग विसरणारे नसतात. एका तापट, उग्र डोळयाच्या पतीची पत्नी त्याला अगदीं भिऊन जात असते—

मोठंमोठं डोळं फिरवी गरगरां
रानी कापती थरथरां

बापडी ही पत्नी पति खुषींत असल्या वेळीं हळूच विचारते कीं तुमचे डोळे मोठे आहेत, छान आहेत—पण मला भीति वाटते त्यांची ! त्याला काय करूं !

**मोठमोठं डोळं, तुमच्या डोळ्यांची मला भीती**
**खाली बघुन चालू किती ?**

अशा प्रकारें पतीबद्दल सुंदर गीतें आहेत. पतीला आदरानें सुभेदार, शिलेदार असें म्हटलें आहे; सावकार, सरकार, तालेवार, सरदार, अशा अनेक बहुमानदर्शक विशेषणांनीं पतीचा गौरव ठिकठिकाणीं केलेला दिसतो. कांहीं कांहीं मराठा शेतकरी आपल्या हुशारीनें, कर्तृत्वानें मोठी नोकरीहि मिळवतात. हा जवान जोखमीचीं कामेंहि अंगावर घेऊन पार पाडीत असतो. अशा वेळीं पत्नीचें मन अभिमानानें ओसंडून जात असतें. ओठांवर गौरवपूर्ण शब्द स्वेच्छेनें नाचूं लागतात—

**सरकारादरबारांत माझा मऱ्हाठा मानाचा**
**इडा पिकल्या पानाचा ।**

विड्याची उपमा कशी तजेलेदार वाटते येथें ! कुणाच्या घरीं तर नौकरचाकरहि असतात व कचेरींत जातांना हे नौकर बरोबर चालत असतात. हें ऐश्वर्य पत्नी वर्णन करीत आहे—

**दिवाणाला जातां मागेपुढं माणूस**
**मधी घरधनी मोत्यांचं कणीस**

पतीला उपमा किती वेचक व आदरयुक्त वापरल्या आहेत ! पतीच्या राज्याची सर जगांतल्या कोठल्याहि वैभवाला नाहीं, हेंच जणूं पत्नीला मनांतून पुरें समजलेलें आहे, अशा आशयाच्याहि ओव्या रचल्या गेल्या आहेत. सोईरेधाईरे पुष्कळ असले तरी ते संपन्नकाळाला साथ देणार. सुगीला पांखरें जमा व्हावीं, तसाच प्रकार. परंतु पतीचें सहजीवन हेंच पत्नीचें खरें ऐश्वर्य आहे.

**सोईरे धाईरे–सारे संपत्तिचे लोक**
**आपुल्या भरताराचं निर्वाणीचं राज्य एक**

शेतकरी जीवनांत नेहमीं उपमा सुचणार त्याहि शेतामळ्यांच्या नि बागांच्याच ! संसारांत पतीची सुखसाऊली असते हें सांगतांना पुढील सहजसुंदर उपमा दिलेली दिसेल—

**उन्हाळा पावसाळा, पानमळ्याला गारवा**
**हौशाच्या जीवावरी न्हाई कुनाची परवा**

पत्नीनें प्रीतीनें आपल्या जीवनाला फुलबाग म्हणतांना प्रिय पतीला किती समर्पक उपमा योजिली आहे—

**भरतार शिरावर, म्हाई कशाची दगदग**
**पान्याच्या जोरावर लहरी मारीतो फुलबाग ॥**

पतीच्या 'जीवना'वर हा सुखाचा बाग बहरलेला आहे हेंहि पत्नी किती अभिमानानें सांगते आहे!

परंतु आयुष्यांत सुखाचाच मळा भरारेल असें नाहीं. दुःखाचे कांटेरी वेलहि कोठेंकोठें रुजलेले असतात. वेळेवारी पाऊस न पडल्यानें पिकें वाळून पाचोळा होतो. प्रेमळ पत्नीला बाहेरख्याली पतीचें वर्तन रडवीत असतें, तिच्या मृदु भावना कोळपून गेलेल्या असतात, त्याचेंहि करुण वर्णन आढळतें. पानावर बसलें, तरी जेवण्याकडेसुद्धां पतीचें लक्ष असत नाहीं. त्याला कसली एवढी घाई असते? पत्नी म्हणते—

**पाची परकाराचं ताट, सखा जेवतो घाईघाई**
**परनारीचा छंद लई**

वास्तविक कारभारीण किती शुद्ध मनाची स्त्री! जणुं स्वच्छ पाण्याचा तलावच. पण या व्यसनी माणसाला तेंहि दिसत नाहीं. हा छंदीफंदी माणूस बाजारबसवीसाठीं घरदार विकायला निघतो!

**घरची अस्तुरी, जसा पान्याचा तलाव**
**पराया नारीसाठीं करी घराचा लिलाव**

पतीचा हा बाहेरख्यालीपणा कितीक घरांतून पत्नीला रडवीत असतो. हा नाद सुटावा म्हणून पत्नी पुष्कळदां समजावून सांगते कीं हें चांगलं नाहीं—

**परनारीच्या पलंगावर नका निजूंसा बिनघोरी**
**पराई नार गळ्यावरची सुरी**

परनारीच्या पायीं केव्हां गळा कापला जाईल नेम नाहीं, सावध रहा, असा हा प्रेमाचा इशारा आहे. पण व्यसनी लोक असले हिताचे पण कडू इशारे ऐकून घेत नाहींत, वर्तनहि सुधारत नाहींत. मग हा दुष्ट छंद वाढतच जातो! पत्नी खेदानें म्हणते,

**माळ्याच्या मळ्यामंदी, एका झाडाला मिर्च्या सोळा**
**कोन झाबड पडली गळा, माझ्या मोत्याची गेली कळा**

पत्नीचें दुभंगलेलें हृदय ‘ मोत्याची कळाच गेली ’ ह्या शब्दांतून स्पष्ट होत आहे. जवळपास एकादी नखरेल बाई राहायला येऊं नये, तेवढ्यानें सुद्धां पतीची चलबिचल होईल कीं काय, अशी कातरता, पत्नीच्या प्रेमळ मनांत उत्पन्न होते. ती देवाला प्रार्थना करते—

**नवतीची नार नसावी शेजाराला**
**भुलावणी घातली माझ्या गुजराला**

याच्याच जोडीला कधींकधीं घरधन्यांना आणखी एक वाईट छंद असतो, तो म्हणजे दारूचा. कित्येक शेतकऱ्यांना हें व्यसन असतें. सोन्यासारखा पति यामुळें मातीमोल होऊन जातो हें पाहून मनाच्या वेदनांतून पुढील शब्द ऐकूं येतात—

**कलालीणबाई जळुजळु दारूखाना**
**धरनी लोळतो मोतीदाणा**

अशा प्रकारें व्यसनापायीं अश्रु गाळण्याचेहि प्रसंग बऱ्याचजणींवर येतात.

केव्हां केव्हां सासर अतिदरिद्री मिळतें. माहेरीं खूप श्रीमंती असावी व सासरीं खायची सुद्धां भ्रांत असावी असेंहि दिसून येतें. परंतु माहेरची श्रीमंती काय उपयोगाची ? सासरीं काय असेल तें आपलें, असा विवेक पत्नी मनाशीं करीत असते. पति कांहींच मिळवीत नसला तर त्या दुबळेपणाचें शल्य पत्नीच्या मनाला टोचीत असतें. पत्नी मनांत म्हणते—

**दुबळा भरतार, दुबळा असूं दे बाई**
**समुरत मायबाप त्यांच्या घरीं सत्ता न्हाई ।**

पति कसाहि असो, त्याची आदरानें सेवा करण हेंच पत्नीचें कर्तव्य आहे हा आलेख प्रत्येक स्त्रीच्या मनावर स्पष्टपणें खोदला गेला आहे असें दिसून येतें.

अशा या घरधन्यांच्या कितीतरी ओव्या आहेत. घरधनी कुशल असले कीं कारभारणीला जणुं सारा सुखाचा ठेवा सांपडला ! पतीच्या आयुष्याशीं संबंधित म्हणून कुंकवाच्या–चुड्याच्या हजारों ओव्यांचा उद्भव झाला. पति हेंच संसाराचें भाग्य ! पतीची सेवा मनापासून करण्याबद्दल एक पोक्त स्त्री एका नवथर विवाहितेला सांगत आहे. ती म्हणते—

**भरताराला ताट, नगं करूस नारी दुजं**
**आपुल्या जलमाचं त्येनं उचलिलं वझं**

पतीजवळ दुजेपणा धरूं नये हा उपदेश किती बहुमोलाचा आहे !

असा हा जन्माचा जोडीदार असावा व त्यांतच सोन्यासारखे कन्यापुत्र असावे म्हणजे मग त्या भाग्याला जणु शीगच लागते. ही गृहिणी किती अल्पसंतुष्ट आहे. तिची देवाजवळ मागणी किती साधी आहे—

**दे रे देवा मला पांच पुत्रांची पंगत**
**घरधन्याची संगत**

आणि कृतज्ञ मनानें सुखी पत्नी वरचेवर वडिलांना दुवा देत आहे, कीं त्यांनीं किती उत्तम पति निवडून दिला आहे—

**बापानं दिली लेक न्हाई पाहिलं घरदार**
**जोड पाहिली ईसवर !**

पतीला 'ईश्वर' मानून दळिद्रांतहि, झोपडींतहि सुखाचा संसार समाधानानें करणाऱ्या या गृहिणींच्या मानसिक श्रीमंतीला खरोखरच धन्यवाद द्यावेसे वाटतात. आतांपर्यंत घरधन्याबद्दलच्या सुंदर ओव्या आपण पुष्कळ पाहिल्या. किती प्रकारचें तें वर्णन होतें ! तथापि त्यांत एका नाजूक विषयाचें वर्णन आलेलें नाहीं. तो विषय म्हणजे प्रणय ! घरधनी हा प्रियकरहि असतो. कर्तबगार कुटुंबचालक या दृष्टीनें त्याचें व्यक्तिमत्त्व आपण पाहिलेंच. आतां एक प्रेमळ पति, ज्याच्यासाठीं पत्नी प्रीतीचे मधुशब्द लाजत बोलते असा एक नवयुवक, प्रणयरंग खेळणारा एक रसिक पुरुष, स्त्रीहृदयाला मोहिनी घालणारा एक सामर्थ्यशाली व उमदा तरुण अशा दृष्टीनेंहि त्याचें व्यक्तिमत्त्व आपण पाहूं. कारण पतिप्रीतीवांचून पत्नीचें जीवन पूर्ण होत नाहीं.

इतरांना साध्यासुध्या व कष्टमय दिसणाऱ्या या कृषिजीवनांत पुष्कळदां प्रीतीच्या नाजुक कलिकाहि उमलतात. शेतामळ्याच्या खुल्या वातावरणांत, गरीब खोपटांत, फळाफुलांच्या सहवासांत या कलिकांनाहि बहर येतो व ग्रामीण युवकयुवतींच्या आयुष्यांत सुखाचे अमर क्षण निर्माण होतात. त्याबद्दलच्या चित्तवेधक ओव्या अनेक आहेत.

या पतिप्रीतीच्या ओव्या किती हृदयंगम आणि उत्कट आहेत ! प्रेमाच्या राज्यांत पत्नीनें पतीला किती गोड नांवांनीं आळवलेलें आहे. सजण, हंबीर, मोहन, रंगीला, राजस, सखया, श्रीरंग, राया, शाहीर, जिव्हाळा, शुकीर (शुक्र) अशीं हीं नाजुकसाजूक विशेषणें आहेत. अर्थात्च या भावना एकान्तांत प्रकट झालेल्या. लोकांना त्यांचें अस्तित्व कळणेंहि अशक्य. परंतु सुगंध प्रत्यक्ष दिसत नाहीं तरी फुलांत तो असतो हें आपण समजू शकतों. पतिप्रीति लाजून, मर्यादेनें संसाराच्या आडोशाला जणूं उभी आहे. पण तिचें जें हें केव्हां केव्हां दर्शन होतें तें किती मधुर आहे !

पतीच्या रूपाबद्दल पत्नीला फारच अभिमान वाटत असतो. हें रूप कसें आहे बरें ?

**सावळी सुरत, अशी पाहिली न्हाई कुठं**
**माझ्या राजसाचं, ओठ बारीक डोळं मोठं**

मोठ्या डोळयांना बहुधा नेहमींच लिंबाची उपमा आढळते—

**मोठंमोठं डोळं, जशी लिंबाचीं टोपणं**
**रूप लालाचं देखणं**

असा हा मनमोहन गल्लींतून ऐटींत जाऊं लागतो तेव्हां पत्नीचा जीव व्याकुळ होतो. ती म्हणते—

**चांगलंपन तुझं, माझ्या जीवाला करवत**
**नको जाऊं गल्लीनं मिरवत**

या तिच्या सजणाचा आवाजहि चांगला आहे. मोटेवर अगर गाडीवर बसून तो उच्च स्वरांत गाणीं गाऊं लागला कीं ही प्रेमळ पत्नी सूचना देते—

**बारीक एवढा साद् नका गाऊंसा गाडीवर**
**नार बाजिंदी माडीवर**

अशा नखरेल बायकांची या पत्नीला भीति वाटत असते. कारण घरधन्याचें रूपच तसें मोहक आहे ना ?—

**चांगलंपनासाठीं नार घालीते येरझाऱ्या**
**माझा शुकीर पानझऱ्या**

आणि या बायका वेड्या व्हाव्यात असा पतीचा रुबाब नेहमींचाच असतो.

**कोशापटका डाव्याडोळ्याच्या आंखावरी**
**चाले सखा ज्वानीच्या झोकावरी**

हा भिवइर्शी बि॰ ॰ला पटका इतका सुंदर कसा बांधला गेला, त्याचें कारण तर पहा- -

**गुलाबी पटक्याची, त्याची बांधणी वेताची**
**राजसाच्या गोऱ्या नाजूक हाताची**

असा हा युवक किती गुणी आहे. त्याला इतरहि कित्येक कला येत असतात. त्याला मृदंग छान वाजवतां येतो, कीर्तन करतां येतें, भजनें तो उत्कृष्ट म्हणूं शकतो. या सर्व सद्गुणांबद्दल पत्नीच्या मनांत किती अभिमान, किती आदर वसत असतो. तिचे उद्गार पहा—

**मुरदुंगावरी हात, बोटाचा चाळाचाळा**
**माझ्या शाहीराचा गोड गळा**
**वाट किती पाहूं, गांवीं गेल्या सजणाची**
**वेळ झाली भजनाची**

हा प्राणसखा प्रकृतीनें देखील दृष्ट पडेसा सुदृढ आहे. दुरूनसुद्धां त्याचा मजबूत बांधा ओळखूं येतो—

**दुरुनी ओळखते, सखयाचा काळा कोट**
**भरज्वानीचा अंगलोट**

पतीच्या शरीरसामर्थ्याबद्दल पत्नीनें पुष्कळच सुंदर गीतें रचलेलीं दिसतात. पत्नी अभिमानानें पुष्कळदां सांगते, कीं माझा पति असातसा, सुदामजी नाहीं! उलट पैजेचा विडा उचलून कुस्त्या जिंकणारा तो कुस्तीगीर आहे—

**कुस्तीच्या फडावर मोठ्यामोठ्यांची खाली मान**
**विडा उचलीतो माझा पैलवान**

दुरून दुरून कुस्त्यांसाठीं या पहिलवानाला बोलावणीं येतात, कारण त्याची कीर्तिच तशी आहे—

**माझ्या घरीं पैलवान, चारी खेड्यांला माहीत**
**दंडी सोन्याचं ताईत।**

अशा प्रकारें मर्दांनी सामर्थ्याबद्दल जागोजाग प्रशंसोद्गार आढळतात. एके ठिकाणीं तर एक पत्नी सांगते—

**माझे दृष्टी डोळे, निवाले शेजीबाई।**
**घरधनियांनी भरल्या गोणीला दिली बाही॥**

धान्यानें भरलेलें पोतें घरधन्यानें उचललें व तें पाहून माझ्या डोळ्याचे आज पांग फिटले असें हें वर्णन आहे. भाषा अडाणी असेल, परंतु पत्नीनें पतीच्या सामर्थ्याचाच अभिमान धरला पाहिजे हें सुंदर तत्त्वच जणूं यांतून सांगितल्यासारखें वाटतें. पतीची निवड करतांना दिखाऊपणापेक्षांहि अशा सामर्थ्यशाली बाहूंचा आधार जन्माचा मिळवणें केव्हांहि अधिक श्रेयस्कर, हा आदेश किती मूल्यवान आहे बरें !

प्रीतीमध्यें विरहालाहि महत्त्वाचें स्थान असतेंच. विरह व्हायचे प्रसंगहि तरुण जोडप्यांत अधुनमधून उद्भवतातच. अशा प्रसंगींहि आर्त, व्याकुल भावना उचंबळून याव्या व त्यांना गीतांचें शब्दरूप मिळावें हेंहि क्रमप्राप्तच आहे. क्षणभर समजूं, कीं पत्नी माहेरीं निघाली आहे. स्त्रीच्या डोळ्यांतून अशा प्रसंगीं टच्कन् आसवें येतात. पण पुरुष सुधीर मनाचा असतो. तो निग्रहानें मनाची व्याकुलता आवरून बाह्यतः शांत रहाण्याचा प्रयत्न करीत असतो. तथापि पत्नी दूर जाऊं लागली, कीं पती स्पष्ट शब्दांत आपली नाखुषी व्यक्त करतोः—

**पीतींच्या भावे, कंथ धरितो पदराला**
**रानी ! नग जाऊंस माहेराला।**

तूं माहेरीं गेल्यानंतर मला चैन पडत नाहीं—

**पीतींनं कंथ म्हणे, रानी खालीं बस**
**जातीस माह्यारा, मला कठीन जातो दिस**

परंतु तेवढ्यांत कोणीतरी येतें. परत कधीं येशील ? हा प्रश्नहि विचारायचा राहून जातो. पत्नीची निघायची वेळ होते. दहा माणसांच्या घरांत अन् तेंहि मर्यादशील जुन्या घराण्यांत पतिपत्नींनीं एकमेकांशीं सर्वांदेखत बोलणें कोठलें जमायला ?

म्हणून हा प्रेमवेडा पति पत्नीला परसूदारीं आंब्याखालीं गांठून हळूच विचारतो, ' परत कधीं येशील ? '

**रानी निघाली माह्यारा, भरतार आंब्यातळी।**
**कधी येसी चंद्रावळी ? ॥**

चेरें, पती गांवाला गेला कीं पत्नीचीहि विरहानें करुण मनस्थिति होऊन जाते. त्याच्याहि सुंदर ओव्या आढळतात. विरहिणी पत्नी गांवाला गेलेल्या पतीची मनांतून वाट पहात असते. पती गावाला गेले कीं पत्नीचे डोळे रडून सुजतात, लाल होतात. मैत्रिणी चेष्टा करूं लागतात व शेवटीं नाइलाजानें पत्नी कबूल करते—

**उन्हाच्या काहारामंदी डोळं कशानं झालं लाल ?**
**सयांला किती सांगूं ? धनी गांवाला गेलं काल !**

ती म्हणते, सख्यांनो काय सांगूं ? दिवस कसातरी घालवतें. पण—

**हसुन खेळुन दिस लावित्ये कारनी**
**रात्रबाई आली, माझ्या मनाची झुरनी !**

कधींकधीं पती गांवाला जाऊन बरेच दिवस झालेले असतात. अधुनमधून पत्र पाठवीन असं पतीनें जाण्यापूर्वी पत्नीला वचनहि दिलेलें असतें, म्हणून ही प्रेमवेडी युवती त्याच्या पत्राची वाट पहात असते. दुरून टपालवाला दिसूं लागतो. प्रियतमाचें पत्र आणणारा तो देवदूतच आहे असें पत्नीला वाटतें. मग त्याचें अगत्य काय विचारतां—?

**टपालवाला आला, त्याला वाढते दहीभात**
**माझ्या राजसाची दे खुशाली कागदांत**

तो पत्र देतो—पण इथें वाचायला कोणाला येतं आहे ? परत त्याला काकुळतीची विनंति पहा—

**टपालवाला आला, माझ्या जीवांत न्हाई जीव**
**हौशा राजसाचं पत्र वाचुनि मला दाव !**

आहे कीं नाहीं प्रेमपत्रांची गुप्तता वर्णन करण्याजोगी ? मनांत निरनिराळे विचार दाटत असतात. पानावर बसावं तर घास उतरत नाहीं—पत्नी विचार करते—

**गेला कुन्या गांवी माझ्या मनींचा मोहन**
**त्याच्याबिगर मला गोड लागंना जेवन**

मनांत गोड आठवणी येतात. शेताची अवघड वाट त्यांच्या गोड बोलण्यांत केव्हांच संपायची—

**चाले चाल झडझडां, वाट लागे लवणाची**
**बोली मंजुळ मोहनाची**

तसेंच, शेतांत दोघें राबत असतांना उन्हाचा चटका पत्नीला लागूं लागला म्हणून पांघरायच्या धोतराची पतीनें तिला सावली करून दिली, ही गोड आठवण प्रेमळ पत्नी कशी विसरेल?

**भरताराचं सुख सांगतें मी गोतामंदी**
**अष्ट्रीच्या धोतराची केली सावली शेतामंदी**

आणि मग अशा आठवणींत दीर्घ व दुष्ट विरहकाल संपून एक दिवस पति येणार असल्याची गोड वार्ता पत्नी ऐकते. मग तर आनंदाला आणि उत्सुकतेला सीमाच राहत नाहीं या तरुणीच्या! ती मनांतून सारखी वाट पहाते. पतीला यायला उशीर लागलेला पाहून तिचें व्याकुळ मन म्हणूं लागतें:—

**सावली परतली परसूंदारीच्या केवड्याची**
**वाट मी किती पाहूं राजविलासी केवड्याची**

पतीला दिलेली ही केवड्याची सुंदर उपमा तर पहा! वाट पहातां पहातां रात्र होऊं लागते तरी घरधनी दिसत नाहीं. जागत बसून डोळ्यांवर लाली चढूं लागते. तरी सजण येत नाहीं! कोठें गुंतला असेल बरें?

**किती मी वाट पाहूं, डोळे झाल्याती रंगराव!**
**कुठ गुंतला माझा भीमराव!**

वाट पाहतां पाहतां उशीर होतो, सारे झोपीं जातात. पण ही प्रिय पत्नी आपली जागीच! खिडकींतून झरूक्यांतून ती दूरवर पाहात आहे—

**दिवस बुडियेला सर्व दुनव्या झोपाळली**
**धनी न्हाई आलं! रात इसाव्याला गेली।**

अशा कातर मनस्थितींत दुरून प्रियपति येतांना दिसूं लागतो. विरहाचे दिवस संपतात व पत्नीचें मन उल्हसित होतें. पतिहि हर्षित होतो व राघु-मैनाची ही जोडी हितगुज करण्यांत ग होऊन जाते. पत्नी मनाशीं

म्हणते, कीं एकदम घरांत जसा आनंदाचा प्रकाशच पडल्यासारखा वाटूं लागला आहे धनी आल्याबरोबर—

**सातपदरी कंठीवर शोभे मुरडीची सरी**
**धनी आलं घरीं-चांद उगवला दारीं !**

अशा प्रकारें या रम्य प्रसंगाचें वर्णन करणारींहि गीतें बरींच आढळून येतात. प्रेमळ संसारांत आणखीहि पुष्कळ तऱ्हेचे प्रसंग उद्‌भवतात, पत्नीला कांहीं आजार झाला आहे अशी कल्पना करूं. प्रीतीचें रोप जेथें अंकुरलें, तेथें अशा वेळीं जीव कसा व्याकुळ होतो ! या व्याकुलतेच्या साक्षीहि गीतांतून पटण्यासारख्या आहेत.

एक आजारी स्त्री पतीच्या अंकावर मस्तक ठेवण्याची इच्छा करीत आहे—

**जीवाला माझ्या जड, उसं तुमच्या मांडीवर**
**तांबड्या मंदीलाची छाया पडूं द्या तोंडावर ।**

ही दुसरी ओवी पहा. पत्नी आजारी आहे हा निरोप ऐकतांच या प्रेमळ मळेकऱ्याला कांहींएक सुचेनासें होतें—

**जीवाला जडभारी, तुला कळालं मळ्यामंदी**
**आसूडशी मोटा, शिवळा बैलाच्या गळ्यामंदी ।**

आणि तो मोटेवरून उतरून तडक घरीं जातो. या उलट प्रीतीसाफल्याचेहि कांहीं गोड प्रसंग असतात. पुढील प्रीतीच्या सूचकतेचें मनोहर उदाहरण पहा—

**भरताराचं सुख हंसत सांगे वालू**
**मुखीच्या तांबुलानं सर्जं नथीचं झालं लालू**

विड्याचा लाल रंग लागून सर्ज्यांचे मोती रंगले हा भावार्थ वाचून एकादा विडे खाणारा रंगेल पति खचित मिस्कीलपणें हंसेल अशी ही ओवी सूचक आहे. प्रीतिप्रसंगाच्या अशा सूचक ओव्या आणखीहि आढळतात.

एकंदरींत पतीच्या कर्तृत्वाबद्दल पत्नीला अभिमान तर वाटतोच, पण पति रसिकवृत्तीचा, प्रीतीची देवघेव करणारा आणि प्रणयचतुर असा असला, उमेदीनें, सामर्थ्यानें, रुबाबानें चित्ताला मोहून टाकणारा असला, कीं या अभिमानाची मधुरता शंभरपट वाढते हें निर्विवाद !

अशा पतीबद्दल प्रीतीनें मन उचंबळून येऊन 'सख्या राजसाच्या' ओव्या अंतःस्फूर्तीनें निर्माण होतात. शब्द साधे पण त्यांतली भावना किती हृद्य आहे! जणूं कांहीं साधींसुधीं दिसणारीं, पण सुगंधाची अमूल्य भेट देणारीं बकुळीचीं फुलेंच!

लोकदृष्टीपासून हीं रम्य कवनें कांहींशीं आडोशाला असलीं तरी त्यांतलें माधुर्य रसिकवृंदाला सहज कळण्याजोगें नाहीं का?

—*—

# घरधनी

टिपूर चांदनं चांदन्याजोगी रात
शेजेच्या भरताराची देवासारखी सोबत १

रेशीमकाठी धोतरजोडा, पदर जरीदार
माझा नेसला तालेवार २

समूरल्या सोप्या कोन निजे पलंगावरी
घरचं मालक कारभारी ३

अंगांत अंगरखा वर केसांचा गरका
माझ्या भरताराचा साज शिपायासारखा ४

अंगांत अंगरखा, वर कबज्या हिरवागार
उभं पेठेला जमादार ५

उन्हाळा पावसाळा, पानमळ्याला गारवा
हौशाच्या जीवावरी न्हाई कुनाची परवा ६

दिवाणाला जातां मागं पुढं माणूस
मधीं घरधनी, मोतियाचं कणीस ७

माझ्या अंगनांत चाफाचंदनाची मेख
घोडा बांधितो माझा देशमूख ८

तालुक्यांत कोन बोलतो बलवान
दिली कचेरी अलवान ९

कचेरीचं बोलावनं, एवढ्या रात्री काई ?
शिलेदार माझा दिव्यानं पत्र पाही ! १०

पाऊसपानियाची लोक आपुल्या घरीदारी
माझ्या हौशाला आली सरकारी कामगिरी ११

सरकारादरबारांत माझा मराठा मानाचा
इडा पिकल्या पानाचा १२

गादीचा बसनार लोडाचं टेकन
माझ्या मारवाडयाचं दुकान १३

दिवान वाड्या जातो, दुही रस्त्यानं संत्री लोक
सुभेदाराचा माझ्या झोक १४
तिन्ही सांजा झाल्या दीवादीपक माझ्या हातीं
घरधनियांच्या बारा बैलाच्या जोड्या येती १५
घोडीला घासदाणा देते डाळ हरबऱ्याची
शिंगी माझ्या सरदाराची १६
वाघ मारीला वाघजाळी ससा मारीला घोळुनी
घरधनी आलं शिकार खेळूनी १७
समूरल्या सोप्या ढाल तरवार बसता घोडा
नावार आमुचा जोडा १८
दिल्या घेतल्याचा हिशोब माझ्या घरी
घरधनियांना शोभते सावकारी १९
कचेरीचं बोलावनं आलं खडाखडी
धनी पत्र वाचीतो घोड्यावरी. २०
हातांत छत्रीकाठी यवढ्या उन्हाचं कुठं जाणं ?
आलं कचेरीला बोलावणं २१
शंभरसाठ संधी पुढं शिपाई दफ्तराला
घरधनी वकील साताऱ्याला. २२
दिवाणाला जातां उजवा घालावा गनपती
धनियांना येतो यशाचा विडा हातीं २३
हौस मला मोठी पाटी भरून भाकरीची
घरधनियांची गडी मानसं चाकरीची २४
वाटेवरली इहीर कुनी बांधली मोडीव
नाव हौशाचं तोडीव २५
खुतनीच्या गादीवर रजई वेलाची
हौशा राजसाची रानी मी हौसेच्या तोलाची २६
गाडीमागं गाडी, एक गाडी घुंगुराची
धनी ! हुशी करावी शंभराची २७

सात सर्ज्यांची नथ, सर्जे सोडून बारा मोती
हौशा राजसाची रानी लेती २८
हौस मला मोठी डाळीडोरल्यावरी सर
पानपुतळ्या चोळीवर २९
हौस मला मोठी टीकाखाली मणी
हौस पुरवीतो माझा धनी ३०
हौस मला मोठी बाळ्याबुगड्या कळसाच्या
येळा घडवा पन्नासाच्या ३१
हौस मला मोठी कंगन्या पाटल्या आटाच्या
धनी, येळा घडवा साठाच्या ३२
सराफकट्ट्यावर जोडी कापाची पाहिली
धनी, हौस मनीची न्हायली ३३
लेन्यामंदी लेनं, तीस पुतळ्या मधी मोहर
कंथ हौसेचा सुभेदार ३४
ठुशा टिक्काखाली सरीबाई तूं जामीन
हौशा कंथाची मी कामीन ३५
हौशा घरधनी हौस करीता न्हाईना
पचीस पुतळ्यांचा गोंडा, त्याच्या खिशांत माईना ३६
भरतार पुशित्यात, कां ग अस्तुरी अबोल्यानं
तुझ्या डोरल्याचं सोनं न्हाई जोखिलं ताजव्यानं ३७
कापडाच्या गाड्या, गाड्या पेठेला दाटल्या
हौशा राजसानं, केल्या सोनीयाच्या पाटल्या ३८
सोनं झालं सस्त रुपै आलं मोडी
हौशा कंथाला हात जोडी ३९
माळीण सादवीते देठासहीत कारलं
कंथाच्या राज्यामंदी ल्याव साजासहीत डोरलं ४०
सोन्याच्या पाटल्या हाताला दाटल्या
बत्तीस पुतळ्या कलाबतूंत गाठवील्या ४१

भरल्या बाजारांत भरणी आलीया कारल्याची
भरतार हौस करी, साजासहीत डोरल्याची ४२
भरतार भोळा सोनं झोकियेतो तोळा
माझा चितांगाजोगा गळा ४३
लेन्यामंदी लेनं, नथ ल्यावी सरज्याची
जाळीच्या मन्याखाली, हवा साजाच्या डोरल्याची ४४
भरतार बोले दमानं घेग नारी
लेन्यालुगड्याची हौस पुरवीन सारी ४५
हौस मला मोठी पायीच्या जोडव्याची
हौशा भरतारानं चांदी खंडली बडोद्याची ४६
मला हौस मोठी रेशमी लुगड्याची
धनी, मोतियाच्या बुगड्याची ४७
गाडीमागे गाडी मधली गाडी खजिन्याची
रानी संभाळा दागिन्याची ४८
ठुशाटिकाखाली सरी घालावी कवांमवां
हौशा आणितो दागिना नवा ४९
उंची उंची चोळ्या जावा घालिती शेजाराला
हौशा ! किती सांगूं ? चला बाजाराला ५०
काळी चंद्रकळा माझ्या मनांत घ्यावी होती
हौशा भरतारानं आणिली अंगमती ५१
हौस मला मोठी जरीच्या पातळाची
हौशा भरतारानं पेठ धुंडली सातान्याची ५२
हौशा भरतार हौस करी मनामंदी
काळी चंद्रकळा घेतो बाळंतपनामंदी ५३
मला हौस मोठी, हिरवं लुगडं पानाचं
मन वघते घेण्याचं ५४
माझ्या मनीची हौस, तुमच्या मनाची कल्पना
धनी बांधा दरवाज्यावर जिना ५५

हौस मला मोठी दूरि जावांत नांदायाची
माडी कौलारू बांधायाची ५६
थोरलं माझं घर, अंगन झालं थोडं
धनी बांधा सदर सोप्यापुढं ५७
थोरलं माझं घर पडवी उतरली स्वैपाकाला
म्होरं ढेलज बसायाला चांदसुर्व्या दिसायाला ५८
थोरलं माझं घर आठ खिडक्या नऊ दारं
धनी बैसले सोप्याला तालेवार ५९
थोरलं माझं घर शंभर पायऱ्याचं
आदरातिथ्य होतं, येनाराजानाराचं ६०
थोरलं माझं घर, हाई चार चौकाचं
घरधानियांचं एकल्या मालकांचं ६१
धाकुटं माझं घर हंड्याभांड्याचा पसारा
धनी वाडा बांधावा दुसरा ६२
माडीवर माडी बांधली नकशाची
माझ्या राजसाची उंच हवेली मोकाशाची ६३
भरताराचं सुख सांगते गोतामंदी
अग्नीच्या धोतराची केली सावली शेतामंदी ६४
भरताराचं सुख, सुख सांगते बयाबाई
वाट पान्याची ठावी न्हाई ६५
भरताराचं सुख, सांगते भावाला
तांब्याच्या घागरीनं पानी घालते देवाला ६६
भरताराचं सुख किती सांगु बयाबाई
मोट धुन्याची ठावी न्हाई ६७
भरतार म्हनुं हाईती भरतार परकाराचं
सुख माझ्या सरकाराचं ६८
भरताराचं सुख दैवा लागलं सारीखं
वळीवाचा पाउस कसापरास बारीक ६९

भरताराची सेवा करावी मनोभावं
राज बसुनी त्याचं खावं ७०
समृत मायबाप, माहेरी खजिन्यांची उंटं
चुडियाच्या राज्यामंदी सुखाची करीन लूट ७१
गावाला गावकुसूं पानमळ्याला वसती
चुडीयाच्या राज्यावरी दुनव्या भरली दीसती ७२
चारी माझी बाळं, पाचवा व्हाई कंथ
राज्याला न्हाई अंत ७३
भरतार शिरावर न्हाइ कशाची दगदग
पान्याच्या झोकावर लहरी मारीता फुलबाग ७४
भरताराचं राज मखमली डेरा
लागंना ऊन वारा ७५
भरताराचं राज जसा ओट्यांतला मेवा
पोटीच्या बाळाला हिशेब किती द्यावा ७६
भरताराचं राज, काचेचा बंगला
पोटीच्या बाळाला वारा धुंधुक लागला ७७
पाचाचं नेसणी साडेसाताचं वलणी
राज भरताराचं मालनी ७८
मायबापाचं राज मळ्यांतली मका
माझ्या चुडीयाचं राज, कृष्णदेवाची द्वारका ७९
चंद्रानं केलं खळं आभाळाच्या बळं
माझ्या चुडीयाचं राज पृथिमीनिराळं ८०
शिपायाची नार दरबाजारी दानं घेती
भरताराच्या राज्यांत मी गाडीनं गल्ला नेती ८१
भरताराचं राज, सावडभावडं
दारी बळद उघडं ८२
सोईरंधाईरं सारं संपत्तिचं लोक
आपुल्या भरताराचं राज निर्वाणीचं एक ८३

भरताराचं राज उगीच न्हवं बाई
मोगऱ्याशेजारी झुलव घेते जाई ८४
भरताराचं राज लूटीते साऱ्यावाटं
त्येची फिर्याद न्हाई कुठं ८५
भरताराचा राग डाव्या डोळ्याच्या तराटणी
नको बोलूं मराठणी ८६
भरताराचा राग, डोळ्याची कोर लाल
राग जाऊंदे, मग बोल ८७
भरताराचा राग, दुधाची उकळी
तेवढी वेळ तूं सांभाळी ८८
भरताराची खूण डोळ्याच्या लवणी
मनी जाणावी मालनी ८९
रुसला भरतार घेईना गंधपानी
अशिलाची लेक शानी ९०
भरतार राग धरी, त्येला रुसायाची सवं
आम्ही पाटलाच्या पोरी पाया पडायाच्या न्हवं ९१
पाच परकाराचं ताट हौशा जेवतो घाईघाई।
परनारीचा छंद लई !॥ ९२
शेजेची अस्तुरी पान्याचं घगाळ।
परनारीसाठीं तोंड करीतो वंगाळ !॥ ९३
परनारीच्या पलंगावर नका निजूंसा बिनघोरी।
परनारी तुमच्या गळ्यावरची सुरी ९४
आपुली नार हाय हळदीचा गाभा।
लोकाच्या नारीसाठीं वळचनीखाली उभा ९५
आपुली नार हाय दवन्याची काडी।
लोकाच्या नारीसाठी घेतो बुरजावरनं उडी ९६
घरची अस्तुरी जशी कवळी काकडी
पराया नारीसाठी वाट चालतो वाकडी ९७

घरची अस्तुरी जसा पान्याचा तलाव ।
पराया नारीसाठी करी घराचा लिलाव ९८

माळ्याच्या मळ्यामंदी एका झाडाला मिर्च्या सोळा
कोण झाबड पडली गळा माझ्या मोत्याची गेली कळा ९९

सडासारवन शेजी पुसे कोन दिस
चुडी[illegible] राजसाची शिरमंताची एकादस १००

घरधनी इच्यारती कुठं गेलीया घरवाली
ऐका माझ्या शाहीराची बोली १०१

घरधनी इच्यारती कुठं गेलीया वेडी जात
बाळ रडे पाळन्यांत १०२

घरधनी इच्यारती कुठं गेलीया येडी सिता
तिच्या पदरी कात हुता १०३

घरधनी इच्यारती कुठं गेलीया घरवाली
मैना हंसत येत दारीं १०४

रुसला घरधनी काम पुशीतो येळाचं
नाव सांगते मी बाळाचं १०५

सोजीचा जेवनार नका वाढूंसा गूळपानी
हौशाची सुरत नाजूक केळावानी १०६

पोटीच्या पुत्रासाठीं नवस केल्याती जागोजाग
कंथ हौशा फेडूं लाग ! १०७

दूरदेशी गेला, सासुबाईचा बिरड मनी
माझ्या कुंकवाचा धनी १०८

जीवाला देते जीव जीवाच्या सोबत्याला
हौशा कंथाची गार साउली बसायाला १०९

पीर्तीचा कंथ पानाला लावी चुना
डोळ्यानं दावी खुणा ११०

पानी भरते, घागर घेउन जाते दूर
घरधानियांचे नंदी आल्याती पान्यावर १११

भरतार बोले, कां ग कामीनी गोरीमोरी
आईबाप गोताला इसर माझ्या जीवावरी ११२
अंतरीचं गुजु मी बोलूं कुनापाशी
कंथ शेजेला इसवासी ११३
आपुला भरतार पूर्वीचा कोन हुता
न्हाई आठवुं दिली माता ११४
भरताराला ताट नको करूंस नारी दुजं
आपुल्या जलमाचं त्येनं उचललं वझं ११५
फाटला पाटव घेते निरीला झाकून
आब कंथाचा राखून ११६
दुबळा भरतार, दुबळा असूंदे बाई
सम्रत मायबाप, त्यंच्या घरीं काडीची सत्ता न्हाई ११७
दुबळा भरतार, त्येच्या इच्यारी असावं
सम्रत मायबाप त्यांच्या वसरी नसावं ११८
दुबळ्या भरताराची नको करूस हेळना
हलवीतो कोडकौतुकं पाळना ११९
दुबळ्या भरताराला नको म्हनूंस मेलागेला
सम्रत आईबाप, तिथं न्हाई तुझा जल्म गेला ? १२०
दुबळपन माझं जनालोकांनी हिणविलं
हौशा भरतारानं जहाज चालविलं १२१
सम्रत आईबाप माळावरला घुमट
दुबळा भरतार लावितो शेवट १२२
दुबळा भरतार आनी भाजीपाल्याची मोट
शहानी मैना, हंसत सोडी गाठ १२३
दुबळ्या भरताराला नार मिळाली दमदार
गळ्यांत काळी पोत, म्हनते चंद्रहार १२४
नाकामंदी नथ, गळ्यामंदी पोत
रस्त्यानं चालली दुबळ्याची चंदरज्योत १२५

लक्ष्मी आई आली मागाचा कट्टा चढे
हौशा घरधनी घोटाच्या पाया पडे १२६

लक्ष्मीआई आली सोन्याच्या पाऊलानं
भरताराचं जोतं चढते डऊलानं १२७

मध्यान्हीला लक्षुमी आली, दाराला देते थाप
घरधानियांची पहिली गाढ झोप १२८

लक्ष्मी आली बैलांच्या मागून
तुमच्या पालवी लागून १२९

लक्षुमी आली, धर माझी करांगळी
माझ्या राजसाची दाविते सोपा आळी १३०

लक्षुमी माय आली हाती तांब्या अमृताचा
माझीया कंथाचा वाडा दाविते सम्रताचा १३१

वाटेवरली लक्षुमी आली परसूदारानं
सावळ्या कंथाच्या कणगी लागल्या फेरानं १३२

वाटेवरली लक्षुमी आली शेताच्या ओढीनं
सावळा कंथ, धान्य मोजितो खंडीनं १३३

लक्षुमी पिकली शेताच्या शिवारांत
सावळा घरधनी मोती भरतो घागरीत, १३४

तिन्ही सांजा झाल्या, लक्षुमीची वेरझार
राया उघडा देवघर १३५

सासुसासऱ्याचं, घर दीराया ननंदाचं
पृथमीमोलाचं लेनं दिलं भरताराचं १३६

सांबाच्या पिंडीवर तीळतांदूळ पाच गहू
चुडिया राजसाला दे पोटी पुत्र पाठी भाऊ १३७

सत्तेनारायना न्हाई मागत तुला काई
हाशा भरताराला थोडी संपत, औक्ष लई १३८

शेजेच्या भरताराला नका म्हनूंसा न्हानथोर
पदरी बांधलं ईसवर १३९

आईबापानी दिली लेक नका करूंसा घरघर
देवासारिखं भरतार १४०

चार माझी बाळं पाचवा भरतार
कृस्नदेवाचा अवतार १४१

सांबाच्या पिंडीवर बेल वाहते तिकटीचं
चुडीया राजसाला औख मागते दुपटीचं १४२

देरे देवा मला पांच पुत्रांची पंगत
जलमाची घरधनियांची संगत १४३

देरे देवा मला, जुनं जुंधळं ठेवणीला
घरधनियांना बारा बैल दावणीला १४४

—※—

# घरधनी-प्रीति आणि शृंगार

रानी निघाली माहेरा, भरतार आंब्यातळीं
कधी येसी चंद्रावळी १

पीतींच्या भाव कंथ, धरितो पदराला
रानी, नगं जाऊस माहेराला २

पीतींचा कंथ बोले, रानी खाली बैस
जातीस माह्यारा, मला कठीण जाती दीस ३

काळी चंद्रकळा, जरीचा पद्र
तिथं भरताराची गुंतली नद्र ४

माडीवर माडी गिलावा लालीलाल
धनियांचा रंगमहाल ५

पिकल्या पानाचा इडा सुकून गेला ताटी
रुसला राजस कशासाठी ? ६

रुसला भरतार, समजावूं कसा
घालीन प्रीतफांसा ! ७

कापी बिलवर कशानं पिचला
हात कंथाच्या उशाला मी दिला ८

लांब लांब बहालं शेजेच्या खाली शेंड
कंथ उशाला देई दंड ९

छप्पर पलंगावर वेलच्यालवंगांचा सडा
घरधनियांना म्यां झोपेत दिला इडा. १०

गोठपाटल्याचा हात कंथाच्या उशाखाली
हलवून जागी केली ११

भरताराचं सुख हंसत सांगे वाळू
मुखीच्या तांबुलानं सर्जे नथीचं झालं लालू १२

तुझ्या जीवासाठीं जीव माझा इकीन
सोनं ताजव्या जोखीन १३
पाच परकाराचं ताट, झाकीत दोन्ही हात
सख्या पाहाते तुझी वाट १४
पाहाटेच्या पारामंदी, कोंबडा माझा वैरी
बांग देतुंया दुहेरी १५
रायासाठीं माझा जीव थोडाथोडा
सख्या पायांत घाला जोडा १६
चईताचं ऊन लागतं माझ्या जीवा
छत्री उघडा सदाशिवा १७
टपालवाला आला जीवांत नाहीं जीव
हौशा राजसाचं पत्र वाचून मला दाव ? १८
पराया मुलुखाचं कांहीं कळंना बातबेत
घालावी खुशाली कागदांत १९
दृष्ट म्हणू झाली पान्यापरास पातळ
डोळं सख्याचं उथळ २०
मोठंमोठं डोळं तुझ्या डोळ्याची मला भीती
खाली बघून चालूं किती २१
मोठंमोठं डोळ, माझ्या सख्या रतनाचं
वाची कागद वतनाचं २२
मोठंमोठं डोळं, तुझ्या डोळ्याची मला गोडी
सुरमा ल्यायाला देते काडी २३
मोठंमोठं डोळं, अस्मानीं तारा तुटे
तुझ्या डोळ्याची भीड वाटे २४
मोठंमोठं डोळं, जशी लिंबाची टोपणं
रूप लालाचं देखणं २५
मोठंमोठं डोळं, नाजूक पापण्या
जशा लिंबाच्या कापण्या २६

मोठंमोठं डोळं, लिंबाच्या ग फोडी
नार वाणियाची, तुझ्यापायी झाली वेडी २७
मोठंमोठं डोळं भुवया बारीक
सुरमा ल्यायाची तारीफ २८
उन्हाळ्याची झळ लागते चटक्याची
राजसानं केली सावली दुपट्ट्याची २९
सावळी सुरत अशी पाहिली न्हाई कुठं
माझ्या राजसाचं ओठ बारीक डोळं मोठं ३०
सावळी सुरत अशी पाहिली न्हाई कधी
सावळ्या भरतारानं जरीपोशाक केला उदी ३१
तुझ्या सुरतीचं, अंगनी लाव झाड
मला लागुनी गेलं याड ३२
सावळी सुरत मोती हजाराला दोन
तुझ्या सुरतीपायी नार झालीया बैरागीण ३३
सावळी सुरत उन्हानं बिघडली
सुरूच्या झाडाखाली आरशी लालानं उघडली ३४
हौशा पान खातो, देते मी कातगोळ्या
दात मोगरीच्या कळ्या ३५
पान खातो सखा चुना लावतो देठाला
त्याच्या लालाई ओठाला ३६
उन्हाळ्याचं ऊन कुठं निघाला ऐनेमहाल
माझ्या हौशाचं, गोरं पावलं टाचा लाल ३७
गुलाबी पटक्याची बांधणी बेताची
राजसाच्या गोऱ्या नाजूक हाताची ३८
कोशा पट्येका, डाव्या डोळ्याच्या आखावरी
चाले सखा ज्वानीच्या झोकावरी ३९
वादली पटका, गुंडीतो बाकावरी
दृष्ट व्हईल नाक्यावरी ४०

चांगलंपन तुझं, माझ्या जीवाला करवत
नको जाऊ गलीनं मिरवत ४१
बारीक एवढा साद, नका गाऊंसा माडीवरी
नार बाजिंदी माडीवरी ४२
बारीक एवढा साद, नका गाऊंसा मोटेवर
नार बाजिंदी वाटेवर ४३
चांगलंपनासाठी, नार घालीत येरझाऱ्या
माझा शुकीर पानझऱ्या ४४
तांबड्या मंदीलाचं, तेज पडलं माझ्या दारी
डोळं दीपलं तुझं नारी ४५
नार भाळयेली, पाठीवरच्या शमल्याला
माझ्या कातीव इमल्याला ४६
चांगलंपन तुझं, नार लागली तुझ्या मागं
तिला दुरला पल्ला सांग ४७
नवतीची नार नसावी शेजाराला
भुलावणी घातली माझ्या गुजराला ४८
चांगलंपन तुझं, कुन्या देवाची करणी
तुझ्या रूपापायी नार लागली झुरणी ४९
अंचल चंचल नार, नसावी वाडियांत
माझ्या शिररंगाला कैफ चारीते विडीयांत ५०
हंसत तुझी बोली, नटत तुझी चाली
सया पुशित्यात, कोन माऊली याला व्याली ५१
चालतो झडझडां, वाट लागते लवणाची
बोली मंजुळ मोहनाची ५२
जीवाला एवढी माया कशाला लाविलीस ?
उंबराच्या फुलावानी, सुरत कशाला दाविलीस ? ५३
तोंडीला चंदन वाया जाईना कुटका
हौशा तुझ्या गुणाचा लागला चटका ५४

सांगुन धाडिते, माझ्या शिपाई रंगील्याला
हातीं कंदील घेऊनी यावं बंगल्याला ५५
बसाया बसकुर देते शेलारीवर पाट
आला जिव्हाळा माझा दाट ५६
तांबड्या मंदिलाची लालाई रसरशी
सख्याला दृष्ट झाली, सुभेदाराच्या वाड्यापाशी ५७
सुरतेचं मोती ठेविलं पाकीटांत
रायाला दृष्ट झाली ग नाटकांत ५८
सावली परतली दारीच्या लिंबाऱ्याची
किती वाट पाहू गावा गेलेल्या हंबीराची ५९
परसुंदारीच्या मोगऱ्याची सावली परतली
वाट पहाण्याची सीमा झाली ६०
सावली परतली दारीच्या घेवड्याची
किती वाट पाहू राजविलासी केवड्याची ६१
सोप्याची साउली गेली जोत्याखाली
वाट पहाण्याची सीमा झाली ६२
किती वाट पाहूं, पिवळी झाली काया
सख्या कठिन केली माया ६३
वाट किती पाहूं, शिणले डोळे कोरा
कुठं गुंतलां राजमोहरा ? ६४
वाट किती पाहूं डोळे झाल्याती रंगराव
कुठं गुंतला भीमराव ६५
गावाला गेले बाई वाट पहाते रंगील्याची
चित्रं कोमेली बंगल्याची ६६
माझे दोन्ही डोळे सख्याच्या गांवाकडे
कधीं राजस दृष्टी पडे ? ६७
गावाला गेले धनी, मोजिते आठवडे
चित्त माझं वाटेकडे ६८

गांवाला गेले बाई, वाटतं भणाभणा
बैठकीचा जागा सुना ६९
गांवाला गेले बाई, जाणं असलं कसलं ?
आकडी दूध ते नासलं ७०
गावाला गेले बाई, मागची न्हाई सई
दुध नासुन झालं दही ७१
गावाला गेला सखा, वाटेना गेल्यावानी
रूप चांदीच्या पेल्यावानी ७२
गांवाला गेलं धनी, जीव तिकडे माझा सारा
पाऊसामागे वारा ७३
गांवाला गेलं धनी, न्हाई मला सांगितलं
अन्याव माझं काय झालं ! ७४
गावाला गेला बाई, गेला माझा येलदोडा
सपनांत येतो, त्याच्या मंदिलाचा तिढा ७५
गावाला गेला लाल, जशी काळजाची पेटी
जिवा हुरहूर तुझ्यासाठी ७६
गावाला गेला बाई माझ्या जीवाचा कालिंदा
साखर सोजीचा मलिदा ७७
गावाला गेला बाई, माझा साखरेचा पेढा
जीव माझा थोडाथोडा ७८
गेल्या कुणा गावी, माझ्या मनीचा मोहन
त्याच्या बिगर, मला, गोड लागंना जेवन ७९
गावाला गेला बाई माझ्या सुरतीचा चांगला
कुन्या नारीनं दिला सात मजली बंगला ? ८०
उन्हाच्या कारामंदी, डोळं कशानं झालं लाल ?
सयानु किती सांगू, धनी गावाला गेलं काल ८१
दिस जातो कामाधामा रात मला येठीची
उतां लागली भेटीची ८२

हसत खेळत दिस लाविते कारनी
रात्र बाई आली, माझ्या मनाची झुरणी ८३
दिस बुडियेला, सर्वी दुनिया झोपाळली
धनी नाही आलं ! रात इसाव्याला गेली ८४
किती मी वाट पाहूं उभी सोप्याच्या खांबाला
माझ्या राजसाचा दृष्टी पडला संबला ८५
साळीचं तांदूळ आधणी बोलत्यात
मला भेटाया घरधनी वाट चालत्यात ८६
पडतो पाऊस, पुढं पाऊस मागं वारा
कंच्या सावलीला माझा हिरा ८७
दिस मावळला मावळून आडऊन
माझ्या श्रीरंगाच्या करड्या घोडीला पिवळा जीन ८८
दिस मावळला दिसापाशी माझं काई ?
राजसाची यायाची वाट राती हाई ८९
उन्हाच्या काहारामंदी डाक कुनाची धाव घेती
सखयाची माझ्या खुशालीची पत्रं येती ९०
किती वाट पाहू गावा गेल्या वकीलाची
पानं सुकली रतिबाची ९१
बारीक माझा साद कसा वाऱ्यानं ऐकूं गेला
सावळ्या सखयानं घोडा मैदानी उभा केला ९२
दुरून देखली मी, चाल माझ्या रायाची
घरीं धूळ झाडील पायाची ९३
गावाला गेला सखा, माझ्या जिवाला लसतं
धनी येतो रस्त्यानं हांसत ९४
सातपदरी कंठीवर, शोभे मुरडीची सरी
धनी आलं घरी, चांद उगवला दारी ९५
मुरदुंगावरी हात टाकीतो नवानवा
गावा गेलेला शाहीर आला कवा ? ९६

आठा दिसाची बोली होती, नववी रात्र कुठं गेली?
घरधनी बोलती, पानमळ्या वस्ती केली ९७
अंगुळीला पानी हंडा ठेवते गुजराती
माझा राजस गोरा किती ९८
पानी तापवते हंडा तापुन झाला लाल
सखा मागतो मोगरेल ९९
अंगुळीला पानी हंडा ठेवीते ठोकयाचा
शीण काढिते सखयाचा १००
कुस्तीच्या फडावर मोठ्यामोठ्याची खाली मान
विडा उचलितो माझा पैलवान १०१
सोनसळे गहु ओलवते रवारवा
पैलवानाला माझ्या मेवा १०२
अंगांत अंगरखं छाती उघडी दिसते
ज्वानी कवळी, वारा पिते १०३
दुरून ओळखते सखयाचा काळा कोट
भरज्वानीचा अंगलोट १०४
अंगांत अंगरखं, छाती कशानं ओली झाली
माझ्या पैलवानानं कुस्ती केली १०५
माझ्या घरी पैलवान चारी खेड्याला माहीत
दंडी सोन्याचं ताईत १०६
माझ्या घरीं पैलवान, चारी खेड्यांत नावाजला
शेला जरीचा देऊं केला १०७
माझ्या घरी पैलवान गांवोगांवीच्या आल्या चिठ्ठ्या
माझ्या राजसाला करती हौसेनं दंडपेट्या १०८
माझ्या दारावरनं कोण गेला गोरापान
राजस माझा कंथ, आकडी दुधाचा पैलवान १०९
माझे दृष्टीडोळे निवाले शेजीबाई
घरधानियांनी भरल्या गोणीला दिली वाही ११०

जीवाला माझ्या जड, उसं तुमच्या मांडीवर
तांबड्या मंदीलाची छाया पडूंद्या तोंडावर १११

जीवाला जडभारी, तुला कळालं मळ्यामंदी
आसूडशी मोटा, शिवळा बैलाच्या गळ्यामंदी ११२

जीवाला माझ्या जड, शिररंगा माझ्या सांगा
म्होरं गाडी, मागं टांगा ११३

जीवाला माझ्या जड सांगा सख्याला जाऊन
आला कंदील लावून ११४

जीवाला माझ्या जड, तुला कळालं माळटेकी
हाती रुमाल धूम ठोकी ११५

जीवाला जडभारी, तुला कळालं वाड्यामंदी
वाळू रुतली जोड्यांमदी ११६

जीवाला माझ्या जड, डोकं दुखतं केसांमंदी
सखा राहिला दूर, गाडीबैल देशामंदी ११७

जीवाला माझ्या जड डोकं दुखतं भांगपट्टी
राजस सखा, वैद्याला धाडी चिट्ठी ११८

सासू मालनीचा कुसवा निर्मळ
राजविलासी शेजेला फुलाचा दरवळ ११९

●

—※—

# तान्हुलें.

पति हा जसा स्त्रीच्या जीवनपटांतला एक प्रमुख धागा त्याप्रमाणें तान्हें मूल हाहि एक महत्त्वाचा धागा म्हटला पाहिजे. सासुरवासिनीच्या कटी-खांद्यावर गोजिरवाणें लेकरूं हसूंखेळूं लागलें कीं त्या घरांत जणुं नवं चैतन्यच जन्म घेतं. बाळाचं महत्त्वच तसं असतं. तो वंशाचा अंकुर. साऱ्यांच्या प्रीतीचं स्थान म्हणजे तान्हुलं. घरांत आनंदाचं साम्राज्य बाळ निर्माण करतं! हसतमुख बालक पाहिल्यानंतर कोण प्रसन्न होणार नाहीं बरं!

अशा या तान्हुल्याला किती गोड गोड गीतं स्त्रियांनीं म्हटलीं आहेत! शिवाय पतीला ओव्या म्हणतांना जीव जरा तरी संकोचतो, लाजतो. पण बाळाचीं गीतं म्हणायला कोणाचं भय आलं आहे? येथें शब्दाशब्दांतून मातेचं वात्सल्य उचंबळून येतांना दिसतं.

असें हें गोंडस बाळ म्हणजे देवाची देणगी आहे! जिला हें देणें लाभतें ती भाग्यवान् खरीच, पण सगळ्यांनाच पुत्रलाभ होतो असें नाहीं. मूल नशिबी हवें. त्यासाठीं नवससायास करावे लागतात. कोणी कोणी पुत्र-प्राप्तीसाठीं पिंपळाचे पार झिजवतात, जादुटोणा करतात, देवऋषीचे गंडेदोरे बांधतात. पण समंजस बायकांना आवडत नाहीं. त्या म्हणतात—अशानें कां पुत्रलाभ होतो?

**पुत्राचं ग फळ न्हाई नारीच्या नावरसी**
**काय करील देवऋषी?**

प्रत्येक विवाहित स्त्रीच्या अंतरीची सुप्त इच्छा आपल्याला अपत्य व्हावं अशी असते. देवाजवळ मागणी तर पहा—

**देरे देवा, मला नकोत सोनहोन**
**इसाव्याला देई मांडीवरी तान्हं**

मग देवाला छोटमोठे नवसहि करण्यांत येतात—

**देवाला वाण, देते मी नारळाचं**
**कडेवरी देई तान्हुलं जावळाचं**

घरांत तान्हं मूल नसलं तर घर कसं शून्य दिसतं. पुष्कळ धनदौलत आहे पण घरांत मूल नाहीं तर काय त्याची शोभा? एक स्त्री म्हणते—

**लाख्या सावकार, काय करावं लाखाला?**
**पोटी न्हाई पुत्रफळ, धन हुईल लोकाला**

केव्हां केव्हां संतूबाई म्हणून एक पुत्रदायिनी देवी आहे तिला नवस केले जातात. धान्याच्या कणग्या भरलेल्या पाहून अपत्यहीन स्त्री मनांत झुरत असते—

**मला हौस मोठी तान्हं बाळ ते असावं**
**त्यानं दानं मुठीनं नासावं**

आणि मग ईशकृपा झाली तर हे सारे नवस व सदिच्छा सार्थ होऊन बाळराजे घरांत हसू खेळूं लागतात. एक आई म्हणते—

**अप्रूबाव मेवा तान्ह्या लेकराचा**
**माझा बत्तासा साकरेचा**

हा मेवा ज्यांना प्राप्त झाला त्यांना केवढी धन्यता वाटत असते. तान्हा बाळराज ही संसारांतली केवढी मोठी दौलत आहे! कडेवर गोजिरवाणं बाळ असलं कीं धनद्रव्य आणि उंची कपडे यांना कोण विचारतो? साऱ्यांचं लक्ष आपलं बाळाकडे—

**लेन्यालुगड्याची नार, कुनी पुसंना लेन्याला**
**महिनं किती झालं, कडीच्या तान्ह्याला?**

कांहीं बायका शतदरिद्री असतात. त्यांचे कपडे उंची नसतात, अंगावर सोन्याचा एक मणिसुद्धां नसतो त्यांच्या! परंतु एक बाळ असलं कीं त्यांना या दारिद्र्याचंसुद्धां कांहीं वाटत नाहीं! एक स्त्री म्हणते—

**धनसंपतेचा कोन करीतंया हेवा?**
**माझा बाळराय, मालाचा गुंड नवा**

एके ठिकाणीं तर पुत्रवती स्त्रीन संपत्तीला किती तुच्छ लेखलं आहे पहा—

**धनग संपदा, तुझ्या सांदीचा घ्येरूसा**
**तान्हा माझा राघू, खेळे गलीला आरसा**

अशा प्रकारें तान्हें मूल ही मोठ्यांतली मोठी श्रीमंती असल्याचे उल्लेख बरेच आढळतात.

तान्हीयाच्या ओव्या रचतांना स्त्रियांची कवनशक्ति जणुं अत्यंत मृदुतेनें शब्दरचना करीत असावी असें मनांत येतें. बाळाला किती गोडगोड उपमा दिल्या आहेत! त्याला चंद्र म्हटलें आहे, निशिगंध म्हटलें आहे, सोन्यामोत्याचा खिचडा, लालकेवडा असंही म्हटलं आहे. तान्हुलीलासुद्धां रानी, बिजली, नागीण, यसवदा इत्यादि सुंदर नांवांनीं आळवलेलें दिसून येतें. हें बाळ रूपानं किती सुंदर आहे! असं हें मनोहर रूप घडवतांना ब्रह्मदेवाला दखील केवढे सायास पडले असतील बरें?

**मोठंमोठं डोळं भुंवया नीटस**
**पडला देवाला अट्टास.**

आणि या बाळाची अंगकांति तरी किती सुंदर—

**खेळूनी मेळूनी बाळ उंबऱ्यांत बसे**
**सोन्याचा ढीग दिसे.**

आणि शेजारणीला वाटतं कीं आपण फारच सुंदर आहों. पण एकदां माझ्या बाळाकडे पहा कीं तुझा गर्व उतरेल!—

**किती नटशील, जूनजरबट केकती!**
**बघ माझ्या राघुला रंग किती!**

अशा देखण्या मुलाला हजारदां दृष्ट होते! तें कोमेजतें, किरकिर करतें. दूध पीत नाहीं. अशावेळीं दृष्ट घालणाऱ्या बाईला आईच्या शिव्या तर पहा—

**जळो तुझी दृष्ट, तुझ्या डोळ्यांत पडू माती**
**तान्हा माझा बाळ कोमेला एका राती**

केव्हां बाळीच्या गोजिरवाण्या जावळालाहि दृष्ट होते—

**दृष्ट मी काढते पाळन्या कळसासुद्धां**
**माझी जावळाची यसवदा.**

ही दृष्टबाधा मीठमोहऱ्यांनीं, लिंबाच्या पाल्यानं अगर विषवंदानं उतरते अशी समजूत असल्यानें हे उल्लेखहि बाळावरच्या ओव्यांतून आलेले आहेत.

नजरबाधा व त्यावरचे हे उपाय या दोन्हीहि मानसिक श्रद्धेच्याच गोष्टी आहेत.

कांहीं वेळेला मुलाऐवजीं मुलगी होते. पण म्हणून काय झालं? शहाणी समंजस माणसं कन्येचंहि इतक्याच कौतुकानं स्वागत करतात. फार तर दागिने बदलावे लागतात इतकंच.

**ल्येकाचं नवस ल्येकीबाळ तुला केलं**
**पानपुतळ्या नवं केलं, काडिलंगर वाया गेलं**

ही मुलगी साखळ्यावाळे घालून हिंडू फिरूं लागली कीं आईच्या हृदयांत हर्षाचें आंदोलन उठतें—

**साखळ्यावाळीयाचा नाद येतुया माझ्या कानी**
**आली खेळून माझी रानी**

ही बाळी भारी अवखळ आहे. शेजारणीच्या फुलझाडांची ती नासाडी करीत असते, हें पाहून आई शेजारणीला प्रेमाची सूचना देते—

**संभाळ शेजीबाई दारींचा सबजा**
**लई अवखळ माझी गिरजा**

पण सर्वच शेजारणी कांहीं मृदुमनाच्या नसतात. एकादीला बाळांच्या खोड्या आवडत नाहींत. ती येऊन भांडूं लागते, ओरडून बोलूं लागते त्यामुळें बाळीहि झोपेंतून जागी होते; हें पाहून आई नम्रतेनं विनवणी करते—

**शेजारीणबाई, नको बोलूं तूं तुटून**
**तान्ही माझी मैना आली झोपेची उठून**

या मुलांबाळांच्यावरून शेजारणींत भांडणं पुष्कळदां होत असतात. एकादी निष्ठुर बाई तर शेजारच्या मुलांना शिव्याशापहि देत असते. परंतु देवाची राखण असल्यावर या शिव्यांचं काय भय?

**शेजी देते शिव्या, तिची तिला मुभा**
**माझा बाळराय, कडव्या *लिंबाऱ्याखालीं उभा**

असं हें तान्हुलं [ अगर तान्हुली ] सगळीकडे दंगा करून खेळत असतं—

* कडूलिंबामुळें कुणाची वाईट वासना अगर दृष्ट बाधत नाहीं अशी समजूत आहे.

**साखळ्यावाळीयाचा पाय रुतला चिकुलांत**
**बाळ खेळे गोकुळांत**

बाळाबद्दल पुष्कळच तक्रारी; हा रात्रीचा रडून झोप घेऊं देत नाहीं! गळ्याला मिठी घालून कामं करूं देत नाहीं—

**छंदखोरू बाळा, छंदाला देते वाटी**
**सोड गळ्याची माझ्या मिठी**

बाळाच्या अंघोळीचं किती काव्यमय वर्णन केलं आहे—

**माझ्या अंगनांत मोत्यापवळ्याची रांगुळी**
**बाळ बसला अंगुळी**

अशाप्रकारें बाळाचें जेवण, अंघोळ, हट्ट इत्यादिवर बरींच कवनें आंढळतात. एक आई अवखळपणाबद्दल तक्रार करीत आहे—

**दळनाची पाटी ठेवुं मी कुनीकडे**
**राघु खेळतो चहूंकडे**

याचे एकेक छंदहि भारी चमत्कारिक! काय करावं?

**अवखळ बाळ छंदाला करूं काय ?**
**मोर मागतो नाचवाय**
**छंदखोरू बाळ, छंद घेतिला नाही त्याचा**
**चंद्र मागतो आकाशीचा**

माहेरीं जावं तरी आपली बाळाची दांडगाई आहेच—

**चुनियाच्या भिंती बाळ पाडीतसे किती**
**मामी येत्याती काकुलती**

हळुहळु कडेवरचं बाळ थोडं मोठं होऊन दुडूदुडू धांवू लागतं, पोरगा असला तर अंगणांत विटीदांडू, भंवरा वगैरे घेऊन खेळतो. मुलगी चूल-बोळकी मांडते—

**ल्येकीचा खेळ चूल भानुशी कोनामंदी**
**तान्ह्या बाळायाचा जंगी भवरा उन्हामंदी**

कधीं मुलगी मुलाचेहि खेळ खेळते—

लाडक्या लेकीनं मांडला भंडवाडा
बाळाच्या रथाशेजारी तिचा गाडा

हीं मुलं मोठी होऊन हूडपणा करूं लागतात. शेजारणीच्या खोड्याहि बाळ काढूं लागतो. आई ओशाळून म्हणते—

अवखळ माझा बाळ किती आवरूं शेजीबाय
भरल्या रांजनी धुतो पाय

असा बाळ लवकरच मोठा होतो, समजूतदारपणें वागतो. कामंधामं करूं लागतो. आई त्याला "बाळराज" म्हणून मोटेपणीच्या ओव्या गाते व मनांत म्हणते कीं माझा स्त्रीजन्म बाळ पोटीं आल्यानं सार्थ झाला आहे—

देवाचा देवपाट फुलानं शोभिवंत
नार पुत्रानं भाग्यवंत

आणि, संसाराचं भाग्य तान्हुलं असणं हेंच नाहीं काय?

—*—

# तान्हुलें

पुत्राचं फळ न्हाई देवाच्या ध्यानामंदी
नार दिलगिर मनामंदी १
पुत्राचं फळ न्हाई नारीच्या नावरसी
काय करील देवऋषि ? २
लेन्यालुगड्याची नार दिसती कळवंतीण
जल्मा येउनी न्हाई झाली बाळंतीण ३
लाख्या सावकार काय करावं लाखाला
पोटी न्हाई पुत्रफळ, धन व्हईल लोकाला ४
लाख्या सावकार घरीं लाखाचा दिवा जळे
पोटी न्हाई पुत्रफळ वसरी कोन खेळे ५
पोटी नाहीं पुत्र नार किती देखणी
लागे जिवाला घोकणी ६
आखाडी एकादस शिवरात्रीला पारणं
केली पुत्राच्या कारणं ७
देवाला देते मी वाण जवसाचं
पोटी बाळ दे नवसाचं ८
दे रे देवा मला संपत् थोडी थोडी
अंगनी खेळायाला भीमाअर्जुनाची जोडी ९
देवाला मी देते, वाण नारळाचं
कडेला देई तान्हुलं जावळाचं १०
दे रे देवा मला, नकोत सोनहोन
मांडीवरी देई इसाव्याला तान्हं ११
हौस मला मोठी, तान्ह बाळ तें असावं
दानं मुठीनं नासावं १२

पुत्राचं ग फळ, देवानं दिलं सहज
कडे घ्यायाला नको लाज १३
अप्रूबाव मेवा तान्या लेकराचा
माझा बत्तासा साकरेचा १४
तान्ह्यां लेकराचा, अप्रूपाव मेवा
कडे उचलून घ्यावा १५
पुत्राचं फळ, देव देतुया बळंबळं
सासुसासऱ्याची माझ्या पुन्याई सबळ १६
खाऊ पाठवीते, बत्तासा रेवडीचा
तान्हुला माझ्या ग आवडीचा १७
पालक पाळणा, येताजाता जुजु बाई
तान्ह्या बाळा नीज न्हाई १८
पालक पाळणा येता जातां करूं जुजू
बाळ गोपालक्रिस्ना निजू १९
रंगीत पाळना येताजाता हलवा
माझ्या राघुला बोलवा २०
रंगीत पाळणा खिडक्याखिडक्यांनी वेढियेला
तुझ्या आजानं धाडीयला २१
पाळन्याची दोरी उंबऱ्यावरी लोळे
ताईत बाळराय, पाळण्यामंदी खेळे २२
थोरलं माझं घर ओटीवर पाळणा
निजला आंत तान्हा २३
पालक पाळणा रंगमहाली करकरला
कंथ हौशानं झोका दिला २४
पाळन्याची फळी दिसती एकार
ऐका माझ्या तान्हीचा हुंकार २५
अंगडं टोपडं अंगीवरी निळ्या
कुना श्रीमंताच्या बाळा २६

अंगड्या टोपड्याचं बाळ खेळे वसरीला
सुर्व्या गगनी दीपला, रत्नं बाळाच्या टोपड्याला २७
अंगडं टोपडं टकुच्यावर टोपी
करते तुला लेकाचा साज, लेकी २८
ल्येकाचं नवस, लेकीबाळ तुला केलं
पानपुतळ्या नवं केलं कडीलंगर वाया गेलं २९
हातांत कडीतोडं कमरे कडदोरा सव्वाशाचा
ल्येक कुना हौशाचा ३०
हातांत कडीतोडं बाळ कुना राजाचं
नांव सांगतं आजाचं ३१
हातांत कडीतोडं, कमरे कडदोरा कवां केला ?
बाळ गुजराती लेणं ल्याला ३२
हातांत कडीतोडं दंडाला बाजुबंद
बाळाला दृष्ट होती लावा गंध ३३
साखळ्यावाळीयाचा पाय रुतला चिखलांत
बाळ खेळतं गोकुळांत ३४
साखळ्यावाळीयाचा बाळ चालतो तोऱ्यायानं
जाऊळ उडे वाऱ्यायानं ३५
साखळ्यावाळीयाचा नाद येतो झुनझुनं
मामाला पानी देतं तान्हं ३६
सुरतेचं मोती रुपयाला आठ
तान्हुल्याचा कडीकरदोड्याचा थाट ३७
साखळ्यावाळीयाचा नाद येतुया माझ्या कानी
आली खेळून माझी रानी ३८
साखळ्यावाळीयानं दणाणली माझी आळी
सावळे सोनूबाई नको खेळूं संध्याकाळीं ३९
दिस उगवला, किरनं टाकी सोप्यांत
तान्हुलं खेळे झोक्यांत ४०

दिस उगवला, किरनं टाकीतो चुड्यावरी
बाळ माझ्या कडेवरी ४१

सूर्यं उगवला, झाडाझुडाच्या वसरीला
तान्ह्यासाठी म्यां पदर पसरीला ४२

सूर्यं उगवला हात जोडियेते दोन्ही
सुखी राखावी माझी तान्ही ४३

माकनीचं पानी कुण्याच्या वाड्या जातं
तान्हं माझं बाळ जावळाचं तिथं न्हातं ४४

थोरलं माझं घर, पुढं लोटितां मागं केर
बाळं झाल्याती खेळकर ४५

माझ्या अंगनांत सांडिला तूपसांजा
तिथं जेवला बाळराजा ४६

माझ्या अंगनांत मोत्यापवळ्याची रांगोळी
बाळ बसला अंगुळी ४७

अंगुळीला पानी इसानाला गंगा
करा अंगुळ श्रीरंगा ४८

अंगुळीला पानी हंडा ठेवते कुलपाचा
बाळ न्हातो झुलपाचा ४९

अंगुळीला पानी हंडा तपेलं न्हानीपाशी
तान्हं बाळ झुलपाला लिंबू घाशी ५०

मोठंमोठं डोळं भुंवया बारीक
बाळाचं रूप मावळ्यासारिखं ५१

सावळ्या सुरतीला न्हाई नटाया लागत
माझा बाळ, लाल केवडा बागेत ५२

रंगीत भंवऱ्यानी बाजार झाला लाल
तुला घेऊन देते चल ५३

अवखळ माझा हरी, करते सयांना ताकीत
धोंडं रस्त्यानं फेकीत ५४

केळी नारळ मोडून चिन्नीदांडूला जागा केला
बाळ अवखळ जलमला ५५

हातांत चिन्नीदांडू, काखेला बैलगाडा
आला खेळून दृष्ट काढा ५६

अवखळ माझा बाळ किती आवरूं शेजीबाय
भरल्या रांजनी धुतो पाय ५७

चुनियाच्या भिंती बाळ पाडीतसे किती
मामी येल्याती काकुळती ५८

दळनाची पाटी ठेवुं मी कोणीकडे
राघु रांगतो चहुकडे ५९

घागऱ्या घुळुघुळु, नको येऊ मागेमागे
तुला सयाची दृष्ट लागे. ६०

घागऱ्या घुळुघुळु, दनानला माझा वाडा
चाले बाळाचा बैलगाडा ६१

जाईच्या शेजारी, काय गुलाबा तुझी हवा ?
तान्हाबाळ बहिणी शेजारी भाऊ नवा ६२

माझ्या अंगनांत खेळे कुनाचा जेठयामाल
अंगी कुसुंबी, झगा लाल. ६३

काळी चंद्रकळा, नेसली धडीवर
मुलगा गुजर कडीवर. ६४

छंदखोरू बाळ, छंद घेतो नाहीं त्याचा
चंद्र मागतो आकाशीचा ६५

छंदखोरू बाळ, छंदाला देऊं काय
मोर मागतो नाचवाय ! ६६

छंदखोरू बाळ, तुझ्या छंदाला डाळगूळ
सोड निरीचा माझ्या घोळ. ६७

मावळण आत्याबाई, तुमच्या हातीं दूधपेढं
भाचा खाऊ मागाया येतो पुढं. ६८

छंदखोरू बाळ, छंदाला देते वाटी
सोड गळ्याची माझ्या मिठी. ६९
लेन्यालुगड्याची नार, काय लेन्याचा तेगार
माझा बाळराज जरीचा पदर ७०
लेन्यालुगड्याची नार, कुनी पुसंना लेन्याला
महिनं किती झालं, कडीच्या तान्ह्याला ? ७१
धन ग संपदा, तुझ्या सांदीचा घ्येरूसा
तान्हा माझा राघू खेळे गलीला आरसा ७२
धन ग संपदा, कुनी पुसंना मालाला
महिनं किती झाले कडीच्या लालाला ७३
धन ग संपदा, तुझ्या सांदीचं कोंदन
तान्हा माझा राघू रासबिंदीला मंडण ७४
लुगडं घेतलं, काय होतंया दीड[illegible]याला
पदर घालावा कडीच्याला ७५
धनसंपदेची नार, मला जातीया खेटून
नेणन्ता बाळ माझा आयना दाविते उठून ७६
तिन्हीसांज झाली सांजाई तिचं नांवु
बाळा बाहेर नग जाऊं ७७
तीनीसांजा झाल्या तीनीच्या तीन परी
घरी जाउळाचा हरी ७८
लोक पुशित्यात, कुनाचं हें घर
बाळराय माझा जाई-मोगरा समोर ! ७९
मध्यान्हरात्रीचं रडतं माझं तान्हं
रात कळंना चांदण्यानं ८०
बोबड्या बोलाचं येतं मला हंसं
बाळा फिरून बोल तसं ८१
दुपारच्या कामा एवढी रात कांहो झाली
तान्हुल्यानं रडी केली ८२

हातात कडीतोडं कमरे कटदोरा सरीगोफ
सया पुशिल्यात कुना द्दौशाचा लेक ८३

उन्हाळ्याचं ऊन थंडीचा गारवा
तान्हुल्याला घेऊं रेशमी दारवा ८४

लाडक्या लेकीनं मांडला भंडवाडा
मुलाशेजारी तिचा गाडा ८५

लेकीचा खेळ चुलभानुशीं कोनामंदी
तान्ह्यावाळायाचा जंगी भंवरा उन्हामंदी ८६

लेकुरवाळीयेच्या कामाच्या हेळणा
जात्याशेजारी तान्ह्याचा पाळणा ८७

लेकाचे हे खेळ, विटी दांडूच्या लगोऱ्या
माझ्या राघूच्या चेंडूला घागऱ्या ८८

माळ्याच्या मळ्यामंदी माळी बाळाला येऊं दीना
तान्हुलं माझं कळी जाईला राहुं दीना ८९

विदीनं खेळे राघु विदाई झाली लाल
मंदिलाचं दिलं पाल ९०

किती नटशील जून जरवट केकती
बघ राघूला रंग किती? ९१

साखळ्यावाळीयाची मैना येते दनदना
नाद येतुंया माझ्या काना ९२

समूरल्या सोप्या कुनी मांडीला ताटपाट
तान्हुल्याचा माझ्या जेवनाचा थाट ९३

बाळा दृष्ट झाली माझ्या सुरतीच्या सोन्याला
इसुबंधासाठी गेला जासूद पुन्याला ९४

दृष्ट झाली म्हनु झालीया तान्या सख्या
विसुबंधाचा आनुं वोफा ९५

दृष्ट झाली म्हनु गोऱ्यापऱ्यास काळ्याला
कुनी चंद्र माझा न्याहाळीला ९६

दृष्ट झाली बाळा, अंगनी अंग धुता
गोऱ्या माझ्या रजपुता ९७
अंगनी खेळत्यात सयाचे गोरे दाजी
झग्यापोलक्याची मैना माझी ९८
लेकाचा खेळ खेळून येते लाडी
रथामागं तिची गाडी ९९
बिदीनं खेळतात, बिदाईचा खेळ मोडा
मैना भुकेली घरी धाडा १००
माळिणीच्या पोरी, फुलं तोड कूपाकाठी
बाळीच्या साजासाठीं ! १०१
मावळण आत्याबाई तुमच्या ओटीला सुपारी
भाचा लाडका उड्या मारी १०२
सुरतेचं मोती रुपयाला सात
चिमण्या बाळाचा अंगठीजोगा हात १०३
संभाळ शेजीबाई दारीच्या जाईजुई
बाळी अवखळ, हात लावी १०४
घडीघडी लिंबलोण उतरते कोण
बाळाची मावशी, मावळण १०५
घडिघडी लिंबलोण उतरते तुझी आत
बाळा तुझं जावळ किती दाट १०६
जळो जळो दृष्ट, मिठाच्या झाल्या लाह्या
दृष्ट झाली बाजीराया. १०७
जळो जळो दृष्ट, मिठाचं झालं पानी
बाळ कोमेलं फुलावानी. १०८
दृष्ट झाली म्हनु, मीठ मोहऱ्या काळी माती
बाळा दृष्ट झालीया काळ्या राती १०९
जळो जळो दृष्ट, मीठ मोहऱ्या पिवळ्या मेथ्या
तान्ह्याला पहाया, कोन पापिनी आल्या होत्या ११०

दृष्ट मी काढते, मीठ मोहऱ्या कांदा
दृष्ट झालीया माझ्या चांदा १११
दृष्ट झाली म्हनु झाली तान्ह्याच्या जावळा
माझा निशिगंध कोवळा ११२
दृष्ट झाली म्हनु झाली तान्ह्या बाळा
आणु मीठ मोहऱ्या बिबा काळा ११३
माळ्याच्या मळ्यामंदी इसुबंधाचे वेल गेले
बाळाकारनं गोळा केले ११४
दृष्ट म्हनु झाली पाळन्यावरनं गेली
माझ्या धनियांनी लिंबलोणाची गर्दी केली ११५
दृष्ट झाली म्हनू झाली पाळण्याच्या फळी
आंत निजली पुतळी ११६
जळली माझी दृष्ट गेली पाळन्यावरून
तान्हुली उभी कळस धरून ११७
दृष्ट मी काढीते पाळन्या कळसासुद्धां
जावळाची यसवदा ११८
बाळा दृष्ट झाली, झालं दृष्टीचं कोळसं
मोडलं बाळाचं बाळसं ११९
बाळा दृष्ट झाली कुनाचं नांव घेऊं
विसुबंधाला किती जाऊ १२०
बाळा दृष्ट होती होती जवां तवां
विसुबंधाला जाउं कवां १२१
कुना पापिनीची दृष्ट पाळन्यावरनं गेली
वाकी दंडाची सैल झाली १२२
दृष्ट झाली म्हनु लावा भुंवयामंदी काळं
बाळाला दृष्टीचा आला जाळ १२३
जळो तुझी दृष्ट, तुझ्या डोळ्यांत पडूं माती
तान्हा माझा बाळ कोमेला एक्या राती १२४

शेजी लेणं लेती इस पुतळ्या वर मोती
कडेवर बाळ मला सोभा देतं किती १२५

संभाळ शेजीबाई दारीचा सवजा
लई अवखळ माझी गिरजा १२६

शेजारीणबाई नको बोलूं तूं तुटून
तान्ही माझी मैना आली झोपेची उठून १२७

शेजी शिव्या देते माझ्या बाळाला देखून
तिच्या तोंडावर देते कडूलिंब मी फेकून १२८

शेजी शिव्या देते, तूं आणिक दे बाई
तान्ह्या माझ्या राघूला, चिऱ्याला भंग न्हाई १२९

शेजी शिव्या देते, तिची तिला मुभा
माझा बाळराय, कडव्या लिंबाऱ्याखाली उभा १३०

खेळुनी मेळुनी बाळ उंबऱ्यांत बसे
सोन्याचा ढीग दिसे १३१

अंगनी खेळे तान्ही कुनाची बछडी
सोन्यामोत्याची खिचडी १३२

देवाचा देवपाट, फुलानं शोभिवंत
नार पुत्रानं भाग्यवंत १३३

—*—

# बाळराज

मुलगा हळुहळू मोठा होतो, पोरपणांतून वयांत येतो. गुरं राखणें, शेतीभाती, मोट चालवणं, मळे शिंपणं साऱ्याला तो पुढें होऊन बापाला मदत करूं लागतो. साहजिकच ओव्यांतूनहि हींच वर्णनें येतात. सुशिक्षित समाजांत, मुलगा मोठेपणीं शिकेल, पगारदार होईल, नोकरचाकर ठेवील, अशीं मुलांबद्दलचीं भावी सुखचित्रें मनांत रंगत असतात. पण खेडुतांत मुलांसंबंधीं अपेक्षा विशेष त्या काय असणार? तो उत्तम "गोपाळ" ऊर्फ गवळी होईल, घोड्यावर बसून शेतामळ्यांतून ऐटीनं हिंडेल, मोटेवर गाणीं गाईल, बाळ बुद्धिमान् निपजला तर कुलकर्णी होईल, पैसेवाला झाला तर मोठा सावकार होऊन कुळांना पावत्या फाडून देईल, त्याला पहायला, भेटायला मोठमोठे लोक येतील, अशा प्रकारच्या साध्याच अपेक्षांचीं सुख-स्वप्नें खेडूत स्त्री मनानं पहात असते. अर्थात् ओव्यांतूनहि याच अपेक्षा स्पष्ट झाल्या आहेत. एक आई कर्तबगार मुलाचें वर्णन करीत आहे—

**धाकुटा कुलकर्णी बसे लोडाला टेकूनी**
**माझा राघू देतो पावत्या फेकूनी**
**भरल्या कचेरींत कोन सावकार हासतो**
**नेनन्ता बाळराय बाजिंदा दिसतो**

बाळाचं रूपहि मोठं चित्तचोर आहे. काळासावळा असला तरी देखील तो किती गोजिरवाणा दिसतो—

**सावळी सुरत अशी पाहिली नव्हती कधी**
**बाळ सुरमा लेतो गंधाच्या मधी**

अशा प्रकारचीं पुत्ररत्नं असणं हेंच केवढं भाग्याचं! शतदारिद्र्य घरांत नांदत असलं तरी आईला त्या दैन्याची आतां फिकीर वाटत नाहीं! दोन मुलगे मोठे झाल्यावर कसली गरिबी?

**दुबळंपन माझं, न्हाई भ्याले नाचाराला**
**दोन्ही माझी बाळं येतील आकाराला**

एकादे वेळीं गरीब किसान पैशाच्या तंगीनं त्रासून गेलेला असतो. अशा वेळीं पत्नी धीर देते—

**ल्येकाच्या आईला कशाचा दुकाळ**
**हौशा किती सांगुं, पानी हौदाला बखळ**

मुलगा असणं म्हणजेच दारीं पाण्याचा हौद भरलेला असल्यासारखी समृद्धि आहे हा भावार्थ हृद्य आहे.

आषाढ—श्रावण हे दोन महिने शेतकऱ्यांना नेहमीं जड जातात. मागील वर्षाची बेगमी संपत आलेली व सुगीला तर अवकाश असतो. पण आतां बरोबरीचे मुलगे झाल्यावर या दोन महिन्यांचें भय काय वाटणार? एक स्त्री अभिमानानं म्हणते—

**आखाड सरावन, दोनी महिनं मोडीचं**
**माझं दोन ल्येक हौशाच्या जोडीचं**

असे कर्ते पुत्र असल्यावर कशाची चिंता! एकादे वेळीं कोणाला पुष्कळ मुलगे असूनहि ते सारे घरबशे, दुर्व्यसनी निपजतात. पण एकाद्या कुटुंबाचा एकच पुत्र असूनहि कर्तबगार निपजतो व सारी कुटुंबनौका चालवतो. अशा सुपुत्राबद्दल आई कौतुकानं म्हणते—

**लोकाला लई ल्येक, माझा एकला शिरहरी**
**जहाजाला लावी दोरी**

मुली किती जरी असल्या तरी कुलदीपक पुत्राची त्यांना सर येत नाहीं कधीं! हें ओळखून आई म्हणते—

**लई झाल्या लेकी, झाली सोइऱ्याची धन**
**एकला माझा चंद्र वाड्याला राखयेन**

हा मुलगा मोठा होत होत सगळ्या गोष्टींत हुशार होऊं लागतो. कर्त्यासवरत्या मुलाच्या किती म्हणून गोष्टी सांगाव्या? व्यवसायधंद्यांत तो मन घालूं लागतो, नांगरट करून बापाला विसावा देतो—

**पहिला झाला ल्येक बापाळा पडली उशी**
**उभा नांगराच्या ताशी**

धनगराचा धंदा असला तर हा एक कुशल मेंढपाळही बनतो—

**उन्हाळा पावसाळा बोरीबाभळ्या वेंधीतो**
**दल मेंढ्यांचं जगवीतो**

शेतामळ्यांतून हा पोरगा राबूं लागला कीं आईला केवढी धन्यता वाटूं लागते—

**शेतांमळ्यां जाते, ओटीला माझ्या भाजी**
**बाळा कमाई पाहते तुझी**

या रानांवनांत रात्री पहांटे बाळाला कामानिमित्त येजा करावी लागते. सापकिरडूं वगैरेचें भय अंधारांत तर असायचंच. आईचं मन शंकाकुल होतं व खुद्द नागिणीलाच प्रार्थना करूं लागतं—

**नागिनी पद्मिनी, पसरूं नका वाटं तिठं**
**माझा बाळराय येतुंया अवशी पहांटं**

पुत्रवात्सल्यांतून निर्माण झालेली ही श्रद्धा किती मधुर वाटते! जणुं नागिणीला प्रार्थना केल्यानं सर्पांची ये जा बंदच होणार आहे! आईला या हुशार मुलाबद्दल कोणती हौस वाटते?

**हौस मला मोठी हंड्याशेजारी तपेल्याची**
**माझ्या बाळाची, दारी अंघुळ वकीलाची**

कधीं कधीं ही हौस [क्वचित्च] पुरी होते. मोठमोठ्या वकीलांना बाळ आपल्या हुशारीनं जिंकून घेतो—

**तीसाचा एक घोडा, त्याला वीसाचा तोबरा**
**माझ्या बाळाला पाहून झाला वकील घाबरा**

अशा प्रकारें मुलाच्या कर्तृत्वाबद्दल अनंत गीतें आहेत व त्यांतून मुलाबद्दलच्या अपेक्षा समजून येतात.

आणखीहि एक वैशिष्ट्य दिसून येतं. मुलगा उत्तम पहिलवान व्हावा, त्यानं कुस्त्या वगैरे मर्दानी खेळ खेळावे, त्यानें मजबूत होऊन शिकार, घोडदौड वगैरे गोष्टींत लौकिक मिळवावा अशीहि या भाबड्या आईची प्रामाणिक इच्छा दिसून येते. बाळ पहिलवान होणार असेल तर त्याला दुधाची, खारीक-खोबऱ्याची, खव्याची वगैरे पौष्टिक न्याहरी ही लागणारच.

ही आई किती आपुल्कीनं ही खाण्यापिण्याची मिजास राखते हें पहाण्या-सारखें आहे—

**सकाळच्या पारी आकडी दुधाचा करते खवा**
**माझ्या बाळाची कुस्ती नेमीली परगावा**

या चिमण्या कुस्तीगीराच्या कधींकधीं आईला मनधरण्यादेखील कराव्या लागतात. कशाबद्दल बरें ?—

**आकडी दुधाचा तांब्या ठेवते आडभिंती**
**पहिलवानाच्या मित्या किती ?**

या छंदानं पोरगा गोटीबाज व रुंद छातीचा बनतो. त्याच्या मजबूत बांध्याला दृष्ट होईल काय, असा विचार आईच्या मनांत येऊं लागतो—

**अंगांत अंगरखं, कुडतं छातीला उसवलं**
**कुठं मानिक दृष्टावलं.**

कधीं घरांत भाऊभाऊ सारख्या उंचीचे व सारखेच देखणे दिसतात. बापाबरोबरीनं दिसणारे हे मुलगे एकदम बाहेर जाऊं लागले तरी आईच्या व्याकुल मनांत शंकाकुशंका येऊं लागतात. दृष्ट नाहीं का लागणार अशा तजेलदार पोरांना कुणाची ? ती म्हणते—

**एकामागे एक कुठं निघाला बानावानी**
**सुरत खाऊंच्या पानावानी**

अशा प्रकारें मातृहृदयांत उठणाऱ्या सर्व तऱ्हेच्या विचारांचें स्पष्ट दर्शन या ओव्यांतून होतें. कांहीं ओव्या कोमल भावनांचा आविष्कार करणाऱ्या आहेत. उदा० उन्हाळ्याच्या दिवसांत चैत्राचं ऊन म्हणजे अंगाची काहिली करून टाकीत असतं. अशा भरदुपारीं उन्हातान्हांत शेतांत राबणाऱ्यांना किती त्रास होत असेल ? आईचा जीव हें पाहून थोडाथोडा होतो. ती घरधन्यांना विनंति करते—

**दुपारचं उन, औतं सोडावी माळाची**
**सुरत कोमेली बाळाची**

एके ठिकाणीं मुलाला किती गोड उपमा दिली आहे—

**भजनाला उभा माझा फुलांचा गजरा**
**माझा बाळराय घाली सभेला मुजरा**

अशा प्रकारें हळुहळू मुलगा मोठा होतो, त्याची उंची वाढते व कर्ता मनुष्य म्हणून लोक त्याला ओळखूं लागतात. ओव्यांतून त्याला पुष्कळदां 'रावण*' हें नांव दिलेलें दिसतें—

**सावळ्या सुरतीवरी मोड्या उठल्या एकदोन**
**बाळ सुरतीनं रावण.**

अशा या भरज्वानीच्या राघूला एकादी "गिरेबाज" मैना नादीं लावूं पहाते व आईला धास्ती वाटूं लागते. बाळ तालमीचं निमित्त करून रोज तिकडे जाऊं लागतो. आई मनांत म्हणते—

**नवतीची नार तुझी नवती जालीम**
**तुझ्या पानियाच्या वाटे माझ्या राघुची तालीम.**

परंतु तरुणपणांत हे प्रकार व्हायचेच, आतां बाळ मोठा झाला, त्याचं लग्नाचं वय झालं असा विचार आई करूं लागते. एक छोटी सून आणायचे बेत सुरूं होतात व बाळराज लवकरच गृहस्थाश्रमी होतो. आईला किती हौस वाटते पहा—

**हौस वाटती, सत्तेनारायना, खाऊ तुझी पोळी**
**पूजेला बसेल सून गुजर चाफेकळी**

मग मुलाचा संसार सुरूं होतो. सुनेचें नवें जीवन सुरूं होतें व त्यांत संसाराचे अनेक अनुभव मिसळूं लागतात.

असा हा तरुण मोठा होतो, सारी घरची जोखीम घेतो, शेतांमळ्यांची कामें करतो, आईच्या अपेक्षा पुऱ्या करतो, वडिलांना विसांवा देतो. असा मुलगा देवानं दिला तर आणखी काय पाहिजे!

---

*रावण ही उपमा आपण 'राक्षस' या वाईट अर्थी वापरतों, परंतु या ओव्यांतून मात्र "रावण" म्हणजे रुबाबदार, दुसऱ्यावर छाप ठेवणारा, कर्तबगार पुरुष अशा अर्थानें हा शब्द वापरलेला अनेकदां दिसून येतो.

**थोरला माझा लेक, वाड्याच्या बुरुज**
**त्याच्या जीवावरी न्हाई कुणाची गरज**

संसारांतल्या सुखाची सीमा कोठली, तर अशा प्रकारचा कर्तृत्ववान्, यशवंत मुलगा लाभणं हीच ! अशा पुत्रदर्शनानें धन्य झालेली माता सहज उद्गार काढते—

**हौस मला मोठी स्वैपाकामंदी हंडा**
**ताईत बाळराज माझा, सर्व्या संसारामंदी झेंडा !**

किती यथार्थ शब्दांत यशस्वी पुत्राचें वर्णन आहे हें !

—*—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
७८३९८ दि:
१८८९

# बाळराज

ल्येकाच्या आईला, नको म्हनूसा नाचारीन
पुत्राच्या जीवावरी मोतीपवळ्याची जव्हारीन १
दुबळंपन माझं न्हाई भ्याले नाचाराला
दोन्ही माझी बाळं येतील आकाराला २
ल्येकाच्या आईला, तिला कशाचा दुकाळ
हौशा किती सांगूं ? पानी हौदाला बखळ ३
दुबळंपन माझं जनांलोकाला जाहीर
माझा बाळराय हंडा मालाचा भाईर ४
दुबळंपनाचं दीस आल्याती सरत
बाळं माझी दोन्ही उद्यां होतील करतं ५
आखाड श्रावन दोन महिने मोडीचं
माझं दोन लेक हौशाच्या जोडीचं ६
आखाड श्रावन दोन महिनं कडाडाचं
हौशाच्या जोडीला दोन दागिने जडावाचं ७
लई झाल्या लेकी झाली सोईऱ्याची धन
एकला माझा चंद्र वाड्याला राखन ८
डागडागिन्याची न्हाई मी आशा केली
पोटीच्या कमळावरी भिस्त दिली ९
नको पापिनी दृष्ट लावू माझ्या तांदुळाच्या ढीगा
बापाशेजारी ल्योक उभा १०
पहिला झाला ल्येक कुणी लाविली त्याची जोड
कुशी पडला उजेड ११
पहिला झाला ल्येक, बापाला पडली उशी
उभा नांगराच्या ताशी १२

बाळराजा पाहून हरली तहानभूक
सोप्या बैसले बापलेक १३
बसाया बसकुर जान टाकते चकराचं
लेक माझ्या सावकाराचं १४
एकामागं एक माझं येत्यात देसमुख
बाळाना देखून जातीया तहानभूक १५
एकामागं एक येत्यात भुईफोड
धाकल्याचं रूप गोड १६
एकामागं एक कुठं निघाला वानावानी
सुरत खाऊच्या पानावानी १७
एकामागं एक नका येऊं धडधडी
भीम-अर्जुनाची जोडी ! १८
साळेला जातां जातां पोरं येत्यात तपासाला
माझा बाळराय घेतो कंदील अभ्यासाला १९
जिरेसाळीचा भात पहाते येता जातां
बाळ साळेला गेला होता २०
बाळा दृष्ट झाली शाळेला जातां जातां
जरीपोशाख केला होता २१
पोथी पुस्तकांचं मांडीला झालं वझं
बाळा किती ग्यानी हृदं तुझं २२
गाडीमागं गाडी, मधल्या गाडीचा धनी कोण
सावळा बाळराय हिरव्या टोपीचा कारकून २३
पाच परकाराचं ताट करीते ताजंताजं
मामाच्या पंगतीला जेवतं बाळ माझं २४
शाळेला जातो बाळ, त्याच्या दवतीपुढं मोर
सयानु माझं दैव किती थोर २५
हातांत छत्रीकाठी, तिला रुप्यांची मूठ
आला फिरूनी माझा जगजेठ २६

माझ्या अंगनांत परवर झाला काळा
बाळरायाचं इष्टमित्र झालं गोळा २७

मोठंमोठं लोक, कचेरीच्या तोंडी
बाळरायानं दिली राजाशेजारी मांडी २८

दवात लेखनी उभा दरवाजाच्या तोंडी
बाळ कुळांची नाव मांडी २९

धाकुटा कुलकर्णी, बसे लोडाला टेकुनी
माझा राघुबा देतो पावत्या फेकुनी ३०

दुरून ओळखते, माझ्या बैलाचं ग कान
माझा बाळराज, संगं बेगडीचं पान ३१

उन्हाळा पावसाळा, बोरीबाभळ्या वेंधीतो
दल मेंढ्यांचं जगवीतो ३२

शेतांमळ्या जाते, ओटीला माझ्या भाजी
बाळा कमाई पाहते तुझी ३३

हौस मला मोठी, हंड्याशेजारी तपेल्याची
दारी अंघुळ वकीलाची ३४

तीसाचा एक घोडा, त्याला वीसाचा तोवरा
बाळाला पाहून झाला वकील घाबरा ३५

थोरल्याचं काम, येईना मधल्याच्या मना
ऊठ धाकल्या, कारकुना ३६

भरल्यां कचेरीत कोन सावकार हांसतो
नेनन्ता बाळराय बाजिंदा दिसतो ३७

चाल तूं शिंगीबाई काळी माती टापाची
वर स्वारी नेनंत्याची ३८

अंघुळीला पानी हंडा, घंगाळ इसानाला
राज दंडतं भूषनाला ३९

माझ्या सोप्यामंदी पानइड्यांची झाली दाटी
माझ्या ग बाळाच्या, वकील आला भेटी ४०

अंगांत अंगरखं, कंबर गोलदार
धोतराच्या निऱ्या घालतो चौदाचार ४१

परटीन धुनं धुते, लिंवं देते देठाची
बाळराजाची दुही धोतरं काठाची ४२

अंगांत अंगरखं वर कवज्या हिरवागार
उभा पेठेला माझा जमादार ४३

साखरेचा लाडू तुपाच्या संगतीचा
माझा बाळराज थोराच्या पंगतीचा ४४

हौस मला मोठी हंडा परात सैपाकाला
झोपा बाळाच्या बैठकीला ४५

चईताचं ऊन खडकाची झाली लाही
माझ्या बाळाच्या गोरेपनाची गत काअी ? ४६

उन्हाळ्याचं ऊन लागतं चईताचं
तोंड कोमेलं ताईताचं ४७

उन्हाळ्याचं ऊन लागतं माझ्या लाला
बांध पटक्यावरी शेला ४८

उन्हाळ्याचं ऊन घडी तापली धोतराची
सुरत कोमेली चातुराची ४९

चईताचं ऊन औतं सोडावी माळाची
सुरत कोमेली बाळाची ५०

तांबडा मंदील गुंडावा माझ्या लाला
दृष्ट व्हईल, लावु काळं गाला ५१

तांबडा मंदील गुंडीतो तामनांत
माझ्या राघुबाची बैठक बामणांत ५२

तांबडा मंदील बांधतो फुलावाणी
दिसे राजाच्या मुलावाणी ५३

तांबडा मंदील देते फिरकी फिरकीला चांदु
तुला शोभेल तसा बांधु ५४

तांबड्या मंदिलाला रुपै दिले साडेआठ
बाळा तुझी शोमल्याजोगी पाठ ५५
तांबड्या मंदिलाला पैका पडेल त्यवढा देते
लाल्या गुजरा तुला घेते ५६
शिरी मंदील लेतो, बाळराज देखणा
शहराचा राह्यनार, खेड्यांत झाकंना ५७
भजनांत उभा माझा फुलाचा गजरा
बाळराज घाली सभेला मुजरा ५८
हातांत टाळवीणा उभा राहिला भजनाला
गळा राघुबा सजणाला ५९
पखवाजावरी हात टाकीतो नीटनीट
तुझी शीणली कवळी बोटं ६०
साद देणारापरीस गीत गानारा हरदासी
गळा बाळाचा चवरसी ६१
पानखातवन्या, पानं खाशील त्यवढी देते
लाला गुजरासाठी पानमळ्याची खोती घेते ६२
पानखातवन्या, माझ्या मुठींत पानं ताजी
बाळराजाच्या डौलाला दृष्ट माझी ६३
पानंखातवन्या, तुला पानाला काय तोटा
तुझ्यासाठी बाळा, पानमळ्यांत घेते वाटा ६४
सावळ्या सुरतीचं किती करू कवतीक
बाळ माझा लऱ्हाळा लवचीक ६५
सावळी सुरत अशी पाहिली न्हवती कधी
माझा बाळराज सुरमा लेतो गंधामधी ६६
सावळ्या सुरतीवर नार टाकिते झगझाप
माझ्या ग बाळाचं अजून बाळरूप ६७
सावळ्यासुरतीवरी मोड्या उठल्या दोनतीन
बाळ सुरतीनं रावण ६८

गावाला गेला बाळ कंठीचा ताईत
न्हाई शहराची माहीत ! ६९
गावाला गेला राघू गावक्या होऊं नगं
वाट बघाया लावू नगं ७०
गावाला गेला लाल कंठीचा दिसं पदर
लोक पुशित्यात, वाणी हाई कां गुजर ? ७१
गावाला गेला बाळ, सुन्या दिसत्यात गल्ल्या
कुठं गेलाया माझा गलबल्या ? ७२
गावाला गेला बाळ माघारा येईल कवां ?
माझ्या सराचा गोफ नवा ७३
कुस्तीच्या फडावरी रणहलगीला जागा दावा
शीण बघुन कुस्ती लावा ७४
माझ्या वाड्यावरनं गेल्या दुधाच्या घागरी
माझ्या पैलवानाच्या बिगारी ७५
माझ्या दारावरनं लेजीम गेलं नऊ
रणहलग्या बिगी बिगी जेऊ ७६
कुस्तीच्या फडावर दंड वाजे तडातडा,
लिंबु नारळ आधी फोडा ७७
अंगांत अंगरखं कुडतं छातींत उसवलं
कुठं मानिक दृष्टावलं ७८
कुस्तीच्या फडावरी दंड वाजतो तोफखाना
कुस्ती गाजवून गेला कुन्या माउलीचा तान्हा ७९
कुस्तीच्या फडावरी शिंग वाजीव गुरवा
माझ्या बाळाला सुरतीसारखा पेहरावा ८०
गावीच्या परावर कशाची लटपट
माझ्या राघूबाचं कुनी धरीना मनगट ८१
कुस्तीच्या फडावर शिंग वाजे दमायानं
माझ्या राघुबाला दिली हुशारी मामानं ८२

माझ्या दारावरनं दुधाची गेली केळी
राघुबानं माझ्या पैलवानानं न्याहारी केली ८३
माझ्या दारावरनं पैलवानाची जोडी गेली
बाळरायानं माझ्या निरशा दुधाची न्याहरी केली ८४
दुधाचा तांब्या, तुझ्या तालमीच्या खुणा
गोटी उचल पैलवाना ८५
आकडी दूध बाळाचा हाच मेवा
कुस्ती नेमली परगांवा ८६
खारीक खोबरं, बाळाची माझ्या न्याहारी
कुस्ती नेमिली खेड्यावरी ८७
अंगांत अंगरखं जुंधळी त्याचा वाण
माझा बाळराज आकडी दुधाचा पैलवान ८८
अंगुळीला पानी हंडा ठेवीते परसूदारी
पैलवानाची रुंदी भारी ! ८९
अंगुळीचं पानी तापून झालं रवा
गनीस बाळराज, इहीर बारवे गेला कवां ? ९०
अंगुळीला जातो हाती धोतराचा पिळा
संगं मैतरांचा मेळा ९१
अंगुळीला जातो, हाती धोतराची घडी
संगं मैतरांची जोडी. ९२
माझ्या दारावरनं कोन गेला छडीवाला -
माझ्या बंधुजीचा जोडीवाला. ९३
माझ्या अंगनांत, काठेवाडी दोन घोडी
लाडक्या लेकांची आली जोडी. ९४
अंगुळीला जातो, हाती घडी धोतराची
बाळरायाला माझ्या दृष्ट हुईल पाखराची ९५
अंगांत अंगरखं, छातीला पिवळी माती
गोरेपणाला दृष्ट होती. ९६

बाळ दृष्ट झाली, अंगनी अंग धुतां
परवरी गंध लेतां. ९७
दृष्ट झाली म्हणु कचेरी जाताजातां
मामासंगट भाचा होता. ९८
दृष्ट मी काढीते, मीठमोहऱ्या पिवळा धना
दृष्ट झाली बाळा पानं परयाची खेळतांना. ९९
गानारापरीस साथ देनारा मागेमागे
माझ्या राघुवाला सयांची दृष्ट लागे. १००
दृष्ट झाली म्हनू, डोळ्यां पडूं मीठमाती !
मावळभाचीयाची जोडी अंगुळीला गेली हुती १०१
दृष्ट झाली म्हनू, मीठ मोहऱ्या चुलीबाई
माझा बाळराज चंद्र कोमेला करूं काई १०२
दृष्ट झाली म्हनू, मीठ मोहऱ्या मिर्च्या नऊ
नवतीला दृष्ट झाली, कुन्या नारीचं नांव घेऊ १०३
जळुजळु दृष्ट घोड्यावरच्या घोडेस्वारा
माझ्या ग बाळाचं केस कुरळं, बांधा गोरा १०४
दृष्ट झाली म्हनु धोंडा फुटला बारवेचा
माझा बाळराज घड कोमेला नारळीचा १०५
हातांत टाळवीणा दिंडी निघाली कुन्या गावा
माझ्या बाळराजाला हुते दृष्ट, कौळं लावा १०६
दृष्ट मी काढीते मीठमोहऱ्या घोळून
माझा बाळराज आला तालीम खेळून १०७
बाळाला दृष्ट होते, माझ्या तालीमतालीयाला
तीन वाटंची घेते माती जाते लिंबाच्या पालीयाला १०८
सावळ्या सुरतीवरी मिसरूड पालापाला
गनीस बाळराय शेवगा भराला माझा आला १०९
सावळ्या सुरतीवरी अबीर ल्याला नीट
राघुवाच्या माझ्या भुंवईच्या कोरा दाट ११०

हाताचा केला पाळना, नखानेत्राच्या केल्या ज्योति
बाळराज सांग ! तवा अस्तुरी कुठं होती ? १११
सोळा वरुषाचा पुत्र, मग झाला ढाण्या वाघ
त्याला वयाचा येतो राग ११२
नवतीच्या नारी तुझी नवती जालीम
तुझ्या पानियाच्या वाटे माझ्या राघूची तालीम ११३
हौस वाटयेती सतनारायणाची खाऊ पोळी
पूजेला बसेल सून गुजर चाफेकळी ११४
अंगनांत उभी, कोन आखूड पदराची
रानी तान्हीया गुजराची ११५
तीस पुतळ्याची माळ सून गौर लेती
कंगनी हिऱ्याला ढाळ देती ११६
आडपडद्यानं सासू बघती सुरत
राघूबाची माझ्या कृस्नदेवाची मूरत ११७
पाया पडू आली धाकल्याची विगीबिगी
थोरल्याची मागं उभी ११८
सोळा वरुषाचा पुत्र माता म्हनिते माझामाझा
आपुल्या कामिनीचा झाला राजा ११९
नवतीच्या नारी माझ्या दारांतून ऊठ
येई नवतीचं जायफळ व्हईल नवतीची लूट १२०
एकुलता एक त्याला हवाला हरीचा
तान्हा माझा राघु मोड बुडल्या घरीचा १२१
लक्ष्मी आई आली जराशी दम धर
माझ्या बाळायाचं दाविते देवघर १२२
सावळी सुरत सासू बघते चोरून
माझा बाळराज चंद्र काढिला कोरून १२३
महिन्याच्या संकष्टीला बाळा सुकलं तुझं ओठ
चंद्र मोहरीला ऊठ १२४

भरली कृस्नाबाई पानी लागे दुही थड्या
बाळ पव्हनार, टाकी उड्या १२५
भरली कृस्नाबाई पानी लागलं ओताला
सोन्याचं कडं माझ्या राघूच्या हाताला १२६
तांबोळीनबाई पानं देई वीसतीस
बाळराय घोडीवर गर्नीस १२७
तांबोळीनबाई पानं देई अणीदार
बाळराय घोडीवर जमींदार १२८
मुंबईची मुंबादेवी, तुला सोन्याचं कमळ
तुझीया नगरी, माझ्या राघूला संभाळ १२९
लोकाला लई लेक, माझा एकला शिरहरी
जहाजाला लावी दोरी १३०
लावणीचा आंबा, पानी घालते वाटीवाटी
साउलीची आशा मोठी १३१
धनसंपतेचा कोन करीतं हेवादावा
माझा बाळराय मालाचा गुंड नवा १३२
दोन माझी बाळं, दोन माझे वाडे
लाडक्या लेकीचं करा माहेर मागेपुढे १३३
दोन माझी बाळं, दंडीच्या दोन येळा
बया ठवणीची चंद्रकळा १३४
नागिनी पद्मीनी पसरूं नकां वाटंतिठं
माझा बाळराय यतुया अवशीपहाटं १३५
लक्ष्मीआई आली दाराला देते धका
जागं व्हावं जेठं लेका १३६
थोरला माझा लेक वाड्याचा बुरूज
त्याच्या जीवावरी म्हाई कुनाची गरज १३७
हौस मला मोठा स्वैपाकामंदी हंडा
ताईत बाळराज सर्व्या संसारामंदी झेंडा १३८

—*—

# मुलगी

मुलाकडे जेवढं स्त्रीमन गुंतलेलं तेवढाच मुलीकडेही तिच्या प्रीतीचा वाटा जातो. कारण मुलगी झाली तरी कुणी लोक थोडीच आहे? मुलगा कर्तृत्वानं घराण्याचं नांव चालवील, तर पोरगी मायेममतेनं हृदयाची आस पुरी करील. संसारांत दोन्ही हवीत. मुलगी हा मुलाएवढ्याच महत्त्वाचा, संसाराचा घटक आहे, याची जाणीव या स्त्रियांनाहि आहे.

बालविवाहामुळें मुलीचा माहेरचा वास मुलाहून कितीतरी कमी असतो. शिवाय कळूं लागल्यास मुलीचं जें काय कर्तृत्व असेल तें सासरींच दिसून येतं. म्हणून मुलंवरच्या ओव्यांतून बहुतेक मुलीचं रूप, बांधा, तिचे बालहट्ट, तिचं लग्न, तिचीं मुलं, तिचा संसार याबद्दलचींच वर्णनें अधिक यावीं हें स्वाभाविकच आहे.

मुलगी हें परक्याचं धन असल्यामुळें, पुष्कळ कुटुंबांत मुलगी होणं हें कमीपणाचं मानतात. पण समंजस आईला असं कधींच वाटत नाहीं. एक आई सात्त्विक संतापानं पहा काय प्रश्न करीत आहे तो—

> **ल्येकीच्या आईला नका म्हनूंसा हलकी**
> **ल्येकाच्या आईला कुनी दिलीया पालकी?**

एकाच आईचीं बाळं. त्यांत कसलं उणं नि अधिक?

> **ल्येकापरायास ल्येक कशानं झाली उणी?**
> **एका कुशीचीं रत्नं दोन्ही**

पुष्कळ स्त्रियांना मुलगी व्हावी अशी हौसमुद्धां असते, कारण मुलगी ही आईच्या प्रीतीची छोटी प्रतिमाच! आईइतक्याच जिव्हाळ्याचं बहिणीचंहि प्रेम असतं. कधीं आई दुर्दैवानें देवाघरीं गेली तर बहीण ती मायेची उणीव भरून काढूं शकते ही गोष्ट समंजस दूरदर्शी स्त्री मनांत जाणून असते. मुलीवांचून संसार अपूर्ण आहे हें जाणणारी एक पुत्रवती माता देवाजवळ मागणें मागते—

देवाला मागते औतीकुळवी चौघं लेक
न्याहारी न्यायाला रंभा एक

एकाद्या घरीं चारपांच मुली असल्या कीं लोक जरा कंटाळा करून बोलतात, मुलींची उपेक्षा करतात. पण एक वत्सल माऊली म्हणते—

लई झाल्या लेकी, नका करूंसा वानवळा
देवाघरीचा पानमळा

सर्व शेतांमध्यें पानमळ्याचं शेत गोजिरवाणं, नाजूक असतं, त्याची उपमा पोरीला दिलेली किती शोभून दिसते. अन् या मुली तरी आपल्या कुठें असतात ?

लेकीचा जलम, जशी तांदुळाची गोणी
ज्याची त्यानं नेली, बाप बघतो येड्यावाणी

पहातां पहातां पोरी सासरीं निघून जातील, त्यांचा राग धरूं नये हाहि आदेश स्पष्ट दिसून येतो—

लई झाल्या लेकी, बाप म्हनीतो माझ्या वाल्या
कुना देशीं चिमन्या गेल्या ।

एक आई अभिमानानं सांगते, कीं आमच्या घरीं मुलाइतकीच मुलगीहि अपूर्वाईची मानली जाते व तिच्यासाठींहि आम्हीं नवस केलेले आहेत—

ल्येकाचं नवस तुला केल्याती लेकीबाई
माझी मोगऱ्यामंदी जाई

जीवाला जडभारी झालं तर मुलगीच जीवाला जीव देईल, सेवा करील हें आई जाणून असते—

ल्येकापरायास मला ल्येकीची माया येती
जडभारीला माझ्या होती

अशा प्रकारें मुलीबद्दल अगत्याचे शब्द आढळतात. मुलीचीं लाडकीं नांवं तरी किती ? बाळाबाई हें सर्वसाधारण नांव तर आहेच. त्याखेरीज मैना, मालन, चांदणी, सारजा, गिरजा, तान्ही, सावळी, गौरी, राधा, अशा कित्येक नांवानीं मुलीचं कौतुक केलेलं दिसून येतें.

मुलीचं वैभव प्रामुख्यानें तिचं सौंदर्य हेंच असल्यानें रूपाचीं तऱ्हे-तऱ्हेचीं वर्णनें येथें आढळतात. सुंदर मुलीचं हें रूपवर्णन पहा—

**कुरूळ केसांची वेणी किती घालूं**
**माझ्या मैनाईचं रूप सुंदर ओठ लालू**

ही मुलगी इतकी सुंदर कोणासारखी झाली बरें ? त्याचे गोड उत्तर आई लाजत देत आहे—

**सावळ्यासुरतीचं रूप आरशांत माईना**
**लाडी वडिलांसारखी मैना**

ही मुलगी नाकीडोळीदेखील नीटस आहे—

**मोठे मोठे डोळे, भुंवयांमदी बांक**
**गोरे नागिनी, रूप झाक**

या राजसबाळीला कोण राजबिंडा पति मिळेल बरें ! अशी काळजी लहान-पणापासूनच आई करीत आहे—

**लाडक्या लेकीचे तळहात किती मऊ**
**कुना राजाला कन्या देऊं ?**

ही पोरगी लाडकी असल्यानं हट्टीहि आहे. तिला निरनिराळ्या प्रकारच्या बांगड्या, तऱ्हेतऱ्हेचे चोळीचे खण, सुंदर साड्या, चिमुकले दागिने, सारंच हवं असतं—

**लाडक्या लेकीचा लाडका ग हेका**
**मागे चोळीवरी टीक्का**
**लाडक्या लेकीचं लाडासारिखं कोड केलं**
**झुबं तोळ्याचं न्हान झालं**

हिच्या साडीसाठीं मामाहि बाजार धुंडूं लागतो—

**भरल्या बाजारांत उंच दुकान बिनाडीला**
**मामा हिंडतो भाचीच्या चुनाडीला**

चांगल्या चोळीसाठीं ही छोटी सारजा रुसली आहे व आई समजुत काढीत आहे, हा प्रसंग वर्णिला आहे—

**काळीकुरुंद चोळी, लेऊं वाटली जीवाला**
**हरनीला किती सांगु, शिंपी येऊदे गावाला**

अन् मग शिंप्यालाहि आईची विनवणी पहा—

**शीव शिंप्या चोळी, आकड्या काढ भुजेवरी**
**मैना रुसलीया माझ्यावरी**

अशाप्रकारें मुलीचे सारे हट्ट मोठ्या कौतुकानें पुरे केले जातात व त्याचीं वर्णनेंहि जागोजाग आहेत.

अशी ही कन्या हळुहळु पोरपणांतून वयांत येत असते. रूप दृष्ट पडण्याइतकं मनोहर होऊं लागतं. ती एकादं झोकदार लुगडं नेसून रस्त्यांत उभी असेल तरी आईचं मन दृष्टीच्या भयानं शंकाकुल होतं. ती म्हणते—

**काळी चंद्रकळा नेसल्याची खुबी**
**माझी बाळाबाई, नगं रस्त्याला राहूं उभी**

आणि या मुलीनं दागिने, कपडे ऐटबाज वापरले नाहींत तरी तिचं रूपच चमकून दिसत असतं—

**गोरीचं गोरेपन, काळी झुरती मनामंदी**
**माझी बाळाबाई बेगड उन्हामंदी**

अशी ही मुलगी मोठी होते, फारच सुंदर दिसूं लागते. तिचे केसहि दृष्ट लागण्यासारखे सुंदर, काळेभोर होतात. अर्थात् दृष्ट लागण्याचं भय मातेला वरचेवर वाटूं लागतंच—

**मोठंमोठं डोळं, भुंवया लैनालैना**
**दृष्टावली माझी मैना**

हळूहळूं बाळी मोठी होते, गृहजीवनाचेहि पाठ घेऊं लागते, कामाधामांत आईला मदत करते. एक आई म्हणते—

**थोरली झाली ल्येक, झालं मातेला सोडवण**
**घाली आडवं सारवण**

दळणाकांडणाचाहि या पोरीला सराव होतो व एकंदरींत एक घर चालवण्याइतकी प्रकृति दमदार होते, बांधा भरूं लागतो व मुलगी हळूहळू तारुण्याच्या सीमेवर येऊन उभी राहते.

आतां लग्नाचं वय झालं! त्याच्या गोष्टी सुरूं होतात. आईला काळजी लागते व बापाला विचार पडतो. लोक पहायला येऊं लागतात व देण्याघेण्याची भाषा सुरू होते. पोरीच्या आयुष्यांतील 'बालकाल' संपल्यासारखा दिसतो. पहातां पहातां एक दिवस ही लाजरी पोर बोहल्यावर चढते व मग तिच्या आयुष्यांतील दुसरा कालखंड सुरूं होतो. त्याचीं गीतें पुढल्या विभागांत पाहूं.

## सोहाळे

मुलाच्या आयुष्याचे जसे अज्ञान मुलगा व कर्तासवरता तरुण असे दोन स्पष्ट विभाग पडतात, त्याचप्रमाणें मुलीच्या आयुष्याचेहि बालिका व युवती असे दोन खंड पडतात. आतांपर्यंत कन्येच्या बाललीला आपण पाहिल्या, तिच्या सोयरीकीच्या व 'नांदाय जाण्याच्या' गमती वाचल्या. पण मुलीचं आयुष्य ती पुत्रवती होईल तेव्हांच आईच्या दृष्टीनं सार्थ ठरतं व म्हणून स्त्रीजीवनांत अत्यवश्यक असलेल्या सुखसोहाळ्यांचाहि योग मुलीला यावा असें आई अपेक्षित असते. अशा सोहाळयांच्याहि सुंदर ओव्या आहेत. त्यावांचून जीवनाला पूर्णता नाहीं!

मुलगी मोठी होऊं लागते, तिच्या बालिश चेहऱ्यांतून नवतीची रूपसंपदा जसजशी प्रकटूं लागते तसतशी आईच्या दृष्टीसमोर एका सोहाळ्याचीं सुखस्वप्नं रंगूं लागतात. आपल्याकडे लग्नाची वयोमर्यादा लांबत चालल्यानं न्हाणवलीचे मखर वगैरे सोपस्कार मागें पडले आहेत; पण मराठमोळा समाजांत बालविवाह असल्यानं अजून कौतुकानं मखराची आरास करतात. लहानशी विवाहित कन्या वयांत येते, दंडांत चोळी रुपून बसूं लागते, बांधा भरदार होतो व एक दिवस ती ऋतुमती होते. घरांतल्या माणसांची अगदीं गडबड उडून जाते. लगेच वाजंत्री बोलावले जातात.

**वाजंत्री वाजत्यात, वाड्यांत काय झालं!**
**मैना गुजरीला न्हान आलं!**

गांवांतल्या बायका वाढणीं घेऊन येऊं लागतात—

**मखराच्या दारीं वाढपांची झाली दाटी**
**हिरवा चुडा तुझ्यासाठीं**

मुलीचें मखर सजवलें जातें, ओटी भरतात. हा समारंभ अर्थात्‌च एक प्रकारें सूचकच असतो व देवानं कृपा केली तर याहूनहि भाग्याचा समारंभ करण्याचा योग येतो. मुलगी मातृपद स्वीकारण्याचे गोड व्रत करूं लागते. मुलीला बरें नाहींसें होतें, डोहाळे लागतात; कुलदीपक जन्माला येण्याची चाहूल वडीलधाऱ्या मंडळींनाहि आनंददायीच असते. आई कौतुकानं डोहाळे विचारते. मुलगी लाजेनं नाहीं होय करूं लागते. पण आईच्या दृष्टींतून काय लपून राहणार ?

**पहिल्यांदा गरभार, न्हाई म्हनते लोकाला**
**पोट निऱ्याच्या झोकाला**

प्रिय पत्नी कोमेजलेली पाहून पतिही प्रेमानं विचारपूस करतो—

**पहिल्यांदा गरभार, कंथ पुशीतो जिव्हाळ्यानं**
**तोंड कोमेलं डव्हाळ्यानं**

मुलीला हिरवे आंबे, आंबट चिंच खावीशी वाटूं लागते—

**आंब्याची आंबराई, चिंचेबाईला तेगार**
**डोळं लागल्याती जबर !**

हे डोहाळे कसे पुरवावे असं आईला होऊन जातें—

**बाळ माझी गर्भीण, माझ्या जिवाला उल्लास**
**आणा कोकनी फणस**

हिरवा खण, हिरवी साडी, हिरवा चुडा असा सारा थाट करण्याकडे आईचं लक्ष लागतं. हिरव्या तंग चोळीनं मांसल दंड कसे रसरशीत दिसतात. आई मनांत म्हणते—

**हिरव्या चोळीयेनं दंड करी रसारसा**
**माझ्या मैनाईचा आळ पुरवीन हवा तसा**

या बांधेसूद पोरीला कशी तेव्हांच दृष्ट होते बाई—

**हिरवी चोळी दंडामंदी उसवली**
**माझी गर्भीण दृष्टावली**

दिवसेंदिवस गर्भारशीला तेज चढूं लागतं. आईचं मन गोडगोड आशा करीत असतं कीं हिच्या उदरीं सुपुत्र जन्माला येऊंदे. माझे पांग फेडूंदे—

आणि एक दिवस कन्येला नवं बाळ होतं. केवढा तो उल्हासाचा दिवस! नवे बेत सुरू होतात. बाळाला काय काय करावें?

**माहेराच्या वाटे सरी बिंदुल्या झोळण्यांत,**
**बाळ तान्हुलं पाळण्यांत**

कुणी सुंदर कपडे करून आणतात—

**अंगडं टोपडं शिवते गझनीचं**
**तान्हुलं माझ्या मैनाई सजणीचं**

मग सोप्यावर पाळणा ऐटींत झुलूं लागतो. एक आई म्हणते—

**माझं मोठं घर, सोप्याला पाळना**
**आंत निजे बाळ तान्हा**

अशा प्रकारें बाळामुळें नवा आनंदच जणूं त्या घरांत खेळूं लागतो. एक आजी धन्यतेनं म्हणते—

**दीस बुडियेला वेल फुलला बाळकाचा**
**माझ्या बाळाईच्या घरीं आनंद बाळकाचा**

पोरगी लेकुरवाळी झाली, स्त्रीत्वाचं सगळ्यांत महत्त्वाचं लेणं तिच्या अंगाखांद्यावर खेळूं लागलं, कीं आईला तिच्या जन्माचं खरं सार्थक झालंसं वाटूं लागतं. आतां तिचं लक्ष स्वतापेक्षांहि बाळाकडेच जास्त गुंतलेलं पाहून आईला मोठं कौतुक वाटतं—

**लेकुरवाळीचा पदर साधाबाधा**
**माझी बाळाई झाली पुत्रवंती राधा**

अशी ही मुलगी माहेरीं आली कीं घर गजबजून जातं—

**साखळ्यावाळियांनी गल्ली माझी दणाणली**
**माझी बाळाबाई लेकुरवाळी आली**

मात्र आतां पूर्वीप्रमाणें तिच्या हातून कामें चटपट होत नाहींत. बाळाचा गोड अडथळा दरेक वेळीं आहेच. आई तिची कड घेऊन म्हणते—तिला आतां कुणी बोलूं नका—कारण—

लेकुरवाळीयेच्या कामाचा पडला राडा
नागानं दिला येढा!

अशा प्रकारें कन्याजीवनाचें सार्थक झालेलें पाहून मायबापांना फार हर्ष होतो. मुलगा कर्ता होऊन घर बांधूं लागला, शेतीवाडीची दौलत त्यानं मिळवली कीं जेवढा उमाप आनंद व्हायचा त्याच तोलाचा हाहि आनंदाचा भाग आहे. मुलगा नि मुलगी! अगदी भिन्न जीवन; परंतु या भिन्नतेंतहि वेगळ्या प्रकारची जीवनसाफल्याची साक्ष आहेच!

—*—

# मुलगी

हौस मला मोठी लोटीशेजारी वाटीची
ल्येक ल्येकाच्या पाठीची १
हौस मला मोठी, ल्येक असावी ल्येकामंदी
गाडू पुतळी गोफामंदी २
देवाला मागते, ओंतीकुळवी चौघं लेक
न्याहारी न्यायाला रंभा एक ३
लुगड्याच्या घडीवर चोळ्याची चवड
मला लेकीची आवड ४
ल्येकाचे नवस, तुला केल्याती लेकीबाई
माझी मोगऱ्यामंदी जाई ५
ल्येकापरायास लेक कशानं उणी ?
एका कुशीचीं रत्नं दोन्ही ६
ल्येकापरायास लेक कशानं उणी झाली
आईबापाला ओवी गाते कैलासी ऐकू गेली ७
ल्येकीच्या आईला नका म्हनूसा हालकी
ल्येकाच्या आईला कुनी दिलीया पालकी ८
जोंधळ्यापरायास वाढवते तुरी
ल्येकापरीस मला लेक प्यारी ९
ल्येकापरायास मला ल्येकीची माया येती
जडभारीला माझ्या होती १०
वाणियाच्या घरी खडीसाखर मोलाची
माझिया घरामंदी लेक ल्येकाच्या तोलाची ११
किती हाक मारू लेकाच्या नावानं ?
दिली राधिका देवानं १२

लई झाल्या लेकी नका घालूसा वानवळा
देवाघरीचा पानमळा १३
थोरला माझा लेक वाड्याचा कळस
धाकुटी बाळाबाई माझ्या दारीची तुळस १४
लई झाल्या लेकी, बाप म्हणे माझ्या वाल्या
चहुंदिशे चिमन्या गेल्या १५
लाडक्या लेकीचं नांव ठेवावं विजली
आंकडी दुधात खडीसाखर भिजली १६
लाडक्या लेकीचं नांव ठेविलं मी साळू
किती नांवानी आळवूं १७
लाडक्या लेकीचं नांव ठेविलं अक्काताय
गोंडं टाकीलं गाठवाय १८
लाडक्या लेकीचं नांव ठेविलं मी मैना
एका शब्दानं ऐकेना ! १९
सावळ्या सुरतीचं रूप आरशांत माईना
लाडी वडिलांसारखी मैना २०
कुरूळ केसाची वेणी किती घालूं
माझ्या मैनाईचं रूप सुंदर ओठ लालू २१
कुरळ केसाचा वेणीबाईचा आंकडा
रूप राधाचं ठकडा २२
कुरूळ केसाचा भांगाशेजारी तुझी वाकी
तूं ग दैवाची माझ्या लेकी २३
मोठेमोठे डोळे भुंवयामंदी बांक
गोरे नागिनी रूप झाक २४
लाडक्या लेकीला काटा रुतला भोपळीचा
पाय नाजूक पुतळीचा २५
लाडक्या लेकीचं तळहात किती मऊ
कुन्या राजाला कन्या देऊं २६

गोरीचं गोरेपन काळी झुरती मनामंदी
माझी मैनाबाई बेगड उन्हामंदी २७
गोरीचं गोरेपन, उन्हानं झालं लाल
मैना माझ्या साउलीनं चाल २८
गोरीचं गोरेपन काळीचं जातं मन
माझ्या मैनाबाई नको लेऊं दांतवन २९
झाला समदा बाजार, इसरलं शिकंकाई
माझ्या मैनाईचं केस लई ३०
हंडा तापवीते, शिकंकाईला आला कड
नगगोंड्याची वेणी सोड ३१
ससूरल्या सोप्या ठेविते आरसाफणी
घालू लाडीची ग वेणी ३२
मोठंमोठं डोळ हरिनीबाई भ्याली
कुन्या वाटेनं माझी राधा गेली ? ३३
चांगलंपन तुझं लांब गेलीया आवई
मामासारखी मैना देवई ३४
अंगनी खेळत्यात सयांच्या पोरीसोरी
हिरव्या साडीची लेक माझी गोरी ३५
शिंदेशाई तोडे केल्याती दिवाळीला
हौस तुझ्या मावळ्याला ३६
लाडक्या लेकीचं लाडासारिखं कोड केलं
झुबं तोळ्याचं न्हान झालं ! ३७
नाकाच्या नथनीला मोती लाविले सात
मैना केवड्याची जात ३८
नाकाच्या नथनीला मोती लाविले ते चवदा
मैना लेनार पोरसवदा ३९
लेन्यामंदी लनं टीक्काचं कवळं
चोळीवरी गोंडं लोळती पिवळं ४०

सात सरज्याची नथ आखूड तिचा दांडा
शोभते बाळीच्या गोऱ्या तोंडा ४१

हातांत गोटतोडे गळ्यांत मोहनमाळ
विदी खेळे चंद्रावळ ४२

साखळ्यावाळे पायी, सोप्यामाळींतून हिंडे
तालेवाराला लेक दंडे ४३

लाडकी ग लेक खिडकीखाली उभी
मैना बाजूबंदा जोगी ४४

लाडकी ग लेक चुलत्याला म्हने ताल्या
पायी पैंजण उभी जोत्या ४५

भरल्या बाजारी उंच दुकान बिनाडीला
मामा हिंडतो भाचीच्या चुनाडीला ४६

काळीकुरुंद चोळी लेऊं वाटली जीवाला
हरनीला किती सांगूं, शिंपी येऊंदे गावाला ४७

तापत्याची चोळी निपत्याचा बंद
लेकी लाडके तुझा छंद ४८

लाडक्या लेकीचा लाडाचा ग हेका
मागे चोळीवरी टीका ४९

मावळण धाडी काशीतल्या चोळ्या
दंडावरती मासोळ्या ! ५०

मावळण धाडी काशींतले खण
दंडावरती मोर दोन ५१

दंडकी जरीचोळी जराशी वर सार
बाजुबंदाला जागा कर ५२

दंडावरची चोळी साजेल त्यानं ल्यावी
माझ्या बाळाबाई मधे कंगनी पडूं द्यावी ५३

काळ्या चोळीवरी कशिदा भिंगाचा
लेकी तुला प्रसाद गंगेचा ५४

काळी चंद्रकळा पदरावरी मासा
माझ्या बाळाबाई, गोकाकी रंग खासा ५५
काळी चंद्रकळा रंग तिचा फिकाफिका
माझ्या मैनाईचा हेका ५६
काळी चंद्रकळा नेस म्हणतां नेसेना
गोऱ्या अंगाला सोसेना ! ५७
काळी चंद्रकळा कशीदा कोथंबिरी
माझी मैना किती गोरी ५८
काळी चंद्रकळा नेसन्याची खुबी
बाळाबाई नगं रस्त्याला ऱ्हाउं उभी ५९
काळी चंद्रकळा आजला खपली
तुझ्या रूपाला दंडली ६०
काळी चंद्रकळा जरीची किनार
मैनाबाई ग लेनार ६१
काळी चंद्रकळा मैना नेसली सुंदर
निरी पडते शंभर ! ६२
काळी चंद्रकळा यमना–जमना काठाची
राधा पुनेरी थाटाची ६३
काळी चंद्रकळा तिचा पदर सोनेरी
मामा घेणार हुन्नेरी ६४
काळी चंद्रकळा तिचा पदर ममई
बाळे तुझ्या बापाची कमाई ! ६५
काळी चंद्रकळा नसतां अंग दिसं
गोरे बाळाबाई, दृष्ट होते खाली बैस ६६
लाडक्या लेकीचं गोडसं जेवण
दुधा साखरेचं विरजण ६७
लाडक्या लेकीला लाडासारीखं काम सांगा
पूजेला पानी मागा ६८

वाईट माझा राग दुधावाणी ऊतूं गेला
सखी माझीनं शांत केला ६९

दिव्याला भरन घालते पळी पळी
आली गुजाला चाफेकळी ७०

थोरलं माझं घर दानं लागे खंडीखंडी
माझी बाळाई मणाला देई माडी ७१

ऐन दुपार झाली, माझ्या एकलीच्या कामा
बाळाबाई लावी हात भुकेला तुझा मामा ७२

सडा सारवन चुल भानुशा लकालकी
तुला आईचं गुन लेकी ७३

थोरली झाली लेक, मातेला सोडवण
घाली आडवं सारवण ७४

लाडक्या लेकीचं खेळणं हुडयावरी
भिंगं झळकतीं चुडयावरी ७५

सातीच्या सुगरनी बसल्या पुरन वाटायाला
माझ्या मैनाबाईला बसवा सजुरी लाटायाला ७६

नऊ महिने ओझं वागवीतां न्हाई भ्याले
बाळे तुला शिकवीतां कष्टी झाले ७७

शेजेबाजेवरी उसुशी भिंगाची
मैनाबाई माझी पोफळी रंगाची ७८

काजळ कुकू लेते, बामन आळी जाते
बाळाबाईला माझ्या दृष्ट होते ७९

कुनी ग दृष्ट केली, पापी चंडाळीन
दृष्टावली माझी नागीन ८०

दृष्ट मी काढीते मीठ मोहऱ्या वळचनीला
दृष्ट झालीया तान्हीला ८१

दृष्ट झाली म्हनू मीठमोहऱ्या अगिनीला
झाली दृष्ट नागिनीला ८२

दृष्ट झाली म्हनु विसुवंद पलानीला
दृष्ट झालीया माझ्या मालनीला ८३
मोठंमोठं डोळं भुंवया लैनालैना
दृष्टावली माझी मैना ८४

## सोहाळे

आंब्याला मोहर, चिंचेबाईला मोगर
माझी मैनाबाई आली न्हानाला गौर १
पहिल्यांदा न्हान आलं शिंद्याच्या लष्करांत
बस मोत्याच्या मखरांत २
वाजंत्री वाजत्यात, वाड्यांत काय झालं ?
मैना गुजरीला न्हान आलं ३
पहिल्यान्दा न्हान आलं अंगन लोटतांना
येळाचा येळ गेला साकर वाटतांना ४
सांगुन धाडते, गावीच्या जिनगराला
कोरे कागद, मैनाच्या मखराला ५
समूरल्या सोप्या दिली मखराला जागा
आली न्हानुली चंद्रभागा ६
पहिल्यान्दा पदुर आला हौस तुझ्या सासऱ्याला
केळी लाविल्या मखराला ७
हिरव्या चोळीसाठीं जाणं झालंया मिरजेला
न्हान आलंया गिरजेला ८
लगीन न्हाईयेवं ! मला कशाची मूळाचिठ्ठी
बंधुजी पहिल्या न्हानाची भरती आटी ९
वाजंत्री वाजत्यात, अंगनी आले माळी
राधिकेच्या मखराला लावा केळी १०
मखराच्या दारीं वाढपाची झाली दाटी
हिरवा चुडा तुझ्यासाठीं ११

वाजंत्री वाजत्यात दुही दाराला गजर
आला तान्हीला पदर १२
पहिल्यांदा गरभार तोंडावर लाली
कुन्या महिन्याला राधा न्हाली ? १३
पहिल्यांदा गरभार कंथ पुशितो जिव्हाळ्यानं
तोंड कामेलं डव्हाळ्यानं १४
पहिल्यांदा गरभार कसं कळालं भरताराला
रंगीत पाळन्याची ताकीद सुताराला १५
भर तूं कासारा बांगडी हिरवीगार
मैना पहिल्यांदा गरभार १६
लेण्यालुगड्यापरीस तान्हीयाची महिमा मोठी
माझ्या बाळाईची भरा पाळण्याखाली ओटी १७
गर्भिनीला डोळं हिरवं येलदोडं
हौशा बंधुजीची गाडी बंदराच्या पुढं १८
पहिल्यांदा गर्भीन आस लागली माहेराची
माउलीनं ओटी भरली सजुन्याची १९
हळदकुंकवानं अंगन झालं लाल
ओटीभरन झालं काल २०
पहिल्यांदा गरभार नाही म्हणते लोकाला
पोट निरीच्या झोकाला २१
पहिल्यांदा गरभार मातेशी करी चोरी
पाचव्या महिन्याला उचलली निरी २२
पहिल्यांदा गरभार डोळं लागलं अवघड
बया म्हणे, चल गावांकडं २३
पहिल्यांदा गरभार लिंबनारळी तुझं पोट
मैना डाळिंबी चीट नेस २४
पहिल्यांदा गरभार डोळं लागलं जिनसाचं
आंबा डोंगरी फनसाचं २५

पहिल्यांदा गरभार रायबोरांचे काकडे
आंबे हिरवे गावाकडे २६
पहिल्यांदा गरभार कंथ पुसे खांबाआडून
माझ्या मैनाईला देतो सुपारी फोडून २७
पहिल्यांदा गरभार डोळं लागलं चिंचंचं
चिन्ह दिसतं लेकीचं २८
पहिल्यांदा गरभार डोळं लागलं ताकाचं
चिन्ह दिसतं लेकाचं २९
पहिल्यांदा गरभार डोळं लागलं बोराचं
माझी मैनाबाई पाय धरीते दीराचं ३०
पहिल्यांदा गर्भार डोळं लागलं मेथीभाजी
हौशा दीर मळं खंडाया झालं राजी ३१
पाहिल्यांदा गरभार अन्नाची येते कीकू
हिरवं डाळिंब घाला पिकूं ३२
पाहिल्यांदा गरभार खाऊं वाटतं काईबाई
हिरवा आंबा बाजारी आला न्हाई ३३
गर्भीणी नारी तुझा गरभ लाडाचा
अंबा लागतो पाडाचा ३४
गर्भीणी नारी, डोळं लागलं कारल्याचं
हौशा कंथ मळं धुंडितो मैतराचं ३५
बाळ माझी गर्भीणी, माझ्या जिवाला उल्हास
आणा कोकर्ना फनस ३६
अंबट अंबिल ताकानं केली गार
गर्भीणीबाई, ऊठ चल न्यारी कर ३७
आंब्याचा आंबरस केळयाच्या करूं वड्या
जाते मी गार्भिणीच्या वाड्या ३८
गार्भिणीला डोळं, खाउं वाटं डाळकांदा
कळ्या पाडून लाडू बांधा ३९

गर्भीण नारीयेला सहावा महिना सरावण
डाव्या कुशीला नारायेन ४०
गर्भीण नारीला खाउ वाटतं कारं बोरं
घेतीया सवाशेर ४१
गर्भीण नारीला गर्भाची येते घेरी
चाफाचंदन माझ्या दारी, साउलीला बस नारी; ४२
गर्भीण नारीला गर्भाचा उल्लास
हौशा कंथ तिचा न्हानी लावीतो गलास ४३
गर्भीण नारीयेला खाउं वाटतं उंबर
सखा धुंडितो डोंगर ! ४४
हिरवी चोळी दंडामंदी उसवली
माझी गर्भीण दृष्टावली ४५
गर्भीण नारी गर्भ तुझा डौलदार
उदराला येऊंद कृष्णदेवाचा अवतार ४६
हिरव्या चोळीनं दंड करी रसारसा
माझ्या बाळाईचा आळ पुरवीन हवा तसा ४७
गार्भिण नारीच्या अंजीर ओट्यामंदी
कंथ विचारी गोठ्यामंदी ४८
आंब्याची आंबराई, चिंचबाईला तेगार
नंद कामिनीला डोळं लागल्याती जबर ४९
गर्भीणी नारी भरल्या दोन कुशी
चोळी दंडांत आंबरसी ५०
माळ्याच्या मळ्यामंदी मेथीबाई डहूळती
तान्ही माझी, गर्भीणी पाण्या जाती ५१
माळीण साद देई चन्नुल्या घेवड्याची
राणी गर्भीणी केवड्याची ५२
साखरशेरणी वाटती दीवाणा
बंधुजीला लेक झाला दैववान । ५३

भावजई बाळांतीण, बंधु दिसे चिंतागती
गवंड्याला काकुळती, न्हानी बांधावी चिरेमती ५४

भरल्या बाजारांत घेते तिघीला तीन खण
मैना गुजर बाळंतीण ५५

भावाला झाला पुत्र साखर आली माझ्या गांवा
वाटीन जावाभावां, रामचंद्र नांव ठेवा ५६

बंधुला झाला पुत्र, आगाशी लावा दिवा.
धनी राज्याला झाला नवा ५७

भावजय गुजर बाळंतीण, साखर मला आली
पुत्र न्हवं, कन्या झाली ! ५८

बंधुला झाला पुत्र मला यावं घोडं
बहिणा, तुझ्या कुयऱ्या, माझं तोंडं ५९

बंधुला झाला लेक, वाटूं साखर पसापसा
ल्येक झाला लई दिसां ६०

बंधुला झाला लेक आम्हां बहिणींना बरं झालं
माह्यार दुणावलं ६१

बंधुला झाला लेक आम्हाला झाला भासा
सरी बिंदुल्यावर ठसा ६२

बंधुला झाला लेक बहिणीला आली पानं
करूं बाळाला बाळलेणं ६३

बंधुला झाली लेक जाते हुंबऱ्या सारवाय
लेक त्याची हरबाय ६४

नवस मी केले नवसासारिखं झालं
बंधुचं बाळ माझ्या अंगणी पाणी न्हालं ६५

माहेरच्या वाटे सरीबिंदुल्या झोळण्यांत
बाळ तान्हुलं पाळण्यांत ६६

सोनं झालं स्वस्त रुपै आलं मोडी
करूं बाळाला वाक्याकडी ६७

बंधुला झाला लक, बहिणींना झाला भाचा
नेऊं पाऱ्ना कुलपाचा ६८
दिवस वुडियेला येल फुलला वाळकाचा
माझ्या बाळाईच्या घरीं आनंद बाळकाचा ६९
भरल्या तीनसांजा तीनसांजाच्या तीनयेळा
बाळ माझी बाळांतीण तान्या बाळाला संभाळा ७०
बाळांतीणबाई तुझ्या उशाला कवळी पानं
बाप इच्यारी कौतुकानं ७१
परसूत व्हावं आपुल्या माउलीच्या घरी
ईस दीस झालं तरी येउ देईना सदरेवरी ७२
बाळंतीणबाई तुझी पिवळी पाउलं
सुख बाळानं दाविलं ७३
बाळांतीणबाई तुज्या टाचा त्या पीवळ्या
म्या न्हाणी जातांना देखिल्या ७४
बाळंतीणबाई, वारसं कोन्या दिशी ?
चाफा फुलला न्हानीपाशी ७५
हिरव्या चोळीला चाटी म्हणे रुपै सवातीन
बहिणा कामीन बाळंतीण ! ७६
बहिणाला झाला लेक जीव उल्हास झाला थोडा
बंधु हौशाला झाला लेक, सोप्या वाजतो चवघडा ७७
बाळंतीणबाई तुला शेपाची शेगडी
पांघराया देऊं वाप्पाजीची घोंगडी ७८
बाळंतीणबाई तुला बाळंतपण साजं
शिळं काजळ कुंकु ताजं ७९
टोपाच्या ठकुच्याला गोंडं लावते झेंडयाचं
बाळ पाठीच्या पांडवाचं ८०
टोपाच्या टकुच्याला गोंडं लावू माईणीचं
बाळ माझ्या बहिणीचं ८१

रेशमी टोपड्याला गोंडे लावू परकाराचं
बंधुजीचं बाळ, तान्हुलं सरदाराचं ८२
अंगडं टोपडं शिवते गझनीचं
तान्हुलं माझ्या मैनाई सजणीचं ८३
हौस मला मोठी बंधुच्या बाळाची
पदर फाडीन साडीचा कुंची शिवीन घोळाची ८४
बंधुचं माझ्या बाळ म्हणतं आत्या जीजी
बाळा मंजुळ बोली तुझी ८५
तीनी सांजा झाल्या समई दिवा लावा
भाचाबाळ मला दावा ८६
माझ्या अंगनांत शिंपीनी सवती सवती
बाळाच्या कुंचीला लावा मोती ८७
सासुऱ्याला जाते लेक कुनाची बालूबाई
पुढं पाळना, मागं गाई ! ८८
लेकुरवाळीयेचा पदर साधाबाधा
माझी बाळाबाई, झाली पुत्रवंती राधा ८९
सारवळ्यावाळीयानं गल्ली दणाणली
माझी बाळाबाई लेकुरवाळी आली ९०
लेकुरवाळीयेच्या कामाचा बोभाटा
बाळ कडेला धाकुटा ९१
भावजय गुजर बाळंतीण, मला कळुन सवा महिना
खण अंगीला घेते फैना, वर काढिते राघुमैना ९२
माझ्या घराला पाव्हनी, कोन आली राधा
पाळन्याला मागे जागा ९३
माझं मोठं घर, सोप्याला पाळणा
आंत निजे बाळ तान्हा ९४
लेकुरवाळीयेच्या कामाचं खटाळं
घाली नागीन वेटाळं ! ९५

—※—

# शेजीबाई

"शेजी" म्हणजे शेजारीण. ग्रामवासियांचीं घरें एकमेकांस लागून असतात. त्यामुळें स्त्रियांचें संघटन नित्याचें होतें. पानोठ्यावर मिळून जाणें, एकमेकीला दळूं लागणें, कामाकाजांत मदत करणें या दृष्टीनें शेजारणींमध्यें चांगल्या प्रकारची घसट पडलेली असते.

खेडुत स्त्रीच्या जीवनांत "शेजी" हाहि एक छोटा पण महत्त्वाचा घटक आहे. शेजारधर्माला जागून अडीनडीला मदत करणारी, दुखल्या-खुपल्याची चौकशी करणारी आणि सगळ्या समारंभांत हौसेनं भाग घेणारी अशी व्यक्ति शेजारीणबाईच असते. ही प्रेमळ असते तेव्हां मुलीला परत आपलें माहेरच भेटलेसें वाटूं लागतें. तिच्या मनाला तेथें विसांवा वाटूं लागतो.

> शेजीचा शेजारू माझं अर्धं माहेरू
> तिठं इसावा खिनभरू

परंतु असं नेहमींच कुठलं घडायला? बहुधा शेजीबाई श्रीमंत गर्विष्ठ असते; किंवा उणंदुणं काढणारी अन् कडू बोलणारी भांडकुदळहि असते. तिच्या वागण्यांत भेदभाव फार आहे असंहि दिसतं. मुलीला भलेबुरे जे या शेजीसंबंधाचे अनुभव येतात, त्यांचेंच वर्णन ओव्यांतून केलेलें आढळतें.

लग्न झाल्यापासून उभा संसार तिऱ्हाईतपणें पहाणारी व कौतुक करणारी शेजारीण ही जवळजवळ जीवनाची एकप्रकारें साथ देणारी स्त्रीच म्हटली पाहिजे. अर्थात् मनुष्यस्वभावाची जशी भिन्नभिन्न तऱ्हा पाहण्यांत येते त्याप्रमाणें "शेजीचे"हि कितीतरी प्रकार असायचे हें उघडच आहे. कधीं वयानं आईइतकी मोठी व आईप्रमाणेंच चुकलंमुकलं सांगणारी, समजूतदार शेजारीण लाभते. परंतु हा योग क्वचितच! आईची माया शेजारीण कशी करूं शकेल? वरचेवर लहान सासुरवासणीचं मन आपल्या आईची व शेजारणीची सारखी तुलना करीत असतं. दोघीहि जेवायला वाढतात. पण फरक किती!

**शेजी जेवूं घाली, राळ्याचा डिखळा**
**बया जेवूं वाढी, भात साळीचा मोकळा**

दोघीहि कधींमधीं न्हाऊं घालतात. पण शेजीबाईचं पाणी घालणं इतकं अपुरं कीं पुरती वेणीसुद्धां भिजत नाहीं! अन् आईचं न्हाणंमाखणं?

**शेजी घाली न्हाऊ, न्हाई भिजली माझी वेणी**
**बया घाली न्हाऊ, न्हाणी दिसे नदीवाणी!**

असा फरक असला, तरी अडीनडीला साह्य देणारी, वेळेवारी एकादा उसना जिन्नस देणारी शेजीबाईच असते आणि या उसनवारीचे प्रसंगहि वरचेवर येतात. गरीबींत डाळ आहे तर पीठ नाहीं न् पीठ आहे तर गहूं नाहीं अशी दैना पांचवीला पुजल्यासारखी कायमचीच असते. गरीब गृहिणी किती आर्जवानं उसनं मागते आहे पहा—

**शेजी तूं आईबाई मला उसनं देग गहूं**
**पाव्हनं आल्याती माझं भाऊ**

परंतु नेहमींच ही उसनवारी पाहून एखादी शेजारीण रागावते, अबोला धरते. गरीब गृहिणीच्या तें लक्षांत येतं—

**शेजीच्या घरा गेले, शेजी बोलेनाशी झाली**
**तिला कोडं पडिलं, काय मागायाला आली**

कधीं ती दुरुत्तरं करते. बापडी दळीद्रानें नम्र झालेली ही गृहिणी समजुतीनें म्हणते—

**दिल्याघेतल्यानं पानी पुरंना न्हईचं**
**माझ्या शेजारनी, ग्वाड बोलनं सुईचं**

बाई, तुझे गोड शब्द मिळाले कीं आणखी मला कांहीं नको. तुझ्या श्रीमंतीचा मीं कधीं दुःश्वास केला नाहीं. तुमचं घर भरलेलं असो, त्याचा मलाहि आधारच वाटतो—

**सम्रत शेजीबाई असूंदे माझ्या रामा**
**तिच्या रांजनाचं पानी, येईल मला कामा**

असें समाधान मानलें तरी घराला घर लागलेलें असलें कीं मुलांवरूनहि शेजारणीशीं भांडण होतं, कधीं शेजीजवळ मनची एकादी गोष्ट बोलावी तर ती त्याचा बोभाटाहि करते—

**शेजीपाशी गुजु वाटे बोलाया दरज**
**एक्या गोष्टीवरी तिनं रचिला बुरुज**

तथापि कशीहि शेजारीण असली तरी तिच्याशीं प्रेमानं वागावं अशी आईची शिकवणूक असते. आणि सर्वच शेजारणी वाईटहि नसतात. एकादी शेजारीण प्रेमळहि असते व ती आईच्या सहवासाची उणीव भासूंहि देत नाहीं. अशा वेळीं कन्या कृतज्ञतेनं म्हणते—

**शेजी जोडयेली बयाच्या तोलाची**
**आगत लागली तिच्या मंजुळ बोलाची**

अशा तऱ्हेनं शेजीबाई ही आयुष्यांतली एक मैत्रीणहि ठरते. परंतु इतक्या सरलमनस्क, देवमाणूस ठरणाऱ्या स्त्रिया अपवादात्मकच म्हटल्या पाहिजेत च म्हणूनच सज्जन शेजारणींच्या ओव्यांची संख्या अल्प आहे व तिच्या कारवायांच्या हकीकती दर्शविणारीं गीतें अधिक आहेत, यांत आश्चर्य नाहीं!

—*—

# शेजीबाई

शेजी आली घरा, बस म्हनाया तिला होवं
माझ्या बयाची मला सवं १
शेजी जोडयेली बयाच्या तोलाची
आगत लागली तिच्या मंजुळ बोलाची २
शेजी आली घरा, बस म्हनावं पिरतीनं
मला शिकविलं मायबाई गरतीनं ३
गुज बोलाया आल्या, गुजेच्या गुजरणी
माझ्या मावंच्या शेजारणी ४
शेजीचा शेजारू, माझं अर्धं माहेरू
तिठं इसावा खिनभरूं ५
पराया मुलुखांत आपुलं न्हाई कुनी
तिठं जोडिल्या मायबाहिणी ६
कंठिते परमुलुख जिथं लावियेला गुळ
आपुल्या बयावाणी शेजी करावी जवळ ७
जीवाला माझ्या जड, शेजी जिवाला माझ्या झाली
माझ्या बयाच्या आधी आली ८
शेजीपाशी गुजु सांगुन आल्ये चट
बया माऊलीवानी हृद राधेचं बळकट ९
शेजीपाशी गुजु बोलून आल्ये चट
काय नारीचं हृदं घट, न्हाई पडला उमट कुठं १०
शेजीपाशी गुजु गळीनं गेलं वारं
माझ्या बयाबाईचं गुजाचं घर न्यारं ११
शेजीपाशी गुजु, पालथ्या घागरीवरचं पानी
साठ्याची ही नार दिसेना बयावाणी १२

शेजीपाशी गुजु, वाटे बोलाया दरज
एका गोष्टीवरी तिनं रचिला वुरूज १३
शेजीपाशी गुजु, गुजाचा झाला वारा
तिनं एकाचं केलं बारा १४
अंतरीचं गुजु, नको बोलूंस शेजीपाशी
येईल वांकडं एक्यादिशी १५
शेजीच्या बोलन्याची हृदय झाली खोली
जाईन बयापाशी काढीन तिची किल्ली १६
बया शिकवीते, कडूलिंब देऊनी हातांत
शेजी शिकवीते गूळ वाढूनी ताटांत ! १७
काय करायाचा शेजीचा गूळ गोडु ?
कामाला आला माझ्या बयाचा लिंब कडु ! १८
शेजी घाली पाणी न्हाई निवला माझा माथा
बया न्हाऊं घाली, भरला रांजन झाला रिता १९
शेजी घाली पाणी, न्हाई भिजला माझा गोंडा
बया न्हाऊ घाली, वेशीला गेला लोंढा २०
शेजी घाली पाणी न्हाई भिजली माझी वेणी
बया घाली न्हाऊं, न्हानी दिसे नदी वाणी २१
शेजी जेवुं वाढी, न्हाई भरलं माझं पोट
बया करी ताट, करंज्यासजुन्या लाडू त्यांत २२
शेजी जेवू घाली राळ्याचा डिखळा
बया जेवु घाली, भात साळीचा मोकळा २३
शेजी काढी चोळी उनाक रंगाची
बया देई खण, खडी सोनेरी भिंगाची २४
जीवाला माझ्या जड शेजी पाहते साण्यावाटे
मायबाईचं माझ्या पानी खळंना डोळ्यावाटे २५
शेजी तूं आईबाई उसनी घाल सोजी
बया पाव्हनी आली माझी २६

शेजी आईबाई घाल उसनं वेलदोडं
बंधुजीची शिंगी नाचते वाड्यापुढं २७
शेजी तूं आईबाई मला उसनी दे ग डाळ
माझ्या बहिणाचं आलं बाळ २८
शेजी आईबाई कर गरज बोटव्याची
बंधुजीची आली दौड नटव्याची २९
शेजी आईबाई, घाल उसनं मालपोव्हं
माझ्या बंधुजीला निरशा दुधाची ग सवं ३०
शेजी आईबाई उसनं घाल लाडू
बंधुचं बाळ आलं, आतां कवाशी सोजी काढूं? ३१
शेजी तूं आईबाई, मला उसनं द्यावं गहु
बंधु पाव्हनं आल्याती माझं भाऊ ३२
शेजीचं उसनं आडसरी पायली
बयाच्या उसन्याची याद कुनाला ऱ्हायली? ३३
शेजी आली घरीं, बस म्हनुनी देते पाट
माझ्या पित्याची वहीवाट ३४
शेजीघरीं गेले, शेजी गेली कोनामंदी
झाले मी शहानी मनामंदी ३५
शेजीघरीं गेले, शेजी बोलली उशिरानं
सासुबाईची ताकीद नको जाऊ दुसऱ्यानं ३६
शेजीघरीं गेले, शेजी बोलेनाशी झाली
तिला कोडं पडियेलं, काय मागायाला आली ३७
शेजीच्या घरा गेले, शेजी म्हणंना खाली बैस
कसा कंठावा परदेस? ३८
जीवाला जडभारी माझं दुखत ऱ्हाई काई
शेजीच्या बोलन्याचा मला शीण आला बाई ३९
उथळ पान्यामंदी घागर बुडयेना
शेजीच्या बोलन्याचा मला इसर पडयेना ४०

पाटानं जातं पानी उसासंगट कर्दळीला
शेजारीनबाई नगं येऊंस वर्दळीला ४१

सम्रत शेजीबाई असूदे माझ्या रामा
तिच्या रांजनाचं पानी येईल मला कामा ४२

शेजारीनबाई किती येसी तिनतीनदां
मला सुचेना कामधंदा ४३

—*—

विभाग ३

# समाजदर्शन

(१) समाज-दर्शन

(२) भाविकता

(३) स्त्रीजीवन

# समाजदर्शन

आतांपर्यंत या सर्व गीतांतून ग्रामीण समाजाचें जें चित्र स्पष्ट झालें आहे, त्यावरून विचार–व्यवसाय, आचार, राहणी इत्यादींचें थोडेंबहुत ज्ञान होत आहे. परंतु बाह्यरेखाकृतीनें चित्राची आकृति स्पष्ट होत असली तरी संपूर्ण चित्र रंगवायचें असेल, तर त्यांत रंग, छायाप्रकाश, सूक्ष्म रेषा, पार्श्वभूमि इत्यादि अनेक गोष्टी चित्रित कराव्या लागतात. या समाज-चित्राचीहि गोष्ट तशीच आहे. स्थूल मानानें त्याची कल्पना आली असली तरी समाजदर्शन पूर्णपणें घडण्यासाठीं आणखीहि कांहीं बाबींचा विस्तारानें विचार होणें जरूर आहे.

कोठल्याहि समाजाच्या परिस्थितीचा अभ्यास करतांना त्या समाजाची शैक्षणिक पातळी पहावी लागते, आर्थिक स्थिति काय आहे याचा शोध घ्यावा लागतो. धार्मिक कुलाचार, सणवार, निरनिराळीं दैवतें, त्यांच्या आराधना, इत्यादि अजमावून घ्यावें लागतें. सामाजिक निरीक्षण करतांना समाजाचा अर्धा भाग स्त्रियांचा असतो, हें ध्यानीं घेऊन स्त्रियांना समाजांत कितपत स्थान आहे, त्यांच्या नीतीच्या कल्पना काय आहेत, त्यांची आर्थिक स्थिति कशी आहे इत्यादि पहावें लागतें व त्यांच्या आचार-विचारांचेंहि आकलन व्हावें लागतें. त्याचप्रमाणें समाजाच्या राहणीची पूर्ण कल्पना येण्याकरितां ह्या लोकांचें अन्न, वस्त्रें, वेषभूषा, दागिने व बौद्धिक दर्जा ह्या साऱ्या गोष्टींचा सूक्ष्म विचार होणें जरूर आहे. कारण समाजाची धारणा याच सर्व गोष्टींवर अवलंबून असते.

अर्थात् या "समाजदर्शन" विभागांत या सर्व गोष्टींचा कमीअधिक प्रमाणांत विचार झाला आहे. पैकीं धार्मिक भावनांच्या विभागांतील देव-दैवतांचें प्रमाण अधिक, धर्मभोळेपणा जास्त, आणि श्रद्धाळू मनानें देवांबद्दल रचलेलीं गीतेंहि विपुल ! तेव्हां भाविकता हें एक स्वतंत्र प्रकरण करणें अवश्य झालें. स्त्रीजीवनाचें निरीक्षण हाहि एक स्वतंत्र विभाग केला व बाकीच्या अनेक गोष्टींचा थोडक्यांत एकत्र विचार केलेला आहे.

## शिक्षणः—

शिक्षणावर समाजाची सुधारणा अवलंबून असते. परंतु ग्रामीण जनतेचे अजूनहि कशाचे हाल होत असतील तर ते शिक्षणाचेच. बहुतांशीं पुरुषवर्गच जेथें अशिक्षित, तेथें स्त्रीसमाजांत निरक्षरता आहे हें सांगायला नकोच. खेडगांवांतून बहुधा शाळा नसते. व असली तरी आपलीं कामं सोडून शिकायला कोणी जातहि नाहीं. स्त्रीचें तर लहानपणीं लग्न होणार ! सासुरवासिणीला कोठली शाळा ? पन्नास वर्षांपूर्वीं पांढरपेशांत देखील स्त्रीशिक्षणाबद्दल एक प्रकारचा दुराग्रह व गैरसमज होता. त्याच वृत्तीचे संस्कार अजून खेडुतांत जीव धरून आहेत. उदा० स्त्रीनं 'पत्र वाचणं' म्हणजे कांहींतरी कुलीनपणाला विघातक अशी गोष्ट आहे असं मानून तशाहि अर्थाच्या ओव्या रचल्या गेल्या. पुढील ओवी पहा—

**पाटलाच्या आम्ही मुली, न्हाई कुनाला मेचायाच्या**
**अंगी लखोटा वाचायाच्या**

अर्थात्च काळ बदलला तशीं हेंहि मत थोडें सौम्य झालें असेल, परंतु स्त्री मात्र अजून निरक्षरच आहे. अगदीं अलिकडे घरांतली बालपिढी, लहान मुलगे निदान साक्षर तरी होऊं लागलेले दिसतात; पण त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे. त्यामुळें एकादा मुलगा शिकत असला तर घरच्या निरक्षर स्त्रीजनाला किती कौतुक वाटतें ! अन् कां वाटूं नये ? घरचे कारभारीसुद्धां जिथं कागदावर अंगठा उठवून काम चालवतात, तिथं बाळ लिहूं वाचूं लागला तर तें अपूर्वाईचंच नाहीं का वाटणार ? पुढील ओव्या पहा किती कौतुकाच्या आहेत—

**साळंला जातां जातां पोरं येत्यात तपासाला**
**माझा बाळराय घेतो कंदील अभ्यासाला**
**पोथीपुस्तकाचं मांडीला झालं वझं**
**बाळा, किती ग्यानी हृदं तुझं**

कधीं एकादा प्रौढ खेडुत शिकून नांव मिळवतो. अशा वेळीं बहीण त्याचें वर्णन नवलपरीनं सांगते—

**लिहीनार पुसनार, शाई लागली धोतराला**
**बंधु वकील सातार्‍याला**

परंतु एकंदरींत ज्यांत शिक्षणाचा उल्लेख आहे अशा ओव्या अतिशय कमी प्रमाणांत आढळतात. याचाच अर्थ, शालेय ज्ञानाचा संपूर्ण अभाव या जनतेंत आहे ! जास्त शिक्षण घेतलेले लोक आतांशा कोठें कोठें दिसतील, पण ते अपवादच म्हटले पाहिजेत. पुरुषांतच जर हें साक्षरतेचें प्रमाण इतकें कमी तर स्त्रीजनता त्यापासून अजूनहि दूरच आहे हें सांगायलाच कां हवं !

अशा प्रकारें शालेय शिक्षण अर्थात् मुलींना मिळत नाहीं. एक तर शिक्षणा-बद्दल विकृत समज व दुसरं स्त्रियांना वेळ तरी कोठला ? बाळपणापासूनच प्रपंचांतील कामें मागें लागतात व दारिद्र्य असलें तर पहायलाच नको. लहान मुलगे व मुली गुरं राखुळीला नेतील. शेतांत, मळ्यांत, मोटेवर, पेरणी मळणी, इत्यादि सर्व कामांत स्त्रियाहि पुरुषाबरोबरीनें कामें करतांना पुष्कळदां आढळतात.

अर्थात् शालेय शिक्षण तेंच खरें शिक्षण ही कल्पना बाजूस ठेवली तर मात्र अनेक प्रकारचें शिक्षण मुलींना मिळत असतें. मुलींचें शिक्षण व शाळा कोणती तें ऐका—

**काम तें करावं येळेच्या येळेला**
**मायबाई शिकले तुमच्या साळंला**

आई ही शिक्षक व आईचा सहवास हीच शाळा, ही कल्पना उगीच येत नाहीं. माहेरघर हेंच मुलीच्या दृष्टीनें मोठें विद्यालय ! येथें बाळपणापासून मुलगी कितीक धड शिकते ! पाकशास्त्राचा धडा पहा—

**सुगरीनबाई, तुझा सुगरपना मला दावु**
**कसा सोजीला साटा लावूं ?**

लोकांशीं कसें वागावें याचा दुसरा एक धडा—

**शेजी आली घरा, बस म्हनावं पीतीनं**
**मला शिकवलं मायबाई गरतीनं**

कुलीनपणाची वागणूकदेखील आईच शिकवीत असते—

**गरतीमधे वसे, गरतीवाणी माझं चित्त**
**बया गवळणीनं शिकवल्याचं झालं हीत**

याखेरीज केव्हां केव्हां स्त्रिया आपल्या अंगच्या हुशारीनें व्यापार वगैरे करून, धान्याची खरेदी विक्री करून चार पैसे मिळवणाऱ्याहि असतात. केव्हां केव्हां भाऊबदीण भागीदारीनं शेती करतात, त्याचा उल्लेख आढळतो—

**सयांना इच्यारते, माझ्या बंधुचा ऊंस कसा ?**
**त्यांत चवथाई माझा हिस्सा !**

एकादी कर्तबगार स्त्री पानमळ्याचीहि लागण करून पैसे मिळवते. अभिमानानें अशी स्त्री मुलाला सांगते—

**पानखातवन्या, पानं खाशील त्यवढी देते**
**तुझ्यासाठीं पानमळ्याची खोती घेते**

अशा स्त्रियांचें प्रमाण अगदीं अल्पच असल्यानें त्या इतर सामान्य स्त्रियांच्या दृष्टीनं कौतुकास्पद ठरतात.

शिक्षण नसलें तरी व्यवहारी दृष्टीनं खेडुत दक्ष असतात असें दिसून येतें. खेडुतांना नेहमींच खरेदीविक्रीचे प्रसंग येतात व ते चोखपणें, न फसतां हे व्यवहार करीतहि असतात. आपल्या उद्योगधंद्यांत हीं माणसं हुशार, चलाखहि असतात आणि कांहीं तडफदार माणसं तर सगळ्यांवर वजन मारून असतात. उदा.

**गांवोगांवीचं पाटील, माझ्या बंधुच्या आरायांत**
**नित कचेरी दारायांत**

कधीं खेडुत उत्तम व्यापारी, चांगला अडत्याहि असतो—

**शहराच्या बाजारांत मालाला ठेलाठेली**
**गुजर बंधुजीची अडत्याची एक बोली**

परंतु असें असलें तरी शालेय ज्ञानाचा अभाव या वर्गांत आहेच. ज्ञानार्जनाचे सर्वच मार्ग अशा प्रकारें बंद असल्यानें सावकाराचे पाश, कर्ज, दारिद्र्य, यांचाहि भार वर्षानुवर्षे लोकांना सोसावा लागत आहे व अशिक्षितपणामुळें विचारांत, व्यवहारांत, समजुतींत व समाजांतील वर्तणुकींत एक प्रकारचा मागसपणा आढळून आल्यास नवल नाहीं. परंतु सुदैवानें साक्षरता-

प्रसाराचे यत्न चहूंकडे होत आहेत, व ही निराश परिस्थिति पालटण्याच्या मार्गावर आहे. म्हणून लवकरच शेतकरी शिक्षणानं अधिकच कार्यक्षम होतील असा आशावाद करावासा वाटतो.

आर्थिक दृष्टीनं पाहिलं तर कल्पनेची श्रीमंती पुष्कळच आढळून येते. सोन्याच्या सुपलींतून मोतीदाणे घोळणाऱ्या मुलींचीं शब्दचित्रें आढळतात, तसे शेल्याचे जरीपदर दुरून लकाकतांनाहि आढळतील! बाळ अंघोळीस बसल्यावर मोत्यापोवळ्याची रांगोळीहि या कल्पनेंत स्त्रियांना दिसून येते. परंतु खरोखर पाहिलं, तर कल्पनेचें राज्य निराळें व दैनंदिन आयुष्य वेगळें. या रोजच्या आयुष्यांत शेतकरी गरीब आहे, पुष्कळदां तो मुंबईला जाऊन गिरणींत रात्रपाळी करतो नाहींतर भाऊच्या धक्क्यावर हमाली करतो, अशा प्रकारचेहि प्रसंग येतात. कोणी मातबर शेतकरी असतीलहि. गायगुरांनीं गोठे भरले आहेत, रेशमी हातभर पदर असलेलीं लुगडीं पत्नी नेसत आहे, मळेशेतीचें वैभव आहे असेहि संपन्न शेतकरी कोठें कोठें आहेत व त्यांच्या वैभवाचीं वर्णनं या गीतांतून वरचेवर आलेलींहि आहेतच. परंतु असे लोक अगदीं थोडे व बहुसंख्य किसान जनता दरिद्रावस्थेंत, कर्जांत बुडून, कशीबशी जगत आहे हेंहि स्पष्ट दिसून येतें. या दारिद्र्याचे उल्लेखहि या ओव्यांतून पुष्कळच आढळतात. उदा०

**फाटला पाटव, घेते निरीला झाकून**
**आब कंथाचा राखून**

पतीची अब्रू संभाळण्यासाटीं फाटकं लुगडं जपण्याची ही पत्नी कोशिस करीत आहे. हमाली करणाऱ्या भावाची बहीण खिन्न उद्गार काढीत आहे—

**भाऊच्या धक्क्यावरी गोनी फुटली गुलालाची**
**माझ्या बंधुजीची छाती रंगली हमालाची**

शेजीबाईपाशीं रोजचे गहूं, डाळ, इत्यादि उसने मागावे लागल्याचेहि उल्लेख आढळतात. बहिणीला भाऊबीजेला एक खण पाठवण्याइतकीहि गरीब भावाला सवड होऊं शकत नाहीं, असेहि शब्द आहेत. तर गरीब बहिणीचीं लुगडीं फाटून गेल्यानं ती भावाच्या लुगड्याची वाट पहाते असेंहि शब्दचित्र आढळतें. अशा प्रकारें दारिद्र्याची छाया अधूनमधून या

ओव्यांवरहि पडलेली आढळते. परंतु दरेक समाजांत गरीबी आणि श्रीमंती दोन्ही नांदत असतातच; त्याचप्रमाणें संपन्नतेचे उल्लेखहि कितीतरी पटीनें जास्त आहेत व समाधानीपणाचा मधुर भाव या सर्व गीतांतून मिसळला गेला असल्यानें दृष्टीसमोर गरीब परंतु खाऊनपिऊन सुखी अशा शेतकऱ्यांचेंच शब्दचित्र येतें. ग्रामीण स्त्रीच्या आवडीनावडी किती साध्या! कपड्यांबद्दल, दागिन्यांबद्दल वगैरे मोठ्या अपूर्वाईनें काढलेले उद्गार ध्यानीं घेतां एकंदर समाजाच्या वेषभूषेची कल्पना येते.

कपड्यांमध्यें पाहिलं तर पुरुषांनीं वापरण्याचे शेलारी, शेला, बादली पटका, मंदील, कोशा, अष्टीचं धोतर इत्यादि कपड्यांचें वर्णन आढळतें. जरीच्या तारांचा पटका ही एक ऐश्वर्याचीच साक्ष म्हटली पाहिजे. अलीकडच्या ओव्यांतून कोटबूट, इत्यादिहि नांवें येतात. पैशांचा कसा कमरेला बांधीन असल्याचा उल्लेख आहे, तसाच पानांच्या बटव्याचा व चंचीचाहि गौरवपूर्वक उल्लेख आढळतो.

स्त्रियांच्या कपड्यांत प्रमुख म्हणजे लुगड्यांच्या तऱ्हा. पण त्यांतल्या त्यांत "अष्टी पातळ" व काळी चंद्रकळा यांची आवड विशेष दिसून येते. साळवी लुगडें, चिरी, चुनाडी, फुटाणी, नामावळ, लालवा, गोमेकाठी, खुतनीच्या पदराचं, कडेल, पोफळी, गोपयाच्या पदराचं, मुगवी पैठणी, इत्यादि कितीतरी प्रकारचीं लुगडीं! लाल रंगाची विशेष आवडहि अधुनमधून व्यक्त झाली आहे. पंचरंगी चोळी, सोनेरी भिंगाची खडी असलेले खण, जरीची चोळी, 'जुंधळी वाणाचा' (ठिपक्याचा कपडा) इत्यादि उल्लेखही सांपडतात. मात्र पुरुषांमध्यें नखीचं व अष्टीचं धोतर व स्त्रियांत अष्टीचं* पातळ हे उल्लेख विशेष अगत्यानें केले जातातसें दिसतें.

दागिन्यांबद्दलहि या दृष्टीनें पुष्कळ माहिती मिळते. दागिन्यांचीं रूढ नांवेंहि कांहींशी निराळींच आहेत. डाळी, [टिकल्यांचा दागिना], मणि [एकदाणी], डोरलं [मंगळसूत्र], दाब [कमरपट्टा], पानपुतळ्या [पुतळ्याची माळ], तोळबंद्या [दंडांतल्या वेळा], कडीलंगर [हातांतले

* अष्टीचं म्हणजे अष्टी गांवाचं; बहुधा पिवळ्या वाणाचीं पातळें व करवतीकाठी धोतरांचा उल्लेख 'अष्टीचं' म्हणून केला जातो.

दागिने ], चितांग [ सरी ] इत्यादि नांवें प्रचारांत आहेत. हीं नांवें आपल्या परिचयाचीं नसलीं तरी, शिंदेशाही तोडे, चंद्रहार, वाक्या, टिका, साखळ्या, तोरड्या, पैंजण, गोटपाटल्या, नथ, बुगड्या हे सर्व दागिने आपल्या पहाण्यांतील आहेतच. लहान मुलाच्या बाळलेण्यांचेंहि वर्णन आढळतें. घागऱ्या असलेला करदोडा, गळ्यांतले वाघनख व ताईत, पायांतल्या चांदीच्यां कुयऱ्या [ कुयऱ्याच्या आकाराच्या घागऱ्या असलेल्या साखळ्या ] इत्यादी कौतुकाचे उल्लेख आहेत. दागदागिन्यांची आवड त्यावरून कळून येण्याजोगी आहे.

प्रत्येक समाजांत देवभोळेपणा व अंधश्रद्धा यामुळें कांहीं समजुती रूढ झालेल्या असतातच. पुष्कळदां त्यांचं स्वरूप धार्मिक असतं व केव्हां केव्हां दैनंदिन सुखदुःखाशींहि त्यांचा संबंध असतो. खेडुत जनतेंत शिक्षणाच्या अभावानंच कीं काय कोण जाणे, पण अशा अनेक समजुती आहेत. देवाला कौल लावणें, नवस करणें, नवस फेडणें, देवऋषी–पंचाक्षऱ्याचं महत्त्व मानणें, इत्यादि गोष्टी मोठ्या आस्थेवाईकपणें चाललेल्या दिसतात. पांढरपेशांत, शिक्षित स्त्रियांत देखील दृष्ट लागणें, शकुन–अपशकुन, शुभाशुभ गोष्टींचे संकेत हे सर्व प्रकार अंधश्रद्धेनें चालतात, तेथें खेडुतांत त्याचा प्रसार निःसंशय अधिक आहे ह्यांत काय आश्चर्य ! लोकभ्रमाचीं कांहीं उदाहरणें पहाण्यासारखीं आहेत.

शकुन अपशकुनांचें प्रस्थ बरेंच दिसून येतें. उदा० पांच पुत्र असणं ही भाग्याचीच गोष्ट मानली जाते व गांवाला जातांना अशा पुत्रवतीचं दर्शन घेणं हा एक शुभ शकून मानला जातो—

**भावाची बहीण, पांच पुत्रांची माता**
**घ्यावा शकुन गांवा जातां**

तसेंच पेरणीला शेतकरी निघाला आणि त्याला जर मांग जातीचा माणूस प्रथम भेटला तर तो एक शुभशकूनच—

**पेराया जाते कुरी आडवा आला मांग**
**ताईत बंधुजीचं उद्या फिटत्याल पांग**

स्त्रीसमाजांत तर या शुभाशुभाचं मोठंच महत्त्व असतं. प्रवासाला जातेवेळीं

तास पक्षी आडवा गेला तर तोहि मोठा शकुन मानतात. एक स्त्री सांगते, माहेरीं स्वागत छान झालं. कारण—

**माह्याराला जाते, आडवा गेला तास**
**बया वाढित्ये, दुधभात जेवायास**

अशा शुभ गोष्टींप्रमाणें अशुभ गोष्टीहि ठरलेल्या आहेत. उदा० जिला भाऊ आहेत अशा स्त्रीनं अवसेला न्हाणें अगदीं अशुभ मानतात—

**भावाच्या बहिनीला सांगुन पाठवा**
**आज अवसेचा पाडवा, न्हाया बैसली उठवा**

तसेंच अमावास्या व पौर्णिमा या दिवशीं वेणी घालणं हें देखील भावाला अशुभ आहे असें समजलें जातें—

**अवसे पुनवेला नका घालूंसा माझी वेणी**
**माझ्या पाठचा चिंतामणी**

फार काय पाठीवरून विस्तव नेणं हेंहि अशुभ मानलं जातं. पाठच्या भावंडांना ही अशुभ गोष्ट आहे असे उल्लेख आहेत—

**माझ्या पाठीवरनं नका नेऊंसा इंगळ**
**ताईत माझा बंधु, पाठचा तांदुळ**
**माझ्या पाठीवरनं नका नेऊंसा आगिन**
**माझ्या पाठची नागिन**

ह्याचप्रमाणें दिव्यावर दुसरा दिवा लावणं हेंहि भावाला बाधक आहे अशी समजूत दिसते—

**दिस मावळला, नको दिव्याला दिवा लावू**
**वाणीतिणीचा माझा भाऊ**

अशा प्रकारें शुभाशुभ गोष्टींचें प्राबल्य खेडुत जनतेंत आहे.

तसेंच जीवनांत कांहीं ठराविक संकेत हे असायचेच. तेहि येथें दिसून येतात. दारांत कावळा ओरडूं लागला कीं कुणी पाहुणा येणार असा संकेत दिसून येतो. हा पाहुणाहि बहुधा भाईरायच असायचा.

**कावळा कुरकुरे परसुं दारीच्या मेढीवरी**
**बंधुजी पाव्हना, सारंग्या घोडीवरी**

तसेंच तिन्हीसांजा लक्ष्मी येते व ती दिवा पाहून घरांत शिरते असाहि संकेत दिसून येतो. यामुळें दिव्यांचा व लक्ष्मीचा उल्लेख एकत्र असा अनेक गीतांतून आढळतो. उदा०

**तीन्हीसांजा झाल्या, दिवा शिगेला हलेडुले**
**लक्ष्मीमाय गुज बोले**
**भरली तीनसांज, दिवा लावावा सूनबाळ**
**लक्षुमीची झाली वेळ**

दृष्ट लागण्याच्याहि अनेक समजुती आहेत. परंतु त्या कडूलिंबानं अगर विषबंदाच्या वेलानं उतरत असल्याचीहि समजूत असल्यामुळें 'दृष्टावणें' व दृष्ट उतरणें याचीं हीं गीतें आहेत.* नवससायास करणें, कौल लावणें यासंबंधीं क्वचित् उल्लेख आढळतात. देवाच्या देवळांत देवाला अनुकूल प्रतिकूल फुलें लावून 'कौल मागण्याची रीत' दिसून येते, त्याचा उल्लेख पहा—

**देवाच्या देऊळांत किती उशीर उभी राहूं**
**गुरवाच्या मुला, आधीं कौल माझा लावुं**

याचप्रमाणें देवाला नवस बोलण्याचीहि पद्धत आहे; ती तर आपणासहि परिचित आहेच. एक स्त्री म्हणते—

**नवस बोलले चतुर्सिंगीच्या लाडीला**
**सापाचं कासरं, वाघ जुंपलं गाडीला**

यल्लमाला नवस फेडायला जातांना एक आई मुलाला सांगते—

**सौंदत्तीपासून जोगळाई सवा कोस**
**बाळा, नवसाचा लिंब नेस**

भावाला बरें वाटावें म्हणून रस्त्यावरचे खडे पदरानें लोटण्याचा एका स्त्रीनें मरीआईला नवस केला आहे—

**आई तूं मरी माता, तुला लिंबाऱ्याची पाटी**
**बंधुच्या जीवासाठीं, मी शेल्यानं खडे लोटी**

अशाप्रकारें दैवतेंही अनंत व त्यांना करण्यांत येणारे नवसही अनंत आहेत. देवभोळेपणाचेंच हें एक स्वरूप आहे. याच्या किंचित् पुढची पायरी

* दृष्टीसंबंधींच्या ओव्यांचें विवेचन "तान्हुलें" या सदरांत आलेलें आहेच.

म्हणजे, या देवतांचा कोप झाल्यानंच गांवांत दुखणीं उत्पन्न होतात ही भोळी समजूत होय. मुलाला खरूज नायटे वगैरे झाल्यामुळें एक भोळी स्त्री हा, रागीट जमदग्नीचा प्रकोप झाला आहे असें मानीत आहे:-

**देवामंदी देव, जमदग्नि वाईट**
**त्येनं बाळाला दिलं खरजु खोकलं नाईटं !**

याचप्रमाणें गांवावर मरीआईचा कोप झाला तर महामारी उद्भवते या कल्पनेनें एक आई मरीआईला नवस करून विनंति करीत आहे—

**आई तूं मरीमाता तुला जरीचं पाताळ**
**आमुच्या खेड्यांतून स्वारी जाऊंदे शीतळ**

मरगाईलाहि याप्रमाणें जरीचें पातळ द्यायचा नवस केलेला पाहून एकंदरींत स्त्रीवर्गाचा देवभोळेपणा व विलक्षण समजुती खेडेगांवांत कशा तऱ्हेनें वास करतात ह्याची स्पष्ट कल्पना येते. ज्ञानाचे हात पोचल्यावांचून या समजुती कशा दूर होतील ?

दैवतांप्रमाणेंच कुलाचार व सणवार यावरूनहि समाजाची धार्मिक पातळी समजूं शकते. पांढरपेशाप्रमाणेंच दिवाळी, दसरा, नवरात्र, गौरी-गणपती इ. सणाचे दिवस शेतकरीहि करतात. पण कांहीं सण शेतकी जीवनाशींच संबंधित असल्यानें ते त्यांना अधिक प्रिय असतात. उदा० बेंदूर ऊर्फ पोळा, हा बैलांच्या उत्सवाचा शेतकऱ्याला केवढा अगत्याचा वाटतो ! याचीं वर्णनें मजेदार आहेत. उदा० बेंदराच्या दिवशीं घुंगरांची किणकिण सारखी ऐकूं येते, ती कां बरें ? एक बहीण सांगते—

**बेंदराच्या दिशीं घाट्या घुंगुरं वाजत्याती**
**बंधुजीचं बेंदराचं बैल सजत्याती**

बैल जणुं नवरदेवाप्रमाणें सजवले जातात. एक पत्नी म्हणते—

**बेंदराच्या दिशीं नंदी झाल्याती नवरं**
**हौशा बांधावीं चवरं**

घरांतलीं धाकटीं मुलं छोटे खोंड सजवूं लागतात. त्यांची मागणी काय आहे बरें ?

सनामंदी सन बेंदूर गजगजे
बंधु बैलाला तेल पाहिजे

अशाप्रकारें बैलांचीं शिंगें रंगवून त्यांची पूजा करतात, व वाजतगाजत मिरवणूकहि काढतात. शेतकऱ्यांनीं बेंदराचा सण अगत्यानं करावा, यांत किती औचित्य आहे ! बेंदरानंतर महत्त्वाचा सण नागपंचमी हा असतो व शेतकरी लोक विशेष आस्थेनें तो साजरा करतात. बहिणीनं भावाच्या दीर्घायुष्यासाठीं हा सण केला पाहिजे असं मानलं जातं—

पंचमीच्या दिशीं नागाला दूधलाह्या
औख मागूंया भाऊराया

या दिवशीं वारुळाला धक्का लागूं नये म्हणून नांगरटहि बंद !—

पंचमीच्या दिशीं नागोबाला पऊत
सोड कुनब्या आऊत

हा खेळायचा सण असल्यानं ग्रामीण स्त्रिया व मुली या दिवशीं फेर धरून गाणीं म्हणतात, चहुबाजूला झाडांझाडांवरून झोपाळे झुलूं लागतात व लहानमोठ्या स्त्रिया ( व कोठेंकोठें पुरुषसुद्धां ) उंच उंच झोके काढण्यांत गर्क दिसतात. सर्व सासुरवासिनी यावेळीं माहेरीं यायच्या अशी पद्धत असल्यामुळें विवाहित मुली किती उत्सुकतेनं नागपंचमीची वाट पहात असतात—

बेंदरापासून पंचमी ईसरोज
नेनन्त्या बंधुजीची वाट पहाते नितरोज

अन् भाऊ येऊन मुलींना माहेरीं नेतो. नागपंचमीचीं कितीतरी सुंदर गीतेंही प्रचारांत आहेत. एकंदरींत नागानं ज्याप्रमाणें ऐटींत फडा वर काढून पहावें, त्याप्रमाणें नागपचमीचा सण शेतकरी आयुष्यांतून जणुं उंच मान करून पहात आहे असें मनांत येतें. नंतर गौरीगणपती भाद्रपदांत येतात. पण त्यासंबंधीं व दसऱ्याबद्दलहि कवनें आढळत नाहींत. पण दिवाळीचीं गीतें कितीतरी आहेत. कारण दिवाळींत भाऊबीजेचा प्रेमळ दिवस येतो. भाऊ कितीहि अंतरावर असो, तो या दिवशीं बहिणीला मुद्दाम भेटायला यायचाच ! बहिण लहानगी असेल तर माहेरपणाला यायची ती दिवाळीलाच.

एकाद्या सासुरवासणीला वर्षांतल्या एकाद्याच सणाला माहेरीं जायची परवानगी मिळते. तो सण दिवाळीचाच असावा अशा इच्छेनें बहिण भावाला विनवून सांगते—

**सांगतेरे बंधु बारा सणाला नको येऊं**
**आली वर्साची दिवाळी, वाट बघाया नको लाऊं**

दिवाळी जवळ आली कीं बहीण प्रेमानं भावाला आठवण देत आहे—

**दसऱ्यापासून दिवाळी विसांदिशी**
**सख्या माघारा कधीं येशी ?**

दिवाळीचा सण म्हणजे बहिणभावंडाचं प्रेम वाढवण्याची एक पर्वणीच म्हटली पाहिजे. त्याची तयारी तर पहा—

**सोनसळे गहूं ओलवीते नखुल्याला**
**माझ्या बंधुजीला भाऊबीज धाकल्याला**

बहीण भावाला शेवया करते, तऱ्हेतऱ्हेचीं खाद्यं करून वाढते. भाऊ बहुतेक लुगडं किंवा एकादा दागिना, अगदीं गरीब असला तर चोळीचा खण ओवाळणी म्हणून देतो. अशाप्रकारच्या मधुर वर्णनांनीं दिवाळीचीं गीतें सजलेलीं दिसून येतात. आणि त्यांतल्या त्यांत भाग्य कोठलें ?

**दिवाळीचा सन मला धाराजिना झाला**
**कडेवरी पुत्र, बंधु अंगुळीला आला**

दिवाळी म्हणजे आनंद, दिवाळी म्हणजे उत्कट भगिनीप्रेमाचाच उत्सव ! दिवाळीच्या दिवशीं बहिणीची धांदल उडून जाणें स्वाभाविकच आहे. एक बहीण म्हणते—

**दिवाळीचा सन, माझ्या कामाचा पसारा**
**बंधु हौशाला ओवाळाया सन न्हाई दूसरा**

अशाप्रकारें दिवाळीचं महत्त्व आहे व त्याबद्दल ओव्या पुष्कळच आढळतात.

यानंतर संक्रांत हा बराच अगत्याचा सण येतो. या दिवशीं पांढरपेशा स्त्रियांप्रमाणेंच मराठमोळा स्त्रियाहि भोगीला न्हाणें, आवा, हळदकुंकु लुटवणें, तिळगुळ व संक्रांतीचें वाण देणें इ० धार्मिक विधी करतात व त्यांचे उल्लेख गीतांतून आहेत. मात्र त्यांत फारसें नाविन्य नाहीं. होळी ऊर्फ

शिमग्याच्या सणांचीहि थोडीं वर्णनें आढळतात. ग्रामव्यवस्थेसंबंधींहि थोडी-बहुत गीतें आढळतात. खेड्यामध्यें पंच नेमून पूर्वी पंचाईतीमार्फत गांवाचे न्यायनिवाडे होण्याची पद्धत होती. पाटील कुळकर्णी हे गांवाचे जणुं राजेच असत. याहि गोष्टींचे नामनिर्देश ओव्यांतून येतात. तेव्हां खरोखरच हीं गीतें समाजाचें प्रतिबिंब दाखवणाऱ्या दर्पणासारखींच वाटतात. पुढील ओव्यांतील वर्णनें पहा—

**पाटील करी पट्टी आपुल्या गांवावरी**
**हजाराची कंठी घाली रयताच्या जीवावरी**
**पाटील करी पट्टी कुलकर्णी गेला गांवा**
**वसूल कुनी घ्यावा?**

आणि पंचमंडळींत नेमलें जाणें म्हणजे मोठाच मान. एक बहीण भावाबद्दल अभिमानानं सांगते—

**पांचामध्यें बसतो, पांचासारिखं गुन त्याला**
**भाऊ माझा चतुर बोलन्याला**

त्याचप्रमाणें पूर्वी खेड्यांतून बलुत्यांची पद्धत असे, त्याचेहि तुरळक उल्लेख आढळून येतात. याशिवाय पैशाऐवजीं धान्य देऊन पूर्वीचे खेड्यांतले खरेदीविक्री व्यवहार होत असत असं दिसतें. येथें एक माळीण हा सौदा पटवून घेत नाहीं, त्याबद्दल उल्लेख दिसतो—

**माळीण मस्तवाल वाड्याला येईना झाली**
**केजं गव्हाचं घेईना झाली**

* * *

खेडुत समाज हा असा आहे. याशिवाय अनेक चालीरीतीबद्दल, राहणीबद्दल व आचारविचारांचें स्पष्ट दिग्दर्शन करणाऱ्या ओव्या आहेत व त्या या पुस्तकांत जागोजाग आढळतील.*

---

* समाजदर्शनांत स्त्रीजीवनाचा अवश्य विचार झाला पाहिजे. परंतु त्याहि विषयाचें विवेचन सर्वांगीण करावयाचें असल्यानें पुढें स्वतंत्र प्रकरण घेऊन " स्त्रीजीवना "चें दिग्दर्शन केलें आहे.

हिंदुस्तानांत खेडीं सात लाख आहेत असें म्हणतात. कृषिवलांची संख्या त्यांत फार मोठी आहे व कमीअधिक प्रमाणांत त्यांच्या जीवनाचें सादृश्य या गीतांतून स्पष्ट झालेल्या जीवनचित्राशीं दिसून येतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. यामध्यें योग्य शिक्षण, शेतीबद्दल योग्य मार्गदर्शन, व आर्थिक सोयी झाल्यास या चित्राचे फिके भासणारे रंग अधिक मनोहर होतील व ही जबाबदारी त्यांच्या बुद्धिजीवी बंधुजनांचीच आहे, यांत संदेह नाहीं !

## कालनिश्चितिः—

या सर्व गीतांची रचना केव्हां झाली हें नक्की सांगणं कठीण आहे. अत्यंत वृद्ध स्त्रियांकडुन जें साहित्य मिळालं त्यांत आधुनिकतेचा स्पर्शही नव्हता आणि कालनिश्चितीच्या दृष्टीनं जरूर असलेल्या ऐतिहासिक ओव्या यांत मुळींच नाहींत, हें ध्यानीं घेण्याजोगें आहे.* तथापि गेल्या दीडशें—दोनशें वर्षांतली ही रचना असावीसें दिसतें.

अलीकडच्या काळांत यांत्रिक युग सुरूं झालें. खेड्यापाड्यापर्यंत मोटरी व सायकली धांवूं लागल्या, आगगाडीचा प्रवास अंगवळणीं पडला, गिरण्या—कारखाने सुरू झाले, फार काय कॅमेरा, घड्याळें, पंप इत्यादि छोट्यामोठ्या नवीन यांत्रिक गोष्टी जीवनांत शिरल्या. खेडोपाडींहि त्यांचा प्रसार झाला व अर्थातच अगदीं अलीकडच्या ओव्यांतून याहि गोष्टींचा उल्लेख होऊं लागला. अशा ओव्यांची संख्या अजूनहि थोडीशीच आहे, हें खरं, पण यापुढें ती वाढणार हें खास. उदा० आगगाडीसारखें प्रचंड वाहन लहानशा रुळावरून धांवत जातें ही गोष्ट खेडुतांना प्रथम किती आश्चर्याची वाटली असेल बरें ! एक स्त्री म्हणते—

**आगिनगाडीयेला नका म्हनूंसा राक्षसीन**
**चार बोटाच्या रुळावरनं कशी चालली मोकाशीन**

* जवळजवळ शंभर दीडशें स्त्रियांनीं हीं गीतें दिलीं, परंतु त्यांत ऐतिहासिक ओवी नांवाला देखील येऊं नये, ही एक नवलाचीच गोष्ट म्हटली पाहिजे. राजकारण हें सामान्य जनतेच्या आयुष्यापासून किती दूर होतें, याची ही साक्षच म्हणावी लागेल.

गिरण्या झाल्या, तेव्हां कितीक ग्रामवासी तरुण मिलमधें मजूर होऊन मुंबईस स्थाईक झाले. तोहि उल्लेख आहे—

**मुंबई शहरामंदी गिरनीबाई तुझा भोंगा**
**माझ्या मास्तराचा गेला टांगा**

पिठाच्या गिरणीमुळें पुष्कळ स्त्रियांमागचे दळणाचे रोजचे कष्ट कमी झाले. अर्थात् गिरणीबद्दल कृतज्ञ उद्गार आहेत—

**दळनाकांडनानं माझ्या शिनल्या दंडबाह्या**
**आली माझी गिरनी अनुसया**

अशा प्रकारें सायकल, फोटो इत्यादींचेहि उल्लेख आढळतात. याच्या पुढची पायरी म्हणजे इंग्रजी शब्दांचा प्रसार बोलभाषेंतहि होणें ही होय. अगदीं अलीकडच्या ओव्यांतून बूट, स्टेशन, कॉलेज, बटनं, बॅटरी इत्यादि शब्दांचाहि वापर आढळून येतो. उदा०

**गाडीच्या बैलाला मोत्याची वेसन**
**गाडी जातीया ठेसन**
**इष्ट झाली म्हनु पाठीच्या गुजराला**
**बटनं सैल सदऱ्याला**

अशा प्रकारचे हे अस्सल इंग्लिश शब्द कितीतरी ओव्यांतून सहज आढळूं लागले आहेत. त्यामुळें या ओव्यांचा पूर्वपरंपरेचा सद्गुण यापुढें टिकणार नाहींसें दिसूं लागलें आहे. भाषेंतहि सरमिसळ होत गेल्यानं तिच्या अस्सलपणाचा कालखंड संपला असेंच म्हणावें लागतें.

या ओव्यांचें प्रमाण अद्यापहि अगदीं कमी आहे, हीच तूर्त आनंदाची गोष्ट मानणें बरें. कालाच्या ओघांत मराठमोळा समाजाची अस्सल मराठा मायबोली स्वत्व टिकवून राहील, तरच तिचें महत्त्व कायम राहील.

—*—

# १ समाजदर्शन

## शकुन-संकेत

माहेराला जाते, आडव्या हातानें गेला तास
बया वाढते दूधभात जेवण्यास १

पेराया जाते कुरी, आडवा आला मांग
ताईत बंधुजीचं उद्यां फिटल्याल पांग २

सोमवारी बाई कोन पापीन पानी न्हाली
पूजा सांबाची ढासळली ३

देवाच्या देउळांत किती उशीर उभी राहूं
गुरवाच्या मुला आधी कौल माझा लावू ४

भावाची बहीन पाच पुत्राची माता
घ्यावा शकुन गांवीं जातां ५

गाडीच्या बैलाची सुपाएवढी पाठ रुंद
बंधुजी, दैवाचा बैल मधी बांध ६

कावळा कुरकुरे परसूंदारीच्या मेढीवरी
बंधुजी पाव्हना सारंग्या घोडीवरी ७

कावळा कुरकुरे लिंबाच्या शेंड्यावर
बंधु पाव्हना घोड्यावर ८

कावळा कुरकुरे घराच्या जईवरी
वहिनीला भेटाया, बंधु नटतो बयाघरी ९

पेरणीला जातां आडवी झाली कुरी
बंधु पिकेल तुमची शेरी १०

दिस मावळला नको दिव्याला दिवा लावू
वाणीतिणीचा माझा भाऊ ११

गुजर भावजई तुला नटण्याचा कसला चाळा
ताईत बंधुजीला दृष्टीचा जाळ आला १२
अवसे पुनवेला नका घालूसा माझी वेणी
माझ्या पाठचा चिन्तामणी १३
माझ्या पाठीवरनं नका नेऊंसा रानशेणी
ताईत माझा बंधु, नाग गुंफला माझ्या वेणी १४
माझ्या पाठीवरनं नका नेऊंसा इंगळ
ताईत बंधुजी, माझ्या पाठचा तांदूळ १५
माझ्या पाठीवरनं नका नेऊंसा आगिन
माझ्या पाठची नागिन १६
भावाच्या बहिणीला सांगुन पाठवा
आज अवसेचा पाडवा, न्हाया बैसली उठवा १७
जुन्या जुंधळ्यानं भरलं माझं कोन
जेण्या सुनंचा पायगुन १८
मेहुन्या राजसाच्या चौकटीला सोनं
बहीन राधाचा पायगुन १९
भरली तीनसांज दिवा शिगेला हले डुले
ताईत बंधुजीच्या घरीं लक्षुमी गुज बोले २०
भरली तीनसांज दिवा लावावा सूनबाळ
लक्षुमीची झाली वेळ २१
भरली तीनसांज साजबाई फुलली
दारीं लक्षुमी बोलली २२
भरली तीनसांज लक्षुमीमाय आली घरा
दिव्याची जल्दी करा, मोतीपवळ्यानं ओटी भरा २३
नवस बोलले चतुरसिंगीच्या लाडीला
सापाचं कासरं वाघ जुंपल गाडीला २४

—※—

## सणवार

बेंद्राच्या दिशीं, घाट्या घुंगुर वाजत्यात
बंधुजीचं बेंद्राचं बैल सजत्यात १
बेंद्राच्या दिशीं, नंदी झाल्याती नवरं
हौशा वांधावी चवरं २
सनामंदी सन बेंदूर गजबजे
बंधु बैलाला तेल पाहिजे ३
वेंद्राच्या दिशीं बाळ येळाचा उपाशी
लागे वैलाच्या सायासी ४
बेंद्रापासूनी पंचमी उरली ईस रोज
नेनंत्या बंधुजीची वाट पहाते नित रोज ५
आला पंचमीचा सन आयाबायांना गेली मुळं
माझी बाळाबाई वाट बघतीया सारा येळ ६
पंचमीचा सन आयाबायांची न्हानीधुनी
माझी बाळाई, वाट बघतीया येड्यावानी ७
पंचमीच्या दिशीं गहुं घातिलं दळाया
नाग निघालं खेळाया ८
पंचमीच्या दिशीं नागाला दूध लाह्या
औख मागूंया भाऊराया ९
पंचमीच्या दिशीं नागोबाला पऊत
सोड कुनब्या आऊत १०
पंचमीच्या दिशीं नाग काढिला भिंतीशीं
बहीण भावाची उपाशी ११
दिवाळीचा सन माझा बंधुजी पुन्यांत
खडीच्या चोळीसाठीं खेप टाकीता उन्हांत १२
दसऱ्यापासून दिवाळी विसा दिशीं
सख्या बंधुराय, मला माघारा कधीं येशी ? १३

दिवाळीच्या दिशीं हंडा तापुन झाला लाल
बंधुजी लाव केसाला मोगरेल १४

भावाला भाऊबीज, करते भाच्याला दिवाळी
दोन्ही मानिकं ओवाळी १५

भावाला भाऊबीज भावासंगट आईला
बहिणीच्या पातळाला बंधु जातुया वाईला १६

भावाला भाऊबीज भावासंगट वडिलाला
पैका मोजतो, कडीलाला १७

भावाला भाऊबीज, भावासंगट भाच्यायाला
मोती मागते कापायाला १८

सांगत्ये रे बंधुजी, बारा सणाला नेऊं नको
आली वर्साची दिवाळी, वाट बघाया लावुं नको १९

दिवाळीबाईनं, दिवाळं काढियेलं
माझ्या बंधुजीनं उंच खनाळं फाडियेलं २०

दिवाळीचा सन, होतो वान्याचा विकरा
भावाला भाऊबीज, बाहिनी घेत्यात साकरा २१

दसरा दिवाळी एका माहिन्यांत दोन सन
वाट बघती तुझी भन २२

दिवाळीचा सन, ताटी ठेवित्ये म्यां केळं
बयाला किती सांगु, वोवाळीन तुझीं बाळं २३

भाऊबीजेदिशीं भाऊ अजून आला न्हाई
जोडा कापाचा झाला न्हाई २४

दिवाळीच्या दिशीं दिवा केला कनकीचा
माझ्या मायबाईचा हिरा ओवाळीन जानकीचा २५

भावाला भाऊबीज एवढ्या लौकर कुनी केली
शिवंशेजारी बहिन दिली २६

दिवाळीची चोळी, भाऊबीजेचं लुगडं
पित्या धनवंताचं दार सदाचं उघडं २७

दिवाळीबाईनं, कां ग दिरंग लाविला
हौशा बंधुजीनं, चिरा घेऊनी ठेविला २८
भावाला भाऊबीज, करत्ये भाच्याला दिवाळी
पुतळ्याची माळ, ताटीं घालीतो पिवळी २९
दिवाळीचा सन, मी ओवाळीन गाईम्हशी
बंधुजी मला आंदन काय देशी ? ३०
दिवाळीचा सन, माझ्या कामाचा पसारा
बंधु हौशाला ओवाळाया सन न्हाई दुसरा ३१
दिवाळीची चोळी भाऊबिजेचं लुगडं
हौशा बंधुजी बाकी राहिली तुम्हांकडं ३२
दिवाळीचा सन सोजी काढित्ये नखुल्याला
भाऊबीज, बंधुजी धाकल्याला ३३
दिवाळीची चोळी सकरातीला मला आली
किती सांगु शेजी, बंधु माझ्याची ओढ झाली ३४
दिवाळीची चोळी, भाऊबीजेची चंद्रकळा
झाला बंधुचा उपराळा ३५
माझ्या अंगनांत अबदागिरींची झाली दाटी
बंधु आल्याती बीजेसाठीं ३६
सोंनसळे गहू रवापिठीला ओलविले
बंधु भाऊबीजेला बोलावले ३७
दिवाळीचा सन, मला धाराजिना झाला
कडेवरी पुत्र, बंधु अंगुळीला आला ३८
दिवाळीची चोळी, भाऊबीजेच्या कुयऱ्या
बाकी राहिली सोयऱ्या ! ३९
दिवाळीचा सन, नको बंधुजी नाट लावूं
शेला पैठणिवर ठेवुं ४०
दिवाळीचा सन, डाळीडोरलं कुनी केलं ?
माझ्या बंधुजीला चंद्रहाराला ओवाळीलं ! ४१

दिवाळीच्या दिशीं, आरती मला आली जड
ओवाळीन माझा शाहीघड ४२

चोळ्यावरी चोळ्या घालुन झाल्या जुन्या
बंधुजी किती सांगुं, दोन्ही दिवाळ्या गेल्या सुन्या ४३

दिवाळीच्या दिशीं ताटांत मोतीहार
ओवाळीला बंधुजी सावकार ४४

सकरातीचा सन आलाया एकाएकी
आवा लुटाया जाऊं मायलेकी ४५

सकरातीचा सन कुंभारा दिली गाई
आवा लुटूंया बयाबाई ४६

सकरातीचा सन भोगी येतीया कुन्यावारी
जोडिली मायबहीण, येवं न्हायाला माझ्या घरीं ४७

सनाच्या दिशीं होळीबाईला पांच पानं
माझ्या खेळ्याचा आधीं मान ४८

शिमग्यादिशीं होळीबाईला पाच पोळ्या
माझा नवसाचा हाय खेळ्या ४९

पाटील पाटील हाका मारीत आला कोळी
बंधुजीची जाते, होळीला पहिली पोळी ५०

शिमग्यादिशी होळीबाई बाळंतीण
राघुच्या डफाखाली नाचते कळवंतीण ५१

शिमग्याची राधा बारा वईत्यानं केली
माझ्या राघुबाला सोंगाड्या दृष्ट झाली ! ५२

## आधुनिकता

अंगांत अंगरखं बूट वाजे करकर
कुठं निघालं जमादार? १

मुंबई शहरामंदी बग्गीला बग्गी दाट
माझ्या गिरनीवाल्याला सोडा वाट २

सकाळच्या पारी टांगा कुनाचा धाव घेतो
तान्हा बाळ, इंग्रजी साळं जातो ३
समूरच्या सोप्या सायकल कुनाची
हौशा बंधुजीची दौड आलीया उन्हाची ४
गांवाला गेली मैना, चैन पडेना माझ्या जीवा
फोटो काढुनी आणावा ५
रेशमी झंपर परटीच्या धुन्यामंदी
केली खरेदी पुन्यामंदी ६
गाडीबैलाची हौस करुनी मला दाव
टांगा मोटारी मागें लाव ७
अंगांत अंगरखं, बाळा पैरणीची सवं
जाकीट करूंया नवं ८
नवरा पाहूं आले म्हाई पाहिलं शेतभात
बंधुचं शिकणं इंग्रजी कॉलेजांत ९
अंगांत अंगरखं वर जाकीट सईल
दृष्ट बाळाला व्हईल १०
दृष्ट झाली म्हनु पाठीच्या गुजराला
बटनं सईल सद्ऱ्याला ११
पहिल्या कालामंदी मुंढ्या गळ्याचं सदरं
आताच्या कलीमंदी गळ्याला कॉलर १२
हाताच्या बॅटरीला कापसाची वात
बंधुजीला रात झाली शहराच्या ऑफीसांत १३
बारीक बांगडी बारा आण्याला डझन
माझी घेणार माउली सज्जन १४
गाडीच्या बैलाला मोत्याची वेसन
गाडी जातीया ठेसन १५
बादली पटका मधी सोनेरी तारातारा
हौशा बंधुजी माझा सायकलीवर हिरा १६

भरल्या बाजारी घड केळीचा पिकला
पित्या दौलतीनं कप रेसचा जिंकला १७
सोनेरी साखळी गिरनीबाईच्या इंजनाला
माझ्या बंधुजीला रातपाळी सजणाला १८
मुंबई शहरामंदी गिरनीबाई तुझा भोंगा
माझ्या मास्तराचा गेला टांगा १९
दळनाकांडनानं माझ्या शिणल्या दंडबाह्या
आली माझी गिरनी अनुसया २०
दृष्ट झाली बाळा वाटेनं येतां येतां
पेटी तवला वाजवीतां २१
सांगुन धाडिते गांवीच्या सोनाराला
सोन्याची साखळी हौशाच्या घड्याळाला २२
गिरनीवर जळे अग्नन ढणढणां
माझ्या बंधुजीचा लोकांत मोठेपणा २३
आगिनगाडीला नका म्हनूसा राक्षसीन
चार बोटांच्या रुळावरनं कशी चालली मोकाशीन २४
आगिनगाडीयेचा मला परसंग पडियेला
बंधुला भेटाया, उभी मी लाइनीच्या कडेला २५
आगिनगाडीच्या डब्याडब्याला कंदील
त्याच्या उजेडांत बंधु बांधितो मंदील २६
आई मुंबादेवी, तुला देते सोनियाचा झुबा
माझा बाळ तुझ्या दादरावर उभा २७
हात मी जोडीते, कलेकटर साहेबाला
बंधुजीला माझ्या नका नेऊ पलटणीला २८
बारीक माझा साद जशी दऱ्हाऱ्याची घाटी
बंधुजी पुसत्यात, कुठं वाजती सूरपेटी २९
साखरेचं लाडू मोजुनी केलं आठ
बंधु नवाची गाडी गाठ ३०

अंगांत अंगरखं वर जाकीट भरजरी
बूट पायांत शिलापुरी ३१

बापानं लेकी दिल्या दिल्या शहरामंदी
चावी दारामंदी, पीठ गिरनीचं घरामंदी ३२

दुरून ओळखते बया हरनीच्या पोपटाला
बंधुजीच्या माझ्या लाल गोंडे जाकीटाला ३३

मुंबई स्टेशनावर माल कुनाचा लई आला
बाळरायानं माझ्या मामा वकील संगं नेला ३४

सांगली शहरामंदी आली वाघीन बदामाची
ताईत बंधुजी कुलपं काढीतो गुदामाची ३५

माझ्या वाड्याम्होरं हिरवा टांगा कुनाचा
आला मुन्सब पुन्याचा ३६

—*—

# २ भाविकता

जों जों शिक्षणाची वाढ जास्त, तों तों देवभक्ति आणि भाविकता यांचें प्रमाण समाजांत कमी होऊं लागतें व अंधश्रद्धेऐवजीं चिकित्सक दृष्टीनें देवाधर्मांकडे पाहण्याची बुद्धि होऊं लागते.

ग्रामीण जनतेंत शिक्षणाचें मान अगदींच कमी अर्थात् देवावरची श्रद्धा अगदीं अढळ व भक्ति अगदीं मनापासूनची दिसून येते. यांच्यांत कितीतरी दैवतें—जेजुरीचा खंडोबा, यल्लमा, सुभानसंतूबाई, कोल्हापूरची अंबाबाई, वाडीचा दत्त अशा अनेक देवांवर रचलेल्या शेंकडो ओव्या आहेत.

तसेंच नद्यांना हिंदुसमाजांत पूज्य समजतातच. हीं ओवीगीतें सातारा प्रांतांतलीं असल्यामुळें कृष्णा, वारणा, कोयना, पंचगंगा इत्यादि नद्यांचे उल्लेख या ओव्यांतून बरेच दिसून येतात. नद्यांकांठीं बहुधा क्षेत्रें वसलेलीं आढळतात. देवांचीं देवळेंहि या नद्यांच्या सान्निध्यांत असतात, फार काय, साधुसंतांच्या समाधिदेखील नदीतीरावर बांधलेल्या पुष्कळदां दिसून येतात. या थोर लोकांसाठींच जणुं तिचं जीवन! त्यांच्या सहवासाचा लोभ नदीलाहि वाटतो असें गृहित धरून भाविक मनानं ओव्या रचल्या. पुढील ओवींत आळंदीला इंद्रायणी नदी आहे, त्याचा उल्लेख आहे—

**आळंदी देहूला इन्द्रायनी मारी झापा**
**सोपानकाका, तुझ्या समाधिवरी चाफा**

आपल्या मुलीला सासर पहायचं तें कृष्णाकांठींच पहा, अशी एक स्त्री पतीस विनंति करीत आहे, कारण काय बरें?

**बाळाबाईला द्यावी कृष्णाकडेच्या भाग्यवन्ता**
**जनालोकांचं तीरथ, तुझा धुन्याचा पानोठा**

अशा तऱ्हेनें सुशिक्षित समाजाला ज्यांत कांहींएक महत्त्व वाटत नाहीं, अशा साध्यासुध्या बाबतींतहि खेडुतांना किती अपूर्वाई वाटते! उदा० नाशिकला पुष्कळ वस्ती आहे. इतर गांवांप्रमाणेंच नाशिक एक, त्याचं काय विशेष? असं आम्ही मानतों. पण एक भाविक स्त्री म्हणते—

**काय पुन्य केलं, तुम्ही नाशिकच्या बाया ?**
**अंघुळीला गोदावरी, दरसनाला रामराया !**

किती हा श्रद्धाळु प्रश्न ! एकदरींत नदीकांठीं सासर असणं, नदी असलेल्या जागीं रहायला मिळणं ही गोष्ट मोठ्या भाग्याचीच मानली जाते.

कृष्णाकोयनेच्या अशा प्रकारच्या कितीतरी ओव्या दिसून येतात. या दोघी बहिणी मानून कांहीं मजेदार ओव्या रचल्या गेल्या. कोयनेचा प्रवाह अवखळ तर कृष्णा शांत ! तेव्हां कृष्णा जणुं धाकट्या बहिणीला [ कोयनेला ] उपदेश करीत आहे ही कल्पना पहा—

**कृष्णाबाई बोले, कोयने, अवखळ बहिणी**
**थीर चालावे माझ्यावाणी**

नरसोबाच्या वाडीचें दत्ताचें देऊळ नदीतीरींच आहे व पूर आला कीं दत्ताच्या पादुकाहि भिजतात. त्याला उद्देशून ओव्या आहेत—

**पंचगंगेपरीस कृष्णाबाई किती धीट**
**जाते दत्तगुरुच्या पादुकांवर नीट !**

अशा तऱ्हेनें दैवतांप्रमाणें नद्यांनाहि पवित्र मानून रचलेलीं पुष्कळ गीतें आहेत.

भाविकता व श्रद्धाळूपणा यांचें प्रमाण पुरुषांपेक्षां नेहमींच स्त्रीमनांत अधिक असतें, ही गोष्ट येथेंहि प्रत्ययास येते. ऐहिक सुखांत, संसारांत मन रमलेलें असलें तरी पारमार्थिक कल्याणाच्या दृष्टीनं भाविक माणसें नेहमीं विचार करीत असतात. या लोकीं कळत न कळत जीं पापं घडतात त्यांचं परिमार्जन ईशभक्तीनेंच होतें, अशीहि दृढ श्रद्धा समाजांत आढळते. या दृष्टीनं कांहीं गीतें फारच हृद्य आहेत. एक स्त्री म्हणते— ' राम ' हा कोण बरें ?

**राम राम म्हनुं, राम माझा मैतर**
**त्येचं नांव घेतां, ध्याई झाली पवितर**

देव हा प्रियमित्र, ही कल्पना किती सुंदर आहे ! सत्यनारायणाची रात्री होणारी पूजापोथी ऐकतांना झोप आली म्हणून एक बाई रागानें म्हणते—

**सत्येनारायन पूजा, माझ्या वाड्यामंदी होती**
**आनि मला चंडाळ झोप येती !**

अशा प्रकारें आत्यंतिक श्रद्धेच्या पायावर या सर्व भाविक गीतांची रचना झाली आहे.

या ओव्या* अनेक दैवतांबद्दल आहेत. राम, कृष्ण, कोल्हापूरची अंबाबाई, गणपती यांबद्दलहि ओव्या आहेत, परंतु ग्रामीण समाजांतलीं अधिक लोकप्रिय दैवतें निराळींच आहेत. यल्लमा हे त्यांतलें एक दैवत होय. साताराकडच्या कितीतरी खेड्यांतून यल्लमाचे भक्त व जोगतिणी पसरलेल्या दिसून येतात.

यल्लमाचा† वार मंगळवार असल्यानें पुढील ओव्या आढळतात.

**सोमवार गेला मंगळवार आला**
**माझ्या यल्लमाला चोळीपातळ शिखराला**

डोक्यावर देवींचे मुखवटे घेऊन हिंडणारे यल्लमाचे भक्त सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्याला झग असें म्हणतात. जत्रेमध्यें या मुखवट्यांना चवरीनें वारा घालीत हे भगत येतात, त्यामुळें चवरीवाल्यांची एकच दाटी होते. तें वर्णन पहा—

**यल्लूच्या डोंगरावर, झगाला झग दाट**
**माझ्या देवीवरी चौरी डुलते तीनशेंसाठ**

हिच्या जोगतिणींची संख्या फार मोठी आहे व त्यांना दर मंगळवारीं 'वारी' ( धान्य वगैरे ) द्यायची पद्धत आढळते.

ज्योतिबा हेंहि एक प्रसिद्ध दैवत आहे. त्याचा वार रविवार मानला जातो. जेजुरीच्या खंडोबाची भक्तीहि पुष्कळ घराण्यांत आहे. यल्लमाप्रमाणेंच याच्याहि भंडाऱ्याचं (हळदीचं) महत्त्व असतं व तसे उल्लेख ओव्यांतून हरघडी येतात. उदा०

**वाणियाच्या मुली, हळदीचा काय भाव ?**
**माझ्या घरीं देव, जेजुरीचा खंडराव**

---

* या ओव्या पांढरपेशा स्त्रियांच्या ओव्याप्रमाणेंच आहेत असें दिसून आल्यानें त्या येथें घेतलेल्या नाहींत.

† परशुरामाची आई रेणुका हिलाच यल्लमा म्हणतात. हें दैवत फार उग्र मानलें जातें. हिची जत्रा सौंदत्तीजवळ गडावर भरते.

खंडोबाच्या* दोन बायका बाणाई व म्हाळसा या असतात. खंडोबाच्या सेवेकरीण स्त्रीला मुरळी असें म्हणतात. हे सर्व उल्लेख ओव्यांतून आढळून येतात.

स्त्रीवर्गांत आणखी एका देवीची विशेष अपूर्वाई दिसून येते. ती म्हणजे कागवाडची सुभानसंतूबाई ही होय. ही देवी पुत्रदा आहे अशी श्रद्धा आहे व नवसाला पावणारें हें एक जागृत दैवत मानलें जात असल्यानें हिला मुलासाठीं तऱ्हेतऱ्हेचे नवस करण्यांत येतात व बाळ झाल्यावर ते समारंभानें फेडले जातात. म्हणून संतुबाईच्या ओव्यांतून तान्हुल्याचा उल्लेख अवश्य असतो. उदा०

**सुभान संतुबाई, तुझं राहाणं काटेवनं**
**पोटीच्या बाळासाठीं मी घेते लोटांगनं†**

याशिवाय "मरीआई"लाहि दैवत मानणाऱ्या कांहीं भोळ्या स्त्रिया आहेतच. ही नगराचें रक्षण करूं शकतें असें मानलें जातें. पण जर तिचा कोप झाला तर साऱ्या गांवाचा सत्यानाश ती करील अशी भीतीहि या स्त्रियांना वाटत असते. खालील ओव्या पहा—

**आई तूं मरीमाता, नांदावं सत्यानं**
**कर नगरी जतन**
**मरगुबाई आली, सारी गांवं भ्याली**
**माझ्या बंधुजीनं तिच्या गाड्याला बैलं दिलीं**

अशाप्रकारें खेडुतांचीं दैवतें भिन्नभिन्न आहेत व त्यांच्या उपासनाहि भिन्नभिन्न आढळतात. नृसिंहवाडीच्या दत्ताबद्दल, मारुतीबद्दल ओव्या आहेत पण त्या एकंदरीनें अल्पसंख्य आहेत.

जात्यावरच्या ओव्यांना प्रातःकाळीं सुरुवात होते ती बहुधा 'पहिली माझी ओवी' या शब्दांनीं. अशा पहिली, दुसरी, तिसरी या अनुक्रमानें ओव्या बायका गातात. पण याहि ओव्यांतून देवांचे आणि त्यांतल्यात्यांत

---

* खंडोबालाच मल्हारी व मार्तंड अशीं दोन नांवें आहेत.

† लोटांगणं घेत दर्शनास येईन, मूल पायांवर आणून घालीन, पाळणा वाहीन, अशा प्रकारचे हे नवस असतात.

विठ्ठलाचें प्रातःस्मरण आढळून येतें. भाविक मनाची हीहि एक साक्षच म्हटली पाहिजे. अशा भाविक ओव्याहि भक्तिरसानं नटलेल्या* दिसून येतात.

## पंढरीनाथ विठ्ठल

या सर्व देवांत पंढरीनाथ विठ्ठलाचा महिमा कांहीं अपूर्व आहे. ग्रामीण जनतेच्या अगदीं हृदयांतला देव कोणता म्हणाल तर पंढरीचा राणा विठ्ठल ह्याच ! दरवर्षी लाखो लोक पंढरीच्या यात्रेला जातात त्यांत खेडूत लोकांची संख्या फार मोठी असते व त्यांत स्त्रियाहि पुष्कळच असतात. विठ्ठल-भक्तीचीं वर्णनं असणारे तुकारामाचे अभंग जसे खेडोपाडीं आढळतात, तशींच ओवीरूपानंहि विठ्ठलाचीं भक्तिगीतें आज घरोघरीं खेड्यांतून गाईलीं जातात. पंढरीच्या वारीचीं, चंद्रभागेचीं, विठ्ठलाचीं, एकादशीचीं अशीं कितीक सुंदर गीतें स्त्रियांनीं प्रेमभरानें रचलेलीं दिसून येतात. पहिलीच गोष्ट लक्षांत येते ती देवाबद्दलची आत्यंतिक आपुलकी ! विठ्ठल रुक्मिणीवर, पंढरीनाथ अशा नांवांपेक्षां "माझा इठु" या एकेरी नांवानं देवाला चहूं-कडे आळवलें आहे. पंढरपूरला माहेर म्हटलं आहे, चंद्रभागेला "आक्का किंवा सखी" म्हटलेलें आढळतें. याचप्रमाणें पुंडलीकाला भाऊ व रुक्मिणीला आई रुक्मिणी मानून अनेक ओव्या तयार झाल्या. हें नातें काल्पनिक असलें तरी किती जिव्हाळ्याचें व मधुर आहे बरं !

संसारांत स्त्रीमन रंगलेलें असलें तरी देखील, त्या रामरगाड्यांतून भाविक स्त्रीला वरचेवर पंढरीच्या विठ्ठलाची आठवण येतच असते. ती मनांत म्हणते—

**जिवाला वाटतं, पंढरीला जावं जावं**
**आईबापाला भेटूं यावं, बंधु पुंडलीकाला लुटावं**

आषाढी एकादशीला पंढरीची वारी करण्याचं मनांत असतं पण संसारांतून जाणं होत नाहीं. माहेरून ( पंढरीहून ) मूळ आलें तर कदाचित् जमेल ! असें मनांत आणून एक स्त्री म्हणतं—

* ब्राह्मणवर्गांत अशाप्रकारच्या ओव्या खूप आहेत, त्यांशीं साम्य असणाऱ्या येथें दिलेल्या नाहींत.

**सांगुन पाठवते, रुक्माबाई मावशीला**
**मला मूळ धाड बाई, आखाडी बारशीला**

परंतु शेतकऱ्यांच्या वांटणीला दळीद्राचा कर्मभोग कायमचाच असल्यानें हें जाणेंहि चटकन् घडत नाहीं. कांहीं वेळेस सुदैवानें वारीला जाण्याचें ठरलें तर गरीब खेडूत स्त्रीला चिंता पडते कीं, देवाला भेटायला रिकाम्या हातांनीं कसं जावं ? हातांत तर पैसा नाहीं, भेट काय नेऊं ? पण यावर लगेच आशावादी मन म्हणते कीं, देव भावाचा भुकेला असतो, त्याला पैसे नकोच आहेत—

**पंढरीला जाते, इठूला काय नेऊं ?**
**तुळशीची प्रीत वाहूं**
**माझ्या पंढरीच्या इठ्ठला न्हाई काई बी लागत**
**त्येला माळबुक्याची आगत**

पंढरीला जाणाऱ्या एका भाविक स्त्रीनं मैत्रिणींना त्याबद्दल विचारतांना किती गोड कल्पना केली आहे पहा—

**पंढरीला जात्ये, तुम्ही सयांनु येतां कोन ?**
**माझ्या इठुची मला पत्र आल्याती दोन !**

प्रेमाचं माणूस, फारां दिवसांत भेट झाली नाहीं कीं, पत्र पाठवून भेटीस बोलवण्याचा रिवाज आहेच. विठ्ठलाबद्दलचा किती आपलेपणा या उद्गारां-तून व्यक्त होतो ! ज्याला देवाचा ध्यास लागला, अशा मनाला आजारी-पणांतदेखील देवाचीच आठवण येणं क्रमप्राप्त आहे. स्वप्नंदेखील देवदर्शनाचींच—

**सपन पडियेलं ! काय सपनाची मात**
**माझं इठू रुक्माई, उभं उशाशीं सारी रात**

या जिवावरच्या दुखण्यांत कुणी भटायला येणार आहे का ? अशा प्रश्नाला भक्तीनं परिपूर्ण असं खालील उत्तर येतं:—

**जीवाला माझ्या जड, म्यां पांडुरंगाला क्येली तार**
**झालं हाईती गरुडावर स्वार !**

वास्तविक तार करणं ही आधुनिक कल्पना. पण जिव्हाळ्याच्या माणसांना

तारा करून भेटायला बोलावतात, त्याच जिव्हाळ्यानं खुद्द देवाला तार केली ही कल्पना किती मधुर आहे !

अनेकदां संसारविन्मुख स्त्रीच्या साऱ्या प्रीतीचा ओघ पूर्णपणें देवाकडे वळलेला दिसतो. देव हाच जिवलग, सगासोयरा तोच, मायबाप तोच, असं मानून त्याच्याशीं सलगीनं केलेलीं भाषणं या ओव्यांतून वाचतांना उत्कट भक्तिभाव प्रत्ययास येतो. विठ्ठलाच्या भेटीसाठीं आसावलेली एक स्त्री म्हणते—

**अंतरीचं गुज माझ्या हृदयीं दाटलं**
**सांवळा पांडुरंग कवां एकान्तीं भेटेल ?**

हा जिवलग कोठें राहतो बरें ?

**पंढरपुरामंदी तिठं हाई माझी वग**
**तुळसीबागेमंदी माझा राहतो जिवलग**

पुढील एक हृद्य ओवी पहा—

**पंढरीचा बुका, लागला माझ्या मुखा,**
**सावळा पांडुरंग मला भेटुन गेला सखा**

यांतली मृदु भावना कशी नाजुकपणें सूचित झाली आहे. कित्येकदां स्वतां पंढरीला दर्शनाला जाणं घडत नाहीं हें पाहून मनानं कल्पनेचं मनोहर राज्य निर्माण केलेलं दिसतं. या कल्पनेंत साक्षात् विठ्ठल आपल्या घरीं आल्याचें भक्ताच्या मनःश्चक्षूना दिसूं लागतें. पुढील ओव्या पहा—

**माझ्या अंगनांत कुनी सांडला जाई बुका**
**इठुदेव माझा पोथी वाचून गेला सखा**

फार काय, विठ्ठल जेवायला आला होता असें मानून पुढील ओवी रचली गेली आहे—

**पाची परकाराचं ताट, राती गव्हाचं केलं हुतं**
**माझं इठुदेव, जेवाया आलं हुतं**

देवाला भेटायला नेहमीं येजा करण्यापेक्षां एका स्त्रीनं नित्य त्याच्या सहवासाची इच्छा केलेली आहे—

**जल्म मरनाची किती करूं मी येरझार**
**इठुराया ठेव माझं, वैकुंठीं घरदार**

निरक्षर स्त्रीनं ही ओवी रचली आहे पण कल्पनेची भरारी व भाविक मनाची आर्तता दोन्ही येथें वर्णनीय आहेत! विठ्ठलाबद्दलची ही प्रीति कांहीं ओव्यांतून जणु शिगेस पोहोंचली आहे. उदा० देव वर्षानुवर्षं उभा आहे हें पाहून एक स्त्री व्याकुळ होऊन म्हणते—

**इटेवरी उभा युगं झाल्याती अट्ठाईस**
**देवा माझ्या इठूला, कुनी म्हनंना खाली बैस**

किती शुद्ध प्रीत आहे बरें ही! असा हा विठुराणा पहाण्यासाठीं पंढरीला जाण्याची संधि मिळणं ही केवढी मोठी पर्वणीच! या पंढरीच्या प्रवासाच्या किती ओव्या, किती उत्सुक वर्णनं! एक प्रकारच्या अनिवार समाधानानं मन भरून जाऊन ओव्या ओठांवर नाचूं लागतात. आषाढीला जायचें म्हणजे पावसाचे दिवस. पायीं वारी करणारेहि खूप वारकरी आहेत. वाटेंत पावसानं चिखल माजलेला, पण त्याचा त्रास कोण मानणार? मनांत तर देवाची आठवण सोबत करीत असतेच—

**पंढरीला जातां वाट लागे चिखलाची**
**संगं, सोबत इठलाची**

कधीं ऐटींत घरच्या बैलांची गाडी घेऊनहि खेडूत जातात. केवढी अपूर्वाई त्याबद्दल वर्णिलेली दिसते—

**पंढरीला जातां, वाट लागली मैलाची**
**जोडी पांढऱ्या बैलाची**

कधीं पंढरीला सारीच कुटुंबीय मंडळी निघतात. अशा वेळीं गृहिणीचें मन अगदी हर्षानें दाटून येतें. ती म्हणते—केवढं माझं भाग्य हें!—

**पंढरीला जाते, संगं भरतार, सासुबाई**
**मला तीर्थाला उणं काई ?**

या प्रवासांत मधेंमधे उपळाई, सांगोलं, इत्यादि छोटीमोठीं गांवं लागतात व त्याच्याहि ओव्या आहेतच. पंढरीस आल्यानंतरचीहि भक्तिमय वर्णनें आहेत. दूर एकाद्या धर्मशाळेंत मुक्काम करावा, तर स्वतां देव चौकशी करतात अशी प्रेममय कल्पना पहा—

**पंढरपुरीं जाते, उतरते धर्मसाळे**
**इठ्ठल बोलती कवां आलीस ? ये ग बाळे**

सर्वच कल्पनेचं राज्य ! पण तें अत्यंत भावदर्शी आहे. राऊळांत हिंडतां-हिंडतां या मुलीस उशीर होतो. म्हणून आईबापांप्रमाणें विठ्ठलरुक्मीणी क़ासावीस होऊन हाक मारीत आहेत ही गोड कल्पना पहा—

**लई रात झाली मला राऊळाच्या मागं**
**इठ्ठल रुक्माबाई माझी, हाकारिती दोगं**

पंढरीच्या देवमूर्ति वास्तविक काळ्या पाषाणाच्या आहेत. पण देवाचं रूप भक्ताला किती दैदीप्यमान् दिसतं, त्याला तोडच नाहीं ! तें जाणायला भक्ताचीच दिव्यदृष्टि हवी ! विठ्ठलरुक्मिणीचं वर्णन एक भाविक स्त्रीनं कसं केलं आहे, पहा—

**पंढरीला जातां एक पायरी चुकले**
**आई रुक्मिणीला चंद्रावळीला दीपले**

नंतर गरूड खांबाजवळून सरकत पुढें जावें लागतें तोहि उल्लेख आहे—

**रांगत रांगत गरुडखांब गांठीयेला**
**हरी बघूंसा वाटला**

अशा प्रकारें देवदर्शनासाठीं जीव व्याकुळ झालेला, पण आषाढीकार्तिकीची गर्दी किती असते ! देवाच्या पायांवर नीटसं डोकं ठेवायलासुद्धां मिळत नाहीं, ही तक्रार पहा—

**पंढरीचा देव आडूशाच्या दाटणीला**
**देवा माझ्या इठूचं चरन येईनाती वाटणीला**

चंद्रभागेचं स्नान हा या यात्रेतला अवश्य भाग आहे त्याबद्दलहि किती जिव्हाळ्याचे शब्द !—

**पंढरी म्या केली मावाप इठूला पुसूनी**
**अंघुळ करते, आका चंद्रभागेंत बसूनी**

तसेंच विठ्ठल रुक्मिणी, तुळस, चंद्रभागा हीं सर्वच सजीव असून पंढरीला मानवाप्रमाणेंच दैनंदिन जीवन कंठीत आहेत ही कल्पना वरचेवर नजरेस येते. उदा०

**रुक्मीन धुनं धुते, इठूदेव तिथं बसे**
**दोघांच्या पितींचं चंद्रभागेला येतं हसं**

हळुहळू देव सजीव आहे व त्याच्याशीं हितगुज केलेलीं त्याला समजतात, ही कल्पना अधिकाधिक प्रकर्षानें नजरेस येते. उदा० देवासाठीं माळा घेतल्या. पण देवाच्या कंठापर्यंत हात पुरत नाहीं म्हणून देवालाच विनंती पहा—

**तुळशीच्या माळा मी पैशाला घेते नऊ**
**सावळ्या पांडुरंगा हात पुरेना, खालीं लऊ**

देव चंद्रभागेंत नौकेंतून रोज जा ये करतात, ही मूळ कल्पना, पण भाविक मनानं त्याहूनहि गोड कल्पना केली कीं ही नाव एवढी नाचते कां ? तर ती नवरी झाली आहे ! पतीच्या ( विठ्ठलाच्या ) पदस्पर्शानं हर्षित होऊन ती पाण्यावर इतकी नृत्य करते, कीं विठ्ठलाचा जरीचा शेलाहि स्थिर रहात नाहीं !—

**भरली चंद्रभागा नाव झालीया नवरी**
**पीतींचा पांडुरंग शेला जरीचा आवरी**

देवासंबंधीं कल्पनेची भरारी याहून मोठी आहे. इठू रुक्माईचा संसार आम्हां मानवांप्रमाणेंच आहे असें कल्पून अनेक ओव्या रचलेल्या दिसतात. रुक्मिणीचें मानसचित्र एखाद्या साध्यासुध्या गृहिणीप्रमाणेंच रंगवलेलें आहे ! भक्तांची रिकामी दाटी पतीभोंवतीं झालेली पाहून रखुमाई चिडतेदेखील ! जेव्हां पहावं तेव्हां देवाला आपलं भक्तांचंच कौतुक ! ती रागानं म्हणते—

**रुक्मीन बोलते, देवा साधुसंताची लई गोडी**
**माझी सवती बांधा माडी !**

शिवाय देवाचं लक्ष सारखं तुळस आणखी जनाबाई यांच्याकडे, त्यांच्या भक्तीनं देव वेडे झालेले ! हें तरी किती सहन करायचं ? रुक्मिणीला सवतीमत्सराचा झटका येतो व सामान्यजनांप्रमाणें देव देखील पत्नीची समजूत करतां करतां टेकीस येतात अशाहि ओव्या आहेत. उदा० तुळस कशी रुक्मिणीला हिणवते आहे पहा—

**तुळसाबाई बोले, काय रुकमीनी तुझा तोरा**
**माझ्या मंजिऱ्यांचा तुझा इठ्ठल लेतो तुरा**

अन् याबद्दल रागानें देवाला विचारावें तर देव गरीब मुद्रा करून विचारतात—

**विठ्ठल बोलत्यात, कां ग रुकमीणी रागराग ?**
**गेलों होतों फुलबागं, तिथं तुळस आली मागं !**

बरें जनीचीही गोष्ट तशीच ! एवढा पृथ्वीपती विठुराणा पण त्या जनीचें वाटेल तीं कामं करायला तयार.

**चंद्रभागेचं पानी, जनी आनतां घाबरी**
**पिर्तीचा पांडुरंग घेतो आडव्या घागरी**

रागानं रुक्मीणी देवाला जाब विचारते—

**रुक्माई बोलते देवा तुमचा येतो राग**
**जनीच्या काजळाचे तुमच्या शेलीयाला डाग !**

अशी ही जनाई तुमची आहे तरी कोण ? अन् यावर जगन्माऊली इठ्ठलाचं प्रेमाचं थोर उत्तर पहा—

**रुक्माई बोले देवा जनीचं काय नातं ?**
**मायेचं लेकरूं ! वस्तीला आलं हुतं !**

अशा प्रकारें हें कल्पनाचित्र असलें तरी या चित्रांतला रंग भक्तीचा अन् प्रीतीचाच आहे हें स्पष्ट दिसून येतें.

विठ्ठलाचे वारकरी नेमानं एकादशीहि करतात. एकादशीबद्दल कितीक ओव्या ! ती केली कीं पुन्हां जन्ममरण नाहीं अशीहि समजूत दिसते. एकादशीचं विठ्ठलाशीं अगदीं जवळचं नातं कल्पिलं आहे—

**एकादशीबाई, पंध्रादिसांची पाहुणी**
**इठुसख्याची मेहुणी**
**एकादस केली न्हाई वाया गेली**
**म्होरल्या जन्माची सोडवण झाली**

अशा या भक्तिभावनेचें वर्णन कोठवर करावें ? विठ्ठलदेव सर्व ग्रामीण जनतेला प्रिय आहे. त्याच्यावरचीं रूपकं, त्याच्याशीं सलगीनं, प्रीतीनं

केलेलीं भाषणं, त्याच्याबद्दलची आपुलकी, अढळ श्रद्धा यांनीं या ओव्या किती मधुर बनल्या आहेत ! याच खेड्डुतांतून नामदेव–तुकाराम, जनाई, चोखा, गोरा, सांवता, हे भगवद्भक्त नाहीं का निर्माण झाले ? त्याच भागवतधर्माचा साक्षात्कार या भाविक ओव्यांतून घडत आहे असें मनांत येतें. या भक्तीगीतांची ओळख करून घेतांना तुकारामाच्या अभंगांचें मूळसाहित्यच आपण नव्यानं पाहात आहोंत असें वाटतें.

हा भोळा भाव देवालाहि आवडत असेल, यांत कोणती शंका ?

—※—

# २ भाविकता

राम म्हनुं राम, राम माझ्या कंठीचं कारलं
सदा गळ्यामंदी वागवीलं १
राम म्हनु राम, राम माझा गुरु भाऊ
त्येच्या नांवानं कुडी वैकुंठाला जाऊ २
राम म्हनु राम, राम माझा मैतर
त्येचं नांव घेतां ध्याई झाली पवितर ३
सत्तेनारायण पूजा माझ्या वाड्यामंदी होती
आणि मला चंडाळ झोप येती ४
बाळाबाईला द्यावी कृष्णाकडेच्या भाग्यवंता
जनालोकाचं तीरथं, तुझा धुन्याचा पानोठा ५
काय पुन्य केलं, तुम्ही नाशिकच्या बाया
अंगुळीला गोदावरी दरसनाला रामराया ६
जीवाला माझ्या जड, येती कोन सेनापती
रामाच्या रथामंदी उभं, ईश्वर-पारवती ७
जीवाला माझ्या जड, येत्यात कोन दोघं
म्होरं शंकर, गिरीजा मागं ८
संसाराचा गाडा ओढतां ओढवेना
हात लावावा नारायेणा ९
आळंदी देहूला इंद्रायनी मारी झापा
सोपानकाका तुझ्या समाधीवर चाफा १०
कृष्णापंचगंगेचा संगम कुठं झाला
दत्तमहाराजांनीं औदुंबरीं वास केला ११
पंचगंगेपरीस कृष्णाबाई किती धीट
जाते दत्तगुरूच्या पायावरी नीट १२

सयानु पाहू चला वाडी गावीचा न्हानीधोंडा
दत्ताच्या अंगुळीला आला पंचगंगेचा लोंढा १३
पाहाटेच्या पारामंदी कृष्णाबाई झोपी गेली
रामाच्या अंगुळीला मारुतीनं जागी केली १४
चला सयानु पाहू, वाई देशाचा दंडक
सत्त्याची कृष्णाबाई वर सोन्याचा मंडप १५
कृष्णाबाई बोले, कोयना, उशीर कां ग झाला
आले लोटीत झाडपाला १६
देवामंदी देव महाबळ कपटी
वाईदेशामंदी कृष्णा लाविली एकटी १७
कृष्णाबाई बोले, कोयना अवखळ बहिणी
थीर चालावें माझ्यावाणी १८
बारा वर्षांनीं बहीण भागीरथी आली
कृष्णा उठून भेटली, कोयना हुंदक्यानं दाटली १९
वडील कृष्णाबाई धाकुटी भागिरथी
दोघींची झाली भेटी, बारा वर्षाच्या कन्यागती २०
किती सांगु बाई वाडी गांवची नवलाई
घाटाखालुन वाहे कृष्णाबाई २१
भरली कृष्णाबाई कोयना आली नीट
कऱ्हाडाला झाला संगम प्रीती दाट २२
रुसली कृष्णाबाई निघाली वाईदेशा
महाबळेश्वर कंथ, समजावीतो कसा २३
कृष्णाबाई बोले, कोयना अवखळ तुझ्या लाटा
तुझ्यापायीं मला लागतसे बट्टा २४
दृष्ट ही ग झाली, अनुसयेच्या बाळाला
विसुबंदाचं रोप कृष्णाबाईच्या घोळाला २५
भरली कृष्णाबाई काय पाण्याचा कालवा
इष्णुच्या देवळाला कांचेचा गिलावा २६

भरली कृष्णाबाई पानी दिसे दुधावानी
जटा धुतल्या गोसायानी २७
शनिवार गेला आइतवार आला
देव जोतिबाचा घोडा सभेला निघाला २८
आईतवार गेला सोमवार आला
दुरड्या बेलाच्या महादेवाला २९
सोमवार गेला मंगळवार आला
माझ्या यल्लमाला चोळीपातळ शिखराला ३०
मंगळवार गेला, बुधवार आला
डोंगराईची डोंगराई तुला मोंगली साज केला ३१
बुधवार गेला, बृहस्पतवार आला
द्या ग पिराला, खडीसाखर मलिद्याला ३२
बृहस्पतवार गेला, शुकीरवार आला
आई लक्ष्मीला हिरवी शेलारी नेसायाला ३३
शुकीरवार गेला, शनिवार आला
देव मारुतीला रुईटीच्या माळा घाला ३४
अटंग्या वनामंदी कोन कोयाळ गीत गाई
कारंड यल्लमा परशुरामाला झोका देई ३५
यल्लूच्या डोंगरावर झगाला झगदाट
माझ्या देवीवर, चवरी डुलते, तिनशेसाठ ३६
मंगळवारादिशी येते कोन तांब्याच्या घागरीची
माझी वाणीण डोंगरीची ३७
मंगळवारादिशी करूं साखरेचं लाडू
यल्लू, तुला जोगव्याला वाढू ३८
आठा दिसा मंगळवारी, यल्लू बसावं सदरेला
माझी तान्ही बाळं येत्यात मुजऱ्याला ३९
यल्लमाच्या डोंगरावर कोन पिवळ्या पातळाची
कारंड यल्लमा हवा पाहते जतरेची ४०

देवामंदी देव यल्लमा किती काहारी
तिनं पुरुषाची केली नारी ४१

यल्लमाला जाते भंडारा घेते समाईक
दोघी बहिणींचा देव एक ४२

यल्लमाला जातां आडवं लागे मोतीचूर
लिंबाला घेते पितांबर ४३

काळं कुरुंद जातं, वाघ्यामागल्या मुरळीचं
दिलं इनाम जेजुरीचं ४४

नऊ लाख पायरी जेजूरी गडाला
कंठी गवंड्याच्या बाळाला ४५

हळदीचं जातं; जड जातं म्हाळसाला
खंडेराव हाक मारी बाणाईला ४६

आठा दिसा आईतवारी, उभी दरवाजांत
बाणाई म्हाळसा आल्या वारी मागत ४७

वाणीयाच्या मुली, हळदीचा काय भाव ?
माझ्या घरीं येव, जेजुरीचा खंडेराव ४८

वाजंत्री वाजत्यात पाली गांवीच्या बुरुजावर
माझ्या मल्हारीचं लगीन लागतं मिरगावर ४९

वान्याची म्हाळसा, धनगराची बाणाबाई
जेविती एका ताटीं, देवा मल्हारी तुझ्यासाठीं ५०

सोनियाची मुदी कशानं झिजली
माझ्या राघुबानं रास भंडाऱ्याची मापली ५१

नऊ लाख पायरी जेजुरी गडाला
खंडोबाचा वाघ्या लागला चढायाला ५२

आठा दिसा आदितवारी सडा देते गुलालाचा
देव जोतीबाचा मला शेजार दलालाचा ५३

आठां दिसां आदितवारी देव जोतिबा घोड्यावरी
टाकी नजर खेड्यावरी ५४

देवामंदी देव जोतीबा लई मोठा
चैताच्या महिन्यांत त्याच्या फुलल्या चारी वाटा ५५
जोतीबाच्या वाटे, तांबड्या करवंदी
तान्हीयाचं माझ्या गुलालाचं गेलं नदी ५६
जोतीबाला जाते, अंबा लागतो इसाव्याला
देव जोतिबाचा डोंगर चढते गोसाव्याचा ५७
सुभानसन्तुबाई, आडरानी तुझा मठ
पोटीच्या पुत्रासाठीं मी केली पायवाट ५८
सुभानसंतूबाई, लोटिते तुझी न्हाणी
सुखी ठेव माझी तान्ही ५९
सुभानसंतुबाई, आडरानी तुझी गाडी
बाळाकारणं करते गाडी ६०
सुभानसंतुबाई न्हाणी तुझी ढवळते
पोटीच्या बाळासाठीं लोटांगणं तुझी घेते ६१
सन्तुबाईला जातां रान लागलं हरभऱ्याचं
बाळ सांगाती, माझ्या सरदाराचं ६२
सुभानसंतुबाई, यावीस माझ्या घरा
सुखी ठेव माझा हिरा ६३
सन्तुबाईला जाता, रान लागलं जवसाचं
सावळा तान्हा संगं, बाळ नवसाचं ६४
आई तूं मरीमाता तुला लिंबाऱ्याची पाटी
बंधुच्या जीवासाठीं मी शेल्यानं खडे लोटी ६५
आई तूं मरीमाता तुला जरीचं पाताळ
आमुच्या खेड्यांतून स्वारी जाऊंदे शीतळ ६६
आई तूं मरीमाता नांदावे सत्यानं
कर नगरी जतन ६७
आई मरगुबाई, तुला शेवयाचं बोनं
संभाळ माझं तान्हं, तुझ्या नगरीं त्याचं राहणं ६८

मरगुबाई आली सुटे गार वारा
दुनव्या कापती थरथरा ६९
मरगुबाई आली सारी गांवं भ्याली
माझ्या बंधुजीनं तिच्या गाड्याला बैलं दिली ७०
देवामंदी देव जमदग्नि वाईट
त्येनं बाळाला दिलं खरूजखोकलं नाईटं ७१

## देवाचें स्मरण

पहिली माझी ओवी, पंढरीला पाठवा
देव निजलं, उठवा ७२
पहिली माझी ओवी, पंढरी ऐकू गेली
इठुरुक्माई जागी झाली ७३
पहिली माझी ओवी, येशीच्या ऋषीला
अंजनीच्या कुशीला ७४
पहिली माझी ओवी गणेश मोरयाला
येवं चिंतल्या कार्याला ७५
पहिल्या ओवीला आलं शंकर धावूनी
संगं गिरजा घेऊनी ७६
पहिली माझी ओवी रामचंद्र चांगल्याला
हुतं शितेच्या बंगल्याला ७७
पहिली माझी ओवी पहिल्या पानाची
सीता गाईली रामाची ७८
पहिली माझी ओवी ओवी सारंगधराला
रुक्माबाईच्या वराला ७९
दुसरी माझी ओवी दुधाची भावना
इनंती माझी इठुनारायेना ८०
तिसरी माझी ओवी, गाते यसुदेच्या कान्हा
जलमले कृस्नदेव, तोडीला बांदिखाना ८१

तिसरी माझी ओवी अंजनाबाई गरतीला
पारावरल्या मारुतीला ८२
चौथी माझी ओवी, वैरीलं दळन,
माझ्या पांडुरंगा, गाईन धीरानं ८३
पांचवी माझी ओवी, गाते माझीया माहेरा
पांडुरंगाच्या पंढरीला गाईन निरंतरा ८४
पांचवी माझी ओवी गाते पावलापासून
इठुरुकमाई आलं रथांत बसून ८५
सहावी ओवी गाते, सहावा अवतार
देवा, पुरे पुरे संवसार ८६
सातवी माझी ओवी गाते मी सात ठायीं
इठ्ठलाच्या चरनीं चित्त लई ८७
सातवी माझी ओवी सात येळ येळा
देव पांडुरंग बसलासे डोळा ८८
आठवी माझी ओवी, आठवा आईतवार
देवसुर्व्याला नमस्कार ८९
नववी ओवी गाते, अंगनीं तुळस कवळी
इठुबाची राहीरुकमीनी जवळी ९०
नववी माझी ओवी, सरीलं दळन
देवा चुकव, संसारीचं मरन ९१
दहावी ओवी गाते, पाणी तुळसीला
नको पुन्हा येणं, संवसाराला ९२
अकरावी माझी ओवी, गाते आळंदींत
पंढरीला जातं चित्त ९३
बारावी माझी ओवी, बारा एकादशी
मला जाणं पंढरीशी ९४
बारावी माझी ओवी, साधुसंताच्या बायका
चालला हरीपाठ तुम्ही सयानु आयका ९५

## पंढरीनाथ विठ्ठल.

पंढरीच्या वाटे न्हाई लागत थंडीवारा
इठुदेव माझा हलुं नेतुंया माहेरा १
जीवाला वाटतं पंढरीला जावं जावं
आईबापां भेटू यावं बंधु पुंडलिका लूटावं २
पांडुरंग पिता रुकमीण माझी बया
आषाढ वारियेला बंधु पुंडलीक आला न्याया ३
सया पुशित्यात, पंढरींत काय ?
पिता पांडुरंग, दाट जिव्हाळा रुक्माबाय ४
सांगुन पाठवते रुक्माबाई मावशीला
मला मूळ धाड बाई आखाडी बारशीला ५
सांगुन पाठवते, रुक्माबाई ननंदेला
कुंकवाचा पुडा धाड, हिरेजडीत फणी मला ६
विठ्ठल माझा पिता, रखुमाई माझी माता
हरला शीणभाग दोघांना ओव्या गातां ७
साळीच्या तांदुळाला आधण मोघामोघा
विठुसख्याच्या पंगतीला आली सखी चंद्रभागा ८
पंढरीला जाया, आईबापाचं माझ्या पुण्य
अंगुळीला चंद्रभागेचं पाणी ऊन ९
देवा तुझ्या देउळीं केव्हाची उभी मी हाई
इठुराया माझ्या, डोळे उघडुनी पाही १०
जल्ममरनाची किती करूं मी येरझार
इठुराया ठेव माझं वैकुंठीं घरदार ११
सपन पडियेलं काय सपनाची मात
माझं इठुरुक्माई उभं उशाशी सारी रात १२
जीवाला जडभारी म्यां पांडुरंगाला केली तार
झालं हाईती गरुडावर स्वार १३

पंढरपुरामंदी तिथं हाई माझी वग
तुळसीबागेमंदी राहे जिवलग १४
अंतरीचं गुज माझ्या हृदयीं दाटलं
सांवळा पांडुरंग कवां एकान्तीं भेटंल ? १५
इठु म्हनु इठु दिसतो केवढा
माझ्या भावंडाएवढा १६
इठु म्हनु इठु झाडाच्या दाटणींत
देवाच्या भेटीपायी म्यां सोडिलं गणगोत १७
जीवाला वाटतं पंढरीला जावं जावं
माझ्या इठूला पोटाशीं धरूं यावं १८
माझ्या इठ्ठलाला न्हाई काईबी लागत
त्येला माळबुक्याची आगत १९
पंढरीला जाया न्हाई लागत मला रुक्का
देवा इठ्ठलाला पैशाचा माळबुक्का २०
पंढरीला जाऊं इठ्ठला काय नेऊं ?
तुळशीची प्रीत वाहूं २१
पंढरीला जाते, इठूला काय न्यावं ?
माळबुक्क्याची त्याला सवं २२
पांडुरंग देव आडूच्या पलीकडे
दरसनासाठीं न्हाई पाहात जीवाकडे २३
संगत करावी इठुसारख्या सजणाची
ओटींत माळबुका, शिडी चढावी चंदनाची २४
घराला पाव्हना, पंढरीचा पांडुरंग
बसाया टाकते, आरशाचा चवरंग २५
वीटेवरी ईट, युगं झाल्याती अठ्ठाईस
देवा माझ्या इठ्ठला, कुनी म्हनंना खाली बैस २६
पंढरपुरीं इटेवरी उभा, कडूसरीवर सोगा
इठु मोहन माळेजोगा २७

माझ्या अंगनांत कुनी सांडिला जाईबुका
इठूदेव माझा पोथी वाचून गेला सखा २८

सरलं दळायाचं मी आणिक घेणार
देव इठ्ठलाचे वारकरी येणार २९

सोळा सतरा शाका, त्याची परात माझ्या किती
देवा, तुमची संतमंडळी हाईती किती ? ३०

पाचीपरकाराचं ताट, रातीं गव्हाचं केलं होतं
माझं इठुदेव जेवाया आलं हुतं ! ३१

पाहाटेच्या पारामंदी कर्णा वाजतो दादडीचा
माझ्या इठ्ठलाला निविद खिचडीचा ३२

मध्यानरात्री तुरा रस्त्यामंदी पडला हुता
सावळा इठुराणा गस्तीला आला होता ३३

आषाढीला न्हाई गेले कार्तिकीला जाईन
देव रथीं बैसला पाहीन ३४

अबीरबुकयाचा वास शेल्या अजून कुठला
बारा वरसं झाली मला पंढरी गेल्याला ३५

चला जाऊं पाह्याला पंढरी पाषाणाची
हौस मला दरसनाची ३६

पंढरीला जाते, वाटखर्ची झाली थोडी
सख्या इठ्ठलानं धाडीली घोडागाडी ३७

पंढरीला जाते, संगे भरतार सासुबाई
मला तीर्थाला उणं काई ? ३८

पंढरीच्या वाटे टाळवीणेची गर्दी भारी
नवं निघालं वारकरी ३९

आषाढीकार्तिकेला चालते बारा वाटा
माझा इठूदेव पंढरीचा साधु मोठा ४०

पंढरीला जाते कशाला पीठकुटं ?
देव खजिन्याचा उठं ! ४१

पंढरीला जातां साधुचा शेजार
टाळवीणेचा गजर ४२

पंढरीला जाते तुम्ही सयानु येतां कोन ?
माझ्या इठूची मला पत्रं आल्याती दोन ४३

पंढरीच्या वाटे सगळी पताक जरायाची
दिंडी आळंद करायाची ४४

नाचत नाचत दिंडी येउंद्या माझ्या वाड्या
माझ्या साधूंना पायघड्या ४५

पंढरीला जाते तुम्ही सयानु येतां कुनी ?
हरीच्या नामाची तिथं उसवली गोणी ४६

पंढरीला जाते, चंद्रभागा भावजई
येतां जातां पाय धुई ४७

पंढरीला जातें तुम्ही सयानु येतां कोनी ?
इठु भरला माझ्या ध्यानीं ४८

पंढरीला जाते, सोबत नको कुनी
पुढं इठ्ठल, मागं जनी ४९

पंढरीला जाते माझ्या मनीं भाव
आधी दरसन घ्यावं, पायरीला नामदेव ५०

पंढरीला जातां वाट लागे चिखलाची
संग सोबत इठलाची ५१

पंढरीला जाता वाट लागली मैलाची
जोडी पांढऱ्या बैलाची ५२

पंढरीच्या वाटं सोन्याचं सराट
इठुदेव माझं गेल्याती मराठं ५३

पंढरीला जातां वाट लागे कुसळाची
बोटं नाजूक मासुळीची ५४

पंढरीची वाट चालतां हलकी गेली
संगं, साधुनं कथा केली ५५

पंढरीला जातां आडवं लागतं कुमठं
देव इठ्ठलाचा पुढं दिसतो घुमट ५६
पंढरीला जातां आडवं लागे सांगोलं
रूप देवाचं चांगलं ५७
पंढरीला जातां मधी लागते खरडी
संगं फुलाची दुरडी ५८
पंढरीला जातां आडवी लागे मानगंगा
माझ्या इठूला वर्दी सांगा ५९
पंढरीला जातां आडवी लागे उपळाई
त्याच्या भजनाची चपळाई ६०
पंढरीला जातां एक पायरी चुकले
आई रुकमीणीला चंद्रावळीला दीपले ६१
पंढरीला जाते गरुडपारींत थोपले
इठुराया चंद्राला दीपले ६२
पंढरीला जाते, गरूडपारींत इसावा
दयाळु इठुराया, कधी भेटशी केशवा ६३
येथून नमस्कार नामदेवाची पायरी
इठुदेवा माझ्या येवं राऊळाबाहेरी ६४
सावळी सुरत इठु माझ्या देखण्याची
देवळामंदी बारी बसली कोकन्याची ६५
रांगतरांगत गरुडखांब गाठीयेला
हरी बघूंसा वाटयेला ६६
पंढरीला जाते हांक मारीते महाद्वारी
पीर्तीचा पांडुरंग मला भेटून गेला हरी ६७
दरसनाला जाते वाट चुकले राउळाची
सावळ्या इठुच्या हातीं परात फराळाची ६८
इठुच्या राउळीं उभी ऱ्हाईले बारीयेला
चिन्ता पडली हरीयेला ६९

पंढरीला गेले उभी राहिले रंगशीळे
इठू बोलतो, केव्हां आलीस ? ये ग बाळे ७०
दिस मावळला राउळाच्या मागं
मला राहावं म्हनत्यात इठुरुक्माई दोघं ७१
दिस मावळला राऊळाच्या आंत
मी राहावं, म्हून इठुरुक्माई धरी हात ७२
रात मला झाली पंढरीच्या बाजारांत
इठुरुक्माई वाट बगती कमानी दरवाज्यांत ७३
पंढरीचा देव आडूशाच्या दाटणीला
माझ्या इठ्ठलाचं चरण येनाती वाटणीला ७४
पंढरीचा देव न्हाई कुनाच्या देव्हारी
दरसनाला सारी लोटली जव्हारी ७५
सावळी सुरत माझ्या इठुची बगाबगा
कानींच्या चौकड्याचं मोती करितं झगाझगा ७६
पंढरपुरामंदी कशाचा गलबला
रुक्माई चोळ्या घेते नामदेव शिंपी आला ७७
पंढरपुरामंदी धोबिनी नाटयेका
चंदरभागेला धुन धुत्यात, श्रीहरीचा पटका ७८
रेशमाचं गोंडं शोभं टाळेच्या टोपणा
इठुदेव माझा समद्या दिंडींत देखणा ७९
पंढरपुरामंदी कशाचा गोमकाला
पंढरीराया माझा, दह्यादुधानं न्हाला ८०
संतांचा मेळा हा ग राउळांत थोपला
इठुदेव माझा हजरी घ्येतुंया एकला ८१
पंढरपुरामंदी बडव्यांनीं केला घेघा
इठु जनीच्या महालीं बघा ८२
तेतीस कोटी देव इठूच्या माडीवर
तजेला पडे त्यांचा, चंदरभागा लाडीवर ८३

साखरेचे लाडू रखमाबाईच्या भानवशी
माझ्या इठुरायाला एकादशी ८४

एकादशीबाई, पंधरा दिसाची पाहुणी
इठुसख्याची मेहुणी ८५

एकादस केली न्हाई वाया गेली
म्होरल्या जलमाची सोडवण झाली ८६

एकादशीबाई, तुझं नांव ग सरस
केळीच्या पानावर इठु सोडितो बारस ८७

एकादशीबाई, तुझं नांव ठेवलं ग कुठं ?
माझ्या इठ्ठलाच्या पेठं ८८

आखाडी एकादस विठ्ठल लालाला
रुक्मीण शिडी लावी वाघाटीच्या येलाला ८९

एकादशीबाई किती निर्मळ तुझा धंदा
गुणाबाई लागली तुझ्या छंदा ९०

सरगीचा देव पापपुन्याच्या घेतो राशी
जलमाला येऊन किती केल्याती एकादशी ? ९१

विठ्ठलाला एकादशी, येई रुक्माई झरझर
तिच्या ओटीला राजगीर ९२

सकाळीं उठून उघडते दारफळी
दारीं तुळस चंद्रावळी ९३

सकाळीं उठून तोंड पाहिलं एकीचं
दारीं तुळस सखीचं ९४

सकाळीं उठून उघडते दरवाजा
दारीं तुळस सारजा ९५

माझ्या अंगनांत तुळसी मालनी तुझा वोफा
देव गोविंद घाली खेपा ९६

तुळशी ग बाई तुला न्हाई नाकडोळे
सावळ्या रूपाला देव गोविंद भाळले ९७

तुळसीची माळ कुना हंबिराची बाळ
हरीच्या हृदयावरी लोळं ९८

सकाळीं उठून कट्टा लोटते तुळशीचा
तिथं राहिवास गोविंदाचा ९९

तुळसीमाय बहिणी, राहा ग माझ्या दारीं
त्रिकाळ दरसन देवाजीचं माझ्या घरीं १००

तुळसाबाई बोले, काय रुक्मीनी तुझा तोरा ?
माझ्या मंजिऱ्याचा तुझा इठ्ठल लेतो तुरा १०१

ज्याला न्हाई लेक त्यानं तुळस लावावी
सभामंडपांत देव करावं जावाई १०२

तुळसीच्या माळा पैशाला घेते चार
इठूच्या गळ्याला झाला भार १०३

तुळसीच्या माळा पैशाला घेते नऊ
सावळ्या पांडुरंगा, हात पुरेना, खाली लऊ १०४

तुळशीच्या माळा पैशाला घेते बारा
ल्याव्या माझ्या तालेवारा १०५

तुळसीच्या माळा, पैशाला घेते सोळा
माझा पांडुरंग लेनार सावळा १०६

तुळशीच्या माळा पैशाला घेते वीस
तुझ्या गळ्याला होती पैस १०७

पंढरपुरामंदी वस्तीला खूप जागा
गल्लोगल्ली तुळसी बागा १०८

माझ्या अंगनांत तुळशीचं रोप
त्याच्या साउलीला देव गोविंद घेई झोप १०९

तुळशीला घाली पाणी, लावी कापूर आरतीला
सेवा घडली गरतीला ११०

रुक्माईला साडीचोळी, सत्तभामेला दोरवा
माझ्या तुळसाबाईला थंड पाण्याचा गारवा १११

रुक्माईला साडीचोळी, नेऊं सत्यभामेला पातळ
तुळशीला माझ्या पानी गंगेच नितळ ११२
इठ्ठल बोलती कां ग रुक्मीनी रागराग
गेलो होतो फुलबाग तिथं तुळस आली मागं ११३
इठ्ठल बोलती हिच्या रागाला करूं काई ?
आज तुळसीबागेमंदी मी गेलों न्हाई ११४
रुक्माबाई बोले, वेड लागलं इठ्ठलाला
माडी हवेली टाकूनी जातो जनीच्या झोपडीला ११५
रुक्माबाई पुसे, जनी कां येती जाती ?
देव बोलत्यात, माझी मावसबहीन होती ११६
रुक्मीन बोले देवा इठ्ठला कुठं होता ?
लटकी आन देतां, जनीच्या घरीं जातां येतां ११७
विठ्ठल बोलत्यात, दे ग रुक्मीणी विडा
रुक्मीन बोलते, तुम्ही जनीचा संग सोडा ११८
देव जवत्यात, पोळी ठेविती काढूनी
नेती जनीला वाढूनी ११९
गोपाळपुरा जाया जनाबाईला झालं ऊन
देव इठ्ठलानं लाविलं चिंचबन १२०
इठ्ठल म्हणूनी हाक मारीते राऊळांत
इठ्ठु जनीच्या देऊळांत १२१
चंद्रभागेचं पानी, जनी आणतां घावरी
पीतींचा पांडुरंग आडव्या घेतो घागरी १२२
देव जेवत्यात लाडू ठेविती शेल्या आड
रुक्माई बोले, देवा जनीचं किती वेड १२३
रुक्माई बोले देवा तुमचा येतो राग
जनीच्या काजळाचे, तुमच्या शेलीयाला डाग १२४
रुक्माईच्या पलंगावर गाद्यागिरद्या बख्खळ
देवाला आवडे, जनाबाईची वाकळ ! १२५

रुक्माई बोले, देवा जनीचं काय नातं
मायेचं लेकरूं वसतीला आलं हुतं १२६

इठ्ठल बोलती, जनीला म्हाई माय
घेईन वजरी, घासीन तिचं पाय १२७

पंढरी म्यां केली, मावाप इठूला पुसूनी
अंघुळ करते आका चंद्रभागेंत बसुनी १२८

भरली चंद्रभागा भरूनी रानमाळ
बुडे कबीराची धर्मसाळ १२९

भरली चंद्रभागा चालली संपूर्ण
देवा पुंडलीकावरून १३०

भरली चंद्रभागा, नाव झालीया नवरी
पीतांचा पांडुरंग शेला जरीचा आवरी १३१

भरली चंद्रभागा, नाव येतीया नटत
सावळा पांडुरंग उभा तुळशी बेटांत १३२

भरली चंद्रभागा, सारी बुडाली म्हातारी
देव झालाया उतारी १३३

भरली चंद्रभागा, तुंबले वारकरी
देव झाले अंबेकरी १३४

भरली चंद्रभागा चालली सुसाट
मधी पुंडलीक हांसत १३५

चंद्रभागेला आला पूर, पंढरीला पडला वेढा
सोन्याच्या इटेवर, विठुरुक्माईचा जोडा १३६

भरली चंद्रभागा उतार नावेचा
संगं पुत्र जावेचा १३७

इठ्ठलदेव म्हणे संभाळ रुक्मीनी घरदार
मला जायाचं, चंद्रभागेंत नावेवर १३८

भरली चंद्रभागा, पानी लागलं चढायाला
बुडला पुंडलीक, इठुरुक्मीन आली सोडायाला १३९

भरली चंद्रभागा, धोंडा बुडिला न्हानथोर
इठ्ठलाचा झगा, जनी धुतीया पायावर १४०
रुक्मीन धुनं धुते, इठ्ठलाचा झगा
त्येच्या अबीरानं दरवळे चंद्रभागा १४१
चंद्रभागेच्या कडेला, सारी पताक झाली गोळा
आला देवाचा गोतावळा १४२
चंद्रभागेच्या काठाला कथा करी इठूराया
नांव देवाचं ऐकाया, भरल्या घागरी उभ्या बाया १४३
चंद्रभागेचं पानी आनूंया रांजनांत
देव तान्हेलं भजनांत १४४
चंद्रभागेच्या कडेला वाळूचा केला ओटा
भजनाचा छंद मोठा १४५
चंद्रभागेची पायरी मी चढते भारानं
तुळसी मंजुरीचं माझ्या ओटीला तोरण १४६
सया पुशित्यात, पंढरी जाऊनी काय केलं ?
चंद्रभागेच्या पान्यानं देहभांडं उजळलं १४७
रुसली रुक्माई, इठूशेजारी बसेना
अबीर बुक्याची तिला दंगल सोसेना १४८
रुक्मीण बोलते, देवा साधुसंताची लई गोडी
माझी सवती बांधा माडी १४९
इठ्ठल बोलती, चल रुक्मीणी माडीवर
माळबुक्याचा भडिमार तुझ्या तेलंग्या साडीवर १५०
रुसली रुक्माई बसेना पालखींत
पीतींचा पांडुरंग रथावरून देई हात १५१
रुक्माई रुसली बसली खिडकींत
सावळा पांडुरंग सगळी पंढरी हुडकीत ! १५२
रुक्मीण बोलते, देवा, कमरा बांधून काय केलं ?
तुळसीबनाला पानी नेलं १५३

रुसली रुक्माबाई, इठ्ठल समजावी
वाडियाच्या मागं झाड पतंगाचे लावी १५४
रुसली रुक्माई सर्व्या पंढरींत न्हाई
विठ्ठल म्हनती, रागाला करूं काई ! १५५
रुसली रुक्माई, गेली मंगळवेढीयाला
सावळा पांडुरंग, जीन घालीतो घोडीयाला १५६
रुक्मीन लेनं लेते सोन्याचीं कांकनं
बडवे बसले राखन १५७
फुलांची शेज, बडव्यांनीं केली दाट
सख्या इठुला रुतलं, फुलांचं देठ १५८
रुक्माईचं लेनं नऊ तोळ्याच्या पाटल्या
कंगन्या हाताला दाटल्या १५९
रुक्माईची चोळी टाका पडे लांब लांब
नामदेव शिंपी रेखितो गरुडखांब १६०
कस्तुरी महागली, रुपयानं तोळा
पांडुरंग माझा नेमाचा लावी टिळा १६१
कस्तुरीचा वास माझ्या अंगाला कोठून ?
आले माझ्या इठूला भेटून १६२
माझ्या इठूला नका म्हनूंसा काळाकाळा
माझा तो सबजाचा ढाळा १६३
माझ्या घरीं पाव्हनं, आलं पंढरीचं हरी
चंद्राच्यावांचून उजेड पडला माझ्या दारीं १६४
आल्या गेल्याला पुशिते, इठू दिसतो कुनावानी ?
सावळं त्याचं रूप ! दिसतो जवसाच्या फुलावाणी १६५

—*—

# ३ स्त्रीजीवन

अनेक ओव्यांतून खेडुत कामकरी स्त्रीचें जीवनचित्र आपण स्थूल मानानें आतांपर्यंत पाहिलेंच. कौटुंबिक जीवन हेंच तिच्या आयुष्याचें सार आहे. माहेर–सासर, मुलेंबाळें, पति, संसार याच गोष्टींचे रंग तिच्या जीवनचित्रांत आढळतात, त्याचा परामर्ष आतांपर्यंत आपण घेतलाच. आतां सामाजिक दृष्टिकोनानं, 'एक ग्रामीण स्त्री' म्हणून तिचं व्यक्तित्व आपण पाहूं. म्हणजे स्त्रीजीवनाचें एक प्रातिनिधिक स्वरूपाचें दर्शन आपणांस वहूं शकेल.

बुद्धिजीवी समाजांत स्त्रीच्या बौद्धिक जीवनाचीं जीं चित्रें नजरेस पडतात, तीं इथं दिसणंहि कठीण ! आज कोठल्याहि शहरांत नजर टाका, मुली शाळेस जात आहेत, पुस्तकं वाचीत आहेत, स्त्रिया नौकरीस जात आहेत अशीं दृश्यं दिसतील. पण खेड्यांतून यांपैकीं कांहींएक आढळणार नाहीं ! उलट लहानलहान मुली खेड्यांत पहाल तर गुरांना चरायला घेऊन जातील, धारा काढतील, आईला दळणांत मदत करतील अन् ऊनऊन भाकरीहि करून वाढतील !

असा हा फरक कां ? अशा प्रश्नाबरोबरच त्याचं उत्तर सुचण्याजोगं आहे. निरक्षरतेमुळें बौद्धिक विकासाचे मार्ग बंद होतात. आणि शारीरिक मेहनत करून जगणं हेंच श्रमजीवी वर्गाच्या उभ्या आयुष्याचें कर्तव्य ठरून जातें. त्याला मुली तरी कोठून अपवाद असणार ? त्यांतून गरीबी हीहि कायमची सोबतीस असते. अर्थात् पांढरपेशा स्त्रीपेक्षां खेडुत स्त्रीला अंगमेहनतीचीं कामें फार असतात, त्यांचा बाळअभ्यासच मुली पोरवयांत करून ठेवतात म्हटलें तरी चालेल.

हें स्त्रीजीवनाचें चित्र वेगळ्या रंगांनीं रंगलेलें आहे. चार भिंतीच्या आंत जे जे स्त्रीहृदयाला अनुभव येतात, त्यांचीहि यथार्थ कल्पना देणाऱ्या आणखीहि कांहीं ओव्या आहेत. तिच्या समजुती, प्रीतीचे अनुभव, तिचीं वैयक्तिक सुखदुःखें यांची त्यावरून कल्पना येण्याजोगी आहे.

या स्त्रियांच्या दैनंदिन जीवनाला बहुधा पहांटेवेळीं जात्यावरील दळणानें सुरुवात होते. पहांटे दळण्याचं कारणहि हेंच, कीं आठला न्याहरी होऊन मंडळी शेतावर जातात, तेव्हां उजाडतच भाकरी करण्यास सुरुवात होते. अर्थात् दळणाचं काम पहांटेचं ठरून जातं. दळणाचं हें काम लहान सासुरवासणींना कधीं कधीं झेपतहि नाहीं. परंतु त्याचीहि संवय करावी लागतेच. दमून एकादी सासुरवासी कन्या मनांत म्हणते, आईच्या जिवावर संवयच नव्हती कामाची. माहेरीं मी सुखांत होतें. पण आतां कष्ट केले पाहिजेत.

**दळपाकांडपानं दुखतात माझं दंड**
**बयाच्या जीवावरी सुखवासी माझा पिंड**

मग ओव्या म्हणत म्हणत हें काम सोपं करण्याचा यत्न मन करूं लागतें—

**कामामंदी काम दळन अवघड**
**गान्याच्या नादावरी मी ओढते दगड**

आणि मग दोन दोन घटका, आपल्या चिमुकल्या जगांतील मंडळींना उद्देशून गीतें म्हणतां म्हणतां दळणाचें काम पुरें होतें. जातं हा ग्रामवासिनीच्या आयुष्यांतला रोजच्या गुजगोष्टी ऐकणारा एक सन्मित्रच म्हटला पाहिजे. दळण्याचें काम अवघड खरें. परंतु तें रोज असावें, कधीं संपू नये अशीच या साध्याभोळ्या गृहिणीची इच्छा दिसते. कारण घरांत खाणारी मंडळी आहेत म्हणूनच हें काम असणार; आणि तें असावं. भरपूर मायेचीं माणसं घरीं असावीं व त्यांच्यासाठीं रोज आपण पीठ दळावं हेंहि एक प्रकारचं भाग्यच नव्हे का ? एक बहिण प्रेमानं सांगते, कीं मीं कितीहि दळलं तरी काम संपत नाहीं यांत नवल नाहीं !—

**दळनाकांडनाची शीग मोडंना गव्हाची**
**सयानु, किती सांगूं ? मी बहिणाई भावाची**

आणि जेवणोरे भाऊ भाग्यानं आहेत तोंवर दळण सरलं असं अशुभ मी कसं बोलूं !

**दळन सरलं सरलं कशी म्हनुं**
**हाईती पाठचं लक्षुमणु**

मुलगी दळणांत आईला मदत करते, परंतु कधीं कधीं आईला मुलीची कींव येते. ती म्हणते—

**नको मला दळुं लागूं, बैस माझ्या जवळी**
**सावळे मैनाबाई तुझीं मनगटं कवळीं**

परंतु आईला हें माहीत असतं कीं हें काम कांहीं चुकवून चालायचं नाहीं, तेव्हां ती पुष्कळदां मुलीबाळींना उलट 'कामाकाजाला भ्यायचं नाहीं, मागें सरायचं नाहीं' अशीच शिकवण इतर वडीलधाऱ्या स्त्रियांप्रमाणें देते. एक सासुरवासीण म्हणते—

**जातं ओढतांना देल्ये मनगटं तोलूनी**
**मातेचं प्यालें दूध न्हाई घेतलं बोलूनी**

या आईच्या दुधाचे उल्लेख जात्याच्या कित्येक ओव्यांतून आहेत, आईनें बाळघुटी दिली त्याचेहि उल्लेख आहेत. त्यांतला अर्थ एवढाच, कीं 'माझ्या मातेनं मला आपल्याप्रमाणेंच सकस बनवलें आहे; मी कामाला डगमगणारी नव्हे !' पुढील ओवी पहा—

**थोरलं माझं जातं मला बघून पळतं**
**बयाचं दूध माझ्या मनगटीं खेळतं**

सारांश दळणासारखीं मोठीं कामं झटकन् करून टाकणं हें आईच्या दुधाचें (अर्थात् मातेच्या कुसव्याचें) भूषण मानलें जातें व म्हणूनच हजारदां हे उल्लेख येतात.

तसेंच अन्नपूर्णा हीहि पदवी या ग्रामवासी गृहिणींना खचित शोभून दिसेल, असें त्यांचें या बाबतींत लक्ष असतें. आपण सुग्रणपणें जेवणाचे जिन्नस तयार करावे व ते पति, पुत्र, भाऊ, आप्तेष्ट यांनीं मनापासून स्वीकारावे यांतच गृहिणीचें मानसिक समाधान दिसून येतें. अनेक ओव्यांमधून जेवणाची अपूर्वाई आणि पदार्थांचीं वर्णनं सांगितलेलीं आढळतात. "पाचपरकाराचं ताट" या शब्दांनीं सुरू होणाऱ्या सर्व ओव्या या सदरांत येतात. "जिरेसाळ" तांदुळाचं महत्त्व पुष्कळ ठिकाणीं विशेष अगत्यानं वर्णन केलेलं दिसून येतं. रोजचं जेवण भाजीभाकरीचं, तेव्हां बारीक तांदुळाचा भात ही अपूर्वाईचीच गोष्ट म्हटली पाहिजे !

सोजी ( रवा ) चे पदार्थहि वर्णिले आहेत. आग्रहाचे प्रकार तरी किती! त्यांतूनहि जेवणारांबद्दलचा जिव्हाळाच दिसून येतो. उदा०

**सोजीच्या शेवाया दुधातुपानं झाल्या मऊ**
**बयाच्या बाळा जेऊं**

अशा प्रकारें प्रत्येक स्त्री सुग्रण असते व कोंड्याचा मांडा करण्याची किमया ल्हानपणापासूनच तिला साध्य होते. खरें सुख कशांत आहे याच्या प्रत्येक व्यक्तीच्या कल्पना निरनिराळ्या दिसून येतात. उदा० जेथें गाडग्यां-मडक्यांनीं, मातीच्या भांड्यांनीं प्रपंच साजरे व्हायचे, तेथें तांब्याचीं भांडीं घरीं असणें हेंहि मोठेंच सुखसमृद्धीचें वाटत असतें—

**भरताराचं सुख सांगते भावाला**
**तांब्याच्या घागरीनं पानी घालते देवाला !**

किंवा खेडेगांवांतून बहुधा पाण्याचे हालच असल्यानें पाणी नदीवरून ओढ्यावरून अगर विहिरीवरून वाहून आणणें हेंहि एक कायमचें काम स्त्रीला करावें लागतें. हें पाणी आणण्याचं काम जर सासरीं करावं लागलं नाहीं, तर आणखी भाग्य भाग्य तें कोठलं? एक मुलगी आईला काय सांगते आहे पहा—

**भरताराचं सुख, काय सांगु वयाबाई ?**
**वाट पान्याची ठावी न्हाई !**

पाण्याची वाटसुद्धां मला माहीत नाहीं इतकं मला घरधन्यानीं सुखांत ठेवलेलं आहे हा भावार्थ ध्यानीं घेण्याजोगा आहे.

गरीबींतच जीवन कंठीत असल्यामुळें स्त्रीच्या अपेक्षाहि अगदीं साध्या-सुध्या आढळून येतात. त्यांची उंची फारशी नाहीं. खेडुत स्त्रीमनाला जास्तींत जास्त हौस कोठली आहे, पहा—

**मला हौस मोठी पाटी भरून भाकरीची**
**घरधनियांची गडीमानसं चाकरीची**
**हौस मला मोठी दीर जावांत नांदायाची**
**माडी कौलारू बांधायाची**

हौस मला मोठी हंडा परात सैपाकाला
झोपा बाळाच्या बैठकीला

किती अल्पसंतुष्टपणाच्या कल्पना आहेत या! जन्मदारिद्र्यामुळें स्त्रीच्या विचारांची व्यातीहि लहानशा मर्यादित क्षेत्रांतच वावरते. देवाजवळ प्रार्थना अशीच साधी आहे—

दे रे देवा मला जुनं जुंधळं ठेवणीला
घरधनियांना वारा बैल दावणीला

अन् एवढंहि देणं शक्य नसलं तर निदान ही तरी प्रार्थना ऐक—

सत्तेनारायना, न्हाई मागत तुला काई
दे घरधनियांना थोडी संपत औक्ष लई
सूर्य उगवला, नेत्र उघडीतो दोन्ही
सुखी राखावी माझीं तान्हीं

एवढी प्रार्थना देवानं ऐकली कीं मग खेडुत स्त्रीला आणखी कांहीं नको. गरीबींतहि ती प्रसन्न दिसते!

पति हेंच स्त्रीचें सौभाग्य! अर्थात् चुडा, मंगलसूत्र, कुंकू इ. सर्व सौभाग्यसूचक मानचिन्हें अत्यंत पूज्य मानलीं जातात व त्यांचें मोल जिवाविशेष समजलें जातें. उदा०:–घरांतलं सगळ्या भाग्यांत मोठं भाग्य कोठलं? तर हें पहा—

एका करंडीचं कुंकू लेत्यात सासूसुना
असं भाग्य न्हाई कुना

शेजीबाईच्या सोन्यामोत्याच्या हाराहून कुंकू अधिक मोलाचं! या दागिन्याला कुणाचं भय?

शेजी लेनं लेती पदराखालीं हार
कपाळीचं कुंकुं माझा उघडा शिनगार

चुड्याचें महत्त्वहि असेंच! चुडा हें पतीचं प्रतीकच मानून ओव्या रचलेल्या दिसतात. उदा०:—

चुडीयाचं माझ्या सोनं तीन ठायीं लवं
पित्या दौलतीची पारख चोखट मला ठावं

०४३१८ लि: ...

१९८९ ...२०१...

अर्थात् ही पारख बावनकशी सोन्याऐवजीं बत्तीसलक्षणी पतीबद्दलची आहे हेंच या चतुर पत्नीला सांगायचं आहे. मंगळसूत्र, (डोरलं, काळी गरसोळी) बद्दलहि कवनें आहेतच.

याशिवाय अहेव मरण म्हणजे सुवासिनी स्थितींत पतीपूर्वी जीवन संपणें अत्यंत भाग्याचे समजतात. उदा० पतीच्या आधीं कपाळभर कुंकू लेवून इहलोकवास संपवण्याची हौस पुढील ओवींतून व्यक्त झाली आहे—

**आहेव मरनाची मला हाई आवड**
**म्होर पतीपुत्र, मागं कुंकवाची कावड**

या अशा मरणाचं दुःख कोण मानणार? पति मरतांच सौभाग्यचिन्हांसह चितेवर हंसत चढणाऱ्या वीरांगनांचा हा देश! पतीनंतर मृतवत् जगण्यापेक्षां पतीच्या पूर्वी भाग्यवान् मृत्यु यावा, शेवटीं पतीच्या मांडीवर डोकं ठेवून या संसाराचा निरोप घ्यावा हें किती पुण्याईचं!—

**आहेव मरन येवं सवभाग्यानं**
**म्होरं गोताच्या फौजा, संगं शेजेचा दीवाण**

हिंदु स्त्रीची वैधव्यांत होणारी एकंदर हालअपेष्टा पाहिली, तर 'आहेव मरण' म्हणजे एक प्रकारें मानाचंच ठरतं. कांहीं असो, जन्मापासून मृत्युपर्यंतचीं सर्व तऱ्हेचीं गीतें हंसत म्हणणाऱ्या या अज्ञात कवयित्रींच्या प्रतिभेस धन्यवादच द्यावेसे वाटतात!

* * *

या समाजांतील स्त्रियांमध्यें आणखी एक वैशिष्ट्य दिसून येतं. तें म्हणजे तरुण मुलींची निर्भय वर्तणूक अन् चोख उत्तरं. तरुण मुलींना एकटंदुकटं शेतामळ्यांत नेहमीं जावं लागतं, पण या एकटेपणाची त्यांना भीति वाटत नाहीं! कमरेला कोयता असतोच—प्रकृति मजबूत असतेच. अन् वागणं चोख, त्यामुळें कोणी त्यांच्या वाटेला जातहि नाहीं फारसं. पण त्यांतूनहि एखादा वात्रट माणूस त्रास द्यायला लागला तर चोख अन् झणझणीत उत्तर ही मराठा युवती देईल—

**मोठ्याच्या आम्ही मुली! जशा तलवारीच्या अण्या**
**जाईल पाणी तुझं! दुरुनी बोल शहाण्या!**

कसा आहे हा तेजस्वीपणा ? अर्थात् माणूस ओळखूनच हीं चोख उत्तरं दिलीं जातात हें विसरतां येणार नाहीं. 'सभ्य' माणसाला 'सभ्य' शब्दांतच या गोष्टी बजावून द्यायला या तरुणीला कुणी शिकवावं लागत नाहीं. बहिणीचा नवराच जर पापी नजर ठेवूं लागला, तर मर्यादेनंच परंतु स्पष्टपणें ही मुलगी सांगेल—

**मेहुन्याचं नातं, नका शिरूं आडरानी !**
**मी तुमच्या धाकल्या बहिनीवानी !**

शीलसंरक्षणाची ही जागरूकता अन् निर्भयता हे दोन्ही गुण किती मोलाचे आहेत पहा बरें !

परंतु कांहीं वेळेला असंहि होतं, कीं बाळपणींचे कांहीं सन्मित्र असतात व भावासारखं त्यांचं मन निर्मळहि असतं, पण मर्यादेच्या कल्पनांमुळें या स्नेहालाहि लोक दूषण देतात. मानलेले भाऊ कितीहि शुद्ध मनाचे असले तरी जनरीत संभाळून कुलीन स्त्रीला वागावें लागतें. ती नम्रपणें सूचना देते—

**तुझा माझा भाऊपना, नगं हाताला हात धरूं**
**गांव हाय निंदखोरू**

बरं, हा निर्मल स्नेह सहज तोडूं म्हणून तुटण्यासारखा नाहीं—

**तुझा माझा भाऊपना, जन तोडिती, तुटयेना**
**रेशमाचा दोरा, गाठ पडली सुटयेना**

अशा प्रकारचं हें हार्दिक प्रेम. परंतु सुशिक्षित समाजांतसुद्धां दोन तरुण स्त्रीपुरुषांचा स्नेह टीकास्पद ठरतो तेथें अशिक्षितांत अशा गोष्टींचं काहूर किती उठत असेल बरें ? अत्यंत निर्बंधित स्त्रीजीवनाचं दृश्य येथें पहायला मिळतें.

मर्यादेच्या कल्पनाहि अशाच तीव्र दिसतात. रस्त्यानं जातांना पदर सावरून मर्यादेनं चालणं कुलीनपणाचं ठरतं. एक स्त्री म्हणते—

**जाते मी उभ्या गल्ली, घेते पदर हाताला**
**सासर माहेरी, पानी चढे दुही गोताला**

फार काय, चोळीवर कशीदा काढायची पण चोरी ! कारण तो दिसण्या-साठीं पदर ढळण्याचा संभव नाहीं का ?

एका तरुणीला चोळीवर कशीदा काढण्याच्या बाबतींत भावाचा धाक कसा वाटतो तें पहाण्यासारखें आहे—

हिरव्या चोळीवरी राघु काढाया जीव भीतो
बंधु रागीट, शिव्या देतो

रस्त्यानं जातांना वर न पहातां भुईला नजर लावून चालणें ही स्त्रीजातीच्या मर्यादशीलपणाची खूण होय—

उभ्या गल्ली जाते, मी वर करीना पापणी
बंधुजीची मला वाघाची जाचणी
उभ्या गल्ली जाते, माझी नंदर जिमिनीला
पित्या दौलतीला, पानी चढेल समिंद्राला

वाडवडिलांच्या घराण्याचा मोठेपणा स्त्रीच्या मर्यादशील वर्तणुकीवरच असतो ही समजूत ठिकठिकाणीं व्यक्त झालेली दिसते. " गरतीपणा " ( म्हणजेच कुलीनपणा ) अनेक तऱ्हेनं संभाळावा लागतो. सासुरवासिनीच्या पायांतलीं जोडवीं वाजणें म्हणजे मोठ्या उद्धटपणाचेंच मानलें जातें. ( अर्थ हाच कीं हळूं चालावें. ) एक आई मुलीला सांगते, कीं सासुर-वासणीनं नम्रतेनं चालावं. या तुझ्या चालण्यावरूनच तुझा पति तुझी चालरीत पारखून घेणार आहे—

जोडव्याचा पाय हळू टाकावा मालनी
कंथ बघतो चालणी

असे हे मर्यादेचे बंध स्त्रिया मोठ्या आस्थेनें पाळतात. कारणावांचून गरती स्त्रियांनीं हंसणं हेंहि असभ्यपणाचं मानलं जातं. विवाहित स्त्री अशा अमर्याद हास्यानं पतीस कमीपणा आणते अशीहि चहूंकडे समजूत आहे. उदा०—

हसूं नको नारी, हसनं कोन्या परकाराचं
पानी जाईल तुझ्या भरताराचं

शीलरक्षणाच्या कामीं अशा प्रकारचे निर्बंध साहाय्यकच होत असतात, हें सहज ध्यानांत येईल.

घराण्याची कीर्ति राखण्यासाठीं ज्याप्रमाणें मर्यादशीलता काटेकोरपणें पाळली जाते त्याचप्रमाणें नांवलौकिक व जातीची अब्रू राखण्यासाठींहि समाजांतल्या व्यक्तींना पुष्कळदां कष्ट सोसावे लागतात. जातकुळी ही फार मोठी गोष्ट आहे. तिचा आदर प्रत्येकानं ठेवला पाहिजे ही जाणीव या निरक्षर स्त्रीवर्गांतहि पूर्णपणें आहे; जातकुळीसाठीं कष्ट सोसावेच लागतात हें सांगतांना एक तरुणी म्हणते—

**जातीसाठीं खाते माती, कुळासाठीं खाते खस्त**
**जातकुळी ही लौकिकाची वस्त**
**जातीसाठीं माती,* खावं गोतासाठीं खडे**
**पिता दौलती लौकिकाला चढे**

वडिलांचा नांवलौकिक, घराण्याची इभ्रत राखण्यासाठीं अनेक कुलकन्यका त्रास अडचणी सोसून, स्वाभिमानानं जगतात. एक कन्या बापाला म्हणते—

**चंदनासारिखा देह घातला करवती**
**बाप्पाजी, तुमच्या नांवासाठीं**

स्वताच्या हालअपेष्टांच किती समर्पक व थोडक्या शब्दांनीं येथें वर्णन केलें आहे बरें! अब्रूदार कुटुंबांतल्या कन्यकांची वर्तणूक या बाबतींत, शील-रक्षणाच्या बाबतींत अत्यंत जागरूक असलेली आढळते व याबद्दल त्यांना खरोखरच धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच!

जीवनांतल्या बऱ्यावाईट अनुभवाचे कडू गोड उद्गार ओवीरूपानं कानावर आले कीं स्त्रीजीवनाची पूर्ण कल्पना येण्यास पुष्कळच मदत होते. मानवी जीवन सुखदुःखानं व्याप्त आहे. कुणाला हें आनंदानं हंसवील, तर कुणाला खेदानं रडवील! दोन्ही प्रकारच्या भावना उत्कट होऊन हृदयांत सांचलेले विचार शब्दरूप घेऊं लागतात. उदा० प्रीतीचं मोहक रूप पाहून फसलेली एक स्त्री म्हणते—

---

* 'माती खाणें' याचा अर्थ संकटें, हाल सोसणे असा असल्यामुळें या तऱ्हेच्या ओव्यांतून माती खाणें, खडे खाणें, वाळू चावून खाणें अशा तऱ्हेचे लाक्षणिक उल्लेख पुनःपुन्हां आलेले दिसून येतात.

**कडू विंद्रावण, मला वाटतं खावं खावं**
**त्याचे हे असे गुन, मला वेडीला काय ठावं ?**

मला वाटलं माझ्यासारखीच माझ्या प्रियकराची प्रीत असेल. पण अखेर वृंदावनाप्रमाणें दिसायला गोड परंतु कडू जहर अशी त्याची वासना होती! पुढें ही स्त्री म्हणते कीं त्यामुळें माझं मात्र वाटोळं झालं!

**म्यापल्या मनासारिखं मन गेले शोधुन पाह्या**
**सोन्याच्या नादानं खरं रेशीम गेलं वाया**

पतिप्रीतीला पुष्कळ ठिकाणीं वळवाच्या पावसाची उपमा दिली आहे. घळवाच्या पावसाची कधीं खात्री देतां येते का? तशीच ही गोष्ट—

**वळीवाचा पाऊस कुठं पडतो कुठं न्हाई**
**भरताराचं सुख दैवालागुन हाय बाई**

जरी प्रेमाचा पति असला तरीसुद्धां पत्नीनं भुलूं नये असाहि एक इशारा पोळलेल्या स्त्रीहृदयानें दिलेला आढळून येतो—

**पीर्तीचा भरतार, नको पीर्तीवरी जाऊ**
**पान्यांतली नाऊ, कांहीं कळेना अनुभवु**

पाण्यांत लोटलेल्या नावेचा कांहीं नेम थोडाच असतो? तशीच पतिप्रीति ही एक अनिश्चित गोष्ट आहे, ही सूचना विफल प्रीति अनुभवलेल्या स्त्रीनं वरचेवर दिलेली दिसते. कांहीं वेळां खुद्द पतीच सद्गुणी पत्नीला छळीत असतो. अशा वेळीं पत्नीचं कष्टी मन म्हणतं—

**जातीचा मोळक्या, त्यानं मोळीचं मोल केलं**
**चाफ्याचंदनाचं झाड ओळखूं न्हाई आलं**

चंदनाची किंमत मोळीविक्याला कुठून कळणार? हा अभिप्राय पहाण्यासारखा आहे. या पतीला पत्नीची किंमतच कळत नाहीं! मारहाण, छळवाद यांचा कहर होतो. पत्नी विचार करते, काय ही आपल्या जन्माची परवड?

**माऊलीच्या पोटीं लेक जन्मला तरवड**
**लोकाच्या लेकराची त्यानं मांडिली परवड**

तसेंच मराठमोळा समाजांत दुसरं लग्न करायची वहिवाट आहे. दुसरी बायको म्हणजे पहिल्या बायकोची नावडच ! अशा वेळीं बिचारी कष्टी होते व विचार करते कीं देवादिकांत देखील हें संकट चुकलं नाहीं, मग आपली काय कथा? चहूंकडे हेंच दिसतं. मग खेद कशाला?

**दोन बायकाची चाल निघाली घरूघरी**
**शंकर देवाजीनं गंगा आणिली गिरजेवरी !!**

परंतु सवतीवर मुलगी द्यायची म्हणजे मत्सराच्या धगधगत्या खाईत पोरीला लोटून देण्यासारखंच निर्दयपणाचं नव्हे का? अशा ठिकाणीं पडलेली एक मुलगी बापाला दोष देत आहे—

**वाटेवरचा आंबा, आंबा न्हवं, हुती कैरी**
**सवतीवर ल्येक दिली, बाप न्हवं, हुता वैरी !**

अशा या दुःखांत पिचत असणाऱ्या तरुण स्त्रीच्या मनांत खेदाचे विचार येतात कीं हा स्त्रीजन्मच नष्ट आहे. बापानं किंवा पतीनं याची वाटेल तशी विल्हेवाट लावावी ना? व्यर्थ, निरर्थक हें आयुष्य—

**लेकीचा जलम जसा बाभळीचा पाला**
**वाऱ्यावावटळानं गेला, धनी कुणाचा कोण झाला?**

हे उद्गार कारुण्य अन् कटु अनुभव या दोहींचे प्रत्यय देणारे नाहींत काय!

कोठेंकोठें पैशाअडक्याचे प्रश्न सुटावे म्हणूनहि सोयरीक घडवण्यांत येते. देण्याघेण्याचे, प्रतिष्ठेचे प्रश्न त्यामुळें थोडेसे सोपे होतहि असतील. परंतु हीं माणसं मनानं चागलीं नसलीं, तर मुलीला फार त्रास व सासुरवास होतो. घडीघटकेला मुलीच्या डोळ्यांत पाणी उभं रहातं. बापडी बापाला दोष देत म्हणूं लागते—

**बापाजींनीं दिली लेक, आपुली केली सुई**
**कसाबाहातीं दिली गई**

कांहीं लोक अडचणींत सांपडून कधींकधीं मुलीचेहि पैसे हुंडा म्हणून वराकडून घेतात. येथेंहि परत कसाब हीच उपमा दिलेली दिसते—

**लेकीच्या पैशानं बाप झालाया सम्रत**
**कसाबाच्या मागं गाय निघाली हंबरत**

लग्न हा एक सौदाहि होऊं शकतो व तो पोरीच्या जातीला किती जाचक होऊं शकतो याची कल्पना या शब्दांवरून येण्याजोगी आहे.

अशा तऱ्हेनें वाईट मंडळीशीं जन्मगांठ पडली म्हणजे अनेक मानसिक दुःखं तर निर्माण होतातच, पण पतिनिधनाचं दुःख या सगळ्या दुःखांपेक्षां कितीतरी पटीनं अधिक असतं! मराठमोळा समाजांत काडीमोड, म्होतूर वगैरे गोष्टी आहेतहि. परंतु त्याला गौण स्थान मिळत असल्यामुळें पुष्कळ विधवा मुली पतीनंतरचं आयुष्य वैराग्यवृत्तीनं घालवतात. त्याबद्दलहि ओव्या आहेतच. पुढील ओवी पहा—

**भरताराचं झालं, सरगामंदी सोनं**
**मागं बाईल, तुळशीचं वाळवण**

तुळशीच्या काष्ठाची उपमा विधवा स्त्रीला आदरानंच दिली आहे. केव्हां केव्हां कुळवंताची एकादी ऐन तरुण पोरगी पतीमागें नीतीनं राहते. मग पंचक्रोशींत तिच्याबद्दल बहुमानानें लोक बोलतात व आदरानें म्हणतात—

**रांडपन* आलं, कुन्या अशीलाची तान्ही**
**ज्वानी जळे दिव्यावानी**

दिव्याची उपमा सूचक आहे. स्वतां जळत राहून इतरांची सेवा करण्याचें दिव्याचें व्रत विधवा स्त्रीनें स्वीकारलेलें अनेक ठिकाणीं दिसून येतें.

पुढील उद्‌गार एका दुर्दैवी विधवेचेच आहेत—

**देव न्हाई देव्हारी, पायां कुनाच्या पडायाचं?**
**आपुल्या नशिबाचं कोडं कुनाला घालायाचं?**

या शब्दांतून वैधव्याचे मनोदाह करणारे ज्वलंत कष्ट किती समर्पक उदाहरणानं सूचित केले आहेत!

अशा तरुण विधवांना पुष्कळदां इतरांच्या विषयी नजरेचा त्रास सोसावा

*'वैधव्य' या अर्थी हा ग्राम्य शब्द आहे. पण खेडुतांच्या बोलभाषेंत या अशा ग्राम्य शब्दांचा भरणा पुष्कळच आढळून येतो, हें लक्षांत घेतलें, कीं ओव्यांतून ते दिसल्यास त्याबद्दल आश्चर्य अगर रोष कोणास वाटणार नाहीं.

लागतो. लोकनिंदाहि सहन करावी लागते. अशा वेळीं ही सत्प्रवृत्त स्त्री मोठ्या मनानं विचार करते—

**वाटचा वाटसरू निंदा करीत माझी गेला**
**बहीण पाठची न्हाई त्याला**

त्याला बहीण नाहीं, म्हणूनच या बहिणीचंहि शुद्ध मन त्याला कळत नाहीं, हा भावार्थ किती क्षमाबुद्धीचा आहे बरें! एकादा विषयांध मनुष्य क्वचित् पापी वासनेचे शब्दहि उच्चारून दाखवतो. बापडी दुखावलेली स्त्री स्पष्ट सांगते—

**पापी चंडाळ, कसं पापाचं बोललास ?**
**राळयाच्या कणीवाणी नेतरीं सललास**

माझं मन तुझ्यासारखं नाहीं ! मी कुळवंताची लेक आहे—

**वाईट बोललास, न्हाई मी तुझ्या बोलाची**
**पिता दौलतीची कळी उत्तम वेलाची**

खरोखर हे शब्द मोठे कणखर व अभिमानाचे आहेत यांत शंका नाहीं. परंतु अशी ही पापी वासना दृष्टीस पडली, कीं सुशील विधवेला मानसिक त्रास किती होतो ! एक स्त्री म्हणते, कीं कांहीं केलं तरी त्या शब्दांचा कडवटपणा कांहीं मनांतून जात नाहीं !—

**मूर्खाच्या बोलन्यानं मन माझं गेलं मोडी**
**साखर घातल्यानं कडू कारल्या येईना गोडी**

आणि मग अशा प्रसंगीं ही तरुणी सात्त्विक संतापानं विषयांध माणसाला बजावून देते—

**डोंगरी वणवा, आग लागली तणाला ।**
**जळती कीडमुंगी शहाण्या उमज मनाला ॥**

सर्व आयुष्याचीच दुःखानं होरपळ झाली तेथें या भावना कुठून उरतील बरें ? या शब्दांतून, विषयवासनेला क्षुद्र कीडमुंगीची उपमा दिलेली लक्षांत घेण्यालायक आहे. वैधव्याचं हें दृश्य करुण असलं तरी त्यांतला नीति-रक्षणाचा दृष्टिकोन कसा जागरूक नि लखलखीत धारेचा आहे !

नीतीच्या कल्पना अशा प्रकारें कडकपणें पाळण्यांत खेडुत स्त्री दक्ष

असते. परक्या पुरुषाच्या बाबतींत कसोशीनं मर्यादा पाळावी लागते. त्याचे निर्बंध स्पष्ट शब्दांत जागोजाग सांगितले आहेत. उदा० एक स्त्री म्हणते—

**पराया पुरुषाच्या हुबं ऱ्हाऊं नये साउलीला**
**बोल येतो माऊलीला !**

आपल्या वाईट वर्तनानं आईबापाच्या नांवाला कमीपणा येतो ही गोष्ट दरेक ग्रामवासी स्त्री मनांत जाणून असते. लग्नानंतर स्त्रीजीवनाला अशा प्रकारें इतकीं बंधनें पडतात. कुलमर्यादा जतन करण्यासाठीं इतकं जपावं लागतं, कीं या तारुण्यापेक्षां निर्मळ बाल्य किती उत्तम असं मनांत येणं साहजिकच आहे. एक तरुणी म्हणते—

**जल्मामंदी जल्म बाळपनीचा ब्येस**
**तरुनपनामंदी हुबं ऱ्हाईल्याचा दोस**

पुष्कळदां तरुण मुली थोडंफार बेछूट वागतातसं दिसलं कीं, लगेच एकादी वृद्ध स्त्री तिला बजावून सांगते—

**गरतीची लेक, कां ग कावरी बावरी ?**
**तिळ घेतील झाडूनी ! झाड पडेल वावरी**

यांतील सूचकता ध्यानीं घेण्याजोगी आहे. तारुण्य लुटून नेल्यावर उकीरड्यांत पडलेल्या झाडासारखीच तुझी अवस्था होईल हा आदेश किती गंभीर आहे !

पण याहि बंदोबस्तांतून कांहीं मूर्ख मुली फसून आयुष्याची नासाडी करून घेतातच. स्त्रीजीवनाचीं सर्व दृश्यें इतर समाजाप्रमाणें इथेंहि आहेतच. मात्र एकंदरींत बांदिस्त जीवनामुळें त्याचं प्रमाण कांहींसं कमी आहे इतकंच.

या सर्व उद्गारांत कौटुंबिक सुखदुःखांची मिळवणी केली कीं मराठमोळा कामकरी स्त्रीचं संपूर्ण जीवन नजरेसमोर येईल. स्त्रीजीवन हें भावनेच्या दृष्टीनं चहूंकडे सारखंच. परंतु शिक्षणाचा अभाव, सुखाच्या मर्यादित कल्पना, साध्या अपेक्षा, नीतीच्या काटेकोर कल्पना, शतदारिद्य, निढळाचा घाम गाळून मिळणारें यश, व जिव्हाळ्याचे बोल या सर्वांच्या मिलाफानं या जीवनास कांहीं वेगळेंच उठावदार सौंदर्य प्राप्त झालें आहे असें दिसून येतें.

—*—

# ३ स्त्रीजीवन

## जातं

जात्या तूं ईसवरा तुझं जेवन मला ठावं
घास घालिते मनोभावं १
जात्या तूं ईसवरा, नको मला जड जाऊ
बयाच्या दुधाचा सया पहात्यात अनुभवु २
जात्या तूं ईसवरा, नको मला जड जाऊ
माझ्या शिणेची राधा कुठं पाहू ३
थोरलं माझं जातं खुटा त्याचा चकमकी
आम्ही दळुया मायलेकी ४
थोरलं माझं जातं, चवघी बायकाचं
घर वडील नायकाचं ५
थोरलं माझं जातं, कशाला तिघी चौघी
एका फेराला लागू दोघी ६
थोरलं माझं जातं, सासुबाईच्या गोडीचं
चौघी बायकाच्या ओढीचं ७
थोरलं माझं जातं, दोघीतिघीच्या ओढणीचं
घरामागल्या गडणीचं ८
थोरलं माझं जातं वोढंना एकलीला
संगं घेते मैना धाकलीला ९
कामामंदी काम दळन अवघड
गाण्याच्या नादावरी मी ओढते दगड १०
जातं ओढतांना, हाताला येती फोड
काळा कुरुंद जाई जड ११

जात्याचं ओढणं तुला कळेना लाडीबाई
काळा कुरुंद जड जाई १२
जातं ओढतांना कंबर माझी लवं
माह्यारी कामाची न्हवती सवं १३
थोरलं माझं जातं मला बघून पळतं
बयाचं दूध माझ्या मनगटी खेळतं १४
चक्कर माझं जातं, घागर वाटे गोटी
बयाबाईचं दूध खेळतं मनगटीं १५
दळन दळीते, नखाबोटाच्या आधारी
बयाबाईचं दूध प्याले जशा मधाच्या घागरी १६
जातं ओढतांना पाठ भिजुन पदर ओला
बयाबाईच्या आकडी दुधाला कड आला १७
जातं मी ओढीते दंडभुजाच्या जोरावरी
माऊलीनं दिली घुटी पारोशा केरावरी १८
दळन दळीते, हाताला सर्दी भारी
बयाच्या जीवावरी जायफळाची केली न्याहारी १९
जातं ओढतांना मुठींत माझ्या बळ
माझ्या माउलीनं घुटींत दिलं जायफळ २०
जातं ओढतांना, देते मनगटं तोलूनी
मातेचं प्याले दूध न्हाई घेतलं बोलूनी २१
दळण दळीते, मनगटीं पडला तिढा
बया मालनीनं दिला घुटींत येलदोडा २२
दळण दळीते, हाताच्या पाचबोटी
माऊलीचं दूध खेळतं मनगटी २३
दळण दळीते, पाचबोटाच्या झेल्यानी
दूध घेतलं तुझं ग मालनी २४
दळण दळीते, बाह्या ग बळ माझं
मायबाई वाघिणी दूध तुझं २५

जातं ओढतांना, अंगाचं झालं पाणी
बया माझ्या माउलीचे वारू जुपल्याती दोन्ही २६
दळण दळीयेते, अंगाचं झालं पाणी
बया माउलीनं चारिलं दूधलोणी २७
दळन दळतांना करूं नये कुचराई
माऊलीच्या दुधाची दाखवावी चतुराई २८
ओढेना मोठं जातं, ओढून पाहीन
माऊलीचं दूध कारनी लावीन २९
बारीक दळसई पीठ जायाचं दूरवरी
दीर थोरला कारभारी ३०
बारीक दळावं, बुक्यापरीस किसावं
गरती बघुन बसावं ३१
दळन दळीते, दळीते ओले गहू
बंधुजी नको अंतर मला देऊं ३२
दळन दळीते जुनं जुंधळं नवं गहु
बंधुच्या पंगतीला आलं नारायन देऊ ३३
काळं कुरुंद जातं, कुठं केलंस सांग मला
कळीचं दांतवन कुन्या नारीनं दिलं तुला ३४
दळन दळीते दानं घेते शेरशेर
घरी हाईती नंदादीर ३५
दळन दळीते, जुंधळं मोतीदानं
माझ्या घराला आलं पाहुणं मेहुणं ३६
नको मला दळु लागुं बैस माझ्या जवळी
लाडके मैनाबाई तुझीं मनगटं कवळीं ३७
दळन दळीते पीठ पडे रवारवा
माझ्या बंधुजीला धाडूं मेवा ३८
दळन दळीते बसुन अंगनांत
माझ्या सोबतीला मुलं बसली चांदन्यांत ३९

दळन दळीते, धान्य पडलं खंडीवर
तान्हुलं बाळ माझं, खेळतं मांडीवर ४०
दळन दळीते, आणीक मापटं
मांडीवर तान्हं निजलं धाकुटं ४१
लेकूरवाळीचं पाळन्याखाली जातं
राजसबाळ माझं त्याच्या नादानं झोपी जातं ४२
दळन दळीते, दळीते मेतकूट
माझ्या बाळराजा पान तुझं वाढू कुठं ! ४३
दळप माझं झालं सुपांत पाच गहू
आलं जेवाया माझं भाऊ ४४
दळन दळीते घालूनिया मांडी
शेताचं धान्य आलंया खंडीखंडी ४५
दळन दळीते बैसुनिया माडी
शेतावरनं धान्याची येई गाडी ४६
पिठाची झाली पाळ नको मोडूंस बोटानं
तान्हुला भाऊ तुझ्या पाठीचा पठाण ४७
दळनाची शीग मोडन्या न्हाई मुभा
पाठीशी बंधुजी चंद्र उभा ४८
दळनाची शीग मोडंना गव्हाची
सयानु किती सांगू मी बहिणाई भावाची ४९
सरलं दळन सरलं कशी म्हनुं
हाईती पाठचं लक्षुमणुं ५०
सरलं दळन सरलं म्हनुं कशी
सासर-माहेर भरल्या दोन राशी ५१
सरलं दळन उरलं मूठपसा
सखी जायाची दूरदेशा ५२
सरलं दळन, माझं उरलं पाच पसं
देवाजीनं दिलं भासं ५३

सरलं दळन उरलं कुठं ठेवु
बळदाला शिड्या उंच लावु ५४
सरलं दळन उरलं कुठं ठेवुं
शिधा बामनाला देऊ ५५
सरलं दळन, पीठ घालते वाण्याला
औख जात्याच्या धन्याला ५६
सरलं दळण, सुप झाडूनी एकीकडे
माहेरीं सासरीं राज्य मागते दुहीकडे ५७
सरलं दळण, सोन्याच्या हातानं
माझ्या भाग्यवानाच्या जात्यानं ५८
सरलं दळण, गीताच्या छंदामंदी
इठुदेव माझं ल्यालं अबीर गंधामंदी ५९
सरलं दळण, सुप झाडुनी उभं केलं
चित्त बयाच्या गावा गेलं ६०
सरलं दळण, माझं उरलं शेर तीन
हात लाविला सईबाई गरतीनं ६१
सरलं दळण मी आणिक घेते घेते
माझ्या चंद्राला ओव्या गाते ६२
सरलं दळण, माझ्या मुखींची सरेना
नऊ लक्ष ओवी माझ्या गोताला पुरेना ६३
सरलं दळण, उरलं मूठपसा
हात जोडुन नमस्कार परळीवरच्या रामदासा ६४
दळनाची पाटी अखंड जात्यावरी
अंबाबाईचं नवरात्र माझ्या घरीं ६५
कांडप कांडीते अनारशाचं पीठ
दिवाळीच्या दिशी बंधुजी येती नीट ६६
कांडप कांडीते, सकाळच्या वेळीं
करूं आज गूळपोळी ६७

कांडप कांडीते तांदुळ आंबेमोर
ज्येवनार ल्येक न्हानथोर ६८

कांडप कांडीते डाळ कांडते मुगाची
जोडी बैसली जेवाया, बापल्येक दोघाची ६९

कांडप कांडीते खीर करीते गव्हाची
जेवायाला जोडी येणार भावाची ७०

कांडप कांडीते कशाचा वास आला
लवंगा वेलदोडे मी ग कुटते मसाला ७१

दळपाकांडपाला न्हाई मी डगमले
बया माझ्या मालनीच्या कुशीला जलमले ७२

दळपाकांडपाला न्हाई कुनाला हार गेले
दूध वाघिनी तुझं प्याले ७३

दळपाकांडपानं, दुखती माझं दंड
बयाच्या जीवावर सुखवासी माझा पिंड ७४

## दिनक्रम

पहाटेच्या पारामंदी, न्हाई जोडण्याला शीण
माझी बाळाबाई भाग्यवानाची हाये सून १

पहाटेच्या पारामंदी मी कशानं झाले जागी
कृस्नाबाईच्या अंगुळीला जाऊ बहीनी दोघी २

पहाटेच्या पारामंदी दळन सैधवा सखीचं
पारवं घुमत्यात माडीयेचं ३

पहाटेचं दळन, येरवाळी शेनपानी
काम झालंया गवळनी ४

पहाटेच्या पारामंदी कोन करीतं किलीकिली
पोरं उठली चिलीपिली ५

पहाटेच्या पारामंदी कोन हौशा गीत गातो
सावळा कंथ, बागेला पानी देतो ६

पहांटेच्या पारामंदी पांखरं झालीं जागी
माझा बाळराय, फुलाला गेला जोगी ७

पहांटेच्या पारामंदी दानधर्माची वेळ झाली
राजा कर्णाला ओवी आली ८

पहांटेच्या पारामंदी कां देवा येतां जातां ?
काळ्या कपिलेची धार काढून देते आतां ९

पहांटेच्या पारामंदी उघडा दरवाजा
गस्त घालितो बाळराजा १०

दिस उगवला वाड्याच्या एका कोनी
नेत्र उघड राजा दोन्ही ! ११

सकाळीं उठून हात जोडीते अंगनाला
सूर्य डोलतो गगनाला १२

सकाळच्या पारी क्रस्नाबाईला आरती
ओवाळीते रामचंद्राची मूर्ती १३

सकाळीं उठून सहज गेले बाहेरी
दृष्टीस पडली पांडुरंगाची पायरी १४

सकाळीं उठून मला येशीकडे जाणं
मारुतीरायाची लालाची भेट घेणं १५

सकाळीं उठून येशींत कोन उभा
मारुतीराय माझा, ल्याला शेंदरी झगा १६

सकाळीं उठून तुळशीबाईचा संग केला
हळदकुंकवाचा तिथं करंडा सापडला १७

सकाळीं उठून तुळसीपाशीं जाते नीट
हळदकुंकवानं तिनं भरीली माझी मूठ १८

सकाळीं उठून लोटते पिढं दारी
तुळसीपाशी गोविंददेवाची येरझारी १९

दिस उगवला, अंगनीं पैसावला
हळदकुंकवाचा म्यां पदर पसरला २०

सूर्य उगवला उगवतांना लालीलाल
शिरी सोन्याचं जाऊळ २१
दिस उगवला उगवुनी आला वर
हळदीकुकवाची पूजा, घेतो तुळसीबरुबर २२
दिस उगवला उगवतांना पानी पडे
गंध लेतांना तेज चढे २३
सकाळच्या पारी, हात माझा देताघेता
पिता दौलतीची, कन्या मी भाग्यवन्ता २४
दिस उगवला केळीच्या कोक्यांत
माझी बाळाबाई उभी मामाच्या सोप्यांत २५
सकाळीं उठून गोसावी अलकंला
पिठ माझ्या शिलकंला २६
जाते देवाच्या पूजेला, दुपार कलली
जाई तवकी फुलली ! २७
थोरलं माझं घर काम करीते ईळभर
कपाळीचं कुकु न्हाई सुकलं तीळभर ! २८
तिन्हीसांजा झाल्या जात्या तुझी घिरघिर
माझं करंगल्याचं घर २९
तिन्हीसांजा झाल्या दिवा लावीन तुपाचा
उजेड पडला देवाच्या रूपाचा ३०
तिन्हीसांजा झाल्या कां देवा केलं येनं
दुधा घातलं विरजण ३१
देव नारायना अस्ताला तूं जाशी
मनामंदी माझी याद राहूं देशी ३२
गुज बोलतांना गुजाला आली गोडी
रात मध्यान उरली थोडी ३३
मध्यान्रात्र झाली, चांद माळीच्या खाली गेला
देव माधवजी गुजा आला ! ३४

## सौभाग्यचिन्हें

अहेवाचं लेनं, हात भरूनी कांकनं
हळदवरी कुकु कपाळ दिसे छान १
धनसंपदेचं नको देवाला घालूं कोडं
हळदकुकवाच राज असावं येवढं २
शेरभर सोनं नार ठेविते ठेवणीला
हळदीवर कुकु, झाड सुरूचं लावणीला ३
राजामंदी राज अखंड भरताराचं
भरल्या बाजारी उंच दुकान अत्ताराचं ४
लाल पिंजरीचं कुकु अत्तारा घाल जोखी
आम्ही ल्यायाच्या मायलेकी ५
पंढरीच कुकु सोनं म्हनुन साठवीलं
वया गौळनीनं, लेनं म्हनुन पाठवीलं ६
तिन्हीसांजा झाल्या लक्ष्मी आली वाड्या
हळदीकुकवाच्या तिला घालते पायघड्या ७
पंढरीचं कुकु धड्यानं येतं लई
वाटा घ्याया भावजई ८
पंढरीचं कुकु घ्याग बायांनो बोटबोट
जावानंदांचा मेळा दाट ९
उगवला नारायेन, काय मागु त्याच्यापाशीं
हळदकुकवाच्या राशी १०
शेजी लेनं लेती पाच पुतळ्या कवा मवा
कपाळीचं कुकु नित दागिना माझा नवा ११
शेरभर सोनं, शेजी झाकून घेते गळा
कपाळीचं कुकु माझा उघडा पानमळा १२
सासुसासरा माझी खजिन्याची पेटी
कुकवाचा पुडा जतन केला माझ्यासाठीं १३

सवाशिनीचं लेनं हात भरून बांगड्या
हळदीवर कुकु कानामंदी बुगड्या १४
अहेवाचं लेनं मनी डोरलं साजाचं
लेनं कथाच्या राजाचं १५
सोन्याची गरसोळी हौस नारीच्या मनाची
काळी गरसोळी अहेवपनाची १६
डोरल्याचं सोनं न्हाईलं रानामंदी
जतन कर शंभुदेवा बेलाच्या पानामंदी १७
कुकवाचं बोट ओढिते रासवट
हाई संचित माझं नीट १८
एका करंडीचं कुकु लेल्यात सासुसुना
असं भाग्य न्हाई कुना १९
सम्रताच्या नारी, डाव्या बाजूनं माझ्या चाल
तुझ्या चितांगाचं मोल, कुकवाला दिलं काल २०
देवा नारायना, मागनं मागु काई
कुकु करंडी घाल लई २१
माझा नमस्कार गिरीच्या व्यंकोबाला
आउख मागते कुकवाला २२
देरे देवा मला हळद पुरती
लाल कुकु निढळावरती २३
देवीच्या दरसनाला जीव झाला येडा
जलमभरी लावाया, तिनं दिला कुकवाचा पुडा २४

## चुडे

चुडियाचं माझ्या, सोनं बिनलाखीचं
पिता दौलतीच्या पारखीचं २५
माझ्या चुडीयाचं सोनं पिवळं हाडूळ
पिता दौलतीनं केली पारख वाढूळ २६

चुडीयाचं माझ्या सोनं, रुपै चांदवडी
पिता दौलतीनं केली पारख घडूघडी २७
चुडीयाचं माझ्या सोनं, तीन ठायीं लवं
पित्याची पारख चोखट मला ठावं २८
शेजी लेनं लेती, लाखेवरलं सोनं
हातीचं चुडं, माझं नऊ लाखाचं लेनं २९
धनसंपत देरे देवा तूं माफक
राज चुडियाचं अधिक ३०
दिस उगवला, किरनं टाकीतो बिगीबिगी
चुडेदान मागाया जाऊं दोघी ३१
सकाळीं उठूनी जाते देवाच्या वाड्याला
औख मागते चुड्याला ३२
सूर्यं उगवला, झाडाझुडांवरी
तेज माझ्या चुड्यावरी ३३

## अहेव मरण

अहेव मरनाची मला हाई आवड
म्होरं पतीपुत्रं मागं कुकवाची कावड १
अहेव मरनाची सयानु मोठी मौज
म्होरं चाले कंथ, मागं गोताची फौज २
अहेव मरन येवं असलपनांत
घ्याईला जागा तुळशीच्या बनामंदी ३
अहेव मरन, सोमवारी सवापारी
कंथ चांदवा देतो दारी ४
सरगाच्या वाटे हळदकुकवाचा सडा झाला
अहेव नारीचा गाडा गेला ५
अहेव मरन अंगनाला देई शोभा
कृष्णाकडेला कंथ उभा ६

अहेव मरन भाग्याच्या नारी तुला
सोन्यारुप्याचीं फुलं कंथ उधळीत गेला ७
अहेव मरन सोमवारी रातीयेचं
पानी कंथाच्या हातीयेचं ८
अहेव मरन येवं, पित्याच्या दारापुढें
बंधुला सांगते, सरलं माह्यार तुझ्याकडे ९
अहेव मरणाची चिता जळे साउलीला
दुःख आगळं माऊलीला १०

## मर्यादशीलता

उभ्या गल्ली जाते हाय पदर डाव्या मुठी
पाप्या नंदर तुझी खोटी, मी आशिलाची बेटी १
जाते मी उभ्या गल्ली वर करीना पापणी
माझ्या बंधुजीची वाघाची जाचणी २
जाते मी उभ्या गल्ली, घेते पदर हाताला
सासर माहेरीं, पानी चढे दुही गोताला ३
जाते मी उभ्या गल्ली दंडभुजा पदरांत
बंधुजीचं बसणं मोठमोठ्या वजिरांत ४
उभ्या गल्लीनं मी जाते, दंड उजवा झाकुनी
नाव पित्याचं राखुनी ५
उभ्या गल्ली जाते, झाकुन पदरापरीस पासवा
सया पुशित्यात, कुन्या मातेचा कुसवा ? ६
उभ्या गल्ली जाते, नंदर जिमीनीला
पिता दौलतीला पानी चढंल समिंद्राला ७
उभ्या गल्ली जाते, माझी नजर वाहीकडे
बंधुजीची सभा बसली दुहीकडे ८
उभ्या गल्ली जाते नको धरूस माझा हात
माझा बंधुराय पुढं उभा रघुनाथ ९

उभ्या गल्ली जाते माझी उभार भडकली
छाती वैऱ्याची तडकली १०
उभ्या गल्ली जाते न्हाई उघडी माझी छाती
उच्च कुळींची माझी माती ११
उभ्या गल्लीनं मी जाते, करते पदराची सारासारी
ताईत माझा बंधु रागीट पारावरी १२
उभ्या गल्ली जात्ये, नव्हे असल्यातसल्याची
पिताजींची माझ्या उच्च कुळी जाधवाची १३
उभ्या गल्ली जात्ये माझी निऱ्याला पांचीं बोटं *
सया पुशित्यात, लेक गरतीची जाती कुठं १४
उभ्या गल्ली जाते, माझ्या पदराची बंदुबस्ती
पित्याच्या नावासाठीं देत्ये जिवाला मी तस्ती १५
उभ्या गल्ली जात्ये कुनी काढीना माझं नांऊ
वाघासारखे माझे भाऊ १६
उभ्या गल्ली जाते हात झाकूनी कांकनाचा
धाक पाठीच्या रतनाचा १७
उभ्या गल्ली जाते खडा हलेना भुईचा
बया माझ्या गौळणीचा येल शीतल जाईचा १८
उभ्या गल्ली जाते खडा हलेना जिमिनीचा
येल शीतळ जाईचा बया माझ्या मालनीचा १९
जातीसाठीं माती, हिमतीसाठीं खाते वाळु
पिता दौलतीची, अशिलाची मी बाळु २०
जातीसाठीं खाते माती, कुळासाठीं खाते खस्त
जातकुळी ही लौकीकाची वस्त २१
जातीसाठीं माती खाते मी चावूनी
माऊलीबाई तुमच्या नांवाला भिऊनी २२

* मराठ्यांच्या कांहीं घराण्यांत डाव्या हातानं निऱ्यांचा घोळ उचलून धरून चालण्याची पद्धत आढळते.

जातीसाठीं माती, खावं गोतासाठीं खडं
पिता दौलती लौकिकाला चढं २३
जातीसाठीं माती खावावी लईलई
बाबा बयाच्या नांवापायीं २४
जातीसाठीं माती खाते मी बरोबर
पित्याचं नांव दूरवर २५
जातीसाठीं माती खाते मी लवणाची
बंधुजींची माझ्या उच्चकुळी रावनाची २६
जातीसाठीं माती, कुळाकारण एवढी लज्जा
तुझ्या नांवाकारणं, बंधुराजा २७
जोडव्याचा पाय हळु टाकावा मालनी
कंथ बघतो चालणी २८
जोडव्याचा पाय हळु टाकावा गरतीबाई
सोप्या बैसले दादाभाई २९
जोडव्याचा पाय टाकावं भरदार
गांव मऱ्हाठी निंद्खोर ३०
जोडव्याचा पाय जमिनीसंगं बोले
भरज्वानीची नार चाले ३१
जोडव्याचं पाय कुना नारीनं वाजवीले
नंदी गाडीचे बुजाविले ३२
पराया पुरुषाच्या उभं ऱ्हाऊं नये साउलीला
बोल येतो माऊलीला ३३
भल्याची मी लेक भलेपणा मिळवीन
पिता दौलतीचं नांव कारंडी वागवीन ३४
गरतीमधें बसे मी गरतीच्या वजनाची
बहीणं भल्या सजणाची ३५
गरतीमधें बसे, गरतीवाणी माझं चित्त
बया गवळनीनं शिकवल्याचं झालं हीत ३६

माय म्हनिते, लेकी नांदून व्हावं खरं
वडील बाप्पाजींचं नांव हाई दूरवर ३७
पराया पुरुषाशीं बोलायाचं काम काई ?
जन खडा टाकुनी अंत पाही ३८
भरताराची खूण डाव्या डोळ्याच्या तराटणी
भुज झाकावी मराठणी ३९
काळ्या चोळीवरी राघु काढाया जीव भीतो
बंधु रागीट शिव्या देतो ४०
वाटंवरला वाडा आल्यागेल्याची नंदर
बंधुजी बोले, बहिणी संभाळ पदर ४१
हासूं नको नारी हसनं कोन्या परकाराचं ?
उतरेल पानी तुझ्या चातुर भरताराचं ४२
हांसूं नको नारी हंशाचा भ्रम मोठा
आपुला अस्तुरीचा जल्म खोटा ४३
हांसूं नको नारी, हंशाची व्हईल थट्टा
भरल्या सभेमंदी भरतारा लागेल बट्टा ४४
हसूं नको नारी हंसनं न्हवं ते कामाचं
पानी जाईल तुझ्या रामाचं ४५
हसूं नको नारी हंसनं न्हवं ते परीचं
पानी जाईल थोराघरींचं ४६
पराया पुरुषाची नको साउली माझ्या दारीं
मावळण आत्याबाई तुळशीबरोबरी ४७
चंदनासारिखा देह घातिला करवती
बाप्पाजी तुमच्या नांवासाठीं ४८

## स्त्रीजीवनाचे अनुभव

राहते हंसुन खेळुन, जन म्हणती सुखाची
पित्याच्या नांवापायीं ध्याई जळते लाखाची १

रांडपण आलं कुन्या आशिलाची तान्ही
ज्वानी जळे दिव्यावाणी २
आपुल्या भरताराचं स्वर्गी झालं सोनं
मागं बाईल, तुळशीचं वाळवण ३
देव न्हाई देव्हारीं, पायां कुनाच्या पडायाचं ?
आपुल्या नशिबाचं कोडं कुनाला घालायाचं ? ४
काय करायाची दीराभायाची पालखी ?
भरतारावांचून नार दिसती हालकी ५
वाटचा वाटसरू निंदा करीत माझी गेला
वहीण पाठची न्हाई त्याला ६
पापी चंडाळ ! कसं पापाचं बोललास
राळ्याच्या कणीवाणी नेतरी सललास ७
वाईट बोलशील न्हाई मी तुझ्या बोलाची
पित्या दौलतीची कळी उत्तम वेलाची ८
मूर्खाच्या बोलन्यानं मन माझं गेलं मोडी
साखर घातल्यानं कडू कारल्या येईना गोडी ९
डोंगरी वणवा आग लागली तणाला
जळती कीडमुंगी शान्या उमज मनाला १०
म्यापल्या मनासारिखं मन शोधून गेले पाह्या
सोन्याच्या नादानं खरं रेशीम गेलं वाया ११
जल्मामंदी जल्म बाळपणीचा ब्येस
तरुणपनामंदी हुभं न्हाईल्याचा दोस १२
वळीवाचा पाऊस कुठं पडतो कुठं न्हाई
भरताराचं सुख दैवालागून हाये बाई १३
पीतींचा भरतार नको पीतींवरी जाऊ
पान्यांतली नाऊ कांहीं कळंना अनुभवु १४
कडू विंद्रावण, डोंगरी त्याचा राहावा
पुरुषाचा कावा मला वेडीला काय ठावा ? १५

कडू विंद्रावण आपुल्या जागी नटे
त्याचे अंगीचे गुन खोटे १६
कडू विंद्रावण मला वाटं खावंखावं
त्याचे हे असे गुन, मला वेडीला काय ठावं? १७
किती नटशील, नटणं गेलं वाया
जूनजरबट झाली काया १८
जीवाला देते जीव बाळपणीच्या सजणाला
सोन्याच्या नादानं मोती लागला झिजणीला १९
जीवाला देते जीव, देऊन पाहिला
पान्यांतला गोटा, अंगीं कोरडा राहिला २०
संसाराचा वेढा वेड्याबाई वंगाळ
पान्यांतली नांव, आवल्या संभाळ २१
कावळ्यानं कोट केलं बाभूळवनामंदी
पुरुषाला माया थोडी, नारी उमज मनामंदी २२
संचिताची रेघ कवाळीच्या आंत
अस्तुरीची वेडी जात जोशाला दावी हात २३
निंदक निंदक बसले शेजारीं
परनारीची केली निंदा, काय पडले पदरी २४
बोलक्या बोलशील शब्द निंदेचे एकदोन
उलटून देईन जाब, कुठं व्हाईलं श्यानपन २५
लोकाच्या अस्तुरीची निंदा करितो वाटेवरी
आपुल्या अस्तुरीचा पदर व्हाई पाठीवरी २६
अभंड नारीला कुभंडा काय तोटा
वाऱ्याच्या बांधी मोटा २७
अभंड झाली नार तिनं बेलाची केली भाजी
खऱ्याखोट्यासाठीं तुळस तोडाया झाली राजी २८
चांगलं म्हून नार जीवाला नांवाजती
बिबव्याचा डाग चुन्यानं सारवीती २९

वेसवा झाली नार, तिला कशाची लाजलज्जा
बळं पदर धरी तुझा ! ३०
नखऱ्याची नार नखरा सांगते रोजरोज
कोऱ्या कागदाला शाई लागुन जाती सहज ३१
नारीनं संग केला, न्हाई पाहिला जातीचा
माळ्याच्या मळ्यामंदी कांदा हिरव्या पातीचा ३२
नारीनं संग केला, न्हाई पाहिला जातीचा
कुंभार घाली आवा, मोघा हिरव्या मातीचा ३३
गरतीची लेक कां ग कावरी बावरी
तिळ घेतील झाडूनी झाड पडेल वावरी ३४
गोरीचं गोरेपन भल्यांनी वानूं नये
कडू विंद्रावण हातीं धरून चाखूं नये ३५
कडू विंद्रावण बांधाला पसरला
मूर्ख बोलून इसरला ३६
माऊलीच्या पोटीं लेक जलमला तरवड
लोकाच्या लेकराची त्यानं मांडिली परवड ३७
लेकीचा जलम उंसाच्या वाढ्यावानी
ज्याची त्यानं नेली, माय बघे वेड्यावानी ३८
लेकीचा ज़लम जसा काचेचा बंगला
संचिताला धनी असावा चांगला ३९
लेकीचा जलम काय घातिला येड्या देवा ?
ज्यांच्या पोटीं जलम, त्यांची घडत न्हाई सेवा ४०
लेकीचा जलम देव घालूनी चुकला
मातापित्याची सेवा करतो बंधुजी एकला ४१
लेकीचा जलम जशी तांदुळाची गोणी
बाप विकून झाले वाणी ४२
लेकीचा जलम जसा बाभळीचा पाला
वाऱ्यावावटळानं गेला, धनी कोन झाला ! ४३

लेकीचा जल्म जसा गाजराचा वोफा
जोपा करूनी काय नफा! ४४
लेकीच्या पैक्यानं बाप झालाया सम्रत
कसाबाच्या माग गई निघाली हंबरत ४५
बाप्पाजींनी दिली लेक आपुली केली सुई
कसावाहातीं दिली गई ४६
लेन्यामंदी लेनं अवघड कापाचं
सवतीवरी लेक दिली, कसं धारिष्ट बापाचं ४७
वाटेवरला आंबा, आंवा न्हवं, होती कैरी
सवतीवर लेक दिली वाप न्हवं, होता वैरी ४८
दोन वायकांची चाल निघाली घरूघरी
शंकर देवाजीनं गंगा आनिली गिरजेवरी ४९
आम्ही पाटलाच्या मुली, न्हाई कुनाला मेचायाच्या
अंगीं लखुटा वाचायाच्या ५०
आम्ही पाटलाच्या मुली, जशा तलवारीच्या अण्या
जाईल पानी तुझं, दुरून बोल शहाण्या ५१
आम्ही पाटलाच्या मुली मिऱ्यापरास तिखट
जपून बोल दादा, आब जाईल फुकट ५२
आम्ही पाटलाच्या मुली तलवारीच्या धारा
न्हाई घ्येनार, परायाचा वारा ५३
अगाशीचा आंबा, आगाशी झोकं खातो
मूर्ख मनांत मिडकतो! ५४
आगाशीचा आंबा आगाशी डळमळे
खाली मूर्ख तळमळे! ५५

## उपदेशात्मक सुभाषितें, दृष्टान्त वगैरे

आईच्या माघारी बाप न्हवं लेकराचा
तोडिला पानमळा, थारा उडाला पाखराचा १

दोघांची एकशीण, तिथं प्रेमाला काय उणं
केवड्यामंदी जाई लाविली हौशानं २
सुरतेचं मोती, वेजांत बारीक
जातीच्या लेकराची करावी पारख ३
गर्वाच्या नारी, गर्वाचं घर खाली
लंकेच्या रावनाची वेवस्था काय झाली ४
कारलीचा वेल कडू लिंबाऱ्यावर गेला
संगतीचा गुन झाला ५
धनसंपतेच्या नारी नको बोलूंस तोऱ्यानं
दिस येत्यात फेरानं ६
जातीचा मोळक्या, त्यानं मोळीचं मोल केलं
चाफाचंदनाचं झाड ओळखूं न्हाई आलं ७
जल्मा येऊनी फुका जल्म का जाळावा
लाविलेला ऊंस घाऱ्यांत गाळावा ८
अस्तुरीपरायास राखेचा ढेबज्या!
तुळशीची सर काय करील सबज्या? ९
तरवड फुलली सोन्यापरीस सवाई
ल्येकाची ही सर काय करील जावाई? १०
मायेच्यावांचून कशाचा मैत्रपणा
मिठाच्यावांचून रुचि न्हाई पकवाना ११
संगत करूं नये पांगीर पळसाची
पाताळा जाते मुळी, मलयगिरी चंदनाची १२
पोटीं न्हाई पुत्रफळ सुख न्हाई कामिनीला
पिकाच्यावांचून काय करावं जिमिनीला १३
देन्याघेन्यानं न्हाई कुनाला सोडियेलं
चंद्रासारख्याला ग्रहनानं वेढीयलं १४
पडतो पाऊस पडतो टपटपा
सुरूच्या झाडाखाली हुबं न्हाऊनी काय नफा १५

माऊलीची माया शेजी कराया गेली
लटकी साखर शाळूच्या पाना आली ! १६

संपदेच्या नारी, नगं होऊंस उताणी
दुपारची सावली देखिली कितीकांनी १७

जल्मामंदी जल्म केळीचा चांगला
आधी काप माझा गळा, मग हात लाव बाळा १८

पिकला उंबर डोंगरी झाला मेवा
वांझे नारीला काय व्हावा ? १९

मायबाप न्हाई तिनं माह्यारी जाऊं नये
उलगला बाजार, सुन्या पेठेला न्हाऊं नये २०

चंदन बोलतो सहाणेबाई वेडी जाती
तुझीया संगतीनं देहाची झाली माती ! २१

वळीवाचा पाऊस कधीं पडतो कधीं न्हाई
सम्रताच्या मैत्रीची ही अशीच रीत बाई २२

शेजीबाई नको लटकी माया लावूं
हिरव्या आंब्याचा रस काढूनी नको दाऊं २३

संगत करावी, पाहून साहून
सोनं कसाला लावून ! २४

भावाच्या राज्यावरी बहिणीची न्हाई सत्ता
अंबारीचा हत्ती भरल्या पेठेनं गेला रिता २५

माउलीची माया सर्व्या बाळावरी
केळीबाईची साउली बत्तीस केळांवरी २६

आईवांचून माया न्हाई, बहिणीवांचून जिव्हाळा
काय झुलव देतो, पान्यावांचून लव्हाळा ? २७

पाऊसावांचून रान दिसंना हिरवं
माऊलीइतुकं कुनी बघेना बरवं २८

—*—

# विभाग ४

# लोकसाहित्याचें लेणें

## भाषेचें लेणें

# भाषेचें लेणें

खेडुत लोकांची भाषा अगदीं साधी. त्यांतून ही सर्व निरक्षर स्त्रीजनाची रचना आहे हें प्रथम ध्यानीं घेतलें पाहिजे. कोठल्याहि बक्षिसासाठीं, कीर्तीसाठीं हें वाङ्मय अभ्यासपूर्वक तयार झालेलें नाहीं. मनांत येणारे विचार शब्दरूप घेऊन साकार झालेले. सहजस्फूर्तीनं जिभेवर खेळूं लागलेले हे ओवीचे चरण! परंतु जसें भाषा आधीं निर्माण झाली व तिचे अलंकार कोणते ते मागून ठरले किंवा लघुकथा जशी आधीं भरभराटीस येऊन तंत्राचा शोध कांहींसा मागून लागला, त्याप्रमाणें या साध्या जीवन-गीतांतून भाषेचीं सर्व लेणीं कमी-अधिक स्वरूपांत आढळतात.

अगदीं प्रथम जर कोठली गोष्ट नजरेंत भरत असेल तर भाषेंतला उत्कट जिव्हाळा! अंतःकरण ओतूनच जणूं एक एक गीत घडविलें गेलें आहे! मनांतल्या कोमल भावनांना छेडूनच जणूं एक एक संगीतमय शब्द प्रकटत आहे. मानससागराला जणूं भरती येऊनच एकेक विचाराचें शब्ददर्शन होत आहे असा भास होतो!

हा जिव्हाळा मधाच्या पोंवळ्यांत मध जसा सांठून राहावा तसा ओवी-ओवींतून सांठलेला आढळतो. आपल्या माणसांबद्दल तर हीं जिव्हाळ्याचीं गीतें आहेतच. पण रोजच्या आयुष्यांत शेतकऱ्यांचा ज्या ज्या गोष्टीशीं संबंध येतो, त्या त्या प्रत्येकीबद्दल तसाच जिव्हाळा, तीच आपुलकी आढळून येते.

उदा० शेतांतल्या विहिरीला एके ठिकाणीं 'विहिरीबाई सुंदरी' असें म्हटलेलें आहे. समईला समईबाई म्हणावयाचें, झोपाळ्यालाहि 'झोपाळेदादा' म्हणावयाचें, भुकेलादेखील 'भूकबाई दम धर' म्हणून म्हटलेलें आढळतें. बैल, गाई, वासरें यांवर तर अपरंपार प्रेम. त्यांनाहि जिव्हाळ्याच्या ओव्या म्हटलेल्या सांपडतात. चुलीशीं रोजचा संबंध त्यामुळें 'चुलीबाई' असें आदराचें संबोधन आढळतें. फार काय, भाजीलासुद्धां 'मेथीबाई'

म्हणून आदराची हांक ! जीवनाशीं संलग्न असणाऱ्या दरेक लहानमोठ्या बाबतींत ह्या जिव्हाळ्याची जाणीव आहेच !

उदा० तुळस हें वास्तविक एक रोप. परंतु विठ्ठलाची ती प्रियतमा ही कल्पना मनांत असल्यानें तिला उद्देशून जिव्हाळ्यानं म्हटलेले शब्द पहा—

**माझ्या अंगनांत तुळसी मालनी तुझा वोफा**
**देव गोविंद घाली खेपा**

इतर झाडाझुडांशींदेखील हें जिवाभावाचें नातें आहेच. मुलीला सासरीं पोंचवून येतांना वाटेंत डेरेदार आम्रवृक्ष लागतो. त्यालाच हात जोडून आई प्रार्थना करीत आहे—

**नदीपलीकडे ल्येक देउनी झाले वेडी**
**आंबेदादाला हात जोडी**

सणांमध्यें होळी, दिवाळी इ. सणांबद्दल अधिक आपुलकी वाटून होळीबाई, दिवाळीबाई असें म्हटलें आहे. दैनंदिन आयुष्यांत तर कितीतरी गोष्टींशीं स्त्रीचा रोजचा संबंध येतो. त्या वस्तूंबद्दल मनांत ममत्व कांठोकांठ भरून राहिलेलं आढळतं. उदा० जातें ही एक वस्तु पहा. जात्याची संगत स्त्रीला रोज आहेच. तेव्हां त्यालाहि उद्देशून स्नेहानं म्हटलं आहे—

**जात्या तूं ईसवरा, तुझं ज्येवन मला ठाव**
**घांस घालिते मनोभावं**

जात्याला-दाणे वैरणें यालाच घांस घालणें असें म्हणतात. पण जात्याला ईश्वर मानून तें ' घांस भरवणें ' ही आपुलकी कशी हृद्य वाटते ! तिफणी ऊर्फ कुरी हें एक शेतीचें प्रमुख अवजार आहे. या तिफणीला शेतकरीणबाई किती गौरवानें प्रत्यक्ष माऊली म्हणत आहे पहा—

**शिवेच्या शेतामंदी गेली तिफणी मावली**
**बंधुला माझ्या, धन मोत्याची घावली**

याचप्रमाणें घरदार, पाऊस, पिकं, नातेवाईक सर्वांबद्दलच जिव्हाळ्याचीं गीतें आढळतात. एकंदरींत खेडुत स्त्रीचं जग लहानसंच खरं, पण त्यांतल्या दरेक वस्तूबद्दल, प्रत्येक घटकाबद्दल, त्यांतल्या पशुधनाबद्दल व व्यक्तीबद्दल तिच्या मनांत जो आपलेपणा आहे तो मात्र अपरंपार आहे.

त्यामुळें या सर्वच ओव्यांमधून जिव्हाळ्याचा मोहक रंग मिसळलेला पानोपानीं आढळून येतो.

या सर्व ओव्यांचा साकल्यानें विचार केला, कीं आणखीहि एक भाषेचें वैशिष्ट्य ध्यानीं येतें. खालील ओवी पहा—

**जल्मामंदी जल्म केळीचा चांगला**
**आधी कापी माझा गळा, मग हात लाव बाळा**

केळीचा घड काढतांना केळ कापून टाकतात यावर या ओवीची रचना आहे. परंतु दुसऱ्या ओळींत हीच गोष्ट खुद्द 'केळीच्याच तोंडचे शब्द कल्पून दिलेली आढळते. तुळशीबद्दल वर्णन करतांनाहि 'तुळशीला नाकडोळे नाहींत, तरीहि तिच्या सावळ्या रूपाला देव मोहित झाले ही गोष्ट अशी सरळ न सांगतां तुळशीलाच उद्देशून भाषण करतांना सांगितली आहे—

**तुळशीग बाई, तुला न्हाई नाकडोळे**
**सावळ्या रूपाला देव गोविंद भाळले**

माहेरीं लक्ष्मीचा वास असावा ह्या इच्छेनं खुद्द लक्ष्मीला (अर्थात् काल्पनिक) उद्देशून शब्द पहा—

**लक्ष्मी आई आली धर माझ्या पदराला**
**दोघी जाऊं या माहेराला !**

छोटा बाळ घोडीवर बसून निघाला आहे अशा वेळीं खुद्द घोडीलाच उद्देशून शब्द पहा—

**चाल तूं शिंगीबाई काळी माती टापाची**
**वर स्वारी नेनंत्याची**

अशा या संभाषण-पद्धतीचे नमुने अनेक ओव्यांतून आढळतात. एकादशीचं माहात्म्य वर्णन करतांना खुद्द एकादशीलाच उद्देशून भाषणं आढळतात—

**एकादशीबाई, तुझं नांव ग सरस !**
**केळीच्या पानावर इठु सोडतो वारस**

एरवींच्या व्यवहारांतून देखील तिऱ्हाईत दृष्टीनें बोलण्याऐवजीं प्रथमपुरुषी

च द्वितीयपुरुषी भूमिका कल्पून संभाषणें केल्याचीं उदाहरणें अधिक आढळतात.

**शेजी देते शिव्या, तूं आणिक दे जा बाई**
**माझ्या राघूला चिऱ्याला भंग न्हाई**
**लुगडं घेतलं, आत जरीची न्हाई काडी**
**न्हाई मी नेसत, घाल घडी**

या पद्धतीला साक्षात्–संभाषण पद्धत असें म्हणतां येईल. जुन्या वाङ्मयांतून याचीं बरींच उदाहरणें असतात.

## कल्पकता

भाषासौंदर्याचे जे अनेक पैलू आहेत, त्यांपैकीं कल्पकता हा एक प्रमुख पैलू आहे. या ओव्यांतून कल्पनासौंदर्यहि कोठेंकोठें दर्शनीय आढळतें. अर्थात् अलंकारिक भाषेपेक्षाहि सरळसरळ, रोखठोक बोलायचें हा खेडुतांचा स्वभावधर्मच असल्यानें या विभागाची व्याप्ति अगदीं छोटीशी आहे.

तरीदेखील कांहीं कल्पना मोठ्या सुंदर आहेत. कल्पनेची विशालता प्रथम पाहूं.

पावसाळ्यांत ढगांची दाटी झाली आहे अशा वेळीं मनानं केवढी व्यापक कल्पना केली आहे—

**मेघरायाचं लगीन, ईजबाई करवली**
**भाऊच्या शेतावर त्यांची वरात मिरवली**

या आर्द्र सृष्टीकडे पाहातांपाहातां आणखी एका मधुर नात्याची मनांत आठवण होते व मनांत एक मोठी सुंदर कल्पना येते—

**पडतो पाऊस, नका करूं गलबला**
**जिमिनीबाईचा पती आला**

सृष्टींत धरणी पत्नी व पर्जन्य हाच पति. ही कल्पना केवढी विशाल अन् मनोहर आहे !

पुष्कळसे कर्ते भाऊ असले कीं अशीच एक व्यापक स्वरूपाची कल्पना केलेली आहे—

**एकापुढं एक, मायबाई तुमचं लेक**
**मोतीपवळ्याचं सामिंदरी झालं पीक**

आपाला कांहीं ओव्यांतून 'समिंदर' ही उपमा दिलेली आढळते. त्यामुळें समुद्रांत उत्पन्न होणाऱ्या मोतीपोवळ्यांची उपमा मुलांना देण्यांत औचित्यच आहे.

संस्कृत वाङ्मयांत यक्षानं मेघाला दूत बनवल्याचं वर्णन आहे. या ग्रामीण भगिनींनीं वायूला दूत बनवलें आहे—

**निरोप धाडिते, पत्र वारियाच्या हातीं**
**फार जीवाला तसदी होती, यावं बंधु रातोराती**

अशा या कल्पनांची व्यापकता पहाण्याजोगी आहे.

कांहीं कल्पना भावनाविष्काराच्या दृष्टीनं मनोहर आहेत. उदा० बहिणीला भावानं बांगड्या पाठवल्या. तेव्हां बहिणीच्या मनांत आलेली गोड कल्पना पहा—

**गोंडाळ माझे हात, जाती बंधुच्या सपनांत**
**सोन्याचे बिल्लोर, मला धाडिले टपालांत**

स्वप्नांत बहिणीचे गोंडस हात दिसल्यामुळेंच भावाला बांगड्यांची आठवण झाली ही निर्मळ प्रीतीची साक्ष देणारीच गोष्ट म्हटली पाहिजे.

रोजच्या सांसारिक जीवनांत तर कितीतरी प्रसंगीं निरनिराळ्या कल्पनांची मनांत दाटी होत असते. त्यांपैकीं कांहीं नमुने पाहूं. उदा० बैलगाडी चालत असतां अधुनमधून बैल मागें वळून पहातात. शेतकऱ्याच्या कारभारणीनं याबद्दल किती हृद्य कल्पना केलेली दिसते—

**गाडीची बैलं माघारी बघत्यात**
**धन्या, इसावा मागत्यात**

सूर्य उगवला कीं लाल दिसतो. एका प्रेमळ आईच्या मनांत पुढील कल्पना येते—सुवर्णाचे केस असलेलं हें मूलच आहे जणूं—

**सूर्य उगवला, उगवतांना तान्हं बाळ**
**शिरी सोन्याचं जाऊळ**

शेती उत्कृष्ट झाली, कीं जोंधळ्याच्या टपोर दाण्यांनीं खळें भरून जातें. साहजिकच त्या दाण्यांकडे पाहून पुढील कल्पना मनांत आल्यास नवल नाहीं—

**लक्षुमी आली शेताच्या शिवारांत**
**हौशा घरधनी मोती भरतो घागरींत**

ऐन उन्हाळ्यांत मनानं केलेली ही कोमल कल्पना पहा—

**चईताचं ऊन, खडकाची झाली लाही**
**माझ्या बाळाच्या गोरेपनाची गत काई ?**

अति उष्णतेनं धान्य फुटून लाही व्हावी तद्वत् खडक फुटण्याइतकं प्रखर ऊन आहे, मग नाजूक बाळाचं काय होईल? ही कल्पना आईलाच सुचण्यासारखी आहे !

कल्पनावैचित्र्य दर्शवणाऱ्या ओव्याहि थोड्याशा आहेत. उदा० धुमकेतूबद्दल केलेली ही विचित्र कल्पना पहा—

**शेंड्याचं नकसत्र, त्यानं नवल केलं फार**
**अंड्याच्या दिलामंदी, सर्प जल्मला नक्षीदार**

तसेंच काळयाभोर कुरुंदाचं जातं पाहून एक स्त्री शेजारणीला विचारते—

**काळं कुरुंद जातं, कुठं केलंस, सांग मला**
**कळीचं दांतवण, कुन्या नारीनं दिलं तुला ?**

कळीचं [ जादूचं ] दातवण लावूनच जातं काळंकुळकुळीत केलं असावं ही कल्पना वैचित्र्यपूर्णच म्हटली पाहिजे.

आतां एका अद्‌भुत कल्पनचें उदाहरण देऊन हें प्रकरण पुरें करूं. हें उदाहरण भाविकतच्या ओव्यांत आढळतें. नामदेव हा विठ्ठलाचा भक्त होता. तो जातीनं शिंपी असल्यानं रुक्मिणीनं त्याच्याजवळ चोळी शिवायला दिली ही कल्पना गृहीत धरून पुढील ओवी रचली गेली आहे—

**रुक्माईची चोळी टाका पडे लांबलांब**
**नामदेव शिंपी रेखितो गरुडखांब**

दोन खांबांतल्या अंतराइतके लांबलांब टाके घालून शेवटीं गरुडखांब रेखून हें ‘ देऊळरूपी प्रचंड शिवण नामदेवानें पुरे केलें ’ ही कल्पना अद्‌भुत नाहीं का ? मात्र ती भाविक मनालाच सुचणारी आहे. भाविकतेच्या प्रकरणांत अशा अद्‌भुत कल्पना आणखीहि आढळून येतात.

अशा प्रकारें भाषेचें सौंदर्य वर्धित करणारे जिव्हाळा, सूचकता व कल्पकता हे गुण या ओव्यांतून आढळून येतात खरे. परंतु एकंदरींत त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे. त्याचें कारणहि सहज लक्षांत येण्याजोगें आहे. ही कोणा विद्वान् पंडितांची रचना नाहीं. तर शालेय ज्ञानापासून वंचित असलेल्या स्त्रीजनांचीं हीं गीतें ! त्यांत हीं उत्कृष्ट उदाहरणें आढळतात. हीच उलट कौतुकाची गोष्ट नव्हे काय ?

## सूचकता

कल्पकतेप्रमाणेंच सूचकता हाहि भाषेचा एक दुसरा सौंदर्यवर्धक असा गुण आहे. या स्त्रीगीतांतून तशींहि थोडीं उदाहरणें मिळतात. उदा० आपल्या पुत्राविषयीं म्हटलेली ही एक ओवी पहा—

**लावणीचा आंबा, पानी घालते वाटीवाटी**
**सावलीची आशा मोठी**

उतारवयांत मुलाकडून निवारा मिळण्याची अपेक्षा यांतून स्पष्ट सूचित झालेली दिसते. पुढील ओवींतील सूचकता तर दृष्ट पडण्याइतकी मनोहर आहे—

**पहाटेच्या परामंदी, सासुरवासनीचा वैरी**
**कोंबडा बांग देतुंया दुहेरी !**

कोंबड्याचें हें वैर कां, हें येथें स्पष्ट सांगितलेलें नाहीं. म्हणूनच त्याची माधुरी जास्त वाटते ! मैत्रिणीच्या एखाद्या तरुण देखण्या मुलीला सावधपणाचा इशारा देतांना एक स्त्री अशीच सूचक शब्दांत बोलत आहे—

**रंभे पाथराच्या मुली, कां ग रस्त्याला मोकळी ?**
**माझ्या बाळराजा, न्हाई वाघाला साखळी**

आपल्या तरुण मुलाबद्दल किती नाजूक सूचना आहे ही !

अशा प्रकारचीं सूचकतेचीं उदाहरणें अधुनमधून आढळतात खरीं ! मात्र त्यांचें प्रमाण अत्यंत कमी आहे, हें ध्यानीं घेणें जरूर आहे.

भाषेचें सौंदर्य दोन तऱ्हेचें असतें. लालित्य, सहजसुंदरता, भावदर्शन, कल्पनाचातुर्य, सूचकता, जिव्हाळा, प्रसाद इत्यादि गुणांनीं जसें तें सौंदर्य खुलून दिसतें त्याचप्रमाणें परोपरीच्या अलंकारांनीं भाषासुंदरी अधिकच आकर्षक वाटते. शब्दालंकार व अर्थालंकार हींहि भाषेचीं भूषणेंच आहेत. हींहि भूषणें या लोकगीतांमध्यें अनेक ठिकाणीं विखुरलेलीं आढळतात.

अनुप्रास हा शब्दालंकारांपैकीं एक प्रकार आहे. लहान मुलाच्या दागिन्याचें वर्णन करतांना रचलेला हा चरण पहा—

**हातांत कडीतोडे, कमरे कटदोरा कुलपाचा**

किंवा मुलीच्या लग्नाच्या वेळीं घातलेल्या बोहल्याचें वर्णन पहा—

**लाडक्या लेकीचं बहुलं घातलं गुलालाचं.**

अशीं आणखीहि कांहीं उदाहरणें आढळतात. दारू विकणारी बाई फार बडबड करूं लागते, तेव्हांची ही विनंति पहा—

**कलालिणबाई, नको करूं कलाकला**

किंवा भाऊ गांवाला गेला आहे हें सांगतांना म्हटलेला हा एक चरण पहा—

**गांवाला गेला काल, लाल माझ्या मालनीचा**

अशीं हीं उदाहरणें केव्हांतरी आढळतात; पण तीं अगदींच थोडीं आहेत. कारण स्पष्ट आहे. तीं मुद्दाम जुळवलेलीं नाहीत. ओव्या रचतां रचतां यदृच्छेनंच हे अनुप्रास जमून आलेले दिसून येतात.

अनुप्रासांप्रमाणें यमकेंहि या रचनेंत आढळतात. मात्र तीं अनुप्रासांप्रमाणें थोडीथोडकीं नसून नजरेंत भरण्याइतकीं विपुल आहेत. याचें कारण असें, कीं ओव्यांमध्यें शेवटच्या अक्षरांचें यमक जुळल्याशिवाय त्याची मजा नाहीं, ही गोष्ट रचत्या स्त्रियांना जाणवली असली पाहिजे. 'यमक' हें नांव कदाचित् त्यांना ठाऊक नसेल. पण त्याची व्याख्या त्या ओळखत होत्या एवढें खरें. त्यामुळें ओवीचे चरणान्त शब्द सारख्या अक्षरांनीं जुळवून आणलेले अनेक ओव्यांतून दृष्टीस पडतात. अर्थात् त्यांतल्यात्यांत

ज्या अधिक बुद्धिमती स्त्रिया होत्या त्यांनीं अधिक सुंदर, अधिकाधिक अक्षरांचींहि यमकें जुळवण्यांत यश मिळवलेलें दिसून येतें. उदा०

**पाऊसानं फळी मांडली वरच्यावर**
**माझ्या राघुच्या मिरच्यावर**

किती सुंदर यमक जुळलें आहें हें! दुसरें एक उदाहरण—

**आला बंधुजी पाव्हना, काय करूं जेवायाला?**
**तूप वाढते शेवायाला**

तसेंच देखण्या पतीला पत्नी काकुळतीनं विनंति करीत आहे—

**चांगलंपन तुझं, माझ्या जीवाला करवत**
**नको जाऊं गलीनं मिरवत**

अशीं हीं उदाहरणें जागोजाग आढळून येतात. आईबापांबद्दलची पुढील ओवी पहा—

**बापजी बयाबाई, दोन्ही हाईती वड–जाई**
**त्येंच्या साऊलीची, किती सांगु बडजाई**

संध्याकाळच्या वेळीं सुनेला सासू सांगत आहे—

**झाली तिन्हीसाज, दिवा लावावा सवंदरी**
**बाळराजाचे बैल आल्याती गावंदरी**

अशी ही यमकांची सुंदर जुळणी कितीतरी ओव्यांतून आढळून येते. त्यांतली साहजिकता व समर्पकता कोणासहि चटकन पटणारी अशीच आहे.

## उपमा

या शब्दालंकारांप्रमाणेंच उपमा, दृष्टान्त, इ० अर्थालंकारांचीहि समृद्धि या विभागांत आढळते. विशेषतः उपमांची बहार तर अगदीं पहाण्यासारखी आहे. या उपमा–उपमानांच्या बाबतींत एक गोष्ट प्रथमदर्शनींच ध्यानीं येते ती ही, कीं या उपमांचा तोंडावळा अगदींच निराळा आहे. आपल्या वाङ्मयांत उपमांच्या बाबतींत चंद्र, सूर्य, तारका, कौमुदी, पुष्पें इत्यादि उपमानें विशेष भाग्यशाली आहेत. जेथें तेथें हीं नांवें आढळतात. परंतु या साहित्यांत मात्र असा प्रकार नाहीं. उलट त्यांच्या जीवनांत ज्या गोष्टी

नित्य येतात, त्यांच्याच संबंधीं उपमा उपमानेंहि आढळतात. अर्थात् पिकें, पाऊस, घरदार, कपडे, खाण्याचे जिन्नस, शेती अशा जीवननिष्ठ उपमांचें प्रमाण केव्हांहि अधिक दिसून येतें. धान्य ही किती बहुमोलाची गोष्ट! शेतकऱ्याच्या, सगळ्या कष्टांचं तें बक्षीसच नाहीं काय? त्यामुळें त्याची उपमा अगत्यानें दिलेली आढळते. उदा० बरोबरीच्या बापलेकांकडे एकादी बाई निरखून पाहूं लागली कीं एक खेडुत स्त्री म्हणते—

नको पापिनी दृष्ट लावूं माझ्या तांदुळाच्या ढीगा
बापाशेजारी ल्योक उभा

अशीच लाडक्या पुत्रवंत भावजईला देखील जिरेसाळीची ( तांदुळाची ) उपमा दिली आहे—

एकामागं एक बंधु हौशाचं लेक
भावजई गुजरीचं जिरेसाळीचं पीक

खालील एक समर्पक उपमा पहा—

चुलत भावंडाला नका म्हनूसा वेगाळ
एका राशीचं जुंधळं

धान्यांच्या उपमांचं प्रेम बरंच दिसून येतें. मुलगा व मुलगी यांनाहि जोंधळे अन् तुरीची उपमा दिलेली आढळते—

जोंधळ्यापरायास वाढवते तुरी
ल्येकापरायास मला ल्येक प्यारी

तुरीचं झाड ज्यास्त जपावं लागतं, त्या दृष्टीनं ही ओवी सूचक आहे. कांहीं उपमा अधिकच हृद्य वाटतात. उदा० जात्यावर दळतांना सुपांतल्या दोन धान्याच्या राशी पाहून सासरमाहेरचा विचार करणाऱ्या स्त्रीला किती सुंदर उपमा द्यावीशी वाटते!

सरलं दळन, सरलं म्हनुं कशी
सासर माहेर भरल्या दोन राशी

धान्याशिवाय झाडांच्याहि उपमा केव्हां केव्हां दिलेल्या आढळतात. तरुण झालेल्या मुलाला किती मजेदार उपमा दिली आहे—

**सावळ्या सुरतीवरी मिसरूड पालापाला**
**शेवगा बहराला माझा आला**

मुलाला बहरलेल्या शेवग्याची उपमा, तर तरुण मुलीला टवटवीत कोथिंबीर म्हटलें आहे!—

**सासुरी जाते मैना म्होरं बंधुजी मागं दिरू**
**मधी सोभा देती, धन्याची कोथमिरू**

याप्रमाणें अनेक मजेदार उपमा दृष्टीस पडतात. एके ठिकाणीं बहिणीला ' मेथीची भाजी ' म्हणून गौरवलें आहे—

**आयुक्ष चिन्तीते मेहुन्या दाजिला**
**माझ्या बहिणाईला सुख मेथीच्या भाजीला**

किती साध्या साध्या तरीहि जिव्हाळ्याच्या वाटतात ह्या उपमा! चांगल्या उपमांप्रमाणें रागानें दिलेली पुढील उपमा पहा! ही छळवाद करणाऱ्या नणंदेला आहे—

**मक्याची कनस हाईती किती जून**
**नन्दाबाईचे द्वाड गुण!**

खाद्यपदार्थांच्या उपमाहि कांहीं कमी नाहींत. पुढील ओव्या पहा—

**कंथ पुशित्यात रानी माहेरवास कसा?**
**केळीच्या पानावर आंबेमोहराचा भात जसा**

आणि सासुरवास कसा आहे बरें?

**बाप्पाजी पुसती लेकी सासुरवास कसा**
**मिरीयांचा घास तिखट म्हणूं जसा**

दोन्हीही उपमा खाद्यपदार्थांच्या आहेत हें साम्य गमतीचें आहे. आईच्या बाबतींत गोडगोड जिन्नसांच्या उपमांची संख्या सगळ्यांत जास्त आढळते. उदा०

**बया म्हनु बया, तोंडा सुटलं पाझर**
**बया मधाची घागर!**

साखरेची पुडी, नारळीचं दूध अशा कितीतरी गोड उपमा आईला दिल्या आहेत.

पतीलाहि मजेदार उपमा आढळतात. उदा०

**गांवाला गेला बाई, माझ्या जीवाचा कलिदा**
**साखरसोजीचा मलिदा**

पतीला अशा आणखीहि गोड पेढा, वासाचा वेलदोडा वगैरे उपमा आहेत. तान्हुल्याला बत्तासा म्हटलें आहे तर मुलीला खडीसाखरेची उपमा! अशीच मसाल्याच्या जिनसांचीहि वानगी पहाण्याजोगी आहे. जांवई व कन्या यांना किती मजेदार उपमा आहेत—

**जावई राजस मर्जीचं जायफळ**
**मैनाबाई माझी लवंग आगजाळ**

आणि पतीला तर एकेठिकाणीं 'वासाचा वेलदोडा' म्हणून गौरवलें आहे. किती उत्तम मालमसाला आहे हा!

कपड्यांच्या उपमांचेंहि कौतुक करावेसें वाटतें. पोफळी म्हणजे चौकटीचें उंची लुगडें. त्याची उपमा पहा—

**शेजेबाजेवरी उसुशी भिंगाची**
**माझी मैनाबाई पोफळी रंगाची**

तसेंच पतीच्या पाठच्या बहिणीला, लाडक्या नणंदेला किती छान उपमा आढळते!

**सर्व्या गोतामंदी नंदाबाईची आवड**
**माझ्या कंथापाठची शालजोड**

मुलीला एके ठिकाणीं 'जावयाच्या मंदिलावरच्या जराची' उपमा योजिली आहे, तर तान्हुल्याला जरीचा पदरच म्हटलें आहे—

**लेन्यालुगड्याची नार काय लेन्याचा तेगार**
**माझा बाळराज जरीचा पदर**

कपड्यांइतक्याच अपूर्वाईनं दागिन्यांच्याहि उपमा दिलेल्या आढळून येतात. खालील ओवींत तर या दोन्ही तऱ्हेच्या उपमा एकत्र आढळतील—

**दोन माझीं बाळं, दंडीच्या दोन येळा**
**बया ठेवणीची चंद्रकळा**

कर्त्या मुलाला सोन्याच्या गोफाची उपमा आढळते—

**गांवाला गेला बाळ, माघारा येईल कवा**
**माझ्या सराचा गोफ नवा**

आणि या गोफाबरोबर मुलीलाहि योग्य दागिन्याची उपमा आहेच—

**हौस मला मोठी ल्येक असावी लेकामंदी**
**गाठू पुतळी गोफामंदी**

कर्त्या, लग्नायोग्य मुलाला एकेठिकाणीं तर मोठीच ऐटबाज उपमा दिलेली दिसते—

**नवरा पाहूं आले, काय पाहातां नवऱ्याला ?**
**माझ्या तोळबंदीच्या भवऱ्याला**

मुलाला याचप्रकारें कंठीचा ताईत, सोन्याचा ढीग, व तान्हुलीला सोन्या-मोत्याची खिचडी इत्यादि छान छान उपमा आहेत. हातांतल्या कांकणाची उपमा जाऊबाईला दिलेली दिसते. आणि पतीबद्दलहि अत्यादरानं दिलेली एक सुंदर उपमा पहा—

**आईच्या परायास सासुबाईचा उपकार**
**सासुमालनीनं दिला पितींचा चंद्रहार !**

जीवनांतील बहुमोल प्रीतीच्या ठेव्याला अशा मूल्यवान् अलंकारांच्या उपमा किती शोभून दिसतात !

ग्रामीण स्त्री–जीवनांत भांड्याकुंड्यांची देखील अपूर्वाई मानली जाते. अर्थात् भांड्यांच्याहि उपमा कौतुकानं दिलेल्या दिसून येतात. मुलीला येथें छोट्या वाटीची उपमा दिली आहे—

**हौस मला मोठी वाटीशेजारी लोटीची**
**ल्येक लेकांच्या पाठीची**

भावाला हंड्यांची उपमा दिली आहे—

**धन ग संपत पडे सांदीच्या सुगडांत**
**बंधुजी माझे, हंडे ते उजेडांत**

मुलीला समई म्हटलें आहे—

**जावायाला दिली पांच भांडी जेवायाला**
**लेक मैना समई, उजेड लावायाला**

कर्त्या मुलालाहि 'मालाचा गुंड' म्हणून कौतुक केलें आहे.

इमारतींच्या उपमाहि अधुनमधून नजरेंत भरण्याजोग्या आहेत. भावाला एके ठिकाणीं काय म्हटलें आहे बरें?—

**भावजई गुजरीचा पदर धरणीचा**
**भाऊराय माझा खांब कांतीव कोरणीचा**

कर्त्या मुलांना 'वाडे' असंहि म्हटलेलं दिसून येतं—

**दोन्ही माझी बाळं, दोन माझे वाडे**
**लाडक्या लेकीचं करा माह्यार मागेपुढे**

थोरल्या मुलाला वाड्याचा बुरूज आणि वाड्याचा कळस अशा उपमा आढळतात —

**थोरला माझा लेक माझ्या वाड्याचा कळस**
**धाकुटी मैनाबाई दारीची तुळस**

याचप्रमाणें मेहुणा व बहीण यांनाहि अभिनव उपमा दिलेल्या आहेत—

**मेहुना राजस माडीचा कडीपाट**
**माझी बहिणाई, जिन्याची चौकट**

नुसत्या इमारतीपर्यंतच मनाची धांव थांबत नाहीं तर पुढें जाऊन बहिणींना विहिरींची उपमा आणि गांवांतल्या चार पेठांची विशाल उपमा दिली आहे. अन् भावाला तर त्याहून उत्तम उपमा—

**आम्ही चौघी बहिणी गांवीच्या चार पेठा**
**मधी बंधुजी किल्ला मोठा**

एकंदरींत या उपमा नाविन्यपूर्ण आहेत यांत संशय नाहीं. व्यवहारांत आढळणाऱ्या आणखीहि कित्येक साध्यासुध्या गोष्टींच्या उपमा पुन्हापुन्हां भेटतात. सुस्वरूप पत्नीला दवण्याची काडी, हळदीचा गाभा, पाण्याचा तलाव इ० उपमा आढळतात. तान्हुल्याला आरशाची, लव्हाळ्याची वगैरे उपमा आहेत, तर जाणत्या मुलाला नारळीचा घड, पाण्याचा हौद, ढाण्या वाघ, बेगडीचं पान इ० उपमा आढळतात.

कृषिजीवनांत सुचणाऱ्या आणखीहि कांहीं मार्मिक उपमा पाहूं. काळ्याभोर शेताला समर्पक उपमा पहा—

**वाटेवरलं शेत, शेत काजळाची वडी**
**घरधनी ग राबती, संगं घरचं बारा गडी**

नेहमींच कर्जाचा प्रसंग पडणाऱ्या शेतकरी जीवनांत पुढील उपमा सुचणें स्वाभाविकच आहे—

**बंधुच्या परायास भाच्या राघूची आगत**
**मुद्लापरीस मला व्याजाची लजत !**

असें हें उपमांचें प्रकरण सरस आणि चित्ताकर्षक आहे. दरेक प्रकरणांत त्याचीं उदाहरणें दृष्टीस पडतात. अनेक सुंदर उपमा–उपमानांची या ओव्यांतून लयलूट दिसून येते! त्याला उपमा त्यांच्याच शब्दांत द्यायची झाली तर शेतांतल्या भरगच्च पिकाचीच दिलेली शोभून दिसेल!

## दृष्टान्त

अर्थालंकारांपैकीं दृष्टान्ताचा उपयोग अनेकवार केलेला लक्ष्यांत येतो. हे दृष्टान्त समर्पक व सहज पटणारे असे आहेत व त्यांचें वैशिष्टय असें, कीं त्यांतले बरेचसे कृषिजीवनांतल्या गोष्टींना अनुसरूनच दिलेले दिसतात. उदा० आई देवाघरीं गेली, तर बापाची मायाहि दूरावते हें सांगतांना पुढील दृष्टान्त दिला आहे:—

**आईच्या माघारीं, बाप नव्हं तो लेकराचा**
**तोडीला पानमळा, थारा उडाला पाखरांचा**

किती सहजसुंदर दृष्टान्त आहे हा! तसेंच घेतल्या जन्माचं चीज झालं पाहिजे हें सांगतांना कोणता दृष्टान्त दिला आहे पहा—

**जलम घेतला, फुका जलम कां जाळावा ?**
**लाविलेला ऊंस, घाण्यामंदी गाळावा**

शेजीबाईचं प्रेम मातृप्रेमाची बरोबरी करूं शकत नाहीं हें सांगतांना पुढील ओवी म्हटली आहे—

**माऊलीची माया शेजी करायाला गेली**
**लटकी साखर शाळूच्या पाना आली !**

हे सर्व दृष्टान्त शेतकी जीवनाला अनुलक्षूनच आहेत हें विशेष.

आणखीहि कांहीं समर्पक उदाहरणें दर्शनीय आहेत. उदा० प्रत्येक व्यक्तीला सुखदुःख हें आहेच, हें सांगतांना म्हटलें आहे—

**सुखदुःखानं न्हाई, कुनाला सोडियेलं**
**चंद्रासारख्याला ग्रहनानं वेढियलं**

संसार नीटनेटका करणं ही किती कठीण गोष्ट आहे ह्याबद्दल एक वृद्धा मुलांना—सुनांना सांगत आहे—

**संसाराचा येढा, येड्याबाई वंगाळ**
**पान्यांतली नाऊ, आवल्या संभाळ**

तसेंच खरी मैत्री ही मायेवांचून असूंच शकत नाहीं हें सांगतांनाहि एक सहजसुंदर दृष्टान्त दिला आहे—

**मायेच्यावांचूनि कशाचा मैत्रपणा?**
**मिठाच्यावांचून रुचि न्हाई पकवाना**

शेजारणीचे कडू बोल ऐकून दुभंग झालेल्या मनाचें वर्णन ऐका—

**शेजीच्या बोलन्यानं मन माझं ईटलं**
**वाऱ्याच्या झळईनं पान केळीचं फाटलं**

अशा प्रकारें उचित दृष्टान्तहि या गीतांतून दृष्टीस पडतात. त्यांची संख्या थोडीशी आहे हें खरें, पण त्यांचें सौंदर्य व मोहकपणा कांहीं कमी नाहीं हें रसिकांना सहज पटेल.

अनुप्रासांप्रमाणें रूपकेंहि अधुनमधून आढळतात. पैकीं संपूर्ण रूपकाचीं एकदोन उदाहरणें फार उत्कृष्ट अशीं आहेत. पतीबद्दल बोलतांना 'चुडा' असा उल्लेख आहे. चुडे ऊर्फ बांगड्या हें सौभाग्यचिन्ह असल्यानें पतीबद्दल बोलतांना "चुडे" म्हणजेच पति असें गृहीत धरलेलें आहे. उदा०

**सकाळीं उठूनी जाते देवाच्या वाड्याला**
**औख मागते चुड्याला**

आणि याप्रमाणें 'चुडा' हें पतीच प्रतीक मानल्यामुळें त्याचीं भावंडें [ नणंद, दीर ] वगैरेबद्दलहि हेंच रूपक आढळतें. उदा०

**ननंद पाव्हनी, नका म्हनूंसा कुठली?**
**माझ्या चुड्यामागली पाटली**

नंदेला पाटली मानलें आहे तर दीराला काय म्हटलें आहे बरें?—

**औख चिन्तिते चुड्यामागें गजऱ्याला**
**दीर राजस वजीराला**

दुसरेंहि एक सुंदर रूपक वरचेवर आढळतें. भाविक स्त्रियांनीं पंढरपूर हें माहेर मानलेलं दिसतं. अर्थात् पंढरीनाथ हाच पिता, रुक्मिणी माता, बहीण चंद्रभागा, बंधु पुंडलीक असं संपूर्ण रूपक या ओव्यांतून आढळून येणं स्वाभाविकच आहे. पुढील ओव्या पहा—

**पांडुरंग पिता, रुकमीन माझी बया**
**आषाढ वारियेला बंधु पुंडलीक आला न्याया**
**पंढरी म्यां केली, मायबाप इठूला पुसूनी**
**अंघुळ करते; आका चंद्रभागेत बसुनी**

या रूपकाला भक्तीचा साज असल्यानं तें अधिकच शोभून दिसत आहे.

* * *

भाषेच्या अलंकारांत सुभाषितांनाहि महत्त्वाचें स्थान आहे. या लोकगीतांतूनहि अधुनमधून सुभाषितें सांपडतात पण त्याचें स्वरूप पुष्कळांशीं उपदेशात्मक आहे व त्यांची संख्याहि अत्यल्प आहे. उदा०

**गर्वाच्या नारी, गर्वाचं घर खालीं**
**लंकेच्या रावनाची अवस्था काय झाली ?**

हीं सुभाषितें मननीय आहेत. तीं थोडीशींच आढळतात खरीं, तरीपण तीं आढळतात हेंच नाहीं का विशेष ?

## शब्दसमृद्धि

ग्रामीण भाषेचं आणखी एक वैशिष्ठ्य म्हणजे समृद्धि हें आहे. एकेका शब्दाला प्रतिशब्द किती! कवि हे शब्दसृष्टीच ईश्वरच मानले जातात, मग या कवियित्रींनींहि नवनवे शब्द वापरून भाषासुंदरीला नवीं भूषणें दिलीं यांत कोठलें आश्चर्य ? अनेक नवीं नामें, नवीं विशेषणें, सुटसुटित भाववाचक नामें, नवीं क्रियापदें, नवे वाक्प्रचार, सुभाषितें

इ०ची या ओव्यांतून अगदीं दाटी झाली आहेसें दिसतें. कांहीं शब्द तर मोठे नमुनेदार आढळतात. उदा०—

**बाळ जाते सासुऱ्या, ओटीला हिरवा पेरू**
**संगं मुराळी छंदखोरू**

ह्यांतील छंदखोरू हा शब्द पहा. अगदीं याचप्रमाणें निंदखोरू, तालेवारू, झेबारू, सासरू असे अनेक उकारान्त शब्द ओव्यांतून आढळतात. फार काय, साध्या 'गांव' शब्दाऐवजीं गांवु, 'नांव' बद्दल नावु, अंदण बद्दल आंदणु, लक्ष्मण ऐवजी लक्षुमणु, अनुभव ऐवजी अनुभवु असे कित्येक शब्द उकारान्त बनलेले असे दिसून येतात. जुन्या मराठी वाङ्मयांतूनहि असेच शब्द आढळत असल्यामुळें मनांत येतें कीं या ओव्या खात्रीनं बऱ्याच वर्षांपूर्वीं रचल्या गेल्या असल्या पाहिजेत व परंपरेनं आपल्यापर्यंत आल्या असल्या पाहिजेत.

प्राचीन मराठी भाषेचे हे अवशेषच तर नसतील ना ? असें मनांत येतें. नामांच्या बाबतींतहि ही समृद्धि पहाण्यासारखी आहे. कितीतरी भिन्नभिन्न अर्थांचीं नामें दिसतात. उदा० दोरवा हें जसें एकप्रकारचें कापड त्याचप्रमाणें "लालवा" हेंहि एक तांबूस रंगाचें पातळच आहे. असेच पुढील शब्द पहा:—

| | | | |
|---|---|---|---|
| तेगार | — दिमाख | जोपा | — जोपासना |
| निळ्या | — निळे ठिपके | परवर | — सोपा |
| दिवाण | — कचेरी | तास | — पात्र [ नदीचें ] |
| जव्हारी | — पंचक्रोशी | काशी गंधारी | — आई |

इत्यादि अपरिचित नामेंहि अधुनमधून खूपच आढळतात. पण तीं फारशी कठीण नाहींत व त्यामुळें या भाषेंत कोठल्याहि प्रकारें दुर्बोधपणा आलेला नाहीं. तसेंच धंद्यावरून किंवा रोजच्या व्यवसायावरून कितीक सामान्य-नामें बनून भाषेमधें रूढ झालेलीं दिसून येतात. त्यांचीं कांहीं मजेदार उदाहरणें पहा—

१ शिंग वाजवणारा तो शिंगाडी
२ हलगी वाजवणारा तो हलग्या

३ विडे खाणारा तो पानखातवऱ्या
४ पेरणी करणारा तो पेरक्या
५ मोट हाकणारा तो मोटक्या अगर मोटकरी
६ नांगर धरणारा तो नांगऱ्या

याशिवाय धंदेवाचक सामान्यनामें म्हटलीं म्हणजे घाटी म्हणजे कापडवाला, अत्तारी म्हणजे कुंकू विकणारा, वैराळ म्हणजे कासार या नमुन्याचे शब्द या बोलभाषेंत पुष्कळच आहेत. प्रत्यक्ष ओव्या वाचतांना ते चटकन् ध्यानीं येणारे आहेत.

कांहीं शब्दांपासून आपोआप बनलेलीं भाववाचक नामेंहि अशींच सुंदर आहेत. उदा० 'लाल' या विशेषणापासून 'लालाई' हें भाववाचक नाम 'लालपणा' या अर्थी वापरलेलें आहे. 'सासू' शब्दापासून जसा 'सासुरवास' शब्द बनतो त्याचप्रकारें 'ननंद' शब्दावरून ननंदपणा व माऊली या शब्दापासून माऊलपणा असेहि छानदार शब्द बनलेले दिसून येतात. मैत्री या अर्थी भाऊपणा हा सुरेख शब्द वापरलेला आढळतो. रस शब्दापासून रसाई (माधुर्य या अर्थी), गोड शब्दापासून गोडाई, 'लाल' पासून लालाई, ब्रिदीपासून ब्रिदाई असे कितीतरी नवे शब्द आढळतात.

यांतील विशेषणें तर फारच मजेदार आहेत. भावजईला सर्वच ठिकाणीं 'गुजर' हें विशेषण लावलेलें दिसतें. त्याचा अर्थ ऐटीची, श्रीमंतीण, झोकदार असाच केलेला दिसून येतो. परंतु एकादी भावजय फारच गर्विष्ठ असेल तर तिला "कुरेंदारी" हें विशेषण लावलेलें आढळतें. भावाला प्रेमानें पुष्कळच विशेषणें ओव्यांतून स्त्रियांनीं बहाल केलेलीं आहेत. 'गनीस' हें एक ठरीव विशेषण असतेंच. पण याशिवायहि वेगवेगळ्या गुणांना उद्देशून वेगवेगळीं विशेषणें दिलेलीं आढळतात. भाऊ बंडखोर असेल तर त्याला प्रेमानें 'दंडिल्या' व पुंडाईत म्हटलें आहे. ऐटबाज असेल तर त्याला नटवा. नाटक, छडीवाला इ० शब्दांनीं गौरविलें आहे. निर्मल बंधुप्रेम दर्शवणारी, ताईत, चातुर, पुतळा इ. आढळतात. गुजर, धुळप, हंब्रीर इ. अनेकानेक विशेषणें भावाबद्दल आढळतात. पतीबद्दल बहुधा सावकार, तालेवार, शिलेदार, सरदार, सरकार इ. आदरयुक्त विशेषणें

आहेत. तथापि प्रीतीच्या राज्यांत हें औपचारिक अंतर नाहींसें होऊन सजण, रंगील्या, मोहन, शाहीर, झुकीर इ. नाजूक विशेषणें प्रेयसीनं दिलेलीं दिसतात. पित्याला चहूंकडे "दौलती" हें विशेषण आहे. मुलीला चंद्रावळ, नागीण, लाडी, इ. आपुलकीचे शब्द, तर मुलाला लाल, पैलवान, गनपती, शिरहरी इ. विशेषणें आढळतात. रंगांबद्दल तर फारच वेगळे शब्द आहेत ते पहाण्यालायक आहेत. उदा० 'काळीकुळकुळीत' या अर्थी काळी-कल्पन्दारू असा वैशिष्ट्यपूर्ण शब्द वापरलेला आढळतो. तसेच लुगड्यांबद्दल पुढील शब्द पहा—

राघुरंगाचे— हिरवे

उडदवाणी— काळे

रंगकताई— उदी

मुगवी— बारीक ठिपक्यांचे

फुटाणी— बारीक चौकटीचे

एकंदरींत हा विशेषणाचा प्रांत या ओव्यांतून जणूं नव्या झिलईनें झळझळ करीत आहेसें दिसून येतें—

क्रियापदांसंबंधीं विचार केला तर अनेक अपरिचित क्रियापदें या ओव्यांतून वरचेवर आढळतात. त्या त्या ग्रामीण जनांकडूनच ते अर्थ समजावून घ्यावे लागतात. कारण आपल्या रूढ मराठी भाषेंतील व्यवहारांत त्यांचा आढळ कमी होतो. कांहीं अगदीं नव्या तऱ्हेचीं उदाहरणें पहाण्याजोगीं आहेत:—

| क्रियापद | अर्थ |
|---|---|
| १ तालामाला पाहणें— | रागरंग पहाणें |
| २ सादवणें— | हाक मारणें |
| ३ सांजड पडणें— | संध्याकाळ होणें |
| ४ ढाळ देणें— | हलणें, डुलणें |
| ५ पडपाने जाणें— | लोभावून जाणें |
| ६ बाह्या चालवणें— | ताकद देणें |
| ७ मलपा देणें— | इकडे तिकडे हलणें |

| | |
|---|---|
| ८ संजोग असणें— | सर्व समृद्धि असणें |
| ९ तक्क्या देणें— | टेकून बसणें |
| १० उशी पडणें— | निश्चितपणा वाटणें |
| ११ कदर येणें— | कंटाळा येणें |
| १२ चिन्तावणें— | काळजी करणें |
| १३ पाणी चढणें— | अभिमान वाटणें |
| १४ सय येणें— | आठवण होणें |
| १५ घाती देणें— | अवकाश देणें |
| १६ दंडणें— | शोभणें |
| १७ हवा पाहणें— | अनुभव घेणें. |

अशा प्रकारचीं कितीतरी क्रियापदें आपणास नवीं वाटतात. परंतु ओव्यांतून त्याचा अर्थ चटकन् ध्यानीं येतोहि. मनास एक गोष्ट मात्र पटतें कीं, ही समृद्धि आपणासच नवी आहे. वास्तविक दरेक भाषेचें शब्दधन विविधतेनें आणि वैपुल्यानें नटलेलें असतें, तसेंच ग्रामीण भाषेचेंहि शब्दभाण्डार वैभवशाली दिसून येतें व एकाद्या कोंदणांत अंगठीचा खडा ठाकठीक बसून गेलेला असावा, तसें त्या भाषेमध्यें हे अनेकानेक शब्द नीटनेटके बसून गेलेले आढळतात. यांची जोड आपल्या मायबोलीस देतां आली तर ती अधिकच समृद्ध होईल !

महाराष्ट्रीय मराठमोळा समाजाचं ओवीगीत हें असें आहे. सर्व प्रकारचें, भावनात्मक, वर्णनात्मक, समाजनिदर्शक असें त्याचें स्वरूप आपण आतांपर्यंत पाहिलें. हें सर्व संचित धन आहे.

लोकसाहित्याचें हें एक सुंदर लेणें आहे. त्याची घडण जुनी आहे, फारशी कुसर त्यांत नाहीं, अनेक जुन्या नव्या हातांनीं तें घडलें आहे हें सारें खरें. परंतु भावनात्मक दृष्टीनं पाहिलं तर त्याची मौलिकता आजहि पटण्यासारखी आहे. साहित्यसुंदरीच्या अंगावर जुनेनवे, असे जे तऱ्हेतऱ्हेचे अलंकार आहेत, त्यांतला एक मौलिक अलंकार म्हणून यास निश्चित स्थान मिळूं शकेल. मात्र लोकसाहित्याच्या अभिवृद्धीला रसिकजनांनीं हातभार

लावला पाहिजे व संघटित स्वरूपाचे प्रयत्न करून जीवनांतून लोपूं लागलेलें हें लोकसाहित्य जनदृष्टीसमोर आणलें पाहिजे. आमची मायबोली त्यानं समृद्ध होईल, व साहित्याचा एक कांहींसा उपेक्षित विभाग पुन्हां नवतेजानं चकाकूं लागेल, यांत संदेह नाहीं !

—*—

# परिशिष्ट

## कठिण आणि अपरिचित शब्दांचे अर्थ

[ ह्यांपैकीं कांहीं शब्दांचे अर्थ शब्दकोशांतसुद्धां सांपडले नाहींत. ते ओव्या सांगणाऱ्या स्त्रियांकडूनच समजून घ्यावे लागले. कांहीं मराठा शेतकऱ्यांना विचारून निश्चित करून घ्यावे लागले. त्यामुळें पूर्ण माहितगार माणसाला क्वचित् अर्थभिन्नता आढळण्याचा संभव आहे. ]

अशील–कुळवंत, खानदान
अगाशी–पडवी किंवा खुली गच्ची
अगंद्–अधिकपणा करणारी
अस्तुरी–बायको
अट्टाला–घरची मंडळी, सरंजाम
अभंड–कजाग, जहांबाज
अहेव लेणं–सौभाग्य लेणं
अल्याड–अलीकडे
आऊ–मराठा स्त्रीचं आदरार्थी संबोधन
आवलं–वल्हें
आवल्या–वल्हें मारणारा
आविंदी–हौसा मौजा
आकडी–आकरी, निरसं ( दूध )
आळ–छंद.
आत्ती–आत्याबाई
आउख–आयुष्य
आगळं–उंची, अधिक किंमतीचं
इवाही–इहीन–व्याही–विहीण
उर्ता–प्रतीक्षा
उतार–परतीरास चालत जाण्याची पाण्यांतील वाट
उतारी–नावाडी
उपराळा–साहाय्य
उभार–चोळीची पुढील बाजू
उलगणें–संपणें
उगराट–उर्मट
उशी पडणें–उसंत मिळणें
उतार फेकणें–दृष्ट काढणें
उमट पडणें–प्रकट होणें
उडद्वाणी–काळें
एकवत–उपवास
एकार–एका बाजूस कललेली
ऐना–आरसा

**अंगमती**–आपण होऊन
**अंगलोट**–बांधा
**आंबरसी**–( रंग ) पिवळा
**अंबेकरी**–नावाडी
**करंगल्याचं**–वर्दळीचं
**कबज्या**–जाकीट
**कडूसें**–संधिप्रकाश
**कडेल**–रेशमी लुगडें
**कवाड**–दार
**कदर येणें**–वीट येणें
**कालवा**–गोंधळ
**कारला, कापी बिलवर**–बांगड्यांचे प्रकार
**कांबरून**–पांघरण्याचें वस्त्र
**काव देण**–त्रासणें
**कापणी पडणें**–घडी पडणें
**कीकू**–शिसारी
**कुयऱ्या**–पायांत घालायच्या साखळ्या
**कुळव**–जमीन भुसभुशीत करणारें दोन बैलांचें औत
**कुंद्याचा फड**–तणाचें शेत
**कुसवा**–वंश
**कुरी**–तिफणी
**केळी**–कळशी
**केज**–मालाच्या मोबदल्याचें धान्य, नारळ, इत्यादि पदार्थ. ( उदा० माळणीपासून भाजी घेऊन धान्य-रूपानं दिलेली किंमत, वगैरे )
**कोयाळ**–कोकिळा
**कोडं घालणें**–संकट घालणें
**कंबळ**–कमळ
**कंगनी** ( कंगणी )–नववधूच्या हातांतली बांगडी
**कंथ**–पती
**खपल्या**–गव्हाची एक जात
**खुता**–पूड
**खुतनी**–अर्ध रेशमी, व अर्धसुती, वर पट्टेपट्टे असलेलें कापड, साटीन
**खुशालींत असणें**–खुशींत असणें
**खोंड**–लहानसा बैल
**खंडणें, खंदणें**–तोडणें, खोदणें
**गजरा**–एक प्रकारची नक्षीदार कांचेची बांगडी
**गल्ला**–रोजच्या विक्रीचे पैसे
**गाळीव**–उत्कृष्ट दर्जाचा
**गुंड**–हंडा
**गोमकार**–आवाज
**गोंडाळ**–गोंडस
**गोकाकी रंग**–कावेचा, तांबूस रंग
**गंगकोनी वारा**–उत्तरेचा वारा

घसू–घोस
घाउ–घाव
घावणें–सांपडणें
घाटी–घंटा
घाती, घात–पिकाचा हंगाम, मोसम, पेरणीची योग्य वेळ
घ्येरूसा ( घेरोसा )–जळमट
घेघ्या ( घेघा )–काहूर करणें, गोंधळ माजवणें
चवरं–बेंदरा दिवशीं बैलांच्या शिंगास बांधावयाचे झाडाच्या सालींचे, पानांचे झुपके
चन्नुला घेवडा–एक घेवड्याची जात
चावरी जमीन–चाहुरी जमीन
चावरी मोट–चार बैलाची मोट
चाटी–कापडवाला
चाड–जी पेरण्याकरितां कुरीवर जी लाकडाची वाटी असते ती
चाडदोर–चाडें बांधायचा दोर
चाडनळी–चाडाला जोडलेली नळी
चांदवा–उंची बसकूर, मांडवाचें छत
चिरी–चिरडी, लहान साडी
चितांग ( चितांक )– मराठमोळा बायका वापरतात ती सरी
चुनाडी ( चुनडी )–ठिपक्यांची साडी
चुनखडी–जींत चुनखडे असतात अशी जमीन
चुडा–बांगड्या
चंग–पतंगाला बांधायचे घुंगूर
छकडा–सहासहाच्या गटानें केलेलें माप
छिडीछिडी–टाकून
जव्हारीण–श्रीमंत स्त्री
जव्हारी–पंचक्रोशी. मोठ्या शहराच्या आसपासचीं खेडीं
जानपासोडी–घोंगडीप्रमाणें लोकरीच एक बस्कुर
जिरेसाळ–बारीक तांदुळ ( जिरगा )
जिनगर–चित्रें, बाहुल्या इ. करणारा
जुवा–जोडी, एकमेकाला बरोबर जुळणारे
जुंधळी वाण–ठिपक्यांचें (कापड )
जेठ्यामाल–पहिल्या प्रतीचा, उत्कृष्ट माल
ज्येवचरी–एक प्रकारची जमीन
जोपा–जोपासना, निगा
जोगतीण–यल्लमाची भक्तीण, जोगवा मागणारी
जोतं–सोपा
झगझाप–झडप घालणें
झग–डोक्यावर यल्लमा देवीचे मुखवटे घेऊन हिंडणारे भगत
झाबड–वयातीत स्त्री ( तिरस्कारानें दिलेली शिवी )

झुबं–कानांतला एक दागिना, इअररिंग ( झुबकबाळया )
झुलव घेणें–हलणें, डुलणें
झोपा–झोपाळा
टकुचे–टोपरें, कुंची
ठकडा–आश्चर्यानें दिग्मूढ करणारे, सुबक
ठावें असणें–माहीत असणें
डफळा वाण–तांबूस पांढरा असा रंग
डहूळणें–डुलणें
डहाळीमोळी विचारणें–माहिती विचारणें
डाळी–टिकल्याचा एक दागिना
डिंभ–लेकरूं
डोळं, डव्हाळं–डोहाळे
डोरलं–मंगळसूत्र
ढाळ देणें–शोभणें, तेज देणें
ढाणक्या–अनावर, धिप्पाड
ढेपण–कडब्याचा ढीग
ढेलज–पडवी अगर देवडी
तवली–थाळी
तबा–तऱ्हा, उजेड
तराटणी–ताणणें
तालामाला पाहणें–रागरंग पहाणें
तक्क्या देणें–टेकून बसणें
तांबोळी–विड्याचीं पानं विकणारा
तापता–चमकदार रेशमी वस्त्र
तालीमतालीया–कुस्तीगीर, तालिमबाज
तिफण, टिपणी–कुरी; शेतीचें एक अवजार
तेगार–शेत, गुरें, घर इत्यादि जिंदगी
तोळबंद–दंडांतल्या वाकी
थड–कांठ
थीर–स्थिर
दरज–भीति, संकोच
दावण–रांग
दादला–नवरा
दाब–कमरपट्टा
दिवाण–कचेरी
दिरंग–उशीर
दिंडं–सणंग
देवई–देवी
दंडाला येणें ( कपडा )–फाटूं लागणें
दंडणें–शोभणें
दंडिल्या–दंगेखोर
धडी–लुगड्याचा कांठ
धगधगा–धाक
धपाटे–थालिपीठें
धजा–ध्वजा, रांका
धूवाडी–पुतणी
ध्याई–देह
धुरी–गाडी, नांगर इत्यादीची दांडी

नखी–नक्षी, धोतराच्या किनारीचे बारीक रेशमी कांठ
नई–नदी
नटनारी–नखरेल स्त्री
नवती–तारुण्य
नथनी–लहान नथ
न्हान–लहान
न्हाण येणें–ऋतु प्राप्त होणें
नाचारी–दारिद्र्य
नाचार–कंगाल
नागर–सुंदर, सुसंस्कृत, शहरी
नवाळ–नव्या नवलाईचा
नाटक–नाठाळ (अटक करण्यास कठीण), अनावर
नेनन्ता–अजाण
पउत–व्रताचे पिवळे दोरे
परवर–घराची जमीन
पहिरा–अदलाबदल. शेतकऱ्यांनीं एकमेकाचे बैल एकमेकास कामासाठीं देणें
पराया–परका, तिऱ्हाईत
पल्याड–पलीकडे
पदर येणें–ऋतुप्राप्ती होणें
परायास-परीस–पेक्षां
पडपानें जाणें–लोभावून जाणें
पलाण–शेताच्या बांधावर घातलेली वरवंडी
पाभर–शेतांत बी पेरण्याचें औत
पाटाव–पैठणी
पाल–झोपडी
पाणंद–गांवांतून, शेतांतून अगर दोन कुंपणांतून जाणारी पाणलोटाची अरुंद वाट
पालवणें–वस्त्राच्या पदरानें किंवा हातानें बोलावणें
पालव–पदर
पासवा–नेसता पदर
पाथर–पाथरवट
पाळ–जात्याभोवतीं पडणारी पिठाची वर्तुळाकार कड
पिढं–बसायचा पाट, बसण्याची चौकी
पुलावा–मसालेभात
पुंडाईत–बंडखोर, उलाढाली करणारा
पुंडा ऊंस–उसाचा एक प्रकार, तांबूस ऊंस
पोफळी–मोठ्या चौकटीचें लुगडें
फाडीफाडी–हप्त्याहप्त्यानं
फुटाणी–बारीक ठिपक्यांचें लुगडें, अगर ठिपक्यांचा वाण
फैना–उत्कृष्ट, उत्तम
फोक–फांदी; सडसडीत मजबूत बांधा

बारा बलुते, बईते—गांवांतील बारा पिढीजाद वतनदार. पूर्वी गांवांतील निरनिराळ्या जातीचे लोक गांवकऱ्यांच्या गरजा भागवीत (सुतार, लोहार, परीट, न्हावी इ० इ०) त्याबद्दल पिकांतून अगर बागाईतांतून त्यांचा ठराविक वांटा असे

बहालं (बाल)—केस

बळद—धान्य सांठवण्याची भिंतींतील पोकळ जागा

बख्खळ—विपुल, पुष्कळ

बया—खेडेगांवांत आईला 'बया' म्हणतात. याशिवाय काशी, गंधारी, गवळण

बाजिन्दी—धूत, नखरेल, फसवणूक करणारी

बारव—पायऱ्यांची विहीर

बाह्या चालवणें—ताकद देणें

बाटूक— ओला कडबा

बारडी—घुसळखांब्याची दोरी

बासन—गाठोडें (ठेवणीच)

बिदी—खेडेगांवांतील रस्ता

बुट्टी—टोपली

बुडता आहेर—जो परत करायचा नसतो असा आहेर

बुत्ती—शिदोरी. खेडेगांवांतील सासुरवाशीण गांवीं जातांना बरोबर द्यायचे खाद्य पदार्थ

बेवड—मुख्य धान्याबरोबर त्याचजागीं पेरण्याचें उपधान्य

बोनं—नैवेद्य

बोटवे—एक प्रकारचे गहुले

बंगाळे—नक्षत्रमाळा (वधुवरांच्या मिरवणुकींत नेतात त्या)

भरतार—पति

भडंग्या—सढळ हाताचा, उदार

भासी भासा—भाची-भाचा

भानुशा (भाणवसा)—चुलीच्या मागचा कट्टा

भिंगारी—सर्वांगावर पांढरे ठिपके असलेलें

भुलावणी—मोहिनी

भुईफोड—भुई फोडून येणाऱ्या रोपाप्रमाणें नाजूक, सुंदर

भोरकडी—गुराच्या दाव्याला असते तशी फिरती कडी

भंडवाडा मांडणें—भंडावून टाकणें

मणी—मण्याचा दागिना उर्फ एकदाणी

मलपा देणें—हेलकावणें, डुलत चालणें

मावळा—मामा

मावळण—आत्या

माव–माया
माचाड, माचाण–मोट्येची लाकडी चौकट
मालत्या–एक प्रकारचे गव्हले
माळी–माडी
माळमुरड–माळावरचं गवत
मालदांडी–ज्वारीची एक हलकी जात
माऊलपण–दयाळूपणा
मिंनती–मनधरणी
मुराळी–नवऱ्यामुलीचा भाऊ
मूळ येणें–आमंत्रण येणें
मुगवी–मुगाएवढ्या बारीक चौकटीचे ( लुगडें, खण वगैरे )
मेट देणें–हटून बसणें
मेंढक्या–मेंढपाळ
मेढी–खांब
मेचणें–बघणें, मोजणें
मोतीचूर–धोतर, लुगडें यांस असलेला जरीकांठ
मोघा–मातीचा लोटा
मोघणें–मुख्य पिकांत दुसरें पीक पेरणें
मोघणा, मोगरा–मोघण्याचा नळा
म्होरकी–मारक्या जनावराचें दावें
म्होरं–पुढें
मंदील–रेशमी जरीचा पटका
मंडण–शोभा, अलंकार
यल्लमा–परशुरामाची आई, रेणुका. हें एक दैवत आहे
युगत–युक्ति
येरवाळी–लवकर
येळा–दंडांतल्या वांकड्या वाकी
रवंदळी चालणें– वाट तुडवणें
रणहलगी– एक रणवाद्य
राजध्यानी– राजबिंडा, राजस
राऊळ–देऊळ
राघुरंग–हिरवा
राहावा, रहिवास–वस्ती, राहाणें
रासणी–बी पेरल्यावर तें झाकून टाकण्यासाठीं फिरवायचें औत
रांडपण–वैधव्य
रासण्या–रासणी चालवणारा
राऊ–राजा
रेघन्दारी–रेखीवपणा
रंगकताई–उदी ( रंग )
रंगीला–रंगेल
लवण–खोलगट जागा, वळण
लई–पुष्कळ
लईदी–पुष्कळ दिवस
लबं धाडणें–निरोप धाडणें
लालवा–लाल रंगाचें लुगडें
लांब दोरी टाकणें–बरेंच अंतर पडणें

लाडी–लाडकी
लिंबू तोंडावर फुटणें–चेहरा टवटवीत दिसणें
लिंबु रसी रंग–हिरवट ( फिका ) रंग
लिडीलीडी–आगंतुक
वलण–कपडे ठेवण्याचें खुंटाळें अगर दोरी
वस–वंश
वायली–वेगळी
वानवळा–कंटाळा
वारधशी–वाऱ्यावर
वाकी–( केसांची ) कुरळ वळण
वाणीण–यल्लम्मा
वाण–रंग
वाणीतिणीचा–नवसाचा
विषबंध ( बिसुबंध )–एक वेल
विंद्रात्रण–कडू वृंदावन ( फळ )
वैराळ–कासार
वंगाळ–वाईट
शोहीघड–राजस
शाहीर–पोवाडे म्हणणारा
शाळूदीस–हिवाळ्यांतले लहान दिवस
शाळू–जोंधळ्याची एक जात
शिळूपा, शिळोपा–गारवा, सावली
शिवार–शेत
शिव–गांवाची हद्द
शीण–वय, बांधा
शिणव्या–मैत्रिणी
शिंगी–लहान घोडी
शिंगाड्या–शिंग वाजवणारा
शिरवा–थोडाच वेळ पडलेला जोराचा पाऊस
शुकीर–शुक्र
शेरी–खाजगी मालकीची जमीन
शेंब्या ( शेंबी )–शिंगास घालणेचें धातूचें टोपण
शेलाटा–उंच, सडपातळ माणूस
शेलारी–शालू, उंची लुगडें
शेलका–उत्कृष्ट, निवडक
शेरणी–नवस फेडण्याकरितां वाटलेली मिठाई
शेस भरणें–ओटी भरणें
शेमला–डोक्याला बांधलेल्या पटक्याचा शेवट
सजुरी–सांजोरी
सय, सई–आठवण
सई–सया–मैत्रीण, मैत्रिणी
सदर–दिवाणखान्याच्या पुढची खोली
सम्रत–समर्थ, श्रीमंत
सवें–बरोबर
सवं–संवय

सवती–वेगळी, स्वतंत्र

सभागती–सहज

सादवणें–हांक मारणें

साज–वेषभूषा

सांग्या–निरोप सांगणारा

साठ्याचा–समृद्ध

सापत्या–( सापती ) बैलगाडीला जुंपतांना बैलाच्या गळ्याखालून जोखडास बांधलेले दोरीचे अगर चमड्याचे पट्टे

साल सारणें–कैवार घेणें

साळ्वी–( लुगडें ) कोष्टाऊ लुगडें

सुपली–छोटें सूप

सुरत–रूप

सधवा–सधवा, सुवासिनी

सोजी–सांजा, रवा

सोनसळे–सोन्यासारखे पिवळेधमक

संगं, संगट, सांगाती–बरोबर

संजोग–समृद्धि, योग, जुळणी

संदी–शिपाई (सनदी-जमीन उत्पन्नाचा शिपाई)

सांजड–संध्याकाळ

हलगी–एक वाद्य. (हलग्या-हलगी वाजवणारा )

हरखणें–आनंदित होणें

हळदीचा गाभा–अत्यंत सुंदर रंग, अंगकळा

हळदाई–लग्नांत हळद लागण्याचा समारंभ

हरोळी–आरोळी

हिलाल–चंद्रज्योत, मशाल

हुन्नेरी–कलावंत

हेड्या–दलाल

हेळणा–अपमान, अवहेलना

हौशा–हौस, पुरवणारा, हौस असलेला

REFBK-0007846

५८४९

०४३१०
१०८६
२२१३

## —: आमचीं प्रकाशनें :—

**सौ. मालतीबाई दांडेकर** रु.

कथामालती २

विद्युत्‌रेखा १।।।

तेजस्विनी ५

अमोल आहेर ३।

उद्यांची कन्या ३

कन्येस प्रेमभेट १।

कृष्णरजनी ५

**कु. डॉ. क्षेत्रमाडे**

आधार ४।।

**प्रेमा कंटक**

अग्नियान ३

**यदुनाथ थत्ते**

जीवन धर्म १।

**शांतीलाल भंडारी**

तोंडचा घास १।।।

**ना. ल. व्हटकर**

अपराधी २

**सौ. मालतीबाई चोळकर**

चित्रलेखा ३।।

**भाऊ धर्माधिकारी**

बदला ब[illegible] ३

**खलील जिब्रान**

सलमा २।।

मानवतेचे राखणदार २।।

**सरदार प्रतापसिंग**

जोहार २।।

**वि. अ. कुलकर्णी** एम्. ए.

मराठी काव्यसमीक्षा ६

**डॉ. अग्रपुत्रे**

चारुमित्रा २।

**टॉलस्टॉय** रु.

सैतान २

**सर मणिलाल बी. नाणावटी व प्रो. अंजारिया**

हिंदी ग्रामीण जीवनाचा प्रश्न ७

**डॉ. भारतन् कुमारप्पा**

पुंजीवाद, समाजवाद कीं ग्रामवाद? ५

**वा. दा. मुंडले**

कार्ल मार्क्स व त्यांचें कार्य ...

**अप्पासाहेब पटवर्धन**

सेवाधर्म २

**महात्मा गांधी**

विद्यार्थ्यांशीं हितगूज २

स्त्रियांशीं हितगूज २।।

**दादासाहेब मावळंकर**

कांहीं पाऊलें २।।

**पं. जवाहरलाल नेहरू**

आव्हान १।।

**वसंतराव नारगोळकर**

भर दुपारच्या अंधारात ६

**ग. आ. लाड**

रामराज्य २

**स्वयंसेवक**

समाजमनाचा ध्येयतारा ५

**के. रा. पालकर**

शाळा व शारीरिक शिक्षण २

**माधवराव बागल**

कला आणि कलावंत भाग २ रा ३

**गणपतराव बोडस**

झांशीची राणी १।।

**व्यं. रा. खंडाळीकर**

आघाडीवर २


कव्हर छपाई: सर्वोदय प्रिं. मुंबई ४.